|| सखी शक्ति जयति ||
अनाहिता सादर करीत आहे
भटकंती विशेषांक
०८.०३.२०१६

मार्गसूची

नमस्कार, "काय आपल्याला एका मोठ्या सुट्टीची गरज आहे?" दूरवर कुठेतरी फिरायला जायचंय पण बॉस सुट्टी देत नाहीये, कामाचा रगाडा संपत नाहीये, पैसे आणि सुट्टीचा मेळ बसत नाहीये. हा कंटाळा घालवायचा उपाय हवा आहे पण तोही घरबसल्या. मग आम्ही आहोत ना. 'अनाहिता ट्रॅव्हल कंपनी' तर्फे आयोजित ही खास सहल अर्थात 'अनाहिता भटकंती विशेषांक'! घर, ऑफिस, ट्रेन, बस, रिक्षा कुठेही बसून कधीही एका लिंकवर क्लिक करा आणि वाचा 'अनाहिता भटकंती विशेषांक'! देश-विदेशातील अनेक प्रेक्षणीय स्थळं एका क्लिकवर फिरण्यासाठी उपलब्ध. तेही अगदी मोफत. अधिक माहितीसाठी वाचा ही मार्गसूची -

मोठ्या प्रवासाला निघायचं तर थोडी पूर्वतयारी हवी, नाही का?

मंडळी, झाली का तयारी? ६

आरोग्यपूर्ण प्रवासासाठी ८

सुरूवात जरा हटके आणि साहसी करायची म्हणताय? मग चला -

जंगल बुक ११

जुले चद्दर २२

पुढे कुठे जायचं? इतकं थकलोय की आता थोडं निवांत रमतगमत फिरायचंय म्हणता? मग युरोपात जाऊयात -

अविस्मरणीय ग्रीस – सँटोरीनी ३०

भटकंती लंडनची.. खेळवेड्यांसाठी! ४२

ग्रोस ग्लोकनर होख अल्पाईन स्ट्रासं!!! ४८

पायवाटा ५२

खेड्यामधले घर कौलारू... .... ५८

पुढे, आता पुन्हा जरा ताजेतवाने झाला असाल, तर जाऊयात अमेरिकेत -

वारी अमेरिकेची - सिक्स फ्लॅग आणि लेक जॉर्ज ६३

वारी अमेरिकेची ऑस्बल चाझम, व्हाईटफेस माऊंटन, हाय फॉल्स गॉर्ज ७१

वेगळ्या वाटेवरची सफर – ग्वाटेमाला ८०

चित्रकोडं ८७

पुन्हा जरा आपल्या मातीत फिरुयात -

माझ्या मामाचे ऐतिहासिक गाव ८८

सरप्राइज सहल ९३

When Ratnagiri Calls - अर्थात आमची रत्नागिरी वारी १०१

सिटी पॅलेस – जयपूर १०७
अमेर फोर्ट अंबर किल्ला - राजस्थान ११३
सहल गाणी! ११८
मनमोर हुआ मतवाला १२१
आता पुन्हा उडूयात दूरवर न्यूझीलंडला -
आनंददायी रहिवास अर्थात होम स्टे परदेशी घरातील वास्तव्य १२८
भटकंती विथ कलरिंग बुक्स १३५
प्रवासात न्यायच्या पाककृती १३७
मी, प्रवास आणि बरंच काही १४०
आसावरीची पर्यटन भरारी १४६
प्रवासातले अजून काही वेगळे अनुभव -
अमेरिकानुभव :एका भारतीय आईच्या नजरेतून १५८
स्पेन -परतीचा प्रवास १६३
प्रवासातले काही अनुभवः फतेहपूर सीकरी, दिल्ली आणि म्हैसूर बंगलोर १७१
झंडा ऊँचा रहे हमारा! १७४
उटिजैम अ विलागबान -"Útjaim a világban"- माझा जगप्रवास! १७६
मेरा जूता है जापानी... .... १८१
स्मरणवस्तू संकलन १८७
भटकंती गिफ्ट शॉप १८९
(पिडीएफ संकलन - किल्माऊस्की)

सहल संपली सुद्धा? की मनाने अजून फिरत आहात सगळीकडे? मग या सहलीबद्दल तुम्हाला काय वाटले ते प्रतिक्रियांमधून आम्हाला अवश्य सांगा आणि पुढच्या प्रवासाच्या तयारीला लागा. पुन्हा भेटूयात...मिसळपावचे सदस्य नसलेल्यांसाठी आमचे फेसबुक पेज - अनाहिता भटकंती विशेषांक"

संपादकीय

शुभास्ते पंथानः संतु!

बरोब्बर एक वर्षापूर्वी याच दिवशी, म्हणजे ८ मार्चला अनाहिताचा पहिला विशेषांक प्रकाशित झाला. देशोदेशीच्या अनाहिता कधी अंक दिसतोय याची वाट बघत होत्या. प्रत्येकीलाच उत्सुकता होती की गेले ३-४ महिने ज्या अंकाबद्दल चर्चा होत आहेत तो अंक प्रत्यक्षात कसा असेल? कुणी काय लिहिलं असेल? वाचकांना आवडेल का? असे अनेक प्रश्न. अखेर मुखपृष्ठ दिसू लागले, एकेक लेख दिसू लागले आणि मूर्त स्वरुपात पहिला अंक प्रकाशित झाला. विविध विषयांवर लेख, कविता यातून वाचक म्हणून अनेकांना आनंद मिळालाच, पण या सगळयासोबत त्यापेक्षाही महत्वाचा होता तो या अंकाने दिलेला आत्मविश्वास! सर्वजणी आयुष्यभर जतन करतील असा तो अनमोल क्षण होता. या अंकानंतर आता पुढचा अंकही इतकाच प्रभावी व्हायला हवा यातून पुन्हा काही महिन्यातच चर्चा सुरू झाल्या. विशिष्ट विषय घेऊन काहीतरी करायला हवे यातून रुची अंकाची निर्मिती झाली आणि पुन्हा एक वैविध्यपूर्ण अंक 'जागतिक अन्न दिवसा'च्या निमित्ताने प्रकाशित झाला. केवळ मिसळपावच नाही, तर इतरत्रही या अंकाचे कौतुक झाले आणि मग तेवढ्याच उत्साहाने अनाहिता सज्ज झाल्या वाचकांना 'अनाहिता' च्या पुढच्या विशेषांकाची सहल घडवायला! यावर्षीच्या जागतिक महिला दिनी तुमच्यासमोर अत्यंत आनंदाने सादर करत आहोत हा 'भटकंती विशेषांक'!

अगदी सुरूवातीच्या काळात जागोजागी भटकणारा मनुष्य पुढे स्थिरावला खरा, पण अनेक कारणांसाठी भटकंती हा प्रत्येकाच्या जीवनात आजही तेवढाच अविभाज्य घटक आहे, किंबहुना अनेक कारणांनी त्यात भर पडली आहे. हे सहलीचे अनुभव इतरांसोबत शेअर करणे हाही त्यातलाच एक भाग! पुलंपासून ते मीना प्रभुंपर्यंत दिग्गज लेखक-लेखिकांनी वाचकांना त्यांच्या प्रवासवर्णनातून सातासमुद्रापार फिरवून आणले. गेल्या काही वर्षात आंतरजालामुळे विविध ब्लॉग्स, लेख यामार्फत आपल्याला बसल्या जागेवर अनेकविध स्थळांचे दर्शन घडले. नवीन ठिकाणी जाताना माहिती शोधणे सोपे झाले. यातूनच विचारमंथन घडू लागले भटकंती विशेषांकाचे! कोण काय लिहिणार, काय असायला हवे यावर गप्पा रंगू लागल्या,चर्चा होऊ लागल्या. 'प्रवासवर्णन' हेच फक्त भटकंतीचे एकमेव स्वरुप नाही, हे लक्षात घेऊन भटकंती या विषयाशी निगडीत विविध पैलुंवर विचार केला गेला.

केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार।
शास्त्रग्रंथविलोकेन मनुजा चातुर्य येतसे फार॥

अशा मनुजा फार चातुर्य येणाऱ्या देशाटनात येणारे वेगवेगळे अनुभव, प्रवासासाठी करावी लागणारी तयारी, प्रवासात घ्यावी लागणारी काळजी, औषधे, साहसी सफरी अशा अनेक विषयांना स्पर्श करणारा हा अंक असावा या दृष्टीने अनाहितांनी आवडीप्रमाणे, त्यांच्या अनुभवांवर लिहायला सुरूवात केली. घर, मूल, करीअर या सर्वात गुरफटलेल्या असताना, अनेक जबबदाऱ्या खांद्यावर झेलत असलेल्या या सगळया जणी अंकासाठी म्हणून विशेष वेळ काढून लिहित्या झाल्या आणि हेच विविध अनुभव एकत्रितपणे गुंफणारा हा अनाहिता भटकंती विशेषांक आज प्रत्यक्षात तुमच्यासमोर आहे.

तर काय काय आहे या अंकात? या सहलीत जंगलसफारी आहे आणि आनंदाने नाचणारा मनमोरही आहे. सरप्राइज सहलीची वेगळीच कल्पना, प्रवासात येणारे बरेवाईट अनुभव आहेत आणि अगदी ज्याला मनमुराद भटकंती म्हणता येईल असे ट्रेक्स, पायवाटा धुंडाळत जाणारे ट्रेल्स, ऐतिहासिक ठिकाणांची वर्णने, खेळवेड्यांसाठीची एक वेगळीच भटकंती आहे. आपल्या

मातीतली रॉयल राजस्थानची सफर आणि अनवट अशा खेड्याची ओळख आहे. ग्रीसमधील शांत समुद्रातली सफर आहे, ग्वाटेमाला, ग्रोसग्लोकनर हाय अल्पाइनरोड सारख्या अनवट ठिकाणांची ओळख आहे आणि परदेशातल्या घरांमधलं आनंददायी वास्तव्यही आहे. प्रवासाला निघताना काय काळजी घ्याल? कोणती औषधे बरोबर ठेवाल ह्याचबरोबर अनेक ट्रॅव्हल टिप्सही आहेत. प्रवासात कंटाळा आला किंवा जरा विसावू या वळणावर..असे वाटले तर चित्रकोडे आहे आणि रंगवायला मंडलाचित्रंही आहेत. सातही खंडात पर्यटन केलेली आसावरी आणि पाच खंड कामा निमित्त फिरलेली विकी अशा काही मिसळपाव बाहेरच्या मैत्रिणीही आपल्याला गप्पांमधून भेटणार आहेत. प्रवासात भेटणारी माणसं कधी कधी जीवाचे मैत्रं कसे होतात हे सुध्दा खेड्यामधल्या कौलारु घरात उलगडले आहे आणि शेवटी परत जाताना आठवणींच्या खजिन्याबरोबरच स्मरणवस्तूंचा खजिनाही आहे. भटकंती म्हणजे छायाचित्रे हवीच, आणि प्रत्येक लेख अशा उत्तमोत्तम छायाचित्रांनी नटलेला आहे. शिवाय या अंकाचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल असा अजून एक मुद्दा असा की, फक्त विविध प्रकारचे लेख हा एकमेव केंद्रबिंदू न ठेवता त्यासोबतीने चित्र, ओरिगामी, क्रोशा अशा विविध कलांचे भटकंतीशी निगडीत स्वरुप देखील या संपूर्ण अंकात बघायला मिळेल आणि हे सगळं आहे 'मेड बाय अनाहिता'!! थोडक्यात एकाच ठिकाणी बसून या अंकाच्या निमित्ताने आपण आसेतुहिमाचल आणि विदेशातही शब्दरुपी, चित्ररुपी सफर करणार आहोत. अगदी सगळ्या खंडातून जगभर मनमुराद भटकंती करणार आहोत.

हा अंक तयार होऊन तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेकांचे मदतीचे हात लागले आहेत. आसावरी, मुग्धा आणि विकी ह्या तिघींनी अनाहिता नसूनही, या अंकाबद्दल समजल्यावर त्यांचे अनुभव इथे मांडायला तयारी दाखवली, त्याबद्दल त्यांना धन्यवाद! नीलकांत आणि प्रशांतने बंदिस्त दालन वेळेत खुले करून दिल्यामुळे तेथे काम करणे सुकर झाले. किलमाऊस्कीने सुरेख मुखपृष्ठ तर तयार केलेच, शिवाय वेगवेगळ्या कल्पनाही वेळोवेळी सांगितल्या. अंकाचे टीझरही तिनेच तयार केले आणि मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत अंकाची सजावटही केली. तिचे आभार मानून तिला परकं करत नाही पण कौतुक नक्कीच करतो. आवर्जून लेख देणाऱ्या अनाहिता आणि पडद्यामागे राहून मदत करणाऱ्या, प्रोत्साहन देणाऱ्या सर्वच अनाहिता, या सगळ्या जणी अंकाच्या खऱ्या शिलेदार कारण त्यांच्याशिवाय हा अंक पूर्ण झाला नसता. त्यामुळे ह्या अंकाच्या निर्मितीसाठी ज्यांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!

चला तर मग, भटकंती अंकात फेरफटका मारून या. मुखपृष्ठावरचा इमिग्रेशन स्टॅम्प तुम्ही पाहिला असेलच, ही या सहलीची सुरूवात, त्यापुढील प्रत्येक स्थळवर्णन, अनुभव तुम्हाला आवडतील अशी आशा आहे. आम्ही तुमच्या प्रतिसादांच्या प्रतीक्षेत आहोत. हा अंक तुम्हाला कसा वाटला ते आम्हाला अवश्य सांगा, ह्यात अजून काय आवडले असते यासाठी तुमच्या सुचवण्याही सांगा. अनाहिताच्या प्रत्येक नवीन अंकाच्या निमित्ताने नवीन अनाहिता लिहित्या होतील आणि हे अंक प्रत्येक वेळी नवीन विषय घेऊन वाचकांना आनंद देतील याची आम्हाला खात्री आहे.

तेव्हा निघूयात 'अनाहिता ट्रॅव्हल कंपनी' तर्फे आयोजित या महिला दिन विशेष सहलीला...

आपला प्रवास सुखाचा होवो!! हॅप्पी जर्नी! बॉन व्हॉयेज!!

- स्वाती दिनेश, मधुरा देशपांडे

"मिसळपावच्या बाहेर असणाऱ्या तुमच्या मित्रमैत्रिणींपर्यंत पोहोचण्यासाठी आमचे फेसबुक पेज-अनाहिता भटकंती विशेषांक"

© या अंकातील लेखांचे सर्व हक्क संबंधित लेखिकेच्या स्वाधीन. या अंकातील कुठलाही भाग/चित्रे, कुठल्याही स्वरुपात पूर्वपरवानगीशिवाय वापरता येणार नाही.

मंडळी, झाली का तयारी?

(लेखिका - किलमाऊस्की)

काय हे, अजून काहीच तयारी झाली नाहीये का? चला चला, आवरा पटापट...केव्हाचं सांगून ठेवलेलं आज निघायचं आहे म्हणून. चला चला बॅगा भरा...

कुठून घेतल्या बॅगा विचारताय...ती किनई मजाच्च झाली. अनाहिता गेलेल्या ना 'सरस' ला तिथूनच आणल्यात. काय बाई, नुस्ता धुडगूस घातला एकेकीने प्रदर्शनात. तुम्हाला म्हणून सांगते, बोलू नका कुणाला...कुठे न्यायची

म्हणून सोय नाही हो या बायकांना. वात आणला नुसता. हिरवे, काळे, निळे मिळतील त्या रंगाचे मसाले उचलत होत्या, पीठं काय नि चहा काय एक वस्तू सोडली नाही. एकीने तर सहा कानातली उचलली. आहात कुठे? आता काय भाज़ी करणार का सहा कानातल्यांची. पण ऐकणार नाहीत...जाऊदेत, तुम्ही आटपा लवकर...आधीच उशीर झालाय.

कपडे अजून वाळतायतचं का दोरीवर....

हम्म, काय म्हणता, घालतच होतात का घड्या. बरं...बरं...

छत्र्या घ्या हो आठवणीने, पाऊस असला तर उगाच तारांबळ नको.

टोपी पण घ्या, काय उन्हं वाढलीत आजकाल.. तुम्हाला सांगते मागच्या वर्षी आम्ही त्या तिकडे गेलेलो ना... ऊन काय मी म्हणत होतं. आमचे हे...काय म्हणता, आमच्या ह्यांच्या गोष्टी नंतर सांगूका?, बर्र...

आणि ते गॉगल काय आणून ठेवलेत ना काल.. हम्म्म भरले का ते?

तिकिटं?

अय्या पिकनिक बास्केट राहिलंच की....काय बाई इतकं हौसेने घेतलेलं या दिवसासाठी..

पाकिट कशाला घेताय... फुकट तर आहे सहल

चपला घाला आठवणीने.

कसं जायचं म्हणता...होडी आहे की तयार कधीपासून..कुठे निघालोय विचारताय? अर्रर्र...मेन मुद्द्याचं राहिलंच..सॉरी, सॉरी बरं का, अहो अनाहिताचा भटकंती अंक आलाय ना! त्याच्याच सफरीवर निघालोय. चला, निघायचं का?

आरोग्यपूर्ण प्रवासासाठी

(लेखिका- अजया)

आंतरजालामुळे जग कितीही जवळ आले असले तरी माणसाची एक आवड त्याला कधी एकाजागी बसू देत नाही. ती म्हणजे भटकंती! पूर्वी परदेश प्रवास, विमान प्रवास या सर्वाची तरी अपूर्वाई असे. आता मात्र आपण सहजगत्या जालावरून माहिती घेतो, पैसे पाठवतो, प्रवास ठरवतो आणि भटकायला निघतो. अशा सुंदर आखलेल्या प्रवासात जर कोणी आजारी पडले तर मात्र चांगलीच पंचाईत होते आणि सहप्रवाश्यांचा हिरमोड. म्हणूनच प्रवासाच्या पूर्वतयारीत अगदी महत्त्वाची तयारी हवी ती म्हणजे संभाव्य प्रवासी आजारपणांना तोंड देण्यासाठी लागणारे प्रथमोपचार आणि औषधांची. मागच्याच महिन्यात आमचे काही नातेवाईक इंदौर उज्जैनला फिरायला गेले होते. रात्री तिथे पोहोचता पोहोचता उशीर झाला. रस्त्यात एका ढाब्यावर सर्वांनी जेवण केले आणि लस्सी प्यायली. दुसऱ्या दिवशी खोल्या खोल्यांतून ओकारीगर्जना ऐकू येऊ लागल्या. सोबत अगदीच जुजबी औषधं नेल्याने सर्वांना तिथल्या सरकरी रुग्णालयाकडे धाव घ्यावी लागली. असे प्रसंग बऱ्याच लोकांना प्रवासात येतात. ते टाळण्यासाठी आपण काय काळजी घ्यायला हवी, काय औषधं सोबत बाळगावी हे या लेखात आपण बघूया.

कोणताही लांबचा प्रवास ठरला की सर्वात आधी आपल्या फॅमिली डॉक्टरांची गाठ घ्यावी. त्यांच्याकडून आपल्याला बीपीचा त्रास नसेल तरी चेक करून घ्यावे. डायबेटीस असल्यास साखर चेक करून घ्यावी. रोज लागणाऱ्या औषधांचे एक नवे प्रिस्क्रिप्शन डॉक्टरांकडून लिहून घ्यावे. ते प्रवासात सोबत असू द्यावे. तसंच रोज लागणाऱ्या अत्यावश्यक गोळ्या इमर्जन्सीमध्ये जास्त राहावे लागले तर या हिशेबाने निदान दहा गोळ्या जास्त ठेवाव्या. परदेश प्रवासासाठी जाताना प्रिस्क्रिप्शनवर डॉक्टरांची सही ,शिक्का असणे आवश्यक आहे. तसेच आपण ज्या देशात जाणार तिथे कोणती औषधे नेणे निषिद्ध आहे का जरूर तपासून घ्यावे. आपला आरोग्य विमा मूळ प्रत आणि कार्ड आपल्या सोबत असावेच. प्रवास कुठलाही असो, कितीही अंतराचा असो, ट्रॅव्हल कंपनीबरोबर प्रवास करताना ते आपला विमा बऱ्याचदा त्याच खर्चात उतरवून देतात. त्याची मूळ प्रत सोबत असणे आवश्यक आहे. तसेच घरीही एक प्रत देऊन ठेवावी.

लहान मुलं सोबत असताना :- अगदी लहान बाळ सोबत असेल तर बाळाची स्वतंत्र पिशवी सामानाच्या वजनाशिवाय घेता येते. त्यामुळे बाळाचे पुरेसे डायपर, वेटटिश्यु पेपरचे बंडल, कोरडे टिश्यू पेपर्, बाळाची पावडर हे सहज हाताला येईल असे ठेवावे. बाळासाठी दूध न घेता दूध पावडर घ्यावी. विमान प्रवासात गरम पाणी मिळू शकते. पोर्टेबल किटली असल्यास त्यात खोलीतही पाणी गरम करता येते. विमानातले खाणे, दूध बाळाला कधीही देऊ नये. यामुळे संसर्गाचा धोका असतो. विमान उडताना कानाला दडे बसून कान जोरात दुखून बाळ रडायला लागते. अशा वेळी बाळाच्या तोंडात पॅसिफायर देणे उत्तम. त्याच्या सकिंग ॲक्शनमुळे बाळाला दडे बसत नाही. प्रवास कोणत्याही वाहनाने असू दे, सोबत हॅंड सॅनिटायझर हवेच. मुलांना खायला देताना आधी सॅनिटायझर लावून हात वाळू द्यावा. मग खाण्यास द्यावे. मुलांना काहीही खायला देण्याआधी हात धुवायला लावणे आवश्यक आहे.

प्रवासातले अन्नपदार्थ- :- प्रवास म्हंटला की रोजचे बाहेर खाणे होणारच. त्यात संसर्ग होऊ नये म्हणून काय काळजी घेता येईल. प्रवासात आहोत म्हणून पॅकबंद ज्यूस इ. मुलांना देणे टाळावेच. हे पुढच्या संसर्गाचे कारण होऊ शकते. त्याचप्रमाणे थंड पेये, आइस्क्रीम, दुग्धजन्य पदार्थ शक्यतो टाळावेच. शक्यतो ताजे गरम अन्न खावे. आपल्या सोबत प्रवासात टिकणारे खाद्यपदार्थ जरूर असावेत. शक्यतो प्रवासात आडवा हात मारून जेवणे, अति तिखट, मसालेदार जेवण करून पुढचा प्रवास करणे टाळावे. एक तर त्याने अपचन होऊन अस्वस्थता येते, तसंच आम्लपित्ताने जळजळ सुरू

होऊन स्वतः ड्रायव्हिंग करत असल्यास चित्त विचलित होऊ शकते. पाणी शक्यतो हॉटेलात प्युरीफायर चांगल्या अवस्थेत आहे याची खात्री करून तिथले किंवा बाटलीबंद घ्यावे. मुलांची प्रतिकारशक्ती वाढवण्याचे प्रयोग प्रवासात अजीबात करू नयेत. रात्रीचे जेवण हलकेच घ्यावे. तसंच लहान मुलांना अगदी उठल्या उठल्या दूध वगैरे देऊन प्रवासाला निघू नये. त्यांना काहीतरी कोरडे खाद्यपदार्थ द्यावे उदा. बिस्किट. नुसत्या दुधाने मुलांना मळमळून येऊ शकते. तसंच नवीन पदार्थ खाऊन बघताना त्यात कशाचा अंतर्भाव केलेला आहे हे जरूर जाणून घ्यावे. आपल्याला ॲलर्जी असणारा एखादा घटक त्यात असल्यास उगाच त्रास होऊ शकतो.

आम्ही काही वर्षांपूर्वी कौसानीला गेलो असता आमच्या सोबत असणाऱ्या कुटूंबमित्राच्या मुलाने इतर मुलांनी मागवले म्हणून ऑम्लेट मागवले. त्याचे आई बाबा सावकाश उठून ब्रेकफास्टला येणार होते. या मुलाला ॲलर्जी होती अंड्याची. काही तासातच तो पोट दुखून हैराण झाला. मग आई बाबाच्या लक्षात आले काय गडबड झाली. त्याच्या दुखण्यामुळे रात्रभर जागरण होऊन या कुटूंबाला कौसानीचा अद्वितीय सुर्योदय बघताच नाही आला. असे हिरमोड करणारे प्रसंग येऊ नयेत म्हणून काळजी घेणे अत्यावश्यक आहे. तसंच शक्यतो रस्त्यावर मिळणारे पदार्थ प्रवासात खाऊ नये. हे एक धाडस चांगलेच अंगाशी आलेला एक किस्सा आमच्याच कोडाईकनालच्या वास्तव्यात घडलेला. आमच्यासोबत तेव्हा मांसाहार मनापासून आवडणारे एक कुटुंब होते. येता जाता रस्त्याने त्यांना तंदूर लावलेल्या गाड्या बघून चिकन खायची हुक्की आली. नंतर ते शिळे चिकन बाधून कुटुंब रंगलं ना उलट्या जुलाबात! अशा वेळी जर पुढचा ठरलेला ट्रेन, विमान आदी प्रवास असेल तर फार पंचाईत होते. आणि आपली गाडी घेऊन प्रवास असेल तर पाण्याचे गॅलन आणि सामान कसे माववावे हाही एक प्रॅक्टिकल प्रश्न उभा राहू शकतो! प्रवासात हॉटेलमध्ये ॲरेंज केलेले सॅलड ताजेपणाची खात्री असेल तरच खावे. तरीही शक्यतो शिजवलेले अन्न खाणे कधीही चांगले. कुठुनही आलो तरी जेवणाआधी हात स्वच्छ धुवून, निदान सॅनिटायझर वापरून स्वच्छ करूनच जेवावे.

प्रवासात उद्भवणारे आजार :- **वाहन लागणे**- काही लोकांना कुठलेही वाहन 'लागण्याचा' त्रास (मोशन सिकनेस) असतो. विशेषतः बस, विमान प्रवास, घाटाच्या रस्त्याने जाताना अशा लोकांना मळमळणे, उलट्या असा त्रास होऊ लागतो. हे टाळण्यासाठी जर नेहमीच हा त्रास होत असेल तर *tab avomine* डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रवासाआधी एक तास घेऊनच निघावे. या गोळ्यांनी झोप येऊ शकते. त्यामुळे ड्रायव्हिंग करणाऱ्या माणसासाठी या धोकादायक आहेत. काही खबरदारी घेऊन आपण हा मोशन सिकनेस कमी करू शकतो.

* शक्यतो गाडी किंवा बसच्या मागच्या सीटवर बसू नये.
* विमानात मधल्या सीट म्हणजे पंखाजवळच्या घ्याव्या. बोटीत मध्यभागी बसावे.
* शक्यतो मोकळा वारा खिडकीतून गाडीत येऊ द्यावा.
* बाहेर बघताना दूरवर नजर कैंद्रित करावी. हलत्या गोष्टी उदा. लाटा,धावती गाडी इ. बघत बसू नये.
* चालत्या वाहनात वाचू नये.
* अति जेवण करून प्रवासाला सुरूवात अजिबात करू नये.
* प्रवासात मद्यपान करू नये. तसंच अति तिखट,तेलकट, मसालेदार खाऊ नये.

जेट लॅग- * विमान प्रवासात भरपूर पाणी पीत राहाणे आवश्यक आहे.

* मद्यपान टाळावेच.
* अती कॉफी किंवा चहा पिऊ नये.
* विमानात डोळ्यावर लावायची पट्टी देतात. ती लावून झोप घेण्याचा प्रयत्न करावा.
* सतत एका जागी न बसता थोड्या थोड्या वेळाने मधल्या पॅसेजमध्ये चालावे. बसल्या जागी पायाच्या हालचाली कराव्या.

कानाला दडे बसणे किंवा कान दुखणे- हा अनुभव विमान प्रवासात हमखास येतो. तो टाळण्याचा बेस्ट उपाय आहे च्युइंगगम चावत राहणे, जेणेकरून जबड्याची हालचाल होऊन कानावरचे प्रेशर कमी होईल. तोंड आणि नाक बंद ठेवून नाकावाटे हवा ब्लो करण्याचा प्रयत्न केला की पटकन कानातला दडा सुटतो. शिवाय कापसाचे बोळे कानात घातले तरीही त्रास कमी होण्यास मदत होते.

पोट बिघडणे- प्रवासात अन्न पाणी बदलल्याने किंवा अन्नामुळे विषबाधा होऊन पोट बिघडणे ही अगदी कॉमन तक्रार असते.अशा वेळी काय करावे?

* सर्वप्रथम भरपूर पाणी आणि इलेक्ट्राल किंवा पुनर्जल पीत राहणे. दर जुलाबानंतर पाणी पीत राहणे अत्यंत आवश्यक आहे.

* Tab ciprofloxacin किंवा tab.normetrogyl आपल्या प्रवासी औषधात असू द्यावे. ही अँटीबायोटिक्स आहेत. यांच्यासोबतtab.loperamide खूप जुलाब होत असतील तर ते थांबवायला घ्यावी विशेषतः प्रवासात बराच वेळ टॉयलेट मिळण्याची शक्यता नसेल तर घ्यावीच, तसंच पाण्यासारखे जुलाब नॉर्मल होण्यासाठी cap.rinifol जी आपल्या आतड्यातले चांगले बॅक्टेरिया जे जुलाबामुळे वाहून गेलेत ते परत देऊन आतड्याला ताळ्यावर आणते. रिनिफॉल दिवसातून दोनदा पुढे पाच दिवस घेतच राहाव्या.

* साधे गरम आणि पचायला हलके अन्न खावे.

* गोळ्यांनी लक्षणे कमी न झाल्यास नजीकच्या हॉस्पिटलात डॉक्टरना दाखवून घ्यावे.

* उलट्या होत असल्यास tab.ondem md 4mg चघळून खावी. कमी न झाल्यास हॉस्पिटल जरूर गाठावे.

* पोट जड झाल्यास किंवा नेहमी ॲसिडिटी होत असल्यास *tab. pan d, tab.gelusil* सोबत असू द्याव्या.

ताप सर्दी खोकला- प्रवासात प्रदूषण, हवा बदलाने विषाणूजन्य आजार होणे कॉमन आहे. अशावेळी आपल्या सोबत सर्दीची गोळी उदा. सिनारेस्ट् (*Sinarest*), तापासाठी क्रोसिन सोबत असलेली बरी. स्ट्रेप्सिलच्या चघळायच्या गोळ्या खोकल्याला तात्पुरता आराम देऊ शकतात.

किटकदंश ॲलर्जी *anything under the sun including the sun can give you allergy*. म्हणूनच सोबत ॲलर्जीची गोळी नेहमी हवी. अचानक गवतात किडा वगैरे चावल्यासदेखील या गोळ्या उपयोगी पडतात. tab.allegra सोबत असल्यास ॲलर्जीने येणारी खाज, सूज, नाक वाहाणे ही लक्षणं कमी होतात.

धडपडणे, खरचटणे- हे कधीही होऊ शकतं. सोबत एखादे अँटिसेप्टिक क्रीम, बँडेडच्या पट्ट्या, असू द्याव्याच. एखादे क्रेप बँडेज पण ठेवायला हरकत नाही. पाय मुरगळल्यास त्याच्याने पाय बांधून ठेवल्यास बरे वाटते. अंग दुखून आल्यास घेण्यासाठी *tab.combiflam* आपल्या ट्रॅवल किटमध्ये जरूर असावी. या सर्वांबरोबर छोट्या डबीत लवंगा, थोडा ओवा घेतला असल्यास ऐन वेळी कामाला येतो. कापूस, गॉझ्, डेटॉलची छोटी बाटली हेदेखील सोबत असावेच.

High Altitude Sickness - समुद्रसपाटीपासून जसजसे वर जाऊ, तसे कमी ऑक्सिजन आणि उंचीला जुळवून घेण्यासाठी*Diamox* या गोळ्या मिळतात. त्या सोबत असाव्यात पण जाण्यापूर्वी डॉक्टरांना याबाबत विचारून त्यांच्या सल्ल्याने घ्याव्यात. शिवाय कापूर जवळ ठेवावा. रोपवे ने बरंच उंचीवर जायचं असेल तर काही वेळा कानाला दडे बसतात. त्यासाठी च्युईंग गम चघळणे हा एक उपाय आहे किंवा कानात कापूस घालावा. कानाला दडे बसलेच तर नाक बंद करून श्वास बाहेर सोडण्याचा प्रयत्न करायचा. अशा प्रकारे व्यवस्थित विचार करून जर आपण जर आपले प्रवासात आरोग्य सांभाळण्यासाठी एक किट तयार केले तर आपला प्रवास नक्कीच सुखाचा आणि आरोग्यपूर्ण होऊ शकेल. शुभास्ते पंथानः सन्तु||

जंगल बुक

(लेखिका- गिरकी)

लहानपणीच्या प्रत्येक सुट्टीच्या अनेक उद्योगांपैकी एक उद्योग ठरलेलाच असायचा : ग्रंथालयातून पुस्तकांचा ढिगारा आणणे आणि रात्रंदिवस वाचनात बुडून जाणे. या ढिगाऱ्यात आधी चुकून प्रवेश केलेल्या जिम कॉर्बेट आणि चितमपल्लींनी सुट्टीगणिक अख्खा गठ्ठा कधी काबीज केला ते मला कळलं सुद्धा नाही. त्यांची अरण्य वाचने अगदी खुळावून टाकायची. नर-भक्षकांचा माग काढणे काय आणि झुंजूमुंजू झालं की पाखरांसोबत रान मेव्याची न्याहरी करणे काय, सगळंच कसं परीकथेतल्या सारखं वाटायचं. पुस्तक वाचता वाचता मनातल्या मनात सगळी जंगले फिरून सुद्धा झालेली, पण तेव्हा कधी प्रत्यक्ष या रानांची फेरी झाली नाही. हळू हळू शिक्षण पूर्ण झालं. गाडी संसाराला लागायच्या बेताला आली आणि कर्म-धर्म संयोग का काय म्हणतात त्यानुसार असाच जंगल वेडा पण कधी जंगलात न गेलेला जोडीदार लाभला आणि बुकातली जंगले आमच्या प्रत्येक सुट्टीचा खराखुरा भाग बनली :)

तीन वर्षांत भारतातली प्रसिद्ध जंगले जीप सफाऱ्या किंवा ३-४ तासांचे 'नेचर वॉक' करत फिरून झाली. वाघांचा शोध घेऊन झाला. एकेका जंगलात ५-६ सफाऱ्या अशी ४-५ जंगले करून सुद्धा ३ वर्षांत वाघोबाने एकदाही दर्शन दिले नाही. जंगलाचा वास, दाटपणा, गूढ शांतता, खूप आशा घेऊन कानाकोपऱ्यात भिरभिरणारी नजर, कॉल ट्रेस करण्यासाठी टवकारलेले कान ई. मध्ये आधी खूप थ्रिल वगैरे वाटायचं. वाघोबा सोडून खूप प्राणी भेटायचे, खूप छान आणि वेगळे पक्षी दिसायचे पण हळू हळू कंटाळा यायला लागला. काहीतरी मिसिंग होतं...उसमे वो पुस्तकवाली बात नहीं थी :(जिम कॉर्बेट, चितमपल्ली, माडगुळकर वगैरे लोक्स काही असे जीप मधून किंवा बफर झोन मधून नाही फिरायचे. आणि आमचे कोणी काके, मामे फारेष्ट खात्यात नसल्याने कुठला वशिला लागून पर्यटकांना मिळणाऱ्या गोष्टींपेक्षा जास्त काही मिळायची शक्यताच नव्हती. पण तरी ज्याच्या नशिबात 'वनवास' लिहिलेला असतो त्यांना तो मिळतोच!! तर त्याचं झालं असं, की कधीतरी बोलता बोलता एका मित्राने पेरियारच्या जंगलातले फोटो दाखवले. हे जंगल काही वाघोबांसाठी प्रसिध्द नाही. त्यामुळे आम्हाला त्याचा काही विशेष पत्ता नव्हता. पण 'पेरियार' हे नाव 'कधीतरी जाण्याच्या जागा' या लिस्ट मध्ये जाऊन बसलं. हेच ठिकाण आमचं जिम कॉर्बेटचा चेला बनायचं स्वप्न पूर्ण करणार आहे हे आमच्या गावी सुद्धा नव्हतं.

एका मे महिन्यात 'चला...कुठेतरी जाऊया ना' चा धोसरा चालू झाला आणि अशात अचानक 'पेरियार' ची आठवण झाली. पेरियार फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या पानावर २ आणि ३ दिवसांच्या जंगल ट्रेक्सची माहिती होती. पण हाय रे दैवा... त्यातले काहीही बुक करण्यासाठी किमान १५ दिवस आधी डिपार्टमेंटला 'डी.डी.' नेच पैसे पाठवणे गरजेचे होते. आणि 'शासकीय' असल्याने संपर्कासाठी दिलेल्या क्रमांकाचा फोन उचलणे आणि उचललाच तर माहिती देणे हे त्यांच्या खात्याच्या धर्मात बसत नव्हतेच. या ठिकाणावर पाणी सोडण्यापूर्वी आम्ही एकदा गूगलबाबाला शरण जायचं ठरवलं आणि गूगल बाबाने प्रसाद म्हणून 'पेरियार टायगर ट्रेल्स' च्या पानावर आम्हाला नेऊन सोडले. यावर दिलेल्या फोनवर चक्क मनुष्यप्राणी अवतरला आणि त्याने आम्हाला या २ किंवा ३ दिवसांच्या जंगल ट्रेलची यथासांग माहिती दिली. आणि आम्हाला हव्या त्या तारखांना ट्रेल साठी शेवटच्या २ जागा शिल्लक असल्याचे सांगितले. तो खरं म्हणजे एक एजंट होता आणि त्याचे कमिशन म्हणून थोडे जास्तीचे पैसे मागत होता. शिवाय हा आधी पैसे घेऊन ऐनवेळी उगवलाच नाही तर वगैरे वगैरे शंका होत्याच. पण आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवायचे ठरवले आणि प्रत्येकी १००० रुपये आगाऊ रक्कम म्हणून त्याच्या खात्यावर भरून टाकले.

कार्यक्रम एकंदर असा होता:
एका ग्रूप मध्ये जास्तीत जास्त ६-७ जण असतील. पहिल्या दिवशी सकाळी साधारण १० वाजता फॉरेस्ट ऑफिस पासून ट्रेक चालू करायचा. साधारण ४ तास ट्रेक करून १० किमी आत जंगलात पोहोचायचे. तिथे २-३ तंबू टाकून आणि त्याभोवती चर खणून बेस कॅम्प बनवला आहे. तिथे सामान ठेवून जेवण आणि थोडी विश्रांती घेऊन दुपारी पुढच्या ट्रेकला निघायचे. पुन्हा १० किमी किंवा साधारण ४ तास भटकायचे आणि अंधार पडला की मुक्कामी परत. दुसऱ्या दिवशी ज्यांना परत जायचे असेल त्यानी परत जायचे आणि बाकीच्यांनी असेच अजून २ ट्रेक करायचे. या लोकांनी तिसऱ्या दिवशी नाश्ता करून ट्रेक करत जेवायच्या वेळेपर्यंत पुन्हा फॉरेस्ट ऑफिसला यायचे. किंमत वगैरे खात्याच्या वेबसाईटवर आहेच.

आम्ही पैसे तर भरलेच होते. पण मोठा प्रश्न होता की जायचे कसे?
एजंट कडून कळले की फॉरेस्ट ऑफिस 'कुमली'(Kumily - केरळमध्ये) नावाच्या गावापासून ५ किमी वर आहे. तुम्ही कुमलीला पोहोचा. तिथून मी तुम्हाला पिक अप करेन. आणि कुमली म्हणजेच 'थेक्कडी' म्हणून प्रसिध्द असलेले पर्यटन स्थळ. आम्ही बंगळूरूवासी असल्याने तिथून कुमलीला पोचणे हा काही फार अवघड मुद्दा नव्हता. बंगळूरू पासून कुमली पर्यंत रात्रीच्या स्लीपर बसेस आहेत. कोचीन पासून सुद्धा खूप बसेस उपलब्ध आहेत. आम्ही बंगळूरू मधून रात्री ७ ला निघणारी आणि सकाळी ७ ला कुमलीला पोहोचवणाऱ्या बसची तिकिटे काढली आणि आमच्या प्रवासाची पाया-भरणी झाली.

आता ३ दिवस ट्रेक करायचा म्हणजे तयारी करणे गरजेचे होते. खाण्या-पिण्याची सोय तेच करणार होते. पण ऐनवेळेस लागलं तर असुदेत म्हणून घेतलेल्या अगणित गोष्टी आणि आमच्या मालकांची लाडकी बासरी वगैरे वगैरे जामानिमा तब्बल ४ बॅगा भरून झाला. आणि मग लक्षात आले की आपले सामान आपले आपण पाठीवर घेऊन फिरायचे आहे. आता सामानाला कात्री लावणे आले! या कामात आमचे मालक एकदम वाकबगार असल्याने त्यांनी आम्हाला हाताची घडी आणि तोंडावर बोट एका कोपऱ्यात बसवले आणि आमचे सामान प्रत्येकी १ पाठीवर लावायची बॅग येवढेच झाले.

फायनल सामान: प्रत्येकी ३ पँट्स-शर्ट, ४ अंतर्वस्त्रे, ५-६ जोड मोजे, दोघांत मिळून १ टॉवेल, टोप्या, इमर्जन्सी लाईट, प्रत्येक दिवसासाठी मोजून घेतलेला एनर्जी युक्त लहान आकाराचा खाऊ, कॅमेरा आणि त्याचे सोबती आणि मालकांची लाडकी बासरी येवढेच होते. तरी मी हळूच रात्री घालायचे कपडे, पेन बाम आणि २-४ क्रीमच्या बाटल्या घुसवल्याच.

येवढे करता करता तयारीचे दिवस संपले आणि आम्ही कुमलीला जाणाऱ्या वाहनात स्वार झालो. खूप घाट रस्ते ओलांडत ओलांडत आम्ही सकाळी ८ च्या सुमारास कुमलीला जाऊन धडकलो. एक प्रसाधनगृह असणारे उपहारगृह शोधले. आन्हिके उरकून तेथेच ट्रेकचे कपडे चढवले आणि एजंटला फोन केला. तो खरेच येईल की पैसे खड्यात गेलेत याचा विचार चालू असतानाच तो भला माणूस येउन हजर देखील झाला. त्यालाच विचारून जवळचे एटीएम गाठले आणि पैसे काढून उर्वरीत रक्कम त्याच्या स्वाधीन केली. त्याने स्वत:च्या गाडीतून आम्हाला फॉरेस्ट ऑफिसला पोहोचवले. ज्या लोकांकडे इतर प्रवासाचे सामान असेल त्यांच्या साठी जास्तीचे सामान ठेवायला या ठिकाणी लॉकर्स उपलब्ध आहेत. तिथे पोहोचल्यावर आम्ही रीतसर फॉर्म वगैरे बघून नोंदणी केली. आणि आम्ही खरोखरच ट्रेकला जाणार आहोत यावर शिक्का-मोर्तब झाले. आता बाकीच्या ग्रूपची वाट पहायची होती.

तोपर्यंत त्यांनी आम्हाला मोज्यांच्या आणि पँटच्या वरून घालून गुडघ्यापर्यंत येणारे खाकी मोजे घालायला दिले. आणि त्याच्यावर भरपूर तंबाखू चोपडली. त्यामुळे जळवांच्या पुर्वानुभावाने पुरेपूर जळलेले आम्ही 'या जळवानो...बघुया तुमचं

काय होतंय' अशा आवेशात इतरांची वाट पाहत उभे राहिलो. थोड्या वेळात एक एकटी बेल्जियन मुलगी आणि एक ऑस्ट्रेलियन जोडपे येउन आमच्या ग्रूपमध्ये सामिल झाले. आणि आम्हाला अगदीच 'लकी' वगैरे ठरवण्यासाठी एक प्रसिध्द नॅचरलिस्ट आणि डॉक्युमेंटरी मेकर या ट्रेकचे चित्रीकरण करण्यासाठी एका पत्रकार बाईंच्या सोबतीने आमचे सोबती झाले. अशा प्रकारे आम्ही ७ जण आणि ३ बंदुकधारी गार्ड अशी एक ओळ पेरियारचे जंगल तुडवायला सज्ज झाली! माझं लहानपणी पासून जपलेलं स्वप्न चक्क खरं होणार होतं!

९.३० - १० वाजता आम्ही ट्रेकला सुरवात केली. मलबार स्क्विरल तथा शेकरू, वेगळ्याच प्रजातीचा कोळी, २-३ पक्षी, फणस खाणारी माकडे असे बघत आम्ही रमत गमत निघालो होतो. इतक्यात एका गार्डने शूक शूक करून तोंडावर बोट ठेवले आणि दुसरे बोट कुठेतरी झाडा झुडपाकडे रोखून धरले. आम्ही डोळे ताणून ताणून काय आहे ते बघायचा प्रयत्न करू लागलो पण काहीच दिसेना. मग तो दबकत दबकत पुढे जाऊ लागला आणि आम्ही त्याच्या मागे मागे. आणि अचानकच अगदी १० फुटांवर डोळ्यासमोर २ डोळे आणि २ शिंगे दिसली. आमचा गाईड पुटपुटला 'इंडियन गौर!! तो आडदांड प्राणी आमच्या पासून १० फुटांवर उभा होता आणि त्याच्या मागे त्याचा अख्खा कळप. खरं तर घाबरायची वेळ आमची होती पण आमच्यापेक्षा हजार पट शक्तिमान प्राणी आम्हाला घाबरून श्वास रोखून स्तब्ध उभा होता. आम्ही काय करू शकतो याचा अदमास घेत होता. २-३ मिनिटे अशीच स्तब्धतेत गेली आणि आम्ही त्या कळपाच्या आणखी जवळ सरकू लागलो. आणि मग अचानकच खळबळ झाली आणि तो कळप उलट दिशेला गायब झाला. आमच्या ट्रेकच्या पहिल्या १५ च मिनिटांत त्या जंगलच्या मूळ वासियांपैकी एकाच्या झुंडीने आमचं स्वागत करून शुभ शकुन केला होता. आमची ही ट्रीप अविस्मरणीय होणार यात आता शंकाच उरली नव्हती :) पेरियार मधल्या हत्ती, अस्वले (स्लॉथ बेअर), वाघोबा, बिबट्या यापैकी उरलेल्यांच्या ओढीने आम्ही पुढे कूच केले.

थोड्या वेळात एक प्रचंड मोठे पण पोकळ बुंधा असलेले झाड लागले आणि त्या झाडाच्या ढोलीत आम्ही प्रवेश केला. मिट्ट काळोख होता आत. गाईडने काड्यापेटीची काडी पेटवली आणि शोधाशोध केली. ३-४ काड्या खर्ची घातल्यावर तो उत्साहाने जवळ बोलावून बुंध्याला घट्ट चिकटून लोंबणारी छोटीशी गोष्ट दाखवू लागला. नीट दिसेना म्हणून लोकांनी



फोनच्या दिव्याचे झोत पाडायला सुरु केले तेव्हा आमच्या सोबतचे 'डॉक्युमेंटरी काका' रागवले. मग शिस्तीत एकेकाला बोलावून काडी पेटवून दाखवली तर समोर एक पिटुकलं वट-वाघूळ होतं. बारीकशा लुकलुकत्या डोळ्यांनी इकडे-तिकडे बघत मजेत लोंबकळत होतं. 'हॉर्स शू बॅट' चं पिल्लू होतं ते. काका रागावले कारण दिव्यांमुळे घाबरून जर ते ढोलीबाहेर उडून गेलं असतं तर त्याला कुणीतरी खाऊन टाकलं असतं. ते स्वत:चं रक्षण करण्याएवढं मोठं झालं नव्हतं. वट-वाघूळाच्या क्यूटपणानी हरखलेले आम्ही पुढे चालायला लागलो.

पेरियार तलावाचा एक प्रवाह आम्हाला आड आला. फारतर गुढघ्यायेवढे पाणी होते. त्यामुळे बूट वगैरे हातात घेऊन आम्ही मजेत तो प्रवाह पार केला आणि दुसऱ्या काठावर फतकल मारून बसलो. एक दोन एनर्जी बार आणि २ लिटर

पाणी संपवून पाठीवरचे ओझे कमी केले आणि त्या मस्त गार हवेत पुढे जायला लागलो. वाटेत रानातच राहणाऱ्या मासेमार लोकांच्या तुरळक झोपड्या दिसत होत्या. लहान सहान पोरी आणि आज्ज्या तलावात उतरून वेगळ्याच प्रकारे चिंगळे मासे पकडत असताना दिसल्या. चालता चालता दूर एका टेकडीकडे बोट दाखवून तिथे आमचा बेस असल्याचे गार्डने सांगितल्यावर दमलो असल्याची जाणीव वाढली. हळू हळू घसे कोरडे पडत होते. भूक लागायला लागली होती. पाय बोलायला लागले होते. तसेच पाय ओढत बरेच अंतर चालल्यावर गार्ड लोकांनी परत कल्ला केला आणि 'थांबा थांबा थांबा' सुरु केले. त्यातल्या एकाने काटकी घेऊन धुळीत गोल केला आणि सांगितले की 'टायगर पगमार्क'...वाघाच्या पायाचे ठसे!! हा प्रकार आमच्यासोबत आधी एकदा घडला होता आणि तेव्हा आमच्या पुढच्या जीपला वाघ दिसून पण आम्हाला या मार्क्सवरच समाधान मानावे लागले होते. यावेळी पण गाईडच्या मते वाघोबाला शोधणे खूप अवघड होते कारण त्या जंगलात वाघ खूप कमी आहेत, जंगल खूप दाट आणि गर्द हिरवे आहे आणि एका वाघाला तेथे जवळपास २५ एकर प्रदेश भटकायला मिळतो. त्यामुळे वाघ सापडणे जरा अवघडच होते. आमचा जरी विरस झाला असला तरी जवळपास असलाच तर आपल्याला दिसलाच पाहिजे अशा निग्रहाने सतर्कतेने वाटचाल करायला लागलो. वाघोबा शोधता शोधता बेसकॅम्पचा रस्ता भर भर संपला.

बेस कॅम्प खरोखरच अगदी 'बेसिक' प्रकारचा होता. २ माणसे जेमतेम आत जातील असे ३ छोटुकले तंबू होते. चुलीचा प्रकाश बाहेर पडू नये अशा प्रकारे बांधलेले पत्र्याचे झोपडे आणि त्यात एका बाजूला चिमुकले डायनिंग टेबल असे छोटेखानी स्वयंपाकघर होते. आणि त्या डायनिंग टेबल वर गरमा गरम काळा चहा आमची वाट पहात होता. सगळेजण चहावर तुटूनच पडले. चहा संपता संपता टेबलवर पिकलेली सोनकेळीसुद्धा येउन बसली आणि फटक्यात अदृष्यपण झाली. गार्ड दादाने सांगितले की थोडे फ्रेश व्हा, तोपर्यंत जेवण होतंच आहे.

पोटात जरा धुगधुगी आली होती तेव्हा ईकडे-तिकडे लक्ष जायला लागले. आमचा बेस कॅम्प अत्यंत प्रेक्षणीय जागी वसला होता. पेरियार तलावाच्या काठावरील एका लहानश्या टेकडीवर तंबू घालण्यायेवढीच जागा रिकामी करून त्यात तंबू ठोकले होते. आणि बाजूने २० फूट खोल आणि ५-६ फूट रुंद चर खाणला होता. चर ओलांडायला एक ओंडका टाकला होता. चारी बाजूने गर्द झाडी, एका बाजूला जरा खालच्या उंचीवर मोठा माळ आणि उरलेल्या सगळ्या बाजूंना वेढून वळणे घेत पसरलेला, नदीचा धाकटा भाऊ वाटेल असा शांत, नितळ पेरियार तलाव! सगळीकडे किर्र शांतता आणि सुखद रंग. माणूस शांतवत नाही गेला तरच नवल...या शांततेची अनुभूती घेत पेरियार तलावाच्या स्वच्छ पाण्याने हात पाय धुवून सगळे तलावाकाठीच पसरले. अर्ध्या तासातच गार्ड दादा जेवायला बोलवायला आले. टेबलवर स्वच्छ ताटल्या मांडल्या होत्या. टॅपिओकाच्या कंदाचा उपमा आणि कांदा, टोमॅटोची कोशिंबीर असा साधा पण भरपूर कर्बोदक युक्त मेनू होता. पहिल्यांदाच खात होते सगळेच जण. चव भन्नाटच होती. सगळ्यांनी अगदी भरपेट खाल्लं आणि पुन्हा एकदा डुलकी काढायला सगळे तलावाकाठी जाऊन पसरले. केरळ आणि मे महिना असुनही उंचीवर आणि गर्द झाडीत असल्याने वातावरण सुखद थंड होतं. वाऱ्याच्या मंद झुळकी येत होत्या. झाडाखाली पडल्या पडल्या मस्त गाढ झोप

लागली. दीड-दोन तासांत जरा उन्हे कलायला आल्यावर गाईडनं सगळ्यांना जाग आणली. डोळे उघडल्यावर कळलं की झोपेनी मस्त काम केलंय आणि मेंदूसोबत शरीरसुद्धा हलकं आणि ताजं तवानं झालंय. पुन्हा एकदा काळ्या चहाचे २-३ कप रिचवले. थोडे पाणी, एनर्जी बार्स आणि गार्ड काकांनी सोबत असुदेत म्हणून दिलेली थोडी सोनकेळी पाठीवर टाकली आणि आमच्या ट्रेकच्या पुढच्या टप्प्यासाठी मार्गस्थ झालो.

हा टप्पा थोडा लांबचा आणि अजून दाट जंगलातला होता. त्यासाठी पेरियार तलाव ओलांडून पलिकडच्या टेकडीवर जायचं होतं. त्यासाठी तराफा बनवून ठेवला होता. तराफ्यात बसून तलाव पार केला आणि तिकडच्या गवतातून, झुडपातून पक्षी प्राणी शोधत फिरत राहिलो. घोरपड तथा मॉनिटर लिझार्ड, लाल रंगाचे मुंगुस वगैरे बारीक सारीक प्राणी दिसत होते. मध्येच वरून कुठूनतरी फ़ाट्ट फ़ाट्ट फ़ाट्ट फ़ाट्ट असा जोरदार आवाज यायला लागला. आणि प्रचंड मोठ्या पंखांनी हवा कापत जाणारा ग्रेट हॉर्नबिल म्हणजे आपला धनेश दिसला. वेग-वेगळे रानटी मश्रूम, वेग-वेगळी झाडे बघत आम्ही हुंदडत होतो. पुढे एक आणि मागे एक बंदुकधारी गार्ड घेऊन आमची टोळी रानांत भिरभिरत होती. गाईड काका कसली कसली रानफळं काढून चाखायला देत होते. इतक्यात एक मोकळे माळरान लागले आणि तिथे एक प्रचंड मोठा सांगाडा पडलेला दिसला. गाईडने सांगितले की काही दिवसांपूर्वीच एका वाघोबाने एका हत्तीला तिथे लोळवले होते. वाघाने चाटून पुसून खाल्यावर उरलेला हत्तीचा सांगाडा तिथेच पडून होता. आम्हाला या प्रसंगाचे मोशन सेन्सर वर नाईट व्हिजन कॅमेरा वापरून केलेले चित्रीकरण सुद्धा बघायला मिळाले. पुढे पुढे वाटेत अनेक ठिकाणी आम्हाला असे गव्याचे, सांबरांचे वगैरे सांगाडे, देखणी शिंगे वगैरे पडलेले दिसले. वेगवेगळ्या पक्षांची रंगीत पिसे मिळाली. पण हे सगळे बघून, मनांत साठवून तिथेच सोडून जायचे होते. आता अंधार पडायला आला होता. झपझप पेरियार तलाव गाठायचा होता आणि तराफ्यात बसून मुक्कामी तंबू गाठायचा होता. कितीपण झपझप चालले तरी तलावाला पोचायच्या आधी किर्र काळोख झालाच. डोळ्यात बोट गेलं तरी दिसलं नसतं. दिवे लावायला परवानगी नव्हती. त्या अंधारात सुद्धा गाईड काका सफाईदारपणाने रस्ता तुडवत होते आणि आम्ही त्यांच्यावर हवाला ठेवून त्यांच्या मागे जात होतो. प्रत्येकानी हातात एकेक काठी घेतली होती आणि काठी आपटत पदयात्रा चालू होती. काठी आपटून जमिनीत होणाऱ्या कंपनाने साप आणि ईतर प्राण्यांना वाटेत न येण्याचा इशारा मिळतो म्हणे. जीव मुठीत घेऊन शक्य तितक्या जोरात काठी आपटत एकदाचे आम्ही ताराफ्याजवळ जाऊन पोचलो. त्यानंतरची १५-२० मिनिटे अक्षरश: 'तिलिस्मी' वगैरे होती. प्रचंड पसरलेला पेरियार तलाव काळोखात बुडून गेला होता. त्यावरून संथ तरंगत तरंगत आमचा तराफा चालला होता. वरती त्याच रंगाचे आकाश. तलावात आणि आकाशात फरक इतकाच की आकाशात असंख्य चांदण्या सांडलेल्या होत्या. अनादी अनंत काळ या तराफ्यात पडून हे चमचमतं आकाश बघत रहावं, कुणी कुणाशी बोलू नये, काही करू नये असं प्रत्येकालाच वाटत असावं. सगळेच जण चिडीचूप होऊन ते दृष्य डोळ्यात साठवून घेत होते. त्या तलावात कुठेतरी हरवून जावं अशी आमची लाख इच्छा असली तरी गार्ड काकांनी आम्हाला तंबू जवळ आणून सोडलेच.

आता हळू हळू सगळेजण त्या स्वप्नातून वास्तवात आले. ठणकून निघालेले पाय आणि पोटात उसळलेली भूकच त्याला जबाबदार असावी. बूट सुद्धा न काढता सगळे जेवायला बसले. मेणबत्तीच्या प्रकाशात वाढून ठेवलेला केरळी लाल तांदळाचा वाफाळलेला भात, खमंग सांबार, २ भाज्या, १ कोशिंबीर असं चारी ठाव जेवण बघून भूक अजूनच खवळून निघाली. इतक्या उत्कृष्ट चवीचं जेवण अख्खा केरळ पालथा घातला तरी परत कधीच मिळालं नाही. खोबरेल तेलात केलेल्या फोडण्या, जंगलातूनच गोळा केलेले ताजे ताजे मसाले, ओल्या आणि सुक्या खोबऱ्याचा सढळ वापर आणि पोटातली अमाप भूक. अर्धा तास फक्त हात आणि तोंडच काम करत होते. बाकीचे शरीर फक्त तृप्त होत होते. आमचे जगातले सगळ्यात रोमॅंटिक कॅंडल लाईट डिनर झाल्यावर चिमुकल्या तंबूत कसेबसे कपडे बदलले आणि नवरोबांनी

पाच-सात मिनिटे बासरी वाजवली. त्या शांततेत तिचे सूर अजूनच गहिरे वाटत होते. त्या सुरावटीत हरवून जात सगळेच झोपेच्या अधीन झाले. स्लीपिंग बॅग मध्ये शिरल्यावर गुडूप झोप कधी लागली ते कळलं सुद्धा नाही.

दुसरा दिवस पहाटे पहाटे पक्षांच्या किलबिलाटाने उजाडला. आन्हिके उरकायला 'होल वावर इज आवर' असल्याने आणि वावरात भरपूर प्राणी असल्याने सुरक्षेसाठी जोडीने जाऊनच सगळे उरकले. तलावाच्या काठावर तोंड, दात वगैरे घासत असतांनाच त्याचवेळी एक हत्तीण तिच्या पिलाला घेऊन चूळ भरायला आली. ती जरा लांब होती तोपर्यंत तिचे फोटो बिटो काढले पण अचानकच तिनी आमच्या दिशेने यायला सुरुवात केली. ते पाहून गार्ड दादाने तातडीने तंबू जवळ चराच्या अलिकडे येउन थांबायला सांगितले. आम्ही चरापर्यंत पोचतो न पोचतो तेवढ्यात हत्तीण बाईंनी परत फिरण्याचा निर्णय घेतला आणि त्या उलट्या दिशेने चालू लागल्या. मग आम्ही पण त्यांना तलाव पार करताना पाहण्यासाठी मागे मागे गेलो. हत्तीणबै पाण्यात शिरल्या तसे पिल्लू सुद्धा आईची शेपूट सोंडेत पकडून हळूच पाण्यात शिरले. अलगद विहरत विहरत मायलेकराने तो प्रचंड मोठा तलाव पार करून दाखवून आमच्या डोळ्याचे पारणे फेडले. :) मग पहाटे सूर्योदय बघत बघत फक्कड काळा चहा झाला आणि आम्ही ताजे तवाने झालो. कपडे वगैरे आवरत होतो तेवढ्यात गार्ड काका पोहून आलेले दिसले. लागलीच आम्ही विचारून घेतलं की आम्ही पण पोहलो तर चालेल का हो? गार्ड काकांनी परवानगी दिली. पण तोवर नाश्ता करून ट्रेकला जायची वेळ झाली होती. 'दुपारी पोहायला नक्की जाऊ' असं नवऱ्याकडून कबूल करवून घेतलं आणि नाश्ता करायला टेबल वर जाऊन बसलो.

नाश्त्याच्या टेबलवर पहिल्यांदाच ग्रूप मधल्या इतरांशी बोलायला निवांत वेळ आणि उर्जा शिल्लक होती. 'डॉक्युमेंटरी' काकांशी आणि पत्रकार बाईंशी आधीच ओळख झाली होती. पण परदेशी पाहुण्यांशी पहिल्यांदाच बोलत होतो. त्यांना आमच्या आणि आम्हाला त्यांच्या गोष्टी ऐकून नवल वाटत होतं. ते ऑस्ट्रेलियन जोडपं त्यांच्या नोकऱ्या सोडून, घरदार विकून वर्ष-दोन वर्ष फिरायचं असं ठरवून त्यांच्या देशातून बाहेर पडलं होतं. 'आयुष्यात स्वत:चे घर, गाडी, मूल काहीही नको, फक्त जग फिरायचे आहे.' असं ठरवून ती जोडी मजल दर-मजल करत फिरत होती. पैसे संपले की असू त्या देशात नोकरी, मजुरी करू आणि पुढच्या प्रवासाचे पैसे जमवू अशा तयारीने निघाले होते. भारतात ४ महिने तरी काढायचा त्यांचा बेत होता. आणि या जग प्रवासासाठी सुद्धा त्यांच्याकडे फक्त एक एक सॅक होती. प्रत्येकी २-२ कपडे. एक अंगावर आणि एक सॅक मध्ये. हे बघून मलाच माझ्या २ दिवसाच्या सामानाची लाज वाटली. सगळीकडे पब्लिक ट्रान्सपोर्ट आणि ते पण सगळ्यात स्वस्तातले वापरून फिरत होते. ट्रेनच्या जनरल क्लास मधून ३-४ दिवसांचे प्रवास करून विना आरक्षण भारत भ्रमण करत होते. हे ऐकून आम्ही अवाक झालेलो आणि आम्ही 'स्लीपर वोल्वो' बसने आलो हे ऐकून ते अवाक!! आमच्या लेखी सगळं विकून असं बेफिकीरीत मस्त मौला आयुष्य स्वीकारू शकणारे ते श्रीमंत होते तर 'वोल्वो' आणि 'एसी हॉटेल रूम्स' परवडणाऱ्या आमच्या तथाकथित श्रीमंतीने ते गुंगले होते. त्यातल्या त्यात त्या बेल्जियन मुलीनं आम्हाला जरासं माणसांत आणलं. ती भारतात कुठलासा कोर्स करायला आली होती. आणि सुट्टीत भारत फिरत होती. 'मुलगी', 'एकटी,, 'भार,,, 'भारतातील सुरक्षितता' वगैरेशी तिला काही देणं-घेणं नव्हतं. जगून घेत होती :) भारतातल्या मुलींना हे कधीतरी जमावं अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून आम्ही नाश्त्याला सामोरे गेलो. चविष्ट गप्पा मारता मारता ब्रेड-जॅम, पुरी-भाजी आणि केळी असा भरभक्कम नाश्ता झाला. आता पुढच्या प्रवासात फक्त फिरंगी आणि आम्ही होतो. पत्रकार बाईंनी आणि 'डॉक्युमेंट्री' काकांनी तेथेच विश्रांती घ्यायचे ठरवले आणि आमचा उरलेला ग्रूप चालायला लागला.

एव्हाना गाईडनं सांगितलं होतंच की ट्रेकचं नाव 'टायगर ट्रेल' असलं तरी इथं फारसे वाघ नाहीत. आपण अस्वले आणि हत्ती शोधूया. गवे भेटतीलच वाटेत. त्यामुळे आम्ही वाघ-बिघ दिसायची दिवास्वप्नं न बघता पक्षी, कीटक वगैरे बघत चालत होतो. मध्येच गाईडने त्याच्या काठीने रस्त्यात पडलेले काहितरी हलवले आणि तो अत्यानंदाने चित्कारला 'स्लॉथ बेअर फ्रेश ड्रॉपिंग'. अस्वलाची ती विष्ठा अगदी १५-२० मिनिटापूर्वीची असावी. म्हणजे अस्वल जवळपास असणार होतं. आमचा एक गार्ड अस्वलाच्या हल्यातला सर्व्हायव्हर होता. त्याने आम्हाला अस्वलाशी झटापटीचा किस्सा रंगवून सांगितला. त्याच्या जखमा सुद्धा दाखवल्या. आणि खूप जपून लक्ष देऊन चालायला सांगितले. हत्ती आणि अस्वले हे दोनच प्राणी माणसावर हल्ला करतात. बाकी सगळे माणूस पाहून पळून जातात. गव्यांचा अनुभव तर आम्ही घेतलाच होता. ते पळूनच गेले होते. आता अस्वल आपल्यावर हल्ला करायला जवळ येईल अशी आशा बाळगून आम्ही त्याला शोधत निघालो. कमरेपर्यंत उंच गवत कापत आम्ही चालत होतो. सापा-बिपांची भिती होतीच. पण थ्रिल सुद्धा वाटत होतं. आणि आमचा गार्ड 'या भागात साप नाहीत. मी बघा चप्पल घालून आलो आहे.' असा दिलासा द्यायचा प्रयत्न करत होता. अर्धा-पाऊण तास अस्वलाला शोधले पण ते पठ्ठे कुठं लपून बसले होते काय माहित. एकदा एका झुडपात खुसपूस झाली म्हणून नवरोबाने झूम लेन्सने फोकस करून २-४ फोटो काढले. पण काही नसेल असं वाटून काढलेले फोटो पाहिलेही नाहित. आम्ही तसेच पेरियारच्या सर्वोच्च टेकडीवर पोहोचलो आणि खूप टेकड्या उतरत परत सुद्धा आलो. आम्ही बेसवर पोहोचताच तिथे विश्रांती घेणाऱ्या पत्रकार बाईंनी सांगितलं की सकाळच्या हत्तीण बाई आपल्या पिलासह तंबू भोवती अर्धा तास चरून गेल्या. आधीच आमच्या या सेशनला काहीच चित्त थरारक झालं नव्हतं. दमणूक मात्र फारच झाली होती. आणि त्यात यांना बसल्या जागी हत्तीण बाई भेटून गेल्या म्हणून आम्हाला फार वाईट वाटलं. अजून २ दा ट्रेक आहे आणि काहितरी घडेलच याचं समाधान होतं त्यातल्या त्यात.

तसेच पाय ओढत तंबूत गेलो आणि फतकल मारून बसलो. अर्ध्या तासाने पाहिलं तर ऑस्ट्रेलियन जोडपं तलावात मस्त अंघोळ करून आलं होतं आणि तंबूवर किच्च ओले कपडे वाळत टाकत होतं. त्यामुळं मलापण नवऱ्याकडून सकाळी कबूल करून घेतलेलं आठवलं आणि आम्ही पण तलावात पोहायला गेलो. तासभर डुंबून, पोहून ताजेतवाने होऊन बाहेर पडतच होतो इतक्यात आमच्या शेजारीच पोहत पोहत घोरपड आली आणि समोरच्या काठावर त्या सकाळच्या हत्तीणबाई आणि पिलू. जीव मुठीत घेऊन आम्ही तर्राट तंबूत जाऊन पोचलो.

खोबरेल तेलाच्या फोडणीचा वास नाकात शिरलाच आणि भुकेची एकदम जाणीव झाली. पुन्हा एकदा सांबार, कालच्या पेक्षा वेगळ्याच चवीच्या २ भाज्या आणि वाफाळता भात खाल्ला आणि झाडाखाली जाऊन पसरलो. २ तास मस्त झोप झाल्यावर चहा झाला आणि आम्ही वेगळ्या भागाकडे जाण्यासाठी तराफ्यात स्वार झालो. खूप वेळ तराफ्यातून फिरत फिरत लांबवरच्या जंगलात उतरलो आणि एकदम सर सर पाऊस आला. तेवढ्यातल्या तेवढ्यात मी 'बघ मी म्हणलं होतं ना रेनकोट लागतील म्हणून' हे म्हणून घ्यायची संधी सोडणं शक्यच नव्हतं. पण माझं वाक्य संपायच्या आत पाऊस थांबला सुद्धा. आता आम्ही जंगल तुडवत तलावाच्या काठाने फिरत होतो. रान डुकरे, सांबरे वगैरेना सळो की पळो करून सोडत होतो. येवढ्यात आमच्या समोर झुडपात खुसखुस झाली आणि ७०-८० गवे दबकत दबकत पाण्यात शिरले. छोट्याना आडोसा देत, एकमेकाला सांभाळत त्यांनी शिस्तीत एक ओळ बनवली आणि पोहत पोहत तलावातल्या एका बेटावर जाऊन ते गायब झाले. आम्हीपण पुन्हा तराफ्यात जाऊन बसलो आणि पुन्हा तलावातून लांब लांब जाऊ लागलो.

तराफा चालवतानाच एका गाईडला प्रचंड लांबच्या अंतरावर एक हत्ती दिसला. आम्हाला काहीही करून तो दिसतंच नव्हता. त्याला तो नुसता दिसत नव्हता तर तो टस्कर आहे हे सुद्धा दिसत होतं. आम्ही दिसत नाही म्हणून नाद सोडून दिला. पण तो गाईड पक्का चिवट होता. सरळ रेषेत त्या टस्करकडे नेता येत नव्हतं. आम्हाला पाहून तो बिथरला असता. त्यामुळे गाईडने आमचा तराफा टेकडीला वळसा घालून दुसऱ्या बाजूला नेला. आणि तिथून चालत टेकडी

ओलांडून हत्तीला कळणार नाही असे लपत छपत आम्ही हत्तीच्या पाठीमागे जाऊन पोचलो. तो आडदांड टस्कर स्वत:च्याच मस्तीत अंगावर माती उडवून घेत होता. एकट्यानेच मजा करून खूष होत होता. त्याला आम्ही कंपनी द्यायला आलो होतो पण त्याला त्याचा पत्ता नव्हता. दगडाआडून लपून छपून त्याला डोळ्यांत आणि फोटोत बंदिस्त केलं आणि अंधार पडायला लागला म्हणून परत फिरलो. तराफ्याकडे जाण्यासाठी वळणे घेत टेकडी पार करत असतानाच अचानकच एका वळणावर आम्ही थबकलो. एक अजस्त्र गवा आमच्याकडे रोखून बघत उभा होता. एका उडीत आम्हा सगळ्यांना सपाट करेल येवढंच अंतर होतं. आमची चांगलीच तंतरली होती. पण तरी फोटो काढायचा मोह आवरत नव्हता. कुणाच्या तरी फोटोमुळे 'क्लिक' चा आवाज झाला तसा तो गवा बिथरला. त्याने जोरदार फुत्कार टाकून एक दणकून हंबरडा फोडला आणि तो दणकन उडी मारून जरासा पुढे आला आणि तसाच यू टर्न मारून झाडीत घुसून पळत सुटला. त्याच्या त्या उडीने हादरलेली जमीन आणि त्याच्या उलट दिशेने जाणाऱ्या दौडीच्या आवाज उनुभवत आम्ही कितीवेळ तेथेच खिळून उभे होतो. त्याने मध्येच यू टर्न मारला आणि म्हणूनच आपण अजून जिवंत आहोत हे कितीतरी वेळ पटतच नव्हते. त्या ट्रान्स मध्येच पावले ओढत गपचूप तराफ्यात येउन बसलो आणि कालच्यासारखेच झगमगत्या आभाळाखालून तंबूकडे परतलो.

जेवलो आणि तंबूत लोळत पडलो. अजून झोप येत नव्हती म्हणून सहज दिवसभराचे फोटो पाहत बसलो. फोटो पाहता पाहता सकाळच्या सेशन मधले झुडपांचे फोटो आले. नवऱ्याला २ मिनिटे आठवतच नव्हते कि हे फोटो का काढलेत? म्हणून झूम करून तो पूर्ण फ्रेम मध्ये भिरभिरला आणि अचानकच मध्येच जर्द पिवळा रंग आणि त्यावर काळे पट्टे असा तुकडा दिसला. २ मिनिटे श्वास अडकलाच आमचा. ते तेच फोटो होते जे नवऱ्याने खुसपूस जाणवली म्हणून काढले होते आणि काही नसेल म्हणून न बघता सोडून दिले होते. पण यात फक्त रंगच दिसत होता. आकार सापडत नव्हता. आम्ही घाई घाईने तसेच गाईड काकांकडे गेलो आणि त्यांना ते फोटो दाखवले. त्यांनी मिश्किलपणाने सांगितले की तुमच्या कॅमेऱ्याला वाघोबा दिसला. आम्ही थोडे खट्टू, थोडे खजील, थोडे आनंदलेले. स्वत:च्या गमतीशीर नशीबाचे काय करावे याचा विचार करत झोपी गेलो. मध्यरात्री निसर्गाची हाक आली म्हणून मी नवरोबाला उठवले. अंधारात झुडपात एकटे जाणे शक्यच नव्हते. नवरोबा हातात इमर्जन्सी दिवा घेऊन सोबतीला आले. कार्यक्रम उरकतच होता तेवढ्यात एका फुटावर साळिंदर समोर येउन बसले. पटापट कार्यक्रम उरकला आणि आम्ही दोघे दिवा लावून ते फुललेले साळिंदर निरखत बसलो. आणि अचानकच दाणादाण आवाज आणि त्यामागोमाग गार्डच्या हाका यायला लागल्या. आमच्या दिव्यामुळे खूपच जवळ फिरत असलेली ती पिल्लूवाली हत्तीण बिथरली होती आणि ती झपाझप आमच्या दिशेने येत होती. आम्ही कसेबसे धडपडत चर ओलांडून तंबूजवळ आलो आणि दिवा बंद केला. केवढे काय काय होऊ

शकले असते ते सुरक्षित जागेवर पोहोचल्यावर लक्षात आले. नंतर खूप वेळ ती हत्तीण तिथेच घोटाळत राहिली. आम्ही श्वासाचा सुद्धा आवाज होऊ न देता तिला चांदण्यात बघत राहिलो. पिलाला काही धोका नसल्याचे पटल्यावर ती परत चरत चरत पिलाला घेऊन हळू हळू लांब निघून गेली. इतका वेळ आमचे तंबूच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या माळाकडे लक्षच गेले नव्हते. चांदण्याला डोळे सरावल्यावर पाहिले तर एक रानडुकरांचा आणि एक गव्यांचा मोठ्ठा कळप तिथे मुक्कामाला आला होता. त्या कळपाला खूप वेळ निरखून झाल्यावर आम्ही तंबूत आडवे झालो. आज २ वेळा थोडक्यात बचावलो होतो. गव्याने हल्ला करता करता माघार घेण्याच्या धक्क्यातून सावरत होतो न होतो तेवढ्यात हत्तीण बाईने चाल केली होती. एवढं होताना मन आणि मेंदू इतका खडबडलेला की झोप येणं शक्यच नव्हतं. तंबूचे पडदे उघडेच ठेऊन आम्ही बाहेर पाहत पडून राहिलो.

पहाट झाली. चहा झाला. आता शेवटचा ट्रेक. परतीचा. आम्ही त्या कालच्या वाघाच्या भागात परत जाऊ म्हणून विनंती केली. पण त्या लोकांना पण वेळ पाळायची होती. पण त्यांनी दुसऱ्या रस्त्याने परत घेऊन जायचं कबूल केलं. खरपूस भाजलेले आलू पराठे पोटभर खाल्ले. आणि आमचं सामान पाठीवर लादून चालायला लागलो. वाटेत परत एकदा वेगवेगळी मुंगसे, साळिंदर, माकडे, हरणे, रानडुक्कर वगैरे दिसत होते. पण कालचा न दिसलेला वाघ आम्हाला अजूनही टोचत होताच. चित्त-थरारक अनुभवाने खच्चून भरून पण तो वाघ असा वेड्यासारखा चुकल्याने मन निराश झालं होतं. 'आता काय संपलाच ट्रेक, याहीवेळी वाघोबा असा निसटला. आपल्या नशिबातच नाही.' असा विचार करत पाय ओढत होतो. एक पाणथळ जागा ओलांडता ओलांडता गाईड काकांनी धावत यायचा ईशारा केला. काय असेल याचा विचारही न करता आम्ही धावत जाऊन पोचलो तर समोरच चिखलात साक्षात वाघोबा लोळत होते. आम्ही ते दृष्य नक्की काय आहे आणि खरे-खुरे आहे हे समजून घ्यायचा प्रयत्न करत होतो तेवढ्यात वाघोबा डिस्टर्ब झाल्याने वैतागून उडी मारून झुडुपात निघून सुद्धा गेले. आम्ही येवढे स्तिमित होऊन ते दृश्य पाहत होतो की फोटो काढायचे सुचले सुद्धा नाही. अखेर आम्हाला याची देही याची डोळा व्याघ्रदर्शन घडले होते! जंगलचा देखणा प्राणी त्याच्या पूर्ण रुबाबासह त्याच्या स्वत:च्या अधिवासात भेटला होता. मन आणि डोळे भरून आले होते. सगळी पायपीट सार्थकी लागली होती. गाईडच्या मते आम्ही खूपच जास्त नशीबवान होतो. या जंगलात वाघ सहज दिसत नाहीतच. पण आम्हाला दिसला होता. फोटो काढायचे राहिलेच पण त्याचीपण फिट्टंफाट झाली होती. काल कॅमेऱ्याला वाघ दिसला-आम्हाला नाही. आज आम्हाला दिसला पण त्याला नाही. :) पण 'डॉक्युमेंटरी' काकांचे चित्त थाऱ्यावर होते. त्यामुळे त्यांनी हे सगळे चित्रित केले होते. आणि ते आमचे हे सगळे अनुभव सीडी बनवून आम्हांला पाठवून देणार होते. या वाघोबाबद्दल चर्चा करता करता आम्ही आमचे उरलेले अंतर बागडतच पार केले. ट्रेकचा याहून सुरेख शेवट शक्यच नव्हता.

केवळ ४८ तासांनी फॉरेस्ट ऑफिसला परत पोहोचणारे आम्ही ४८ तासांत केवढे काही अनुभवून आलो होतो. अफाट निसर्ग, अफाट ताकदीचे जीव आणि त्यासमोर अगदी खुजे खुजे असलेले आपण. गार्डस काय आणि फिरंगी काय

आपल्यासारखीच हाडा-मासाची पण वेगळ्याच मातीची माणसं... या जंगल बुकात शिरताना अगदी लहानसे असणारे आम्ही दोघे केवळ ४८ तासांत त्याची थोडी पाने अनुभवून मोठे होऊन आलो होतो...अजूनही जंगल बुकाची कित्येक पाने बाकीच आहेत. आम्ही ती वाचायच्या संधीची आतुरतेने वाट पाहतोय!

जाता जाता: 'डॉक्युमेंटरी काका' म्हणजे दुसरे कोणी नसून केरळ मधले पक्षीतज्ञ आणि wildlife filmmaker सुरेश एलमन. David Attenborough च्या Life of Birds मालिकेचे सहाय्यक दिग्दर्शक! यांना केरळ जंगल आणि पर्यटन विभागाने पेरियारवर माहिती/जाहिरातपट बनवण्यासाठी आमंत्रित केले होते. यांच्याच कृपेनी आमचा हा सगळा प्रवास आयुष्यभरात पुन्हा पुन्हा अनुभवता येणार आहे. त्याचाच हा एक छोटासा भाग!

https://youtu.be/decxvCyRL1E

ट्रॅव्हल टिप्स - महत्वाची कागदपत्रे, पैसे

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

- ✓ पासपोर्ट, तिकिटे, हॉटेल बुकिंग
- ✓ आंतरराष्ट्रीय प्रवासात पासपोर्ट आणि व्हिसाच्या फोटोकॉपी प्रत्येक बॅग मध्ये असू द्याव्यात. भारतात प्रवास करतानाही ओळखपत्राची फोटोकॉपी ठेवू शकता. काही अडचण आली तर उपयोग होतो.
- ✓ आंतरराष्ट्रीय प्रवासात इन्शुरन्सच्या कॉपीज देखील आवश्यक आहेत.
- ✓ लांबची सहल करताना पूर्ण सहलीच्या प्लॅनच्या दोन कॉपीज तरी सोबत ठेवाव्या, ज्यात हाॅटेल्सचे पत्ते-फोन नंबर इत्यादी सगळी माहिती आहे. एक कॉपी मुख्य बॅगेत आणि एक रोज फिरताना सोबत ठेवावी.
- ✓ सगळे पैसे एकाच जागी ठेवू नयेत. क्रेडिट /डेबिट कार्ड्स, थोडे पैसे वेगळ्या पाऊचमधे बॅगेत सुरक्षित ठेवावे.
- ✓ पैशांसाठी कमरेला आतून बांधायची पिशवी मिळते, ती मिळाली तर घेऊ शकता. काही खास पासपोर्ट साठीची पाउच मिळतात जी गळ्यात अडकवून त्यात पासपोर्ट, पैसे इत्यादी ठेवता येतं.

जुले चद्दर

(लेखिका - मधुरा देशपांडे)

प्रस्तावना - "ट्रेकला जायचं?" असा प्रश्न कधीही आणि कुठेही विचारला गेला तरी "चला, मी तयार आहे" असं हमखास उत्तर मिळतं ते या प्रकाराचं वेड असलेल्यांकडून. अशातलीच एक म्हणजे मुग्धा. गेल्या २.५ वर्षांपासून माझी आणि मुग्धाची ओळख झाली. एकत्र फिरणे, विकांताला ठरवून काहीतरी खादाडीचे बेत करणे, अशा अनेक निमित्ताने वरचेवर भेट होऊ लागली. आमच्या गप्पांच्या ओघात मुग्धाकडून तिचे अनेक ट्रेक्स, त्यातल्या गमती जमती याबद्दल खूप ऐकले होते आणि त्यातले काही कहर किस्से ऐकून मी गमतीने "यावर लिहायला हवे इतके महान किस्से आहेत हे" असेही म्हणाले होते. त्याच वेळी कधीतरी 'चद्दर ट्रेक' हा विषय सुद्धा झाला आणि हा ट्रेक करायचाच आहे, तोही येत्या २ वर्षात असेही ती म्हणाली होती. आणि एक दिवस "यावेळी भारतवारीत आम्ही चद्दर ट्रेक करतो आहोत" हे आम्ही ऐकले. मुळात भारतात कमी दिवस मिळतात, त्यात तुम्ही १०-१२ दिवस घरी नसणार ट्रेक मुळे हा आमचा पहिला प्रश्न होता. पण 'इच्छा तेथे मार्ग' या उक्तीप्रमाणे खरंच तिचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती आणि सोबतीने तिचा नवरा कैलास, म्हणजेच आमचा मित्र हे दोघेही ट्रेकचे बुकिंग कन्फर्म करून पुढची माहिती काढत होते. म्हणता म्हणता त्यांचे जायचे दिवस आले, आणि त्याच वेळी एकीकडे भटकंती अंकाची तयारी चालू होती. त्यामुळे मग आता चद्दर ट्रेक बद्दल लिहुयात हा विचार मनात आला. मुग्धाला इथे स्टेशनपर्यंत सोडायला गेलो तेव्हा "माझ्या अंकासाठी तरी सुखरूप परत या" असे गमतीने म्हणत हॅपी जर्नी केले. आणि ठरल्या दिवशी "सुखरूप पोहोचलो" असा मेसेज आला. ट्रेक करण्याची मुग्धाची इच्छा किती तीव्र होती हे माहिती होते, त्यामुळे ट्रेक झाला याचा आम्हालाही तेवढाच आनंद झाला आणि अर्थातच अंकातल्या एका धाग्यावर शिक्कामोर्तब झाले. मग गप्पांमध्ये चद्दर हाच मुख्य विषय झाला. आणि त्यातूनच त्यांचा हा प्रवास उलगडत गेला. तर आता जाणून घेऊ तिच्याकडून या ट्रेक बद्दल -

ट्रेकिंगची तुझी सुरुवात कशी झाली?

मी पुण्यात असताना अनेक निमित्ताने विविध ट्रेक केले होते. यात मग जवळचा सिंहगड असो किंवा पुण्याजवळचे इतर नेहमीचे किल्ले, ट्रेकिंगची ठिकाणं हे सगळंच आलं. नंतर ट्रेक हा प्रकार खूपच जिव्हाळ्याचा झाला. काही दिवस झाले आणि कुठे डोंगर दऱ्यात गेले नाही तर मला करमत नाही. मग समान आवडीच्या काही मैत्रिणींसोबत महाराष्ट्राबाहेरचे ट्रेक केले. यात गोवा जंगल ट्रेक, उत्तर - दक्षिण भारतातले काही ट्रेक्स केले.तो वेगळा अनुभव मिळाला. आणि ट्रेकिंगचा हा छंद मग असाच वाढत राहिला.

चद्दर ट्रेक बद्दल माहिती कुठून मिळाली? तिथे जायलाच हवं असं का वाटलं?

सतत भारतातल्या आणि आता इथल्याही (जर्मनी आणि युरोप) ट्रेक बद्दल गुगल करत बसणे हा माझा आवडता टाईमपास आहे. वर म्हणाले त्याप्रमाणे भारतातले ट्रेक्स करताना हिमालयात ट्रेकिंग हा एक विचार नेहमीच डोक्यात होता. असंच कधीतरी चद्दर ट्रेक बद्दल वाचलं होतं. ते वाचतानाच 'इथे जायलाच हवं' हे सतत वाटायचं. पण काही वर्षांपूर्वी चौकशी केली तर अंदाजे खर्च ८०,००० रुपये - लेह ते लेह असा होता. ही किंमत बघूनच हे त्या वेळी परवडणारे नव्हते. पण तरीही चद्दर ट्रेक डोक्यात बसला होता. त्यात मागच्या काही वर्षात ग्लोबल वॉर्मिंग मुळे कदाचित येत्या काही वर्षात इथे ट्रेकिंग अवघड होईल असे वाचले. मग पुन्हा याबद्दल चौकशी केली. त्याच वेळी त्यांनी ट्रेकच्या स्वरुपात जे काही बदल केले, त्यामध्ये अंतर कमी करून खर्चही आता आमच्या आवाक्यातला होता. मग अधिक माहिती शोधायला सुरूवात केली.

चद्दर ट्रेक बद्दल थोडक्यात माहिती सांग.

झंस्कार नदी हिवाळ्यात पूर्ण/काही प्रमाणात गोठते आणि त्यावेळी या भागातले इतर सगळे रस्ते हिमवर्षावाने बंद

असतात. गोठलेली ही नदी हा या भागात राहणाऱ्या लोकांना लेहला जाण्यायेण्याचा एकमेव मार्ग आहे. तिथले निसर्ग सौंदर्य बघणे, अनुभवणे आणि आपल्याला अशा ठिकाणांची अजिबात सवय नसल्याने तिथे राहणे हा सगळा भाग आपल्यासाठी ट्रेक म्हणून एक ॲडव्हेंचर आहे. तर तिथल्या लोकांसाठी हा रस्ता आहे, त्यांच्या जीवनमानाचा एक भाग आहे. याच खडतर मार्गाने इथली शाळकरी मुलं हिवाळ्यात ये-जा करतात. गोठलेल्या नदीवर जणू ही बर्फाची चादर पांघरली जाते, म्हणून चद्दर हे नाव. जेव्हापासून पर्यटकांसाठी हा 'चद्दर ट्रेक' म्हणून प्रसिद्ध होऊ लागला, त्यानंतर आता इथल्या झंस्कारी लोकांचा हा हिवाळ्यातला रोजगाराचा हा एक महत्वाचा पर्याय आहे. साधारण जानेवारी ते फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत अशा ठराविक कालावधीतच हा ट्रेक करता येतो.
३ प्रकारे हा ट्रेक करता येतो.

* लेह ते नेराक (Neyrak) - ९ दिवस
* लेह ते लिंगशेड (Lingshed) - ११ दिवस
* लेह ते पाडम (Padum) - १५ दिवस

पूर्वी फक्त लेह ते पाडम हा एकमेव पर्याय होता. त्यात खर्च जास्त, वेळ जास्त आणि प्रवास जास्त खडतर यामुळे प्रचंड शारिरीक तयारी लागायची. अशा प्रकारच्या ट्रेकिंगची सवय असलेले लोकच सहसा इथे यायचे. नंतर इतर २ पर्याय असल्याने आता पर्यटकांची गर्दी वाढली. आम्ही यातला ९ दिवसांचा ट्रेक निवडला होता.

बुकिंग कसे केले? खर्च किती आला

जानेवारी आम्हाला एकंदरीत जमेल असं वाटत होतं. माहिती शोधताना एका मुलीचा ब्लॉग वाचण्यात आला. तिच्या ब्लॉग मध्ये तिने तिच्या ऑर्गनायझरची माहिती दिली होती. त्याच्याशी संपर्क केला, तेव्हा मग त्याने सविस्तर माहिती आणि तारखा कळवल्या. आम्हाला आधी इथून भारतात जायचं बुकिंग बघायचं होतं, तसं सुट्ट्यांचं नियोजन केलं. आणि लेह ते लेह असं बुकिंग पक्कं केलं. आमचे दोघांचेही कुटुंब पुण्यात असल्याने ट्रेकच्या तारखा बघून पुणे-लेह-पुणे असे विमानाचे बुकिंग केले. आणि शेवटी इथून भारतात जायचे केले. अर्थात कुठल्याही क्षणी नैसर्गिक आपत्ती किंवा हवामान अयोग्य असेल तर रद्द होऊ शकतो याचीही कल्पना होती आणि त्यामुळे थोडी भीती होतीच. पण सतत मनातून सकारात्मक विचार करत होतो की असे काही होणार नाही आणि आम्हाला ट्रेकला जाता येईल. लेह ते लेह असा ९ दिवसांचा खर्च प्रत्येक माणशी २०,००० रुपये होता. यात तिथली सगळी व्यवस्था ते करणार होते. आम्हाला लेह मध्ये राहायचं असेल तर तो खर्च आमचा करायचा होता.

यासाठी तुम्हाला तुमच्या भारतातल्या सुट्टीची तडजोड करावी लागणार होती. मग घरच्यांची प्रतिक्रिया काय होत?

वर्षातून एकदा आम्ही तिथे जाणार आणि त्यातलेही १०-१२ दिवस ट्रेकला जाणार हे कळल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय असेल याचा मला अंदाज आला होता. त्यातही हा ट्रेक इतर ट्रेक पेक्षा बराच कठिण आहे, त्यामुळे भीतीपण होती. त्यातून माझी नोकरी नवीन असल्याने मला ट्रेक वगळता घरी फक्त ५ दिवस मिळणार होते. हे ऐकल्यानंतर तर घरच्यांनी "आता तुला जे करायचंय ते कर, आम्ही काही बोलतच नाही" असेच ठरवले. मलाही घरी राहायला, भारतात अजून वेळ घालवायला आवडतंच, पण हा ट्रेक काही सहजासहजी इतर वेळी होणार नव्हता. त्यामुळे घरच्यांसोबत राहणे, भारतातली खाद्य भ्रमंती, मित्र-मैत्रिणींना भेटणे, शॉपिंग यावर थोडी तडजोड केली, घरच्या सगळ्यांना समजावलं आणि अखेर ट्रेक पूर्ण झाला.

जाण्यापूर्वी काय तयारी केली?

तयारी खरं तर अजून करायला हवी होती. म्हणजे आम्हाला ट्रेक मध्ये त्रास काहीच झाला नाही, स्टॅमिना व्यवस्थीत

पुरला. पण जेवढं जास्त तुम्ही शारीरीक मेहनत घ्याल, अधिक सक्षम व्हाल तेवढं चांगलं. २-३ वेळा इथे असताना जवळचे ट्रेक केले, पण तेव्हा इथलाही हिवाळा चालू व्हायचा होता. त्यामुळे थंडीत दिवसभर बाहेर राहण्याची सवय नव्हती झाली.

तयारीतला महत्वाचा भाग म्हणजे थंडीसाठी कपडे आणि इतर साहित्य. तिथले तापमान -३५ पर्यंत देखील जाऊ शकतं. त्यादृष्टीने लेयर्स मध्ये कपडे घालावे लागतात. काही सामान त्या लोकांनी आम्हाला दिलं. तरीही आमच्याकडे लेयर्स मध्ये घालता येतील अशी जॅकेट्स, हातमोजे, पायमोजे, शुज, औषधांचा साठा, आणि वरचेवर खायला चालेल असा खाऊ असं एका बॅकपॅक मध्ये बसेल एवढं सामान होतं. ऑक्सिजन कमतरतेमुळे ईतक्या उंचीवर जो त्रास होऊ शकतो, त्यासाठी काही गोळ्या, कापूर हे देखील होतं. मी स्वतः होमीओपॅथी डॉक्टर असल्याने होमीओपॅथीच्या गोळ्या घेतल्या होत्या. आमच्यापैकी कुणालाही त्रास झाला नाही. तळपाय गरम राहण्यासाठी मोज्यांना चिकटतील असे हीटपॅक्स मिळाले होते तेही घेतले. आम्ही लेह मध्ये गम बुट घेतले. बाकी बरंचसं सामान जाताना घेऊन गेलो होतो. खाण्याची सोय ते लोक करणार होते. स्लिपिंग बॅग, त्यातले लायनर्स, तिथले तंबू हे सगळं त्या लोकांनी दिलं होतं.

आता सुरुवातीपासून ट्रेक बद्दल सांग. कुठून सुरुवात झाली? रोजचा दिवस कसा असायचा? हवामान कसं होत?

आम्ही पुण्याहून आधी दिल्लीला गेलो. तिथून पुढे लेह ला जायचे होते. आणि लेहला आधी एक दिवस राहून मग ट्रेक चालू करायचा होता. लेह मधला मुक्काम मुख्यत्वे उंची आणि थंडीशी जुळवून घ्यायला. इथे आम्हाला आमचा टुर ऑर्गनायजर भेटला. आम्हीही पहिल्यांदाच लेह पाहिले. लेह फार फार सुंदर आहे आणि आपल्या लष्कराने उत्तम ठेवले आहे. पण आम्हाला तिथे फारसा वेळ मिळाला नाही. आम्ही तिथल्या मार्केट मध्ये जाऊन थोडी खरेदी केली, जी ट्रेकसाठी आवश्यक होती. आमच्यासोबत माझी पुण्यातली एक मैत्रीण आणि तिचा नवरा हे दोघं होते. नंतर तिथेच एक दिल्लीची मुलगी आणि एक साठीचे काका भेटले. तिथे एक दिवस घालवून मग सगळे लोक सोबत आधी मिनीबसने निघालो.

लेह पेक्षाही तापमान हळूहळू कमी होऊ लागलं. आमच्या ग्रुप मध्ये आम्हा ६ जणांसोबत अजून १० मदतनीसांची टीम होती. खरं वाटणार नाही पण हो, दहा लोक होते. यातले ७ जण सोबत पोर्टर्स म्हणून, १ आचारी, २ गाईड, त्यापैकी एक मुख्य आणि एक मदतनीस असे लोक होते. सर्वसाधारणपणे एका ट्रेक ग्रुप मध्ये १०-१६ लोक असतात. पण आमच्यातल्या काहींनी ऐन वेळेवर बुकिंग कॅन्सल केलं. त्यामुळे आम्ही फक्त ६ जण होतो. काही तासांच्या प्रवासानंतर झंस्कार नदी दिसू लागली. नंतर काही वेळाने मग ठरलेल्या ठिकाणी उतरून पुढे खरा ट्रेक चालू झाला.

त्या लोकांनी आम्हाला खबरदारीच्या सूचना दिल्या. पूर्वी जशी पूर्ण पात्रात चद्दर तयार व्हायची आणि अक्खं पात्र गोठायचं, ते गेल्या काही वर्षात कमी झालं आहे. त्यामुळे बाजुने बर्फ असतो त्यावरून चालायचं आणि जर एखाद्या ठिकाणी बर्फ नसेल तर बाजुने डोंगरावरून जायचं. रोज साधारण १०-१५ किलोमीटर चालावं लागायचं. पहिल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी आलो. अंधाराच्या आत तिथे पोहोचणं आवश्यक होतं. खरं तर त्यांनी रोजच्या मुक्कामाची त्या खेड्यांची नावं दिली आहेत, पण प्रत्यक्षात ती लोकवस्ती तिथून बरीच लांब असायची. त्या लोकांना

हे सवयीचं असतं. त्यामुळे जिथे तंबू बांधायला योग्य जागा असेल तिथे ते बरोबर थांबायचे.

तंबू बांधून ते लोक जेवणाच्या तयारीला लागायचे. सामानात त्यांनी स्टोव्ह, केरोसीन सगळं ठेवलं होतं. थंडीचा त्रास होऊ नये म्हणून गरम पाणी किंवा चहा द्यायचे. मग एकीकडे स्वयंपाकाची तयारी चालायची. त्यांच्यातलेच काही जण जाऊन लाकडं तोडून आणतात म्हणजे ती जाळून आजूबाजूला गरम वाटत राहतं. तिथेच तात्पुरती स्वच्छतागृह बांधायचे. कडाक्याच्या थंडीत जेवून मग स्लिपिंग बॅग मध्ये झोपायचं. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून थंडीत कुडकुडत नंबर लावून प्रातर्विधी आटोपायचे. पुन्हा चहा नाश्ता व्हायचा. आंघोळीला स्कोपच नव्हता. आणि मग निघायचं. सकाळी त्या थंडीत त्या स्लिपिंग बॅग मधून बाहेर येणे, सगळीकडे जमलेला बर्फ झटकणे ही कामंच फार मोठी वाटायची.

एक गाईड नेहमी आमच्या पुढे आणि एक मागे असायचा. बाकीचे लोक सगळं सामान स्लेजवर टाकून ते ओढत पळत आमच्या पुढे जाऊन मुक्कामाच्या जागी पोचून तंबू बांधायचे आणि स्वयंपाकाच्या तयारीला लागायचे. जिथे अवघड वाट असेल, चढ किंवा मोठे खडक असतील, तिथे हे लोक थांबून आम्हाला मदत करायचे. हे तर प्रचंड कौशल्याचं काम आहे. जिथे लहान कपारीतून मार्ग असेल आणि बर्फ किती ठिसुळ आहे याचा अंदाज नसेल, तर ते लोक आधी त्यावरून जायचे, मग आम्हाला सांगायचे की कशा प्रकारे येता येईल. तेव्हा भीतीही वाटायची, पण जीवनमरणाचा प्रश्न असेल तर आपोआप जमतात काही गोष्टी तसे आम्ही ते या लोकांच्या मदतीने जमवले.

रोज अंदाजे दिनक्रम हा ठरलेला होता. पहिले ४ दिवस झाले. नशीबाने हवामान खूप चांगले होते. थंडी रात्री -३० पर्यंत होती पण पाऊस नव्हता. पावसात किंवा स्नो झाला असता, एखादं वादळ आलं असतं तर वाट लागली असती. पाचव्या दिवशी मात्र आम्ही पुढे गेलो नाही. आमच्या ट्रेकमध्ये त्या दिवशी पुढे जाऊन मुक्काम करुन मग परतायचे होते. पण

तिथे जातानाच आमच्यासमोर ठिसूळ बर्फावरून पाय घसरून लोक पडले, त्यात पाणी वाहत होतं आणि आम्ही थोडे घाबरलो. पाण्यात पडलो असतो तर काही खरं नव्हतं. पुढचा भाग बघण्यासारखा होता. बराच वेळ विचार केला, जे काही ठरवायचं ते अक्ख्या ग्रुपला ठरवावं लागतं, काही पुढे जातील काही थांबतील असं चालत नाही. त्यामुळे आम्ही बऱ्याच विचारानंतर एकमताने पुढे जायचं नाही या निर्णयावर आलो. आणि आधीच्या कॅम्पला परत गेलो.

मग तो दिवस तिथेच थांबून पुन्हा परतीचा प्रवास चालू झाला. गेलो त्याच रस्त्याने परत आलो. ठरल्या ठिकाणी आम्हाला पिकअप साठी मिनि बस आली आणि मग लेहला परत आलो. तिथून मग पुन्हा दिल्ली मार्गे पुणे आणि म्हणता म्हणता इथे जर्मनीत परत येऊनही महिना झाला.

तिथे खाण्यापिण्याची व्यवस्था काय होती?

खाण्यापिण्याबद्दल खरं तर आम्हाला सुखद धक्का बसला. इतक्या थंड ठिकाणी आणि तेही एका गोठलेल्या नदीवरून लोकवस्ती नसलेल्या दुर्गम ठिकाणाचा ट्रेक. त्यामुळे आमची मानसिक तयारी तशीच होती की जे मिळेल ते खायचं. पण प्रत्यक्षात इतकं वेगळं घडलं की आमचा विश्वास बसत नव्हता. हा ट्रेक जेवढा इतर बाबींसाठी आठवणीत राहील तेवढंच लक्षात राहील ते या झंस्कारी लोकांनी खाऊ घातलेले पदार्थ. सकाळी गरम चहा, भरपेट नाश्ता, दुपारचे जेवण आणि परत रात्रीचं जेवण हे ते लोक करायचे. त्यासाठी सोबत स्टोव्ह, केरोसीन सगळं असतं. बरं फक्त वरण भात किंवा फक्त पोळी भाजी नाही, रोज २ भाज्या, डाळीचे प्रकार जे शिजायला वेळ लागतो, काहीतरी सलाड आणि गोड सुद्धा. शिवाय विविधता हवी म्हणून कधी पास्ता, खास लडाखी पदार्थही करायचे. यात रेडी टू कुक किंवा फ्रोझन सामान कमीत कमी. बरं छोले वगैरे शिजायला वेळ लागतो, पण त्यांनी तेही केलं. पोहे केले. ते असेच कुणी मराठी लोक आले होते त्यांना विचारून, शिकून ते करून खाऊ घालणे हे विशेष आहे. शेवटच्या दिवशी तर कहर होता. एका मडक्यात काहीतरी बांधलेलं दिसलं. म्हणून मी विचारलं "आज काय बिर्याणीचा बेत का?" तर तो म्हणाला "वो सरप्राईज है." आणि प्रत्यक्षात होता केक. त्यावर अगदी चद्दर ट्रेक असं लिहिलेलं सुद्धा. आम्ही रोज थक्क व्हायचो आणि शेवटच्या दिवशी तर आमच्याकडे बोलायला शब्दच नव्हते. हे अगत्य कायम लक्षात राहील.

अजून या ट्रेकमधले इतर अनुभव?

या ट्रेक मध्ये आम्ही बरेचदा धडपडलो. पण आमच्यापैकी कुणालाही त्रास असा झाला नाही आणि काही दुखापत झाली नाही हे महत्वाचं. गंमत अशी की फार फोटो काढता आले नाहीत. जिथे आम्ही ब्रेक घ्यायचो, तिथल्या ठिकाणचे २ फोटो कसेबसे काढायचो. त्या थंडीत तो कॅमेरा बाहेर काढा, मग फोटो काढा वगैरे इच्छाच नसायची. आणि एका जागी जास्त वेळ उभं राहू शकत नाही, पाय गोठायला सुरुवात होते. त्यामुळे अगदी नावाला काही फोटो आले. चांगलं लोकेशन बघून फोटो काढायचे असं न होता जिथे थांबलो ते आमचं लोकेशन आणि थरथरत्या हातांनी फोटो काढायचा असं झालं.

तिथून आकाश फार सुंदर दिसतं. रात्रीच्या वेळी चांदण्या बघणं हे सुख असतं. एकदा तर बहुतेक एक सॅटेलाईट दिसला असं वाटलं. रात्री झोपताना मध्येच दगडं पडल्याचे आवाज यायचे. नदीच्या पाण्याचा खळखळाट तिथल्या शांततेत अजून जाणवायचा. भीती वाटत नव्हती पण तरीही आपण कुठे झोपलो आहोत याची जाणीव झाली की थोडं वेगळं वाटायचं.

त्या भागात झाडी अजिबात नाहीत. आणि हिमालय हा मूळ ठिसुळ आहे खूप. ती माती वेगळीच आहे आणि तिथले लोकही. ते लोक निसर्गाच्या या अनेक आपत्तींना सरावले आहेत. ट्रेक जिथून सुरू होतो, तिथे जाताना एका ठिकाणी दरड कोसळून आम्हाला ४ तास थांबावं लागलं. पण त्यांच्यासाठी हे इतकं नेहमीचं आहे की त्यात त्यांना काहीच विशेष वाटले नाही. पुढेही ते लोक अक्ख्या ट्रेक मध्ये काधेही खंतावलेले दिसले नाही, कंटाळा तर नाहीच. सतत आम्हाला मदत करणार आणि त्यात मी काही विशेष केलं असं कुठेही दाखवणार नाहीत. त्यांनी आमचे खायचे किती लाड केले हे सांगितलंच. शिवाय एवढी मेहनत असूनही त्यामानाने त्यांना मोबदला कमी मिळतो. आम्हाला एवढं आग्रहाने खाऊ घालून ते लोक मात्र उरलेलं जेवण असेल तेवढंच खायचे. हे लक्षात आल्या नंतर आम्ही शक्यतोवर त्यानाही मिळेल असं बघायचो. पण तरीही त्यांचा 'आप खाओ पेटभर' म्हणून आग्रह चालूच असायचा. त्यांच्याकडे त्यांच्यासाठी असे विशेष साहित्यही नव्हते. आम्ही परत येताना जे आमचं सामान होतं ते सगळं त्यांना दिलं, तर ते म्हणे तेही आपापसात वाटून घेतात, ज्याला खरी गरज असेल त्याप्रमाणे. पूर्वी या भागात स्नो लेपर्ड्स दिसायचे. याच भागात या लोकांच्या मदतीने त्याकाळी काही प्रसिद्ध छायाचित्रणकारांना त्या स्नो लेपर्डने दर्शन दिले आणि नंतर ते छायाचित्र अत्यंत दुर्मिळ म्हणून प्रसिद्ध झाले. अशा कित्येक कलाकारांना हे लोक पडद्यामागे राहून मदत करतात.

ज्यादिवशी आम्ही परत फिरलो, त्यादिवशी त्यांना लाकडं शोधायला मदत करूयात म्हणून आम्ही पण सोबत गेलो. आम्ही २ तास चाललो तेव्हा मोजून ४-६ झाडं दिसली आणि त्यांच्या दृष्टीने ते जंगल होतं. रोज ते लोक किती जास्त खपायचे याची तेव्हा अजून कल्पना आली.

ही चद्दर अर्थात झंस्कार नदी ही त्यांची देवता आहे. रस्त्यात आम्हाला ठिकठिकाणी डाळ दिसली. मग कळलं की ही त्यांची या देवतेप्रती पुजेची पद्धत आहे. रस्ताभर जाताना ते अधून मधून डाळीचे दाणे वाहतात. नैसर्गिक आपत्ती येऊ नयेत, ही नदी अशीच राहावी म्हणून प्रार्थना करतात. असं वाटतं की जणू काही आम्ही फक्त तिथे गेलो, त्या लोकांनी आम्हाला हात धरून फिरवलं आणि ट्रेक पूर्ण झाल्याचं सांगितलं इतकी त्या लोकांची साथ महत्वाची होती.

त्यांच्याशी बोलताना जाणवलं की हे लोक शिकलेले आहेत. त्यांच्यातल्या एकाची बहीण डॉक्टर आहे असे त्याने सांगितले आणि त्याच्या गावात प्रॅक्टिस करते. इतर वेळी हे लोक शेती करतात किंवा अशाच इतर ठिकाणच्या पर्यटकांना गाईड म्हणून जातात. सतत घरापासून दूर राहतात. पर्यटकांशी जुळवून घ्यायला ते लोक सतत तयार आहेत आणि सेवेत तत्पर आहेत.

आम्ही शेवटच्या दिवशी जे परत फिरलो, तर नंतर कधीतरी वाटायचं की पुढे जायला हवं होतं, पण तिथे पडलो वगैरे असतो कुठे तर काहीही होऊ शकतं हा विचार करून ते टाळलं.

आमच्यासोबत जो मैत्रिणीचा नवरा होता, तो व्हेगान आहे. त्यामुळे खाण्यापिण्याची बंधनं आणि अगदी प्राण्यांपासून तयार झालेलं जॅकेटही नको असा त्याचा पहिले सूर होता. पण नंतर मात्र त्याने ट्रेक पुरते हे सगळे बाजूला ठेवलं आणि आम्हाला हायसं वाटलं. सोबत जे एक काका होते, ते गेली १५ वर्ष नेहमी लेहला येतात, महिनाभर राहतात. ते आर्टिस्ट आहेत, जगभरात फिरतात. पण या ट्रेकला पहिल्यांदाच येत होते. त्यांच्याशी बोलताना त्यांचेही विविध अनुभव ऐकायला मिळाले. त्यांनी सांगितलं की लेहच्याच अजून दुर्गम भागात काही खेडी आहेत जिथे मूळ आर्यन्स राहतात असं म्हणतात. तर एकदा एका जर्मन मुलीला हे कळलं आणि मग ती तिथे जाऊन राहिली. बाहेरून येणाऱ्या लोकांमध्ये जर्मन्स, रशियन्स बरेच आहेत शिवाय इतर युरोपियन्स, अमेरिकनही आहेत. भारतातले अनेक तरूण मुलं मुली आहेत. एक तर ग्रुप दिसला जे सगळे सांगलीचे लोक होते आणि सगळे ज्येष्ठ नागरिक होते, बहुतांशी ६०-६५ वर्षांचे आणि उत्साहाने फिरत होते. अशा लोकांचं कौतुक वाटतं.

लेहमध्ये आणि इतरही भारतीय लष्कराचे काम हे निव्वळ महान आहे. त्या लोकांमुळे आपल्यासारख्या सर्वसामान्यांना या ठिकाणी फिरणे शक्य आहे. जिथे १० दिवस राहताना आपल्याला इतकं वेगळं वाटतं, तिथे हे लोक आपल्या कुटुंबापासून कितीतरी दूर, अनेक अडचणींचा सामना करत राहात आहेत. हे सगळं आधी माहिती असलं, तरीही तिथे जाऊन ते समोर दिसतं. त्यांनी ठेवलेली स्वच्छता दिसते. आणि त्यांच्याप्रती आदर अजून दुणावतो.

त्या लोकांचा पर्यटकांचा अनुभव कसा आहे याबद्दल काही बोलणं झालं का?

जसे नियम पाळणारे लोक असतात तसेच ते तोडणारे सुद्धा. त्यामुळे बरेचदा या लोकांना पर्यटकांचा त्रास सहन करावा लागतो. त्यातही आमचा गाईड म्हणाला की मराठी लोक सहसा व्यवस्थित असतात, दिल्ली किंवा उत्तर प्रदेशीय लोकांचा जास्त त्रास होतो. हे लोक तिथल्या अति थंड पाण्यात जातील. अनवधानाने अपघात होऊ शकतात, होतातच. पण स्वतःहून काही लोक त्यात जातात. जवळपास वैद्यकीय सुविधा काही नाही. मग लेह मध्ये जरी नेलं तरी तिथे लष्कराचा दवाखाना. तिथे नेहमीचे लोक गेले की त्या लष्कराच्या लोकांना अडचण वाटते. कारण त्यांनाही कमीत कमी सामानात, तिथल्या अवघड परिस्थितीत काम करायचे आहे. पण या गोष्टीला फारसा आपला इलाज नसतो. आपण नियम पाळणे, त्या लोकांच्या कौशल्याला समजुन घेऊन त्यांच्याशी नीट वागणे, भारतीय लष्कराच्या कामाची जाणीव ठेवणे एवढेच आपण करू शकतो.

तुम्ही युरोपातही फिरला आहात आणि भारतातला हा किंवा इतर ट्रेक. यात मुख्य फरक काय जाणवला?

या चद्दर ट्रेक बद्दल बोलायचं झालं, तर मुख्य म्हणजे या झंस्कारी लोकांच्या प्रेमानी आम्ही भारावून गेलो. इतक्या अवघड हवामानात, दुर्गम ठिकाणी त्यांनी ज्या प्रेमाने सेवा दिली ते विशेष आहे. इथे युरोपात वर्षभर फ्रोझन अन्न खाल्ले जाते आणि त्याला पूर्वीच्या थंडीच्या दिवसांची कारणं दिली जातात, बाहेर कुठे फिरायला गेलो तरीही कधीकधी खाण्याचे हाल होतात. पण त्या लोकांनी अशी कुठलीही कारणं न देता हे केले. बरं तिथे असे कळले की जेव्हा अमेरिकन, युरोपियन लोक येतात, तेव्हा त्यांच्यासाठी हे लोक पूर्वी त्यांच्या पद्धतीचे अन्न शिकून तेही करायचे. तिथले अनेक लोक जर्मन, फ्रेंच, रशियन या भाषा शिकले आहेत आणि येणाऱ्या पर्यटकांच्या सेवेसाठी खूप तत्पर आहेत. त्यामानाने युरोपात सगळं साचेबद्ध आहे. प्रेमाने, जिव्हाळ्याने पेक्षा 'व्यवसाय' म्हणून केले जाते. अर्थात भारतातही अशी ठिकाणं आहेतच जिथे लुबाडणूक होते, ते इथे युरोपात तसे कमी आहे.

हिमालय हा भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे तो संवेदनशील भागही आहे. आपल्या लष्करामुळे आज निदान या भागात जाणं शक्य आहे आणि सोयी सुविधा करण्यात अजून वाव असला तरीही त्याला मर्यादा आहेत. इथे आल्प्स संपूर्णपणे टुरिजम साठी प्रसिद्ध आहे आणि फक्त त्यावरच लक्ष केंद्रित करून या देशांनी तो प्रसिद्ध केला

आहे. त्यांच्यावर इतर सुरक्षितता, परकीय आक्रमण हे धोके तेवढे नाहीत. शिवाय हवामान दोन्हीकडे थंड असले तरी हिमालयाएवढे खडतर नाही. त्याचा उत्तम फायदा या युरोपीय देशांनी घेतला आहे.

अजून एक महत्वाचा मुद्दा बाहेरच्या लोकांचा जो आपण शिकायला हवा तो म्हणजे पब्लिक मॅनर्स. इथे कुठल्याही पर्यटन स्थळी बहुतांशी इथले लोक अगदी व्यवस्थित वागतात, कुठेही कचरा फेकत नाहीत. मग त्या स्थळाचा मनमुराद आनंद सगळ्यांना घेता येतो. भारतातही हे लोक येतात तेव्हा मुद्दाम कचरा टाकतील असे होत नाही. पण आपल्याकडच्या पर्यटकांचा माज दिसतो. इथे चद्दर ट्रेकला येऊन इतकं उत्तम खाणं मिळत असताना तक्रारी करणारे लोक आहेत. अगदी गरम अन्नही तिथल्या थंडीत ५ मिनिटात थंड होतं म्हणून लोक तक्रार करतात. शाकाहारी जेवण दिलं तर मांसाहारीच का नाही, मग ते असेल तर कांदा लसूण विरहित जैन अन्नपदार्थ का नाहीत अशा लोकांच्या मागण्या असतात. तिथल्या लोकांना नोकर म्हणून वाईट वागणूक देणारे आपले भारतीय लोकच जास्त आहेत. पाश्चात्य देशातील लोक या अगत्याचं कौतुक करतात. आणि इतक्या किरकोळ तक्रारी करत नाहीत. आमच्यासमोर असे लोक दिसले की ज्यांनी गरम पाण्याचा अर्धा ग्लास प्यायला आणि उरलेलं फेकून दिलं. तिथे ते लोक रोज इतक्या मेहनतीने सामान उचलतात, दूरवरून लाकडं आणतात, गरम पाणी करून देतात आणि लोक निर्लज्जपणे ते फेकतात. कचऱ्याचं तर विचारायलाच नको. युरोपचं निसर्ग सौंदर्य आहेच, पण ते लोक उत्तम मेंटेन करतात. आपल्याकडच्या चांगल्या जागासुद्धा खराब करण्यात लोक फार पुढे आहेत. या अनवट जागेची हळुहळू लोक वाढलेत तशी दुरावस्था होत जाते आहे, तर मग प्रसिद्ध स्थळांबद्दल बोलायलाच नको. मी आधी केलेल्या ट्रेक्स मध्येही हे अनुभवलं आहे आणि लोकांना सांगूनही आपल्यालाच उलट उत्तरं मिळतात हे पण पाहिले आहे. इथे युरोपात जेव्हा फिरले त्यानंतर हा फरक अजून जास्त जाणवला.

आता ट्रेक पूर्ण झाल्यावर काय वाटतंय? तिथे जाण्याची इच्छा असणाऱ्यांना काय सांगशील

ज्यांना मनापासून हा ट्रेक करायचा आहे त्यांनी अवश्य करावा. आमची पूर्वतयारी थोडी कमी पडली, त्यामुळे अजून थोड्या तयारीने जायला हवं. अर्थात आम्हाला त्रास झाला नाही ही चांगली गोष्ट. आणि सगळ्यात महत्वाचं, केवळ थ्रिल म्हणून, जगाला दाखवायला म्हणून, ट्रेकिंगची खोटी आवड दाखवायला म्हणून, फक्त फेसबुकीय पोस्ट टाकण्यात, मिरवण्यात आनंद असणाऱ्यांनी या अशा ट्रेकच्या वाटेला जाऊ नये. हा फक्त ट्रेक आहे, इथे कितीही सुंदर निसर्ग असला तरीही अशा भीषण थंडीत त्याचा आस्वाद घेता येईलच असं नाही. यासाठी मानसिक तयारी हवी. सरळ कुठेही न बघता, किलोमीटर किती राहिले याचा हिशोब न करता चालत राहायचं. ते पर्वत, बर्फ, तिथले लोक, निळं पाणी, निरभ्र आकाश हे बघून आपण स्तब्ध होतो, पण रोजचं लक्ष्य ठरलेलं असतं. शिवाय तिथल्या पर्वतांवर हिरवाई नाही, तशी कल्पना डोक्यात ठेवायची आणि मग 'इथे काय आहे बघण्यासारखं' असंही लोकांचं होतं. त्यामुळे पूर्ण माहिती घेऊन रुचत असेल तरच इथे जावं. अगदी शेवटच्या क्षणीही खराब हवामानामुळे ट्रेक कॅन्सल होणे, मधून परतावं लागणे असे काही होऊ शकते. शिवाय एकट्याने मध्येच मागे फिरायची संधी नाही. हे टीमवर्क आहे. सगळ्यांच्या सोबतीने नियम पाळून जायचं. अशा प्रकाराची आवड असेल तर हा ट्रेक तुम्हाला केवळ आनंद देईल आणि परत परत तिथे यावंसं वाटेल.

ही मुलाखत प्रकाशित करायला परवानगी दिली त्याबद्दल मुग्धाचे आभार. तिच्या सोबत ट्रेक करण्यापासून तर या मुलाखतीत माहिती पुरवण्यापर्यंत सतत साथ देणाऱ्या कैलासचेही आभार. तुमच्या पुढच्या अशाच अनेक यशस्वी ट्रेक्स आणि प्रवासासाठी तुम्हाला अनाहिता परिवारातर्फे शुभेच्छा!!

अविस्मरणीय ग्रीस – सँटोरीनी

(लेखिका - सानिकास्वप्निल)

अनाहिता भटकंती विशेषांकाची घोषणा झाली आणि कुठल्या विषयावर-लिखाण करायचे याचा विचार सुरु झाला आणि मग लख्खं आठवले की आपण मिपावर सुरु केलेल्या ग्रीस लेखमालेचा शेवटचा भाग लिहिलेला नाहीयेकाही . ... कारणास्तव त्यावर लिखाण असे करायला जमत नव्हतेच, ग्रीस लेखमाला अपूर्ण राहिली याची रुखरुख मनाला लागून राहीली होती पण भटकंती विशेषांक येणार असे कळल्यावर हुरुप वाढला आणि ही लेखमाला पूर्ण करायची असे ठरवूनच लेखणी आपलं ते कळफलक हातात घेतला आणि पुन्हा त्या रम्य आठवणीत रमून गेले (:

अविस्मरणीय ग्रीस सफरीचे आधीचे भाग-

अविस्मरणीय ग्रीस - प्रस्तावना, भाग १ - अथेन्स, भाग २ - अथेन्स, भाग ३ - नॅक्सोस

सँटोरीनी - दिवस पहिला

तर नॅक्सोसहून साडे बाराला आमची सँटोरीनीची बोट निघाली आणि आम्ही नॅक्सोसला टाटा करत निघालो....

अडीच तासांचा प्रवास होता, त्यामुळे सँटोरीनीला पोहोचेपर्यंत तीन वाजणार होतेच म्हणून मग बोटीतच जेवण केले. बोट चालत होती आणि सोबतीला एगियन समुद्राची साथ होती. समुद्राचा निळाभोर रंग बघून डोळे सुखावले होते अगदी. दूर दिसणाऱ्या इतर बोटी, निळेशार पाणी बघून मन उत्साही झाले. **सँटोरीनी!!** कधी स्वप्नातसुद्धा आपण इथे जाऊ शकू असे वाटले नव्हते, बऱ्याच सिनेमांमध्ये बघितलेले सँटोरीनी, ती सागर निळाई, टेकडीच्या कडेने असलेली पांढरी-निळी घरे, निळसर घुमट असलेले चर्च, मोठ-मोठाले हॉटेल्स, अगदी मोहक, अद्भुतरम्य पोस्टकार्डच जणू! त्यासुंदर देखाव्याने मनाला भुरळ घातली होती आणि आज प्रत्यक्षात आपण तिथे जात आहोत, हे सर्व बघणार आहोत, अनुभवणार आहोत या कल्पनेनेच मी हुरळून गेले होते.

एगियन समुद्राचे क्षेत्रफळ ८३,००० स्क्वे.मी आहे. एगियन समुद्रात हजारो बेटं पसरलेली आहेत, पूर्वी याला द्वीपसमूह असे म्हटले जाई कारण येथे समुद्रातून वर आलेले अनेक भूभाग किंवा बेटं आहेत. ही ग्रीक-एगियन बेटं सात भागात विभागलेले आहेत:

१. नॉर्थईस्टन एगियन आयलंड्स   २. Euboea   ३. नॉर्थन स्पोरेड्स   ४. सायक्लेड्स

५. सेरॉनिक आयलंड्स   ६. Dodecanese   ७. क्रेत

(माहिती विकिपिडियावरुन साभार - Reference https://en.wikipedia.org/wiki/Aegean_Sea)

काहीवेळातच घोषणा झाली आणि आम्ही प्रवासी आप-आपले सामान घेऊन उभे राहिलो. आमची फेरी किनाऱ्याला लागताच फेरीचे दार उघडले आणि ही लोटच्या लोट गर्दी हळू-हळू बाहेर पडू लागली. सँटोरीनी हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ असल्यामुळे तौबा गर्दी होती तिथे. आम्ही रांगेत सामान घेऊन चालत होतो, काही मिनिटातचं आम्ही फेरीच्या बाहेर पडलो आणि जवळच एका आडोश्याला उभे राहिलो. आमच्या समोर होता बस थांबा आणि तिथे ही पर्यटकांची भली मोठी रांग दिसत होती. आम्ही सँटोरीनी फिरण्यासाठी आधीच गाडी बुक केली होती. मित्राकडे नेदरलँडचा परवाना होता

शिवाय त्याला लेफ्ट-हँड ड्राईव्हिंगची सवय होतीच त्यामुळे गाडी बुक करुन फिरणं सोयीचे होणार होते. आम्ही टुअरला निघण्याआधीच बुकिंग केले असल्यामुळे सँटोरीनीला पोहोचताच काही मिनिटातच गाडीवाला सर्व कागदपत्रे आणि गाडी घेऊन हजर झाला. सगळे सोपस्कार पार पाडून, गाडीत सामान टाकून, सॅटनॅव्ह लावून व्हिलाच्या दिशेने, मेसारियाला निघालो.

क्रेतच्या उत्तरेस, १२० किलोमिटरावर, एगियन समुद्राच्या दक्षिणेस असलेल्या सायक्लेड्समधले, चंद्रकोर द्वीपसमूहातील सँटोरीनी हे सर्वात मोठे बेट आहे. या द्वीपसमूहाला सँटोरीनी कॅलडेरा असे म्हणतात. सुमारे ४००० वर्षांपूर्वी स्त्राँजिली नावाचे गोलाकार बेट एगीयन समुद्रात होते. पुरातत्वशास्त्रानुसार ताम्रयुगात झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकात या अखंड बेटाची चार भागात विभागणी झाली सँटोरीनी, थेरासिया, निया कामेनि, पालेया कामेनि तसेच कॅलडेरा परिघाच्या बाहेरील बाजूस असलेले Aspronisi ही या द्वीपसमूहाचा छोटासा भाग आहे. त्यातील सँटोरीनी आणि थेरासियावर मनुष्यवस्ती आहे तर निया कामेनि आणि पालेया कामेनि निर्जन आहे. सँटोरीनीला स्थानिक भाषेत थेरा किंवा थिरा म्हटले जाते आणि सँटोरीनीच्या राजधानीचे नाव**फिरा** ही त्यावरूनच पडले.

** छायाचित्र आंतरजालावरुन साभार- Reference Site - www.santorinigreece.net.gif)*

व्हिलाला पोहोचताच चेक-इन करुन रुममध्ये सामान टाकले, थोडे फ्रेश झालो, नाही म्हटले तरी वातावरणातला बदल जाणवत होताच. व्हिलाच्या स्टाफने आम्हाला चहा-कॉफी की फ्रेश ज्युस हवे ते विचारले आणि त्याप्रमाणे प्रत्येकाच्या आवडीनुसार पेयपान आणून दिले. सोबत असलेले घारगे, मुगाचे लाडू खाऊन आम्ही तयार झालो आणि निघालो इयाला फेरफटका मारायला आणि तिथला सुप्रसिद्ध सूर्यास्त बघायला.

इया हे सँटोरीनीच्या वायव्य दिशेला वसलेले सुंदर, नयनरम्य गाव आहे. इथला सूर्यास्त जगातला सर्वात सुंदर सूर्यास्त आहे असे म्हटले जाते आणि ते खरं ही आहेच. इया हे छोटेसे गाव आहे जिथे अरूंद रस्ते, निळ्या रंगाचे घुमट असलेली चर्च, पांढरी-पेस्टल रंगाची आकर्षक घरे, त्यांची सुर्यप्रकाशात न्हालेली ओसरी, कॅफेज, टॅव्हर्न्स आणि सगळ्यात व्यस्त असा पादचारी रस्ता जिथे अनेक दुकाने आहेत. इथे पर्यटकांची ये-जा सतत सुरु असते. इयाला पोहोचताच कार पार्क शोधणे आणि त्यातही पार्किंगसाठी जागा मिळवणे अवघड काम आहे. सुदैवाने आम्हाला एक जागा पटकन मिळून गेल्यामुळे फार शोधाशोध करावी लागली नाही पण तिथून वर चढत जायचे अंतर तसे बरेच होते. गाडी पार्क करुन आम्ही चालत निघालो. अरुंद, कॉबलस्टोन आणि दोन्ही बाजूंनी दुकाने असलेल्या पायऱ्यांवरुन आम्ही चढाई करायला सुरूवात केली, जसे जसे चढत होतो तसे तसे त्या जागेच्या प्रेमात पडत गेलो, शब्दात वर्णन करता येणार नाही इतके अप्रतिम सौंदर्य आहे इयाचे. मैत्रीण त्यावेळी गरोदर होती म्हणून हळू-हळू चढाई करत, वाटेत थोडे फोटो काढत आम्ही वर पोहोचलो. पांढऱ्या शुभ्र भिंती, जीने, गडद निळ्या रंगाचे दरवाजे, खिडक्या सगळेच आकर्षक दिसत होते.

** इयाला जाताना वाटेत काढलेले काही फोटोज*

सूर्यास्त व्यवस्थित बघता यावा, फोटो काढता यावे म्हणून आम्ही जागा शोधत होतो. बऱ्याच पर्यटकांनी सूर्यास्त बघण्यासाठी मोक्याची जागा आधीच पकडून ठेवली होती. इयावर असलेल्या व्हेनेशियन किल्ल्याचे काही अवशेष आहेत त्यावरही लोकं चढून बसली होती. इयाचा सूर्यास्त बघण्यासाठी खास सनसेट क्रुझही निघतात. जवळच असलेल्या एका ओपन रेस्तराँच्या मागच्या बाजूस एक दगडी आवार होते त्यावर जागा पकडून आम्ही बसलो होतो. हळू-हळू अनेक पर्यटक आमच्या बाजूला येऊन बसले, कुणी कॅमेरा, कुणी मोबाईल हातात घेऊन सुर्यास्त टिपण्यासाठी सज्ज झाले. आता सुर्याचे तेज सर्वत्र पसरले होते, त्याच्या सोनेरी किरणांनी सगळे लख्ख चमकत होते. क्षणात समुद्राचे पाणी शंभर नंबरी सोन्यासारखे झळाळून गेले. हळू-हळू सूर्य अस्ताला जात होता, तो भव्य सोहळा बघून मंत्रमुग्ध व्हायला झाले अक्षरशः. सूर्य मावळताना क्षितीजावर केशरी, पिवळी, गुलाबी रंगांची उधळण होत होती, हलके सोनेरी-गुलाबी सूर्यकिरणांनी तिथली पवनचक्की, पांढरी शुभ्र घरे व्यापून टाकले होते.

निसर्गमातेचे हे भावपूर्ण सौंदर्य, तो रूबाब बघून थक्क व्हायला झाले. सूर्याचे फोटो जमेल तेवढे काढत होतेच पण शेवटी तो कॅमेरा बाजूला सारला आणि ते जादूई क्षण भरभरून अनुभवले, जमेल तितक्या त्या सोनेरी क्षणांची आठवण जमा करत होते. सूर्य जेव्हा मावळला तेव्हा आकाशात पसरलेले विविध रंग बघून शांत वाटले आणि कुसुमाग्रंजाच्या कवितेच्या ओळी आपसूकच ओठी आल्या, *"प्रकाशदाता जातो जेव्हा जळाखालच्या घरी, नकळत माझे हात जुळोनी येती छातीवरी"*. नॅक्सोसमधल्या सूर्यदेवाचे रूप बघताना असा सूर्यास्त याआधी कधीच अनुभवला नव्हता असे वाटून गेले होते पण इयाचा सूर्यास्त बघितला आणि जाणवले हा अनुभव तर **अ फा ट** आहे!! शब्द अपुरे पडतील इतके भारावून जायला होतं, कॅमेऱ्यात कितीही ते क्षण साठवण्याचा प्रयत्न केला तरी प्रत्येक्षात ते अनुभवणं कैकपटीने सरसचं ठरले. सूर्याची ती मोहकता, ती साजिरी प्रतिमा तुम्ही कायम मनात जतन करून ठेवाल :)

** सूर्यास्ताचे काही टिपलेले फोटोज*

** व्हेनेशियन किल्ल्याचे अवशेष आणि चमचमणारे इया*

हळू-हळू अंधार पडू लागला, काही फोटो काढत, चमचमणारे इया बघत, थोडी खरेदी करत आम्ही खाली उतरलो. भूक ही लागली होती म्हणून एका ग्रीक टॅव्हर्नमधून ग्रीक जेवण घेतले आणि कार पार्कपाशी जायला निघालो. आज आवरून लवकर झोपायचे होते, उद्या ओल्ड पोर्ट ऑफ फिरावरुन बोट पकडून टुअर ऑफ कॅलडेरा करायची होती. व्हिलावर येऊन जेवलो व आजच्या सूर्यास्ताच्या मनमोहक रुपाने भारावलेले आम्ही त्या सोनेरी विचारातच झोपी गेलो :)

****

सँटोरीनी - दिवस दुसरा

सकाळी लवकर उठून आवरले. व्हिलाच्या स्टाफने रुममध्येच ब्रेकफास्ट

आणून दिला होता. मैत्रीणीची खोली शेजारीच असल्यामुळे तिच्या खोलीतच एकत्र जमलो आणि हेव्ही ब्रेकफास्ट केला. आवरून आम्ही फिराला पोहोचलो, तिथून खाली ओल्ड पोर्ट ऑफ फिराला जाण्यासाठी तीन पर्याय आहेत एक चालत (उतरत), केबल-कार आणि गाढवावरुन ;) हो सँटोरीनीमध्ये गाढवांचा वापर ओझी वाहण्यासाठी, पर्यटकांना चढाई करण्यासाठी होतो. पायी जाणे आम्हाला शक्य असले तरी मैत्रीण गरोदर होती आणि जवळ-जवळ ५७०+ पायऱ्या उतरणे तिला जमले नसते, गाढवावर बसून धिंड आपलं ते वरात आपलं ते टेकडी चढ-उतर करायची हौस आमच्यापैकी कोणालाच नव्हती त्यामुळे केबल-कारचा पर्याय सगळ्यात सोयीस्कर होता. केबल-कारचे तिकिट काढून आम्ही खाली बंदरावर जायला निघालो, वरुन दिसणारा निळा समुद्र आणि पांढऱ्या बोटी लक्ष वेधून घेत होते. खाली येताच नवरा व मित्र एक्सकर्शन टुअर्सवाल्यांकडे जाऊन **टुअर ऑफ कॅलडेरा** ची तिकिटं काढून घेऊन आले. एकूणचं साडेपाच तासाची टुअर होती ज्यात निया कामेनी (ज्वालामुखी विवर)**--->**पालेया कामेनी(हॉट स्प्रिंग्स)**--->**थेरासिया(लंचब्रेक)**--->**इया पोर्ट**--->**ओल्ड पोर्ट ऑफ फिरा अशी टुअर असणार होती.

काहीवेळातच आमची बोट लागली आणि आम्ही प्रथम निया कामेनी बघायला निघालो. बेटाच्या किनाऱ्यावर अनेक पर्यटकांच्या बोटी लागल्या होत्या. काळ्या रंगाचे दगड, बोल्डर्स दिसत होते. ग्रीसला असेच उन्हाचे चटके बसत त्यामुळे सनस्क्रीन लावून, गॉगल, छत्री, पाण्याची बाटली घेऊनचं आम्ही बाहेर पडत असू (दे व्हिल बी युअर लाईफसेव्हर्स) पण ज्या क्षणी निया कामेनीवर पाय ठेवला प्रामाणिकपणे सांगते सूर्य आग ओकतोय या वाक्याचा अर्थ तंतोतंत समजला. उन्हाचा कडाका चांगलाच जाणवत होता, त्वचा रापली होती. आम्ही इतक्या दिवसात जितके टॅन झालो नव्हतो तितके टॅन निया कामेनीवर येऊन झालो, रुक्ष, रणरणतं उन, सूर्य तळपत होता अगदी.

निया कामेनी बेट १३० मी.उंच, २ किलोमीटर व्यासाचे ज्वालामुखी विवर आहे. ताम्रयुगात झालेल्या ज्वालामुखीच्या महाभीषण उद्रेकात त्यावेळचे थेरा आणि आक्रोतिरी वसाहतीची नासधूस झाली होती. इथे मनुष्यवस्ती नाही पण रोज हजोरो पर्यटक हे विवर बघायला येत असतात. थोडी चढाई करुन उंचावर पोहोचायचे होते. तशी चढाई फार नाही पण डळमळीत, अस्थिर भूभाग असल्यामुळे वॉकिंग शूज़ असले तर चालणे सुसहय होईल हे आवर्जून सांगावेसे वाटते.

** फिरावरुन दिसणारे निया कामेनी आणि तिथली चढाई करताना काढलेले काही फोटोज*

ओसाड, खडकाळ, वळणा-वळणाच्या, रखरखीत रस्त्यावरुन चालत असताना असे वाटून गेले की आपण चंद्रावरच चालत आहोत. चहूबाजूंनी लाव्हारसाचे तयार झालेले फत्तर, लहान-लहान विखुरलेली खडी आहेत. असे म्हणतात की हा ज्वालामुखी आजही सक्रिय(ॲक्टिव्ह) आहे. गेल्या हजारो वर्षात अकरा

वेळा या ज्वालामुखीचा उद्रेक झाला असल्याची नोंद आहे, शेवटचा उद्रेक १९५० मध्ये झाला होता. इथे बऱ्याच ठिकाणी सल्फरचे वायुमार्ग आहेत. आमच्या गाईडने अशाच एका वायुमार्गातून वाफ बाहेर येताना दाखवली, फोटोत ती टिपणं शक्य झाले नाही तरी वायुमार्गाचा फोटो देतेय. इथे आमच्यासोबत असलेले बरेच पर्यटक हात ठेवून वाफेची उब अनुभवत होते. वरती ISMOSAV (Institute for the Study and Monitoring of the Santorini Volcano)च्या शात्रज्ञांनी त्यांच्या निरिक्षणासाठी ठेवलेली उपकरणं आपल्याला बघायला मिळतात. आमचा गाईड सांगत होता १९५० साली झालेल्या ज्वालामुखीचा उद्रेक त्याकाळी काही शाळकरी मुलांनी पाहिला होता. निया कामेनीवर अनेक मानवनिर्मित दगडांचे मनोरे रचून ठेवलेले दिसतात असे करण्यामागचे कारण माहित नाही कदाचित पर्यटकांनी कधीतरी हे केले असावे. संपूर्ण चढाई केल्यावर वाऱ्याची उष्ण झुळुक त्या असह्य उकाड्यात तरतरी आणून गेली आणि समोर असलेले निसर्गाचे अद्भुत दृश्य बघून मन सुखावले. निया कामेनीवरुन दिसणारा पालेया कामेनी त्यामागे असलेले Aspronisi बेट, तर एकीकडे थेरासिया, एकीकडे इया, कुठे गडद निळे तर कुठे टर्क्वाँइज़ रंगाचे पाणी, पांढऱ्या बोटी, काळे-कुट्ट पाषाण तर फिके-निळे आकाश, आय मस्ट से, नो ट्रिप टू सँटॉरीनी इज कंप्लिट विदाऊट अ ट्रिप टू दी निया कामेनी! साधारण दीड-पावणे दोन तासात आम्ही संपूर्ण निया कामेनी बघून खाली उतरण्यास सुरूवात केली. पुढचा स्टॉप होता पालेया कामेनी.

** वायुमार्गाचा फोटो*

** उपकरणं*

** दगडी मनोरे*

* निया कामेनीवरून दिसणारे Aspronisi *निया कामेनीवरून दिसणारे पालेया कामेनी आणि Aspronisi

पालेया कामेनी येथे हॉट स्प्रिंग्स आहे. तिथे (Sulphuric) गंधकयुक्त, गरम /ऊन पाणी आहे जे रोगनिवारक मानले जाते. या पाण्याचा रंग तपकिरी आहे. पालेया कामेनीजवळ Agios Nikolaos या कोव्हमध्ये नांगर सोडले जाते आणि तिथून

मग पर्यटक पालेया कामेनीच्या हॉट स्प्रिंग्जमध्ये पोहण्यासाठी उतरतात. आमच्याआधी अजून एक बोट आली होती, त्यातील प्रवासी ही पटापटा पाण्यात उतरून हॉट स्प्रिंग्सजवळ पोहत जाऊ लागले. आमची बोट किनाऱ्याजवळ येताच बोटीतले लोकं चटकन स्वीमवेअर घालून पाण्यात डाईव्ह करु लागली, मैत्रीण सोडून आम्ही तिघेही उतरलो. साधारण ३० मिनिटे बोट थांबते या ठिकाणी, शिवाय पोहून आल्यावर बोटीत चेंज करण्यासाठी चेंजींग रुम्सची सोय आहे. या पाण्याचे तापमान ३०-३५ डिग्री असतं पण समुद्राचे पाणी यात मिक्स होत असल्याने खरंतर हॉट स्प्रिंग्ज नाही म्हणता येणार "वॉर्म स्प्रिंग्ज" म्हणता येईल. इथे जाणवलेल्या महाभयंकर उकाड्यात हॉट स्प्रिंग्जमध्ये पोहून छान ताजेतवाने वाटले. हॉट स्प्रिंग्जच्या पायथ्याशी ग्रीक सेंट.निकोलस ऑर्थोडॉक्स चॅपल आहे. सगळे प्रवासी पोहून पुन्हा बोटीत आल्यावर आमची बोट निघाली थेरासिया बेटावर लंच ब्रेक घ्यायला.

** पालेया कामेनीचे काही फोटोज*

** सेंट.निकोलस ऑर्थोडॉक्स चॅपल*

** पालेया कामेनी- सुखद निळाई आणि तेथून दिसणारे थेरासिया*

वाटेत दिसणारे थेरासिया इयाप्रमाणेच सुंदर दिसत होते, नागमोडी पायऱ्या, पांढऱ्या रंगाची हॉटेल्स, कॉर्फोसचे पारदर्शक पाणी आणि अगदी किनाऱ्यालगत असलेली काही रेस्तराँ/टॅव्हर्न्स. आमची बोट लागली बंदराला तसे सगळे पर्यटक खाली उतरले. गाईड म्हणाला इथे दोन तासाचा ब्रेक आहे लंचसाठी इथल्या लोकल टॅव्हर्न्समध्ये जेवू शकता किंवा कोणाला डाँकी-राईड घेऊन वर मनोलास गावात फिरायचे असल्यास जाऊन येता येईल. आम्ही लंच ब्रेक घ्यायचा ठरवले आणि कॅप्टन जॉन रेस्तराँमध्ये जेवायला गेलो. इथे विविध प्रकारचे सी-फूड्स होते पण त्यात जास्तं करुन स्क्विड्स, ऑक्टोपस असल्यामुळे आम्ही मीटकडेच मोर्चा वळवला. आताशी भूक खूप लागली होती आणि पोहून आल्यामुळे, उन्हामुळे थकवा ही जाणवत होताच. पुरूषांनी ग्रीक मिथॉस बिअर आणि मी सँटो वाईन (सँटोरीनीला गेला तर तिथली वाईन प्याच) आणि सोबत ग्रीक सागानाकी चीझ (पॅन फराईड चीझ) अशी ऑर्डर केली. थोड्या वेळातच आमच्या ऑर्डर केलेल्या जेवणाच्या डिशेस आल्या कॉर्न-पीज राईस, चिकन कबाब, टोमॅटो पास्ता आणि ऑलिव्ह ऑईल + ब्रेड. रेस्तराँच्या थंडगार सावलीत शांत वाटत होतं, बाजूलाच समुद्राचे निळे पाणी, एखाद-दुसरी रिकामी बोट बांधून ठेवलेली आणि हलका-हलका वारा. जेवणं आटोपून तिथेच थोडा आराम केला, किनाऱ्यावर फिरलो, तिथे लोकं पाण्यात माश्यांना ब्रेडचे तुकडे खायला देत होती, ते अन्न मिळवण्यासाठी छोटे-छोटे मासे अगदी लगबगीने यायचे तेव्हा

पाण्यात माश्यांच्या हालचालींमुळे छान तरंग तयार होत, एक-दोन दुकानं होती तेथे डोकावून आलो. काही लोकं पाण्यात पोहत होते काही भटकत होते तर काही बिअर घेऊन बसले होते.

** थेरासिया बंदरावर काढलेले फोटोज*

थोड्यावेळात निघायची वेळ झाली तसे सर्व सह-प्रवासी बंदरावर येऊ लागले. आमची बोट निघाली होती इयाला. इयाला सूर्यास्त बघायला उतरणारे काही प्रवासी होते त्यांना उतरवून आमची

बोट ओल्ड पोर्ट ऑफ फिराला येणार होती. इया जवळ पोहोचताच प्रवासी उतरले काही पायी चालत गेले तर काहींनी डाँकी राईड घेतली. फिरून आम्ही फिराच्या पोर्टवर आलो, एक संपूर्ण दिवस मजेत घालवला होता आम्ही.

** फिरा*

उतरून केबल-कारने दोन मिनिटांत वर पोहोचलो. वर येताच ऑलिव्ह ऑईल आणि स्मरणवस्तू विकत घेण्यासाठी आम्ही दुकानं फिरत राहिलो. मध्येच फ्रुट सॅलॅडचा स्टॉल दिसला मग फ्रेश फ्रुट सॅलॅड खात, फेर-फटाका मारत कार पार्ककडे गेलो. रात्रीचे जेवण व्हिलात होणार होते त्यामुळे थेट व्हिला गाठले. फ्रेश झालो, फक्कडसा चहा घेतला आणि व्हिलाच्या मोठ्या बाल्कनीत गप्पा मारत बसलो. त्या रात्री व्हिलामधून दिसणारा चंद्रही सुंदर दिसत होता आणि लगेच जाणवले, सँटोरीनीमधला अजून एक दिवस संपला.....

***

सँटोरीनी: दिवस तिसरा - आज सँटोरीनीमधला शेवटचा दिवस, सकाळी उठून भरभर आवरले, नाश्ता करुन आम्ही इयाला निघालो, काय करणार इयाच्या प्रेमातच पडलो होतो ;) इयाला प्रथम आलो ते सूर्यास्त बघायला, आज दिवसा-उजेडी तिथून निघण्यापूर्वी एकद इया-दर्शन घ्यायचे होते शिवाय इयाच्या पांढऱ्या-निळ्या पार्श्वभूमीवर हौसेने सोबत आणलेले पांढरे-निळे कपडे घालून फोटो काढायचे होते =)) तर आजचा प्लॅन होता इया, तिथून आक्रोतिरीचा रेड बीच, पेरीसा ब्लॅक

बीच आणि कामारी बीच बघण्याचा. त्याप्रमाणे आम्ही निघालो. इयाला पोहोचलो तेव्हा सूर्य डोक्यावर आला होता आणि दुतर्फी दुकाने ही उघडत होती. पटपट पायऱ्या चढून जमेल तिथे, मोक्याची जागा बघून आम्ही चौघे फोटो काढत होतो. इयाच्या खाली बंदरावर जाणाऱ्या नागमोडी पायऱ्या, नीलवर्णी समुद्र, पायऱ्या उतरताना दिसणारी गाढवं आणि कडे-कडेला असलेली पंचतारांकित हॉटेल्स, घरे हे सर्व कॅमेऱ्यात टिपले. सँटोरीनीमध्ये ठिक-ठिकणी गाढवं दिसतात, अगदी दया येते त्यांना बघून पर्यटकांना बंदरावर ने-आण करणे, माल-ओझी वाहून नेणे, ते बिचारे आपले काम अगदी चोख करत असतात.

***

** इयाचे फोटोज*

इयाच्या त्या सुंदर देखाव्याचे अनेक फोटो काढून झाले. तिथून निघताताना येता-जाता बघून ठेवलेली, सँटोरीनी लिहलेली, बुटाच्या आकाराची क्रॉस-बॉडी बॅग तिथली आठवण म्हणून मी घेतली. गाडी काढून आम्ही निघालो आक्रोतिरीला, तिथला रेड बीच बघण्याकरीता. आक्रोतिरि हे दुसऱ्या सहस्रकाच्या मध्यात झालेल्या थेरा ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या राखेत पुरले गेलेले शहर होते. १८९५-१९०० च्या काळात भूस्तरशास्त्रवेत्त्यांनी या जागी उत्तखनन केले.

** मेसा व्युओनोच्या उंचावर पुरातन थेरा*

आजही मेसा व्युओनोच्या उंचावर पुरातन थेराचे काही भग्नावषेश आपल्याला बघायला मिळतात, तसेच काही पुरावशेष तिथल्या संग्रहायलायात बघायला मिळतात. रेड बीच हा आक्रोतिरीच्या पुरातन स्थळापासून काही अंतरावर असलेला छोटा बीच

आहे. इथे जाण्यासाठी तुम्ही फिराहून बस घेऊ शकता, तिथेच आक्रोतिरीचे प्रसिद्ध संग्रहालय आहे, आम्ही तिथे गेलो नाही. कार पार्क करुन चालत आम्ही निघालो रेड बीच बघायला, रेड बीचला जाण्यासाठीची पाऊलवाट खडबडीत आहे तसेच थोडे चढून वर जावे लागते. आम्ही पाऊलवाटेने जात असताना अगदी टेकडीच्या (खरंतर टेकडी नाही म्हणता येणार जराशा उंचवट भागाच्या) पायथ्याशी मकेवाला बसला होता. आम्ही जवळ पोहोचताच इंडियन असे त्याने विचारले, आम्ही हो म्हणताच नामास्ते, बुठा काओगे? असे विचारले, आम्हाला मौज वाटली, त्याला म्हटले बीच वरुन येताना घेऊ :) वर चढताच दिसतं निळे-हिरवे कोव्ह आणि उंच उंच लाल मातीच्या कडा. बीचला जाण्यासाठी त्याच रस्त्याने पुढे-पुढे चालत जाऊन थोडे खाली उतरावे लागते. आजू-बाजूला मोठमोठाल्या लाल रंगाच्या शिळा आहेत आणि कच्चा रस्ता आहे. खाली उतरताच बरेच पर्यटक टॉवेल अंथरून त्यावर उन्हं घेत बसलेली दिसतात. या बीचवर प्रसाधनगृहे, डेक चेअर्स नाहीत, इथे पायी खडबडीत वाटेने जाता येतं तसेच आक्रोतिरी बंदरावरून सुटणाऱ्या बोटीतूनही जाता येत. इथल्या किनाऱ्यावर वाळू नसून लालसर - काळसर रंगाचे खडे आहेत, तसेच पाणी स्वच्छ व पारदर्शक आहे. इथल्या बीचवर थोडा वेळा टाईमपास करुन आम्ही परत यायला निघालो, वाटेत एक स्थानिक माणूस अगदी रममाण होऊन व्हॉयलिन वाजवत होता, न रहावून त्याचा फोटो काढला. खाली उतरल्यावर सांगितल्याप्रमाणे भाजलेले मके घेतले व कार पार्ककडे प्रयाण केले.

** रेड बीचचे फोटोज*

राजधानी फिराच्या आग्नेयाला पेरीसा बीच आहे. या बीचच्या किनाऱ्यावर वाळू अशी नाहीच, संपूर्ण किनारा काळ्या गोट्यांचा, खड्यांचा आहे. किनाऱ्यावर अनेक डेक-चेअर्स आणि पॅरासोल्स आहेत, गोरे पर्यटक समुद्रात पोहून त्या डेक चेअरवर येऊन विसावत. हजारो पर्यटक या समुद्रकिनाऱ्याला भेट देत असतात ते इथल्या काळ्या खड्यांचा किनारा पहाण्यासाठी, स्फटिकासारखे स्वच्छ निळे पाणी बघण्यासाठी. Pofitis IIias / एलिजाह डोंगराच्या दक्षिणेला असलेला हा बीच तसा कमी गडबडीचा आहे. याच डोंगराला मेसा व्युओनो असे ही म्हटले जाते आणि पुरातन थेरा बघायला इथून जाता येतं. या समुद्रकिनाऱ्यालगत अनेक रेस्तराँ, कॅफेज, पिझ्झा शॅक्स आहेत आणि इथे डेक चेअर्स पण ४ युरोला उपलब्ध असतात. तुम्ही चेअर घेतल्यावर कॅफेची माणसे तुमची खाण्या-पिण्याची ऑर्डर घ्याला येतात. आम्हाला रात्रीचा प्रवास करायचा होता त्यामुळे बीचवर येऊन पोहण्याच्या आम्हा मुलींचा विचार नव्हता फक्त विश्रांती घ्यायची होती. पिझ्झाची ऑर्डर देऊन मुलं पोहायला गेली. आम्ही निवांत पडून समुद्राच्या लाटा उसळताना बघत होतो, त्या पॅरसोलच्या शीतल छायेत, ती समुद्राची निळाई डोळ्यांना सुखावणारी होती. बीचवर कुठे मसाज करणाऱ्या मुली आपले किट घेऊन फिरत होत्या, कुणी मालिश करवून घेत होतं कुणी पुस्तक वाचत बसले होते तर कुणी सनबाथ घेत होते. उन्हाची झळ बसत होती, अगदी चटके

बसणारी. अशा कडक उन्हात काळ्या खडेवाल्या किनाऱ्यावर अनवाणी चालूच शकत नाही, पायाचे तळवे भाजतात अक्षरशः.

** पेरीसा बीच्चे फोटोज*   *मेसा व्युओनो

तिथूनच जवळ म्हणजे कामारी बीच आहे. Pofitis IIias / एलिजाह डोंगराच्या उत्तरेस हा बीच आहे. याचा ही किनारा पेरीसा बीचप्रमाणेच काळ्या गोट्यांचा आहे पण इथे उन्हाळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी असते. या समुद्रकिनाऱ्यावर अनेक जलक्रीडा होत असतात. इकडचे नाईट-लाईफ ही प्रेक्षणीय आहे. प्राचीन थेराला इथूनही जाता येतं. निघताना तिथे मिळणारे भन्नाट चवीचे पिस्ता आईस्क्रीम घेतले. बघता-बघता दिवस संपत आला, आता जड पावलांनी कामारीवरुन आम्ही निघालो व्हिलावर यायला. व्हिलावर आल्यावर फ्रेश झालो आणि सामानाची बांधाबांध करु लागलो. आज रात्री साडे-अकराला फिरा बंदरावर आम्हाला गाडी तिच्या मालकाच्या स्वाधीन करायची होती आणि तिथूनच पिराऊसला जाणारी आमची ब्लू-स्टार फेरी पकडायची होती. व्हिलावरचं रात्रीच्या जेवणाची व्यवस्था केली होती त्यामुळे जेवणं आटोपून, आम्ही तयार झालो.

** कामारी बीचचे फोटोज*

बंदरावर येताच गाडी दिली. आमची बोट पहाटे १:२५ ची होती त्यामुळे आम्ही वेटिंग रुम मध्ये येऊन बसलो. बोट लागली, बरेच आधी आल्यामुळे बोटीत पटकन जाता आले आणि त्यामुळे पटापटा ४ सोफे आम्ही पकडून सामान ठेवून, आडवे झालो. पावणे सात तासांचा प्रवास सुरू होणार होता, थोडेसे उदास वाटत होते, सामानाकडे लक्ष ठेवत झोपी गेलो, मनात इथे घालवलेले प्रत्येक क्षण येत होते, प्रत्येक ठिकाण आठवत होते, प्रत्येक जागेचे आपले वेगळेपण, इतिहास, मनोहारी सौंदर्य, मजा, आठवणी या सगळ्यांची उजळणी सुरू होती, त्या विचारातचं डोळा लागला. पहाटे-पहाटे लोकांची उठाऊठ सुरू झाली. उठून आवरले आणि चहा आणि लाईट ब्रेकफास्ट केला. काहीवेळातच आम्ही पिराऊसला पोहोचलो. आता पुन्हा तसाच प्रवास पिराऊस ते ओमोनियाला ट्रेनने आलो. तिथून चालत सिंतगामा स्क्वेअरला आलो आणि अथेन्स एअरपोर्टला जाणारी बस पकडली. विमानतळावर आल्यावर इंडिकेटर चेक केले, गेट लागले नव्हते. वेटिंग एरियात गप्पा मारत बसलो, मैत्रिणीला मानले बुवा, ४ महिन्यांची गरोदर असूनही इतका प्रवास तिने स्वतःला अजिबात त्रास न होऊ देता केला हॅट्स ऑफ टु हर!! आमच्या आणि मित्राच्या विमानाच्या वेळेत एका तसाचा फरक होता. काही वेळांनी त्यांचे गेट लागले, ॲमस्टरडॅमचे बोर्डिंग सुरु झाले तसे गळाभेट करुन, एकमेकांचे आम्ही निरोप घेतले. आमचे विमान लागायला एक तास होता, आता

मात्र वेळ जाता जाईना, पाय तिथून निघेना. सात दिवस भुर्र्क्कन गेले, उरल्या त्या सुखद आठवणी. काही वेळाने आमचे गेट लागले, मागे वळून वळून बघत होतो, पुन्हा केव्हा येऊ माहित नाही पण येऊ हे नक्की असा निश्चय केला आणि ग्रीसचा निरोप घेऊन जड अंतःकरणाने आम्ही फ्लाईट बोर्ड केले.

समाप्त.

नोटः ग्रीसमध्ये खरेदी करण्यासारख्या वस्तू

बकलावा, कतैफी ग्रीक मिठाई घ्याच.
पाकवलेली, सुकवलेली फळे.
ऑलिव्ह ऑईल.
सन ड्राईड टोमॅटोज, सन ड्राईड टोमॅटोज इन ऑलिव्ह ऑईल.
ग्रीक कॉफी पॉट.
सुवालाकी मसाला.
कॅलामॅटा ऑलिव्ह पेस्ट.
सँटोरीनी वाईन.
वेगवेगळे प्रकारचे चीझ.
आवडत असतील तर ग्रीक आयलंड्समधली खास नॅचरल स्पाँजेस घेऊ शकता.
स्मरणवस्तू / सिरॅमिक्स / हँडीक्राफ्ट्स.
.....आणि कायमस्वरूपी जतन केलेल्या अमूल्य आठवणी :)

अनाहिता भटकंती विशेषांकाच्या निमित्ताने शेवटचा भाग जरी लिहिला तरी त्या स्वप्नातल्या प्रवासाच्या आठवणी अजून ताज्याच आहेत हे पुन्हा एकदा जाणवले. ग्रीसने हृद्याच्या कोपऱ्यात कायमस्वरूपी स्थान पटकावले आहेच. या जागेची जादूच अशी आहे की तुम्ही अगदी प्रेमात पडता तिच्या.

अफाट सौंदर्याने नटलेल्या ग्रीसच्या पुनर्भेटीच्या प्रतिक्षेत....समाप्त!!

भटकंती लंडनची.. खेळवेड्यांसाठी!!

(लेखिका - पद्मावती)

"व्हेन यू आर टायर्ड ऑफ लंडन, यू आर टायर्ड ऑफ लाइफ..." असे कोणीतरी म्हणून ठेवलंय...

माझ्या मते हे शहर एका मस्त, मोठ्या बुफे टेबल सारखं आहे. इथे प्रत्येकाच्या आवडीचं, रुचीचं काही ना काहीतरी आहेच. इतिहास प्रेमींसाठी टॉवर ऑफ लंडन, चर्चिल वॉर रूम्स आहे. कला, संगीत, स्थापत्यकलेमधे रुची असणाऱ्या लोकांना सेंट पॉल्स कॅथेड्रल आहे. इथली असंख्य संग्रहालये, आर्ट गॅलरीज आहेत, थियेटर्स आहेत. लहान मुलांसाठी लंडन झू, हॅरी पॉटर वर्ल्ड आहे. राणीचा राजवाडा आहे, लंडन आय, फेरफटका मारायला थेम्सचा किनारा, रीटेल थेरेपी साठी अख्खा ऑक्स्फर्ड स्ट्रीट आहे आणि खेळ वेड्यांसाठी ... अर्थातच लॉर्ड्स आणि विम्बल्डन आहे.

जगभरातल्या टेनिस आणि क्रिकेट शौकिनांसाठी विम्बल्डन आणि लॉर्ड्स वर जाऊन प्रत्यक्ष मॅच बघण्यासारखी सुखाची गोष्ट नाही. पण लंडन मधे जर तुम्हाला कमी वेळ असेल तर दुसरा बेस्ट पर्याय आहे तो म्हणजे या दोन्ही ठिकाणी गाइडेड टूर्स घेणे. मॅच न बघता सुद्धा लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंड आणि विम्बल्डन स्टेडियम प्रत्यक्ष बघण्याचा उत्तम पर्याय आहे हा! जेव्हा मॅच बघणं जमेल तेव्हा जमेल पण तोपर्यंत या तीर्थक्षेत्रांचे निदान दर्शन तर घेऊ असा विचार करून आम्हीही हा पर्याय घ्यायचे ठरविले. आधी बुक केली लॉर्ड्स ची टूर. सकाळी अकराची वेळ मिळाली होती. आठवड्याचा अधला-मधला दिवस असल्यामुळे गर्दी काहीच नव्हती.

वेलकम टू लॉर्ड्स, होम ऑफ क्रिकेट

ही टूर सुरू झाली लॉर्ड्स म्युझीयम पासून..

१८८२ च्या ऑगस्ट मधे ओवल वर ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा पराभव केला. दुसऱ्या दिवशीच्या लंडनच्या स्पोर्टिन्ग टाइम्स मधे 'ब्रिटीश क्रिकेट' च्या निधनाची दुख:द वार्ता जाहीर करण्यात आली. थोडक्यात मजकूर असा होता.... " काल ओवल वर ब्रिटीश क्रिकेटचे निधन झाले. क्रियकर्म पार पडले असून त्याची राख रांगोळी म्हणजे 'ॲशस' आता लवकरच ऑस्ट्रेलियाला पाठविण्यात येतील ".. अगदी टिपिकल ब्रिटीश सेन्स ऑफ ह्यूमर!

त्यानंतर काही आठवड्यातच ईंग्लिश संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेला. ब्रिटीश संघाचा कर्णधार, आयवो ब्लिघ ने प्रतिज्ञा केली की यावेळेस ऑस्ट्रेलियाला जिंकून आपली गेलेली अब्रू परत आणायची...' ॲशेस' परत आणायचेच. या दौऱ्यावर एका फ्रेण्डली मॅच नंतर फ्लोरेन्स मॉर्फी या ऑस्ट्रेलियन मुलीने गंमत म्हणून मॅच मधे वापरल्या गेलेल्या बेल्स जाळल्या आणि त्याची राख स्वत:च्या अत्तराच्या रिकाम्या बाटलीत भरली. मग तो 'ॲशस अर्न' मोठ्या

थाटामाटात आयवो ब्लिघला ॲशस चे रूपक म्हणून सादर केला गेला. ब्लिघने सुद्धा हा जरासा खोडसाळपणा अतिशय खिलाडू वृत्तीने स्वीकारला आणि तो ॲशस अर्न आपल्याबरोबर इंग्लंडला परत घेऊन आला. आता मजा अशी की, हीच फ्लोरेन्स मॉर्फी पुढे बरोबर एक वर्षानी सौ.आयव्हो ब्लिघ झाली.

डावीकडे ॲशस अर्न आणि उजवीकडे ॲशस ट्रॉफी

ही ॲशसची गोष्ट टूर गाइड सांगत होता पण माझं पूर्ण लक्ष होतं अर्थात प्रुडेन्शियल वर्ल्ड कप १९८३ कडे..

१९७५ मधे सुरू झालेल्या क्रिकेट वर्ल्ड कप चे पहिले तीन सामने इंग्लंड मधेच पार पडले. या तिन्ही कप्सचे प्रयोजक होती प्रुडेन्शियल पी एल सी कंपनी. या संग्रहलयात अजूनही बऱ्याच गोष्टी आहेत. खेळाडूंचे पोर्टेट्स, डॉन ब्रॅडमन सारख्या दिग्गजांनी वापरलेल्या क्रिकेट किट्स, जुने बॉल्स, बॅट्स, कागदपत्रे आणि पत्रव्यवहार इत्यादी.

म्युझीयम नंतर आता आम्ही लॉर्ड्स पॅविलियन कडे वळलो.

आधी इंग्लिश संघाच्या ड्रेसिंग रूम कडे. ही रूम अतिशय साधी आहे. खोलीच्या मधोमध एक काउंटर टेबल आणि सर्व भिंतींना लागून असलेले काळ्या लेदरचे सोफे/ खुर्च्या. आमचा गाइड सांगत होता की हे खेळाडू इतके अंधश्रद्धाळू असतात की प्रत्येक खेळाडूची या ड्रेसिंग रूममधे बसण्याची जागा ठरलेली असते. ही जागा हातची जायला नको म्हणून हे लोक आपापला नंबर लावायला उतावीळ असतात नाहीतर त्यादिवशी आपला खेळ बिघडण्याची त्यांना धास्ती असते.

या खोलीच्या बाहेर आलं की त्याच लाईनीत पुढे जाऊन पाहुण्या संघाची ड्रेसिंग रूम आहे. रचना तशीच. तसेच सोफे. दोन्हीही ड्रेसिंग रूम्स मधे ऑनर्स बोर्ड्स आहेत. एका इनिंग मधे शंभर रन्स किंवा पाच विकेट्स घेणाऱ्या खेळाडूचे नाव या बोर्डावर लागतं. इथे आपले नाव लागणे हे कुठल्याही क्रिकेट खेळाडू साठी मोठ्या अभिमानाची बाब असते. या बोर्डवर सचिन तेंडुलकरचं मात्र नाव नाही.

ड्रेसिंग रूम्सला लागून आहेत लॉर्डसची सुप्रसिद्ध गॅलरी! याच गॅलरीतून खेळाडू ग्राउंडवर चाललेली मॅच बघतात आणि आपापल्या संघाला चियर करतात. इथेच सौरभ गांगुलीने सीरीज जिंकल्यानंतर बेभान होऊन आपल्या अंगातला शर्ट काढून हवेत फिरवला होता. त्याच्या अशा वागण्याने लॉर्ड्सच्या प्रतिष्ठेला कसा धक्का बसला होता, लॉर्ड्सच्या परंपरेचा केव्हडा तो अपमान , सगळे MCC सभासद कसे भयंकर डिस्गसटेड झाले होते असे आमचा टूर गाइड मोठ्या कळकळीने सांगत होता... फक्त मग त्याला अँड्र्यू फ्लींटॉफच्या वानखेडे स्टेडियमवरच्या शर्ट स्ट्रिपिंग बद्दल छेडल्यावर मात्र त्यावर त्याने पाठांतर केलेलं, अपेक्षित असलेलं अगदी टिपिकल गुळमुळीत उत्तर दिलं. थोडक्यात " आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते...." असला प्रकार होता.

फोटोत उजवीकडे गॅलरीचा भाग दिसत आहे..

लॉर्ड्स गॅलरी-- डावीकडची इंग्लिश आणि उजवीकडे जी दिसते ती पाहुण्या संघाची..

दोन गॅलरिजच्या मधे खालचा मजल्यावर दिसतेय ती जगप्रसिद्ध लॉग रूम. इथे फोटो मात्र काढू देत नाहीत. प्रत्येक खेळाडू हा ड्रेसिंग रूम मधून तयार होऊन खाली येतो मग लॉगरूम मधून चालत, सगळ्या MCC सभासदांचे अभिवादन स्वीकारत इथल्याच दारातून खाली ग्राउंडवर उतरतो. मॅचच्या वेळेस प्रेक्षकांच्या प्रचंड आवाजाने, गदरोळाने इथे टांगलेली झुंबरे कधी कधी थरथरतात.

लॉर्ड्स ग्राउंड हे MCC (Marylebone Cricket Club) या क्रिकेट क्लबच्या अखत्यारीत येतं.
१९९९ पर्यंत इथे स्त्रियांना मेंबरशिप मिळत नसे . MCC च्या या भेदभावामुळे एक ईंग्लंडची राणी सोडली तर सामन्यादरम्यान कुठल्याही स्त्रीचा प्रवेश या pavilian मधे निषिद्ध असे. प्रत्यक्ष

लॉर्ड्सच्या क्रिकेट ग्राउंड बदद्ल मी काय बोलणार? बस, नाम ही काफ़ी है....

जे.पी. मॉर्गन मीडीया सेंटर मधून दिसणारा नजारा.. समोर लॉर्ड्स pavilion. या ग्राउंड ला एका बाजूने जवळजवळ अडीच मीटर्सचा उतार आहे त्यामुळे पावसात इथे पाणी साचण्याचा खूप मोठा प्रश्न असतो.

जे.पी. मॉर्गन मीडीया सेंटर

९ जून १८७७ या दिवशी लंडनच्या 'द फील्ड' या मासिकात एक छोटीशी जाहिरात आली होती, ती साधारण अशी होती..." द ऑल इंग्लंड क्रुके अँड लॉन टेनिस क्लब ने एक लॉन टेनिस स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धा ९ जुलै पासून सुरू होईल."
ही जाहिरात होती सगळ्यात पहिल्या वहिल्या विंबल्डन चॅम्पियनशिप्सची!!! ऑल इंग्लंड लॉन टेनिस अँड क्रोके क्लब अर्थात विम्बल्डन! हा जवळपास पाचशे सभासदांचा प्रायवेट मेम्बर्स क्लब आहे. या संपूर्ण अतीप्रचंड आवारात ग्रास, क्ले,

इनडोर तसेच सरावाचे कोर्टस असे सर्व मिळून पन्नासएक कोर्टस आहेत. या आमच्या टूरची सुरूवात झाली ती विम्बल्डन म्युझीयम पासून. इथलं मुख्य आकर्षण म्हणजे वर्षानुवर्षं टीवीवर पाहिलेल्या विम्बल्डन पुरूष आणि स्त्रियांच्या एकेरी विजेत्यांच्या हातातल्या या ट्रॉफीज...

या ट्रॉफीज विजेत्यांच्या समारंभपूर्वक हातात देतात खरे पण समारंभानंतर त्या इथेच या संग्रहालयात ठेवल्या जातात. विजेते घरी घेऊन जातात ती याची प्रतिकृती! पुरूष एकेरीचा कप जिंकण्याचं भाग्य ब्रिटीश खेळाडूंना फार कमी मिळालं. फ्रेड पेरी च्या १९३६ मधे झालेल्या विजयानंतर हा कप जिंकणारा ब्रिटीश खेळाडू ठरला अँडी मरे...... पण त्यासाठी ब्रिटीशांना सत्त्याहत्तर वर्षे वाट पाहावी लागली.

यानंतर आम्हाला नेण्यात आले कोर्ट क्रमांक १. सेंटर कोर्ट नंतर हे कोर्ट सगळ्यात महत्वाचं. ही दोन कोर्टस अत्यंत कमी अपवाद सोडले तर वर्षातून फक्त एकदा चँपियन-शीप साठीच उपयोगात आणली जातात. बाकी सर्व कोर्टस मात्र सभासदांसाठी खेळायला उपलब्ध असतात.

दरवर्षी विम्बल्डन सामने सुरू होण्याआधी कोर्टस वर नवीन गवत उगवले जाते. सामने खेळतांना गवताची लांबी अचूक आठ मिलिमीटर्स असणे जरूरी असते. गवताच्या वाढीसाठी कृत्रिम सूर्यप्रकाशासाठी दिव्यांची व्यवस्था आहे. इंग्लंडमध्ये एकूणच कोल्हे आणि कबुतरे भरपुर प्रमाणात आहेत. हे कोल्हे या गवतावर वर येऊ नयेत म्हणून कोर्टवर विजेच्या तारांची कुंपणं घातलेली दिसतात. तसेच सामन्यांच्या वेळेस कबुतरं आणि पक्ष्यांना पळवून लावायला विम्बल्डन चा खास प्रशिक्षण दिलेला ससाणा (Hawk) ' रूफस' रोज सकाळी एक तास कोर्टसवर घिरट्या मारतो.

या कोर्टाच्या बाहेर पडलं की बाहेर मोकळ्या जागेत सामन्यांच्या वेळी प्रचंड मोठे टीवी स्क्रीन्स लावलेले असतात. ज्या लोकांना तिकिटे मिळाली नाहीत अशांसाठी या स्क्रीन्सवर सामना बघायला समोर एका छोट्याशा टेकडावर मोकळी जागा राखून ठेवली असते. या जागेला ' Aorangi Terrace' म्हणतात. मित्रमंडळी, कुटुंबियांबरोबर इथल्या हिरवळीवर सतरंजी पसरून ऐसपैस बसून ,आरामात खात पीत आपल्या आवडत्या खेळाडूला चियर करत सामना पाहण्याचा हा अनुभव केवळ आणि केवळ अविस्मरणीय! विम्बल्डन सामन्यांच्या वेळेस स्ट्रॉबेरी आणि क्रिमला आणि 'पिम्म' या ड्रिंकला प्रचंड मागणी असते. स्ट्रॉबेरी अँड क्रीम तसेच पिम्म या गोष्टी म्हणजे विम्बल्डनची जणू परंपराच आहे.

आता कोर्ट नंबर १८. टेनिसच्या इतिहासातली सर्वात जास्तं वेळ चाललेला सामना २०१० मधे इथे खेळला गेला. जॉन इस्नेर आणि निकोलस माहूत मधे खेळलेला हा सामना १८३ गेम्स, अकरा तास आणि एकूण तीन दिवस चालला. या कोर्टला लागूनच ज्या काळ्या काच लावलेल्या खिडक्या आहेत ती ब्रॉड्काॅट सेंटरची इमारत.

ही खेळाडूंची इंटरव्यू रूम. मॅच संपल्यानंतर प्रत्येक खेळाडू इथे मीडियाच्या प्रश्नांना उत्तरे देतो. सगळ्यात छान म्हणजे या टूर मधे आपल्याला पण या इंटरव्यू टेबलसमोर, खुर्चिवर बसून फोटो काढून घेण्याची हौस भागवून घेता येते.

" If you can meet with triumph & disaster, & treat those imposters just the same...."

विम्बल्डन चं हृदय ज्याला म्हणता येईल ते सेंटर कोर्ट. ज्यावर खेळणे हे जगातल्या प्रत्येक टेनिस खेळाडूचं स्वप्न ते सेंटर कोर्ट. या कोर्ट वर येण्यासाठी स्पर्धकांसाठी जे प्रवेशद्वार आहे त्यावरती या वरील ओळी कोरल्या आहेत.

या प्रवेशद्वाराच्या थेट वरती दिसतोय तो रॉयल बॉक्स. फक्त ब्रिटीश राजघराण्यातले लोक आणि खास आमंत्रित केलेले विशेष पाहूणेच फक्त इथे बसू शकतात. स्वत: राणी आतापर्यंत फक्त चार सामन्यांच्या वेळेस उपस्थीत होती, बाकी तिला टेनिस फारसे आवडत नसावे. या रॉयल बॉक्स च्या शेजारी खाली कॉमिंट्रेटार बॉक्स आणि त्यावरती स्पर्धकांच्या नातेवाईकांसाठी असलेला प्लेयर्स बॉक्स. ८७ मधे पॅट कॅश ने इवान लेंडलला मात दिल्यानंतर एक अतिशय आगळी-वेगळी गोष्ट केली. ती म्हणजे जिंकल्यानंतर आनंदाच्या भरात हा माणूस स्टॅंड्स कडे धावत सुटला. कॉमिंट्रेटार बॉक्स च्या वरती चढून प्लेयर्स बॉक्स मधे पोहोचला आणि तिथे जाऊन आपल्या कोचला, वडिलांना भेटला. विम्बल्डन च्या इतिहासात हे असे कोणीही केले नव्हते. त्यानंतर मात्र असे करणे आता अगदी नेहमीचेच झाले आहे. आता तर त्या खेळाडूंना चढून जावं लागू नये म्हणून एक लहानसे गेटच बनवले आहे. या कोर्टवर काही वर्षांपूर्वी सरकणारं छत बांधल्या गेलं. तीन हजार टन वजनाचे हे प्रचंड धुड पूर्णपणे सेंटर कोर्ट ला अच्छादायला दहा मिनिटे लागतात. आता या रूफ मुळे मात्र पावसातही सामने निर्धोक पणे चालू राहतात.

शेवटी विम्बल्डन काय आणि लॉर्ड्स काय इथे प्रत्यक्ष मॅच बघण्याचा योग येईल तेव्हा येईल पण तोपर्यंत लंडन गेलात तर ही दोन ठिकाणे तुमच्या मस्ट विझिट यादीत जरूर असू द्या...

ग्रोस ग्लोकनर होख अल्पाईन स्ट्रासं!!!

(लेखिका - स्वाती दिनेश)

आल्प्समध्ये लपलेल्या सुंदर, अनवट जागा हुडकून तिथे मनसोक्त भटकंती करायला आम्हाला आवडते. नेहमीच्या टूरिस्ट जागा सोडून प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्यायला आवडतातच पण ह्या अशा भटकंतीत एक वेगळा आनंद असतो. इतक्यांदा ठरवूनही ऑस्ट्रीयन आल्प्समधल्या 'ग्रोस ग्लोकनर होख अल्पाईन स्ट्रासं' (*großglockner hochalpenstraße*) वरती जायचा योग काही आला नव्हता. कधी अतिवृष्टी तर कधी हिमवर्षा तर कधी खराब हवा तर कधी वेळेची कमी अशा एक ना दोन.. अनेक कारणांनी हा हाय अल्पाईन रोड आम्हाला हुलकावण्या देत होता. ह्या वेळी मात्र हवामानाचा अभ्यास करून तेथल्या ऑफिसमध्ये चारचारदा खात्री करून घेऊन आम्ही होख अल्पाईन स्ट्रासं जवळच्या एका चिमुकल्या गावातल्या फार्महाउस वर बुकिंग केले. तारांकित हॉटेलं वगळून अशा फेरियन वोहनुंग म्हणजे हॉलिडे होम्स किवा फार्म हाउस वर राहणे म्हणजे स्वतःशी आणि तिथल्या निसर्गाशी संवाद करण्याची हुकमी संधी! तर साल्झबुर्गपासून जवळ असलेल्या फारवेर्फन नावाच्या लहानशा खेड्यातल्या अहोन्न्नेगरांच्या फार्म हाऊसवर आमचे बुकिंग झाले..

फ्रांकफुर्ट पासून साधारण ६०० किमी अंतरावर हे गाव असल्याने सहा तासांच्यावर वेळ लागणार हे गृहित धरून सकाळी ब्रेकफास्ट करून दहाच्या सुमाराला बाहेर पडलो. इतकसं चिमुकलं गाव आहे ते की सहा साडेसहालाच सगळं बंद होऊन जातं. हे माहित असल्याने तहानलाडू, भूकलाडू बरोबर घेतले होतेच. मध्ये दोन कॉफी ब्रेक्स घेतले आणि एखादा छानसा स्पॉट दिसला की थोडे रेंगाळत साडे पाचच्या सुमाराला तेथे पोहोचलो. हसतमुख गेर्टा आजी आणि पीटर आजोबांनी आमचे आपुलकीने स्वागत केले. मागच्या उन्हाळ्यात आम्ही येथे आल्याची आठवण काढली. थोड्या गप्पा झाल्या आणि मग पहिल्या मजल्यावरच्या आमच्या खोल्या दाखवल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट हॉलमध्ये ब्रेड,जॅम, अंडी, फळे, म्युसली असा भरपेट नाश्ता करताना ग्रोस ग्लोकनर ला कसे जायचे हे विचारले. तर उत्तर आले, आता सिझन सुरू झाल्यामुळे रस्ता चालू झाला आहे पण तरीही आधी फोन करा तिथे आणि आज रस्ता खुला आहे की नाही ते पहा. आज हवा चांगली आहे म्हणजे काही अडचण येऊ नये. आम्ही तेथल्या ऑफिसला फोन लावला आणि रस्ता खुला आहे हे समजल्यावर लगेचच निघायचे ठरवले. जपून जा रे, गाडी जपून चालवा. आजीआजोबांची प्रेमळ दटावणी सुरू होती.

छान, स्वच्छ कोवळ्या उन्हात आम्ही ग्रोस ग्लोकनरकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो. फारवेर्फन पासून साधारण ६०/६५ किमी अंतरावर ही हिमशिखरं आहेत. तिथे पोहोचण्यासाठीचा रस्ताही अटकर वळणे घेत जाणारा, एका बाजूने उंचच उंच आल्पस तर दुसऱ्या बाजूला दरीतली रानफुले, कुरणे, त्यात चरणारी गाईगुरे, छोटी छोटी घरे अशी दोबाजूंना हिरवाई लेवून स्वागत करणारा आहे. मे महिन्याच्या सुरूवातीला हा रस्ता पर्यटकांसाठी खुला करतात तो ऑक्टोबर पर्यंत. हिवाळ्यात मात्र पूर्ण बंद ठेवतात. प्रवेशद्वाराशीच दिवसाचा पास (३५ युरो) घेऊन आत जाता येते. अटकर वळणे आता अजून अटकर आणि उंचही होतात.

दुचाकी, एकचाकी वरून चढाई करणारे स्वार, गड हेंगायला जाणारे वीर आणि गाड्यातून येणारे आपल्यासारखे पर्यट्क.. मेळाच भरलेला असतो. सायकली, मोटरबाइक्स आणि गाड्यांची नुसती जत्रा फुललेली असते शिखराकडे तरीही वाहने शिस्तीत वर जात असतात. मध्ये मध्ये थांबे केलेले आहेत, तेथे थांबून आल्प्सची अनुभूती घेता येते. धुक्यात लपेटून जाता येतं आणि कॅमेरात ती निसर्गाची जादू पकडण्याचा प्रयत्नही करता येतो. खूप कुड्कुडायला झालं तर वाटेतल्या कॉफीशॉप मध्ये वाफाळत्या कॉफीचा आस्वाद सभोवतालचा निसर्ग पाहत घेता येतो.

साधारण तासाभरात आम्ही प्रवेशद्वाराशी पोहोचलो. पास घेऊन वर जायला निघालो तेव्हाही हवेत सुखद गारवा होता, चुकार पांढरे ढग होते पण त्यामुळे उन्हाचा तडाखा जाणवत नव्हता. काही मीटरच वर गेलो असू, तर उजवीकडे समोर दिसणाऱ्या पर्वतरांगा, त्यावर चमकणारे हिम पाहून फोटो साठी एक थांबा घ्यायचा मोह अनावर झाला. आमच्यासारखेच अनेक जणं तेथे गाड्या थांबवून तो नजारा डोळ्यात साठवत आणि कॅमेऱ्यात पकडत होते. फोटो काढत असतानाच

समोरच्या डोंगरमाळेवर धुक्याची चादर लपेटली गेली. थोडा वेळ ते निसर्गकौतुक पाहून आम्ही अजून वर जायला निघालो. काही वेळाने परत एक कॉफी ब्रेक घेतला आणि कॉफीशॉपच्या बाहेर आलो तर वर आकाशात ढग दाटून आलेले आणि रस्त्यावर धुक्याचा पूर्ण जाड पडदा! चार फुटांवरचेही दिसेना. गाडीपार्किंग पर्यंतचा रस्ताही धुक्यात बुडून गेला होता. अतिसाहस करण्यात अर्थ नव्हता. पाठीशी आल्पस तर दुसऱ्या बाजूला खोल दरी .. सगळे परत कॉफीशॉप मध्ये आलो. तिथे बाकीची मंडळीही धुकं निवळण्याची वाट पाहत निसर्गाची ती गूढ, रौद्र सुंदरता अनुभवत बसली होती. काही वेळाने धुकं आसमंतात विरघळू लागले आणि थोडे दिसू लागले. मग एकेक गाड्या आस्तेकदम वर सरकू लागल्या.

३७९८ मी. उंचीवर सेंट्रल इस्टर्न आप्लस आणि आल्पिनं डिव्हाइन मध्ये वसलेले हे ग्लेशियर ऑस्ट्रीयातले दूरवर पसरलेले मोठे ग्लेशियर आहे. पिरॅमिडच्या आकारातले हे ग्लेशियर ग्रोसग्लोकनर आणि क्लाइनग्लोकनर म्हणजे थोरले आणि धाकले ग्लोकनर असे दोन भागात असून एका ग्लोकनरशार्ट नावाच्या सॅडलने ही दोन ग्लोकनर वेगळी दिसतात. बेल्झर हाकेत नावाचा फ्रेंच ॲनॉटॉमी प्रोफेसर इस १७७९ ते १७८१ इस्टर्न आल्पस मध्ये गेला आणि तेथून आल्यावर त्याने सन. १७८३ मध्ये ग्लोकनर पर्वतराजींचं वर्णनपर पुस्तक प्रसिध्द केलं. ग्लोकनर पर्वतराजीचं हे पहिलं ज्ञात वर्णन! ह्या पुस्तकापासून प्रेरणा घेऊन मग प्रिन्स बिशप कोर्ट फ्रान्स झेवियरने त्याच्या सहकाऱ्यांसह हे

शिखर सर करण्याची मोहिम आखली. सन १८०० मध्ये ६२ लोकांचा चमू हे शिखर पादाक्रांत करायला गेला त्यात फ्रान्स मिशाइल फिअर्टहालर हा शाळा मास्तर आणि डॅव्हिड हाइनरिश होफं हा वनस्पतीज्ञ हे ही होते. बर्फातून वाट काढत क्लाइनग्लोकनर पर्यंत ते पोहोचले. १९ व्या शतकात पुढे अनेक जणांनी प्रयत्न करून तेथपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर केला. सन. १९०९ मध्ये तेथे पहिल्यांदाच स्किइंग केले गेले आणि मग पुढे हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनले.

काही ऑस्ट्रीयन एक्सपर्ट्सनी सन १९२४ मध्ये ह्या उंच पर्वतरांगातून रस्ता खोदण्याचा प्रस्ताव मांडला तेव्हा त्यांना आधी मूर्खातच काढण्यात आले पण पुढे सन १९३० मध्ये त्यांना मान्यता मिळाली आणि १९३५ मध्ये म्हणजे पाच वर्षांनी हा रस्ता तयार होऊन तेथे आंतरराष्ट्रीय ऑटोमोबाइल आणि मोटरबाइक रेस खेळवण्यात आली. त्यावेळी हा रस्ता फक्त उन्हाळ्यातच खुला असे; सुमारे १३२ दिवस पण आता मात्र तो मे ते ऑक्टॉबर असा सुमारे २७६ दिवस खुला असतो. नागमोडी वळणे घेत आल्प्सच्या अंगाखांद्यावरून सळसळत जाणारा हा रस्ता! ह्या रस्त्यावरून जाताना दूरवरची हिमशिखरं सतत साद घालत असतात. तेथे कधी पोहोचतो असंही होतं आणि मध्ये मध्ये थांबून ते रौद्र सौंदर्य पाहवेसे, अनुभवावेसे वाटते.

ग्रोस ग्लोकनरच्या शिखराची उंची जरी ३७९८ मीटर असली तरी २५०० मीटर उंचीपर्यंत साधारण ४८ किमीचा हा रस्ता बांधून काढला आहे. त्यामुळे जेथे रस्ता संपतो त्या टोकाशी जेव्हा आपण पोहोचतो आणि आपल्याला अगदी अमोरासामोरा अगदी जुन्या मित्रासारखा आल्प्स भेटतो ना तेव्हाचं वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. एकदा स्वच्छ उन्हात भेटेल तर एकदम धुक्याची शाल लपेटेलं.. किती रुपडी बदलतो तो! गाडी तिथल्या पार्क हाउस मध्ये पार्क करताना आपलं वयही तिथेच पार्क करायचं आणि मग फक्त हुंदडायचं, त्या आल्प्सच्या अंगाखांद्यावर खेळायचं. पार्क हाउस म्हणजे मोठ्ठी इमारतच आहे. समोरच एक होडगं मांडून ठेवलं आहे आणि त्या पुढे काही अंतरावर रेलिंग. त्या रेलिंगला रेलून मनसोक्त आल्प्स पहायचा..

तेथून खाली उतरून नितळ, निळ्याशार पाण्यात डोकावायचं. पाय दमले तरी मन भरत नाही तोवर आल्प्स आपल्यात भरून घ्यायचा. अशा विचाराने गाडी पार्क केली आणि आल्प्सला भेटायला गेलो. मनसोक्त हिंडलो. डोळे भरून ती निसर्गशोभा पाहिली. सूर्याचा आणि ढगांचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. मध्येच ढगांचा आणि धुक्याचा पडदा सारून तो बाहेर आला की खोलवर खाली दिसणाऱ्या नितळ निळ्या पाण्यात चुकार सोनेरी किरण लख्खकन चमकून जात होते. किती वेळ तो खेळ पाहण्यात गेला समजलेच नाही.

तिथे असलेल्या स्मरणवस्तूंच्या दुकानात चक्कर मारून आलो. हे सारं चित्रं मनावर जरी अगदी स्पष्ट कोरलं गेलं होतं तरी सुवेनियर्सचा मोह झालाच. खूप वेळ गेला, पोटात कावळ्यांचं समूहगान सुरू झालं. मग तिथल्याच एका उपाहारगृहात केझं स्पेट्झलं, सलाड खाल्लं आणि परत भटकत बसलो.

घड्याळातले काटे वेळ दाखवायला लागले, मग नाइलाजाने मग परतीचा रस्ता धरावा लागला. मनात आणि कॅमेऱ्यात ग्रोस ग्लोकनर स्ट्रासं जपत आणि आठवणी घोळवत !

गेर्टा आजीच्या घरापाशी आलो तर आजी दारात वाटच पाहत होती. आम्हाला पाहून कशी झाली ट्रीप, हवा कशी होती? वगैरे विचारलं आणि मग गप्पच झाली. खोदून खोदून विचारल्यावर समजलं मागच्याच आठवड्यात तिच्याकडे आलेले काही पाहुणे मोटरबाइक्स घेऊन तेथे गेले होते आणि हवा खराब झाली. धुक्यात काही न दिसल्याने मोठ्ठा अपघात झाला आणि त्यात त्या मंडळींपैकी दोघेजण गेले.. क्षणभर सगळेच स्तब्ध झालो. एकदम अंगावर काटा आला. सकाळचा धुक्याचा जाड पडदा आठवला आणि आपण सुखरूप परत आलो ह्याचा नि:श्वास टाकत असतानाच पीटर आजोबांनी सेक्ट उघडली आणि त्यांना फोटो दाखवत असताना आम्ही सगळेच परत त्या ग्रोसग्लोकनरच्या शिखरात हरवलो.

पायवाटा

(लेखिका - मधुरा देशपांडे)

"तुम्हाला कसा प्रवास आवडतो? स्वप्नातल्या गाडीतून घाटातल्या अवघड रस्त्याने किंवा सहा-आठ पदरी मोठ्या महामार्गाने? ऐन पावसाळ्यात दुचाकीने घाटातले धबधबे बघत थांबत की रखरखत्या उन्हात डोंगर दऱ्यात भटकायला? बाहेर बर्फ पडत असताना रेल्वेत उबदार वातावरणात बसून ते क्षण टिपायला की तंत्रज्ञानाची निसर्गाशी सांगड घालत उंचावर नेऊ शकणाऱ्या रोपवेने?" असे कितीही पर्याय दिले तरी त्यातून हमखास एक असा निवडणे कोणाच भटक्याला जमण्यासारखे नाही. कारण यातल्या प्रत्येक प्रकाराची वेगळी गंमत आहे. स्वतःच्या गाडीने प्रवास करताना अनपेक्षित स्थळांना भेट देणे हा सुखद अनुभव, पण त्यातला एकसूरीपणा नको असेल तर बस, ट्रेन अशा सार्वजनिक वाहतुकीने प्रवास हवा ज्यात लोक भेटतात, कधी त्यांच्या वागण्याचा वैताग तर कधी त्यातून उमगलेली माणसं! विमानाचे सततचे प्रवास कंटाळवाणे होतात तरीही पहिला विमानप्रवास हे आकर्षण असतंच. याच फिरण्यातला एक महत्वाचा भाग म्हणजे पायी भटकंती! मग ते जंगलात ट्रेक साठी असो, गावाबाहेरच्या लहानशा डोंगरातला ट्रेल असो की एखाद्या महानगराच्या उंचच उंच इमारती बघत गल्लीबोळा शोधत तुडवलेले रस्ते असोत. हिरवीगार वनराई, त्यात पक्ष्यांसाठी लोकांनी बांधून ठेवलेली घरं, त्यापलीकडे दूरवर डोंगरावर लपाछपी खेळणारा सूर्य, कधी अचानक ढग येऊन बरसलेल्या सरी आणि मग आडोसा शोधताना दिसलेल्या लाकडी झोपड्या, पक्ष्यांची किलबिल, पानगळीच्या ऋतूत आपल्याच पायांमुळे होणारा जमिनीवरच्या पानांचा आवाज आणि शरद ऋतूतले विविधरंगी झाडं, कधी 'साद घालती हिमशिखरे'ची आठवण करून देणारी पर्वतरांग, मधूनच उगवलेली रानफुलं, युरोपातील महानगरात तिथल्या इमारतींमधून डोकावणारा इतिहास, कडाक्याच्या थंडीत नाताळसाठी सजलेले शहर, नदीकाठच्या रस्त्याने प्रिय व्यक्तीसोबत केलेला वॉक असे अनेक क्षण या पायी फिरतीने आजवर अनुभवायला मिळाले ज्यांनी भटकंतीत पायी फिरती हवीच असं प्रत्येक वेळी मनावर ठसवलं. कुठल्याही नवीन ठिकाणी जाताना तिथल्या फिरतीच्या नियोजनात या पदभ्रमंतीसाठी काही वेळ/दिवस जमेल तसे राखून ठेवायला हवेत हे अशा प्रत्येक भटकंतीनंतर नव्याने वाटतंच आणि तसं केलंही जातं. अशाच काही क्षणांना उजाळा देताना पोतडीतून बाहेर पडलेल्या या आठवणी.

हायडेलबर्ग हे असंच एक जर्मनीतलं असंच एक अतीव सुंदर शहर, कुणीही प्रेमात पडेल असं. शनि-रवि कंटाळा आला तर सहज जाऊ शकू इतकं आम्हाला जवळ. तिथे अनेक वेळा नेकर नदीच्या काठाने चालत जायचं, तिथला प्रसिद्ध किल्ला बघण्यासाठी चढत जायचं, उन्हाळ्यात आईसक्रीम खायचं, तिथल्या जुन्या शहरात फेरफटका मारायचा, व्हायोलिन किंवा कुठलंही वाद्य वाजवत तिथे हमखास कुणीतरी असतं ते सूर ऐकतच सूर्यास्त बघून परत यायचं हा तसा नेहमीचा उद्योग झाला होता. तसं हे काही फार मोठं शहर नाही. पण इथे प्रत्येक वेळी फिरताना काहीतरी नवीन

सापडायचं आणि त्यामुळे कितीही वेळा पाहिलं तरी तिथे जाण्याचा कधी कंटाळा आला नाही, अजूनही येत नाही. वर्षभर कुठल्याही ऋतूत हे पर्यटकांनी गजबजलेलं असतं. या शहराबद्दल खूप काही लिहिता येईल पण तो या लेखाचा विषय नाही. या शहरात असे पायी भटकताना टिपलेले हे काही क्षण - (यात शहरातली मुख्य प्रेक्षणीय स्थळं नाहीत)

पण हे सगळं म्हणजे काही कुठले ट्रेल-ट्रेक नव्हते. इल्लुसे डोंगर चढायचे इतपतच माझी मजल होती. असंच एकदा ऱ्हाईन (*Rhein*) नदीच्या काठावरच्या ऱ्युडेसहाईम (*Ruedesheim*) या गावात गेलो होतो. टुमदार कौलारू घरं, नदीकाठाने जाणारा रस्ता आणि डोंगरावर द्राक्षांची शेती. या डोंगरावर जाताना केबल कार मधून खाली डोंगरात फिरणारे हे लोक असे चित्र दिसले आणि एकदम वॉव, सही, हे असं काही आपण केलं नाहीये असं वाटलं.

"आपण पुन्हा इथे येऊयात हे असं फिरायला?" या माझ्या अति उत्साहातल्या वाक्यावर नवऱ्याने 'हीच का ती, जी इतर वेळी ट्रेकला जायचं नाव काढलं की "नको, मी धडपडेन, मला जमणारच नाही, मला भीतीच वाटते" अशी अनेक कारणं देत असते' अशा आविर्भावात दुर्लक्ष केलं. हा उत्साह पुढे फार टिकेल असं त्याला अजिबात वाटलं नाही. पण मस्तपैकी शेतातून जाणारा साधा सरळ रस्ता आणि शिवाय माझ्यासारख्या कच्चा लिंबु व्यक्तीला सहज जमेल असं मला वाटत होतं. माझ्या डोक्यात हे दृष्य अगदी फिट्ट बसलं होतं. तसंही एरवी पुण्यात 'चल मेरी स्कुटी' म्हणत गावभर फिरायची जरी सवय होती, इथे येऊन गाडी हा प्रकार बंद झाल्याने धावत पळत जाऊन बस, ट्राम पकडणे, ग्रोसरीसाठी पायी जाऊन सामान घेऊन येणे आणि हायडेलबर्ग आणि अशाच काही गावातून दमत भागत का असेना थोडेसे डोंगर चढणे इतपत तरी पायी चालायची सवय मला लागली होती. आता प्रत्यक्षात मात्र असे रस्तेच असतील असं अजिबात नाही, व्यवस्थित चढ उतार असलेले डोंगर, दगड, माती हेही असणारच. पण तरीही ही 'किंचित' पळापळ सुद्धा मला मी मस्तपैकी डोंगरात चालू शकेन, ट्रेल्स करू शकेन असं निदान भासवत होती.

तर पुढच्या अशाच एका सहलीत पहिल्यांदाच ब्लॅक फॉरेस्टला जायचं ठरलं. जरा बघुयात तिथे काही ट्रेल्स असतील तर म्हणून शोधायला सुरूवात केली. तेव्हा आंतरजालावर जी काही माहिती दिली होती, त्यावरून बराच अंदाज आला. तरीही आपण सुरूवातीला जरा दमानं घेऊ म्हणून जमेल तसं एका तळ्याकाठी फिरूयात असं ठरलं. या ३ दिवसांच्या सहलीत ब्लॅक फॉरेस्टच्या कुठल्याही घाटातल्या रस्त्यात मध्येच जंगलात गाड्या पार्क करून मग पायी फिरायला जाणारे अनेक लोक दिसले. यात लहान मुलं, म्हातारी माणसं सगळे होते. आमच्या प्लॅन मध्ये इतका वेळ नव्हताच, पण ते सगळं दृश्य बघून उत्साह वाढला होता. मग शेवटच्या

दिवशी ठरलेल्या जागी आलो ते म्हणजे श्लुकसे. आणि या तळ्याकाठच्या रस्त्याने निवांतपणे ३-४ तास फेरफटका मारला. अगदी तुरळक गर्दी, दूरवर पसरलेले हे सरोवर,

त्यामागची डोंगर रांग, तळ्याकाठची फुलं, बाजूनेच धावणारी झुकझुकगाडी हे सगळं बघण्यासाठी, शांततेनी अनुभवण्यासाठी असा राखीव वेळ ठेवायलाच हवा यावर शिक्कामोर्तब झालं.

आता यात काही फार मोठे तीर मारले नव्हते. किमान १०-१२ किलोमीटर तरी हवे आणि थोडा तरी चढ उतार असावा तर याला काहीतरी पायी फिरणे म्हणता येईल. पण निदान एका जागी न बसता किंवा हे ठिकाण बघून लगेच न निघता या ३-४ तासांनी दिलेला अनुभव छान होता, अर्थातच सवय नसल्याने थकवणारा सुद्धा. मग विकांताला जवळच्या काही ३-४ किलोमीटरच्या छोट्या ट्रेल्स वर जायला सुरूवात केली. ही काही प्रेक्षणीय स्थळं नव्हती. पण निसर्गाशी जवळून संवाद साधायला ही किती चांगली संधी आहे हे कळलं. लोकांना घराबाहेर पडून चालायला, सायकल चालवायला अशा अनेक जागा सरकारने राखीव ठेवल्या आहेत, त्या मेंटेन केल्या आहेत आणि लोकांनीही त्याचा पुरेपुर फायदा घेतला आहे हे यानिमित्ताने लक्षात आले. त्यात हिवाळ्याचे ४-६ महिने बाहेर पडणं इतकं कमी होतं की जरासा सूर्य दिसला की बाहेर पडा असं हे जर्मन लोक का करतात हेही इथल्या वर्षभराच्या वास्तव्यात उमगलं.

मग अशा नवनवीन जागा शोधून फिरायला जाणं हा छंद झाला. त्यात समान आवडीचे मित्र मैत्रिणी मिळाले आणि उत्साह अजून वाढला. आता हिवाळा सुरु होण्यापूर्वी प्रत्येक शनी–रवि हवामान बघून काही ना काही बेत आखले जातात. कदाचित इतक्या सुंदर सूर्यप्रकाशात फिरायला जाण्याची ही शेवटची संधी असं म्हणत हे बेत पटापट पक्केही होतात. शिवाय चांगला व्यायाम होतो हा एक तेवढाच महत्वाचा फायदा. सुरुवातीला ६-८ किलोमीटर हा आकडा बघूनच दमायला व्हायचे, आता सवयीने १५ किलोमीटर सुद्धा सहज पार करता येतात. ज्या सरळसोट रस्त्याने मला भुरळ घातली होती, तसे रस्ते नकोसे होऊन मातीच्या पायवाटा आणि डोंगर चढ उतार जास्त आवडायला लागलेत.

यात काही वेळा गमतीशीर अनुभवही येतात. एकदा असंच आंतरजालावर वाचून एक ट्रेल शोधला. 'पॅनारोमा वे' असं या ट्रेलचं नाव होतं आणि जिथून सुरूवात होणार होती त्या जागेवर १०० लहान धबधबे आहेत असं लिहिलेलं होतं. धबधबे असं सांगितलं असेल आणि शोधून सुद्धा काही मोजके झरे सापडत असतील तर काय वाटेल? जगात कुठेही गेलो आणि तिथल्या कितीही गोष्टींची कौतुकं केली, तरी जेव्हा जेव्हा भारतातल्या आठवणी येतात, तेव्हा मात्र जिथे तिथे "मेरा भारत महान" असे वाटतेच हे आजवर अनेक वेळा अनुभवलं आहे. गप्पांमध्ये हळूहळू हे धबधबे(?) मागे पडले आणि चक्क मोठा रस्ता सुरू झाला. सहसा अशा ठिकाणी काहीतरी माहिती दिली असते. पण इथे काही दिसेना. थोडीशी नाराजी, चिडचिडही होऊ लागली की एवढ्या लांब येऊन प्रत्यक्षात वेगळेच दिसते आहे. तेवढ्यात एक आजी-आजोबा दिसले. त्यांना विचारले तर ते म्हणाले "जरा पुढे जा या रस्त्याने, मग पुन्हा डोंगरातला रस्ता चालू होईल, लिहिलेलं आहे तसं" आजोबांच्या सूचनेप्रमाणे गेलो आणि मग मात्र एकेक डोंगर चढायचा, परत उतरायचा, त्या डोंगरांवर असलेली द्राक्षांची शेती, विविध रानफुलांनी दिलेलं दर्शन, दूरवर दिसणारी तुरळक वस्ती, ती कौलारू टुमदार घरं, लपाछपी खेळणारा सूर्य, अगदी द्राक्षांच्या शेतातही मधोमध लावलेली फुलझाडं, काही ठिकाणी संपुर्ण डोंगरभर पसरलेली पांढऱ्या फुलांची झाडं हे सगळंच दृश्य अप्रतिम होतं. पॅनारोमा वे हे नाव सार्थ करणारा हा मार्ग होता. ब्लॅक फॉरेस्ट चा निसर्गरम्य परिसर अगदी जवळ असल्याने तिथल्या अशा अनेक पायवाटा तुडवता आल्या. आणि फक्त तिथेच नाही, तर जर्मनीत इतरही अनेक ठिकाणी फिरताना शोधले असता अशा जागा ठिकठिकाणी आहेत हे समजले. कुठेही असलो, तरी जवळच्या ५०-१०० किलोमीटर अंतराच्या आत अशा

अनेक जागा असतात आणि त्या सगळ्याची माहिती आंतरजालावर दिलेली असते. त्यामुळे सहज जाता येतं.

सहज फिरताना अचानक कुठेतरी उगवलेली ही मश्रुम्स दिसतात.

बरेचदा तिथल्याच मोठ्या दगडांचा उपयोग दिशादर्शक म्हणून केलेला असतो.

हिवाळ्याच्या सुरुवातीला झाडांवर दवबिंदू असतात, तर पानगळीच्या ऋतूत जागोजागी पानांचा खच पडलेला असतो. प्रत्येक ऋतूप्रमाणे दिसणारे हे बदल आपल्याला निसर्गाच्या अजून जवळ घेऊन जातात.

कधी या अशा चित्रातल्या जागा आपली वाट बघत असतात.

काही लोकांच्या प्रेम प्रदर्शनातून कुठलीच जागा, कुठलाच देश सुटत नाही याचं हे उदाहरण.

एकाच प्रकारच्या ट्रेलमध्ये विविध रुपांचा आस्वाद कसा घेता येईल याचा विचार करून, तसे मार्ग आखून त्याची काळजी घेणे, तिथे सगळीकडे दिशादर्शक लावणे, या सगळ्याची अद्ययावत माहिती आंतरजालावर उपलब्ध करून देणे ज्यात कुठला ट्रेल किती कठिण आहे, किती चढ उतार आहेत, जवळ बस, ट्रेन इत्यादीची काय

सोय आहे हे सगळं, शिवाय या निसर्गाच्या सोबतीने अधून मधून बसायला केलेली जागा, त्यातही दाखवलेली सुबकता आणि तरीही शक्य

तेवढा नैसर्गिक रुपांकडे दिलेला भर, वेळोवेळी दिसणाऱ्या कचरापेट्या या सोयींमुळे हा प्रवास क्वचित काही अपवाद वगळता कुठेही वैतागवाणा होत नाही. जे बघायला आपण आलेलो आहोत, त्याचा पुरेपुर अनुभव घेता येतो. अगदी लहान लहान मुलांना घेऊन सुद्धा अनेक जण फिरत असतात. लहान बाळांना स्ट्रोलर मध्ये ठेवून नेण्यासारख्या पायवाटा सगळीकडे असतात. ज्यांची मुलं चालू-पळू शकतात, त्यांना

तर अशा ठिकाणी मनसोक्त खेळायला वाव असतो. याच अनुभवांमुळे स्वित्झर्लंडमधल्या भटकंतीत प्रवासी स्थळं बाजूला ठेवून त्याऐवजी असे दिवसभराचे ट्रेल केले आणि ते मनसोक्तपणे अनुभवले.

अशा या प्रवासात अनेकदा फिरायला आलेले बरेचसे आजी आजोबा दिसतात. नवीन चेहरे बघून कधी कौतुकाने हसतात, कधी चुकून कुणी इंग्रजीतून देखील बोलतात. या लोकांचा ७०-८० व्या वर्षी हा उत्साह बघून त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावेसे वाटते. या सगळ्यात थोडी खंत जाणवते की या शेतात, गावात माणसं क्वचित दिसतात. शेतातली बहुतेक कामे यंत्राने होत असली तरीही शेत म्हंटले की भारतातले शेतकरी आठवतात. या देशाच्या निसर्गाचं संवर्धन करणारी, जपणूक करणारी ही लोकं, त्याचं जीवनमान समजून घेणं हा देखील अशा प्रवासातला आनंदच भाग असतो जो इथे तेवढ्या सहज जमत नाही. पण या सगळ्या मागचे त्यांचे कष्ट मात्र नक्कीच दिसतात. गायी, शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या, कोंबड्या यांच्याशिवाय आपली भारतातली शेती अपूर्ण आहे आणि ते आहे म्हणूनच कदाचित ते जास्त जीवंत वाटतं. माझ्या गावातून बाहेर पडताना दिसणारी तुरीची, कपाशीची शेतं आणि त्यात अजूनही दिसणारी बुजगावणी, भर पावसात कोकणातल्या लाल मातीत भातपेरणी करणारी माणसं, कुठे झाडाला झोळी बांधून एकीकडे काटक्या उचलणारी बाई आणि धोतर टोपी घालून बैलांना हाकणारे शेतकरी अशी अनेक दृष्य जी लहानपणापासून डोळ्यासमोर आहेत ती पुन्हा बघण्यासाठी मन हळवं होतं हेही खरं.

मार्च महिना आला की सगळीकडे वसंताची चाहूल लागते आणि कधी एकदा बाहेर भटकंतीचे दिवस सुरु होतील यावर बेत ठरू लागतात. सलग ५-६ महिन्यांच्या ब्रेक नंतर सूर्य आपली उपस्थिती ठळक पणे दाखवू लागतो. फुलांचा बहर जागोजागी लक्ष वेधून घेऊ लागतो. त्यात युरोपीयन लोकांचे फुलांवरचे आणि एकूणच निसर्गाबद्दलचे प्रेम जगप्रसिद्ध आहेच. गावातल्या प्रत्येक चौकात, प्रत्येक रस्त्यावर, घरात, खिडकीत जागोजागी फुले दिसू लागतात. आणि त्या फुलांप्रमाणेच लोकांचा उत्साह देखील ओसंडून वाहू लागतो. यातलाच एक महत्वाचा भाग म्हणजे चेरी ब्लॉसम. साधारण ३ ते ४ आठवडे फक्त ही फुलं बहरतात. अनेकांच्या घरासमोर, बागांमध्ये दुरूनही या फुलांचा गोड गुलाबी रंग लक्ष वेधून घेतो. या चेरी ब्लॉसम बद्दल जपानमधील साकुराच्या रूपाने वाचले होते, फोटो बघून 'अहाहा' असे उद्गार काढले होते. पण तेव्हा याची व्याप्ती जगभर पसरली आहे हे माहिती नव्हते. पण ही झाडे इतरत्रही पसरली आहेत. वसंत ऋतूच्या सुरुवातीला ही फिकट गुलाबी रंगाची नाजूक आणि सुरेख फुले चेरी च्या झाडांना दिसू लागतात. यातील काही झाडे ही बरेचदा केवळ सुशोभीकरणाच्या उद्देशाने लावलेली असतात, त्यांना चेरीचे फळ येईलच असे नाही. देशांप्रमाणे आणि दरवर्षीच्या हवामाना प्रमाणे बहर कधी येणार हे बदलते. अजून माहिती शोधली असता असे कळले की हा अशा प्रकारचा ब्लॉसम चेरी सोबतच बदाम, पीच, प्लम अशा इतरही झाडांना येतो. यातली चेरीची झाडं ही डेरेदार असतात आणि फुलं सारखीच दिसत असली तरीही त्यांमध्ये किंचित फरक असतो. याउलट बदामाची ही झाडं अगदीच लहान असतात. इथे साधारण मार्च महिन्यानंतर २ आठवडे हा गुलाबी रंग सर्वत्र पसरलेला असतो. बहुतेक ठिकाणी जवळच्या कुठल्यातरी बागेत ही अशी अनेक झाडं एकत्र बघायचा योग येतो. पण त्याशिवाय काही भागात असे काही 'गुलाबी रस्ते' आहेत जे जिथे दुतर्फा ही गुलाबी रंगात बहरणारी झाडं लावलेली आहेत. मधून चारचाकीसाठी रस्ता आणि त्यापालीकडून खास पायी चालणाऱ्यांना म्हणून रस्ता आहे. बाजूला दूरवर दिसणारी छोटी छोटी गावं, त्यात उठून दिसणारे चर्च आणि पुढ्यात असलेली द्राक्षांची शेती हे विलोभनीय दृष्य. 'शाम गुलाबी, सेहेर गुलाबी' अशी गाणी इथे बसूनच सुचली असावीत का असा प्रश्न पडतो. हा प्रदेश वाईन साठी प्रसिद्ध असल्याने अधून मधून वाईनची दुकानं थाटलेली असतात आणि नितांत सुंदर वातावरणात एका हातात वाईन ग्लास घेऊन शेतात लोक बसलेले असतात. विशेष कौतुकास्पद हे की कुणीही ही फुलं तोडत नाहीत, मग ती अगदी लहान मुलं असोत की वयस्कर लोक.

या ठिकाणी जाताना आम्हाला जवळचा असा जो रस्ता होता तिथे जाताना मध्ये लागलेलं हे गाव -

सोबत नकाशे होतेच, शिवाय गुलाबी रंगाच्या फुलाचे चित्र असलेले स्टिकर्स अनेक झाडांवर लावले होते की जे दिशादर्शक म्हणून काम करत होते. साधीशीच गोष्ट, पण ज्या कलात्मकतेने, मूळ निसर्गाला कमीत कमी धक्का लावून ती केली की ती अजून आवडते हे नक्की.

ही काही चेरीची झाडं -

अशा आजवरच्या अनेक ठिकाणांनी कायमस्वरुपी मनात घर केलंय. या गावाबाहेरच्या डोंगरात, शेतात आणि निसर्गाच्या जवळ जाणाऱ्या रस्त्यांसोबतच विविध शहरात फिरतानाही असे अनेक अनुभव या पायी फिरण्यातून मिळाले. नाताळच्या उत्सवी वातावरणात, कडाक्याच्या थंडीत बर्लिन मध्ये फिरताना अशी पायी भटकंती केली तेव्हा इतिहासाच्या खुणा सतत भेटत होत्या. व्हेनिस सारख्या शहरात तर तसेही फक्त लहान सहान गल्ल्याच सगळीकडे, अधून मधून पाण्याचे कालवे आणि त्यावरचे पुल, हातात नकाशा घेऊन पाय तुटेपर्यंत फिरून अनुभवलेलं ते शहर आजही तसंच आठवतंय. पॅरिसमध्ये फिरताना आलेली मुंबईची आठवण, लंडनमधला एकटीने केलेला प्रवास, ॲमस्टरडॅमला चुकलेले रस्ते, व्हिएन्नात फिरताना दिसलेले स्थापत्यशास्त्राचे उत्तमोत्तम नमुने आणि बुडापेस्टला नदीकाठाने चालताना ज्या ठिकाणी ज्युंना मारण्यात आले त्या जागेवर थबकलेले पाय, अशाच कुठल्याशा इमारतीच्या खिडकीतून डोकावणारी सुरकुत्या पडलेली आजी, तिथल्या खिडक्यांमधून डोकावणाऱ्या फुलांमधून दिसलेली लोकांची आवड अशी न संपणारी आठवणींची यादी...

या प्रत्येक ठिकाणांच्या आठवणी अधिक प्रिय झाल्या त्या या पायवाटांनी. जुन्या घराचा रस्ता कसा आपुलकीचा वाटतो, तसं काहीसं नातं तयार होत असावं या रस्त्यांशी, डोंगरांशी. पुन्हा कधीही त्याच रस्त्याने जाण्याचा योग आला तर त्या मातीशी बहुदा जास्त जवळीक वाटत असावी, जणू काही आपलेच ठसे तिथे कायमस्वरूपी उमटलेत. अशाच क्षणांना आठवत त्यातल्या मोजक्या आठवणी या निमित्ताने कागदावर उतरल्या...अजून अनेक अशाच पायवाटांच्या प्रतीक्षेत...

खेड्यामधले घर कौलारू...

(लेखिका - स्वाती दिनेश)

नेहमीची प्रवासी ठिकाणे सोडून अनवट जागा शोधायला आम्हाला आवडते. जरा शनिवार रविवारला जोडून सुटी आली किवा सुटी घेतली की चार दिवसाचे कपडे बॅकपॅकमध्ये भरून गाडीत टाकायचे. थोडा शिधा आणि शिदोरी घ्यायची. तहानलाडू भूकलाडू घ्यायचे आणि भटकायला जायचे हा आमचा आवडता छंद!

आल्प्स मध्ये अशी अनेक सुंदर स्थळं लपलेली आहेत आणि त्यातही ऑस्ट्रीयन आप्ल्समध्ये.. मग फारवेर्फन नावाच्या नकाशातला एक ठिपका असणाऱ्या एका चिमुकल्या खेड्यातल्या गेर्टा आजीच्या फार्महाउसवर आम्ही नेहमीप्रमाणे फोनवर बुकिंग करतो. हे अहोननेग्गर कुटुंब आता आमचे इतके चांगले परिचित झाले आहेत की फोनवर नाव सांगताच किती दिवसांनी आपले सुहृद भेटल्यासारखे बोलणे होते. २००८ साली आपल्या मिपा भ्रमणमंडळाच्या सहलीच्या निमित्ताने ह्या कुटुंबाची ओळख झाली. पावणेसहा फुटाच्या आसपास उंची असलेली. थोराड बांध्याची, पिंगटसोनेरी केसांची, प्रेमळ निळ्या डोळ्यांची आणि मंजुळ आवाजाची गेर्टा आजी आणि तिला साजेसे दणकट सहाफूट उंच, शेतात राबून रापलेला लाल गोरा रंग असलेले आणि आपल्या गुरावासरांमध्येच जास्त रमणारे हसतमुख पीटर आजोबा!

गेर्टा आजी, पीटर आजोबा त्यांचे घोडे, बदकं, मांजरं, नातवंडं आणि त्यांचं डोंगराच्या कुशीत लपलेलं सुंदरसं घर आणि त्या घराचं घरपण.. सगळ्याच्याच आम्ही प्रेमात पडलो आणि तिथे पुनःपुन्हा जात राहिलो आहोत. तिच्याकडे जागा उपलब्ध नसली तर ती आजूबाजूला राहणाऱ्या तिच्या परिचितांकडे

आमची सोय करते पण तिला भेटून जाच, असेही आवर्जून सांगते. मागच्या वेळी गेलो होतो तेव्हा पीटर आजोबांच्या पायाला लागलं होतं. त्यातून ते बरे होऊन आता शेतावर कामही करू लागले होते. त्या घराच्या व्हरांड्यात सकाळी उभं राहिलं की समोर दिसतो तो काळसर हिरवे पाइन्स अंगाव्रर ल्यालेला, शेळ्यामेंढ्या, गाईंना आपल्या हिरव्या मांडीवर

बागडू देणारा आल्पस, त्यातून वर डोकावणारा बालसूर्य आणि त्याची सोनेरीलाल प्रभा! खाली अंगणातल्या

गोठ्यातून एका हातात दुधाची चरवी आणि दुसऱ्या हातात चारा घेतलेले पीटर आजोबा तोच चाऱ्याचा हात उंचावून आपल्याला 'गुटन मॉर्गन' करतात आणि मॉर्निंग नुसती गुडच नाही तर सुंदर होऊन जाते.

आजीचे घर तिमजली आहे. सर्वात खालच्या मजल्यावर ती दोघे आणि त्यांची मांजरं राहतात. तेथेच ब्रेकफास्टसाठी प्रशस्त हॉल आहे आणि वरच्या दोन्ही मजल्यांवर अपार्टमेंट केली आहेत आणि ती अपार्टमेंट्स आणि खोल्या हॉलिडे होमसारख्या भाड्याने देतात. पुढे मोठे अंगण आणि त्या अंगणात कोंबड्या, बदके बागडत असतात. एका भल्यामोठ्या लाकडी ओंडक्याची डोण केली आहे आणि तीत ह्या प्राण्यांसाठी पाणी असते. कोपऱ्यावर गोठा आणि तबेलाही आहे. गोठ्यात चार पाच दुभत्या गाई आहेत आणि तबेल्यात शेपट्या उडवत असलेले पुष्ट उमदे, देखणे घोडेही आहेत. मागच्या अंगणात सफरचंदाची, पेअरची झाडे आहेत आणि त्यांच्या फुलांचा मंद दरवळ किवा फळांचा गोड सुवास कोंदलेला असतो. मागच्या डोंगरातून एक ओढा वाहत येतो त्याचं खळखळ गाणं सतत चालूच असत. फारवेर्फन हे सगळं गावच मुळी डोंगरात आहे. सगळेच उंचसखल कच्चे, पक्के रस्ते! सरळ रस्ता नाहीच. एक चढण चढायची आणि दुसरी उतरायची...एकच ट्रॅक असलेलं एक अगदी लहानसंस रेल्वे स्टेशनही आहे. ते क्रॉस करून समोरच्या चढणीवरून मोठी पाणचक्की येईपर्यंत जायचं. तीच त्यांच्या घराकडे जाण्याची मोठ्ठी खूण!

पलीकडच्याच घरात तिचा मुलगा, सून आणि नातवंडे राहतात. तर थोडे खाली उतरून गेले की मुलीचे घर आहे आणि कोपऱ्यावरच्या घरात दुसरा मुलगा राहतो. सगळे एकमेकांना धरून आहेत आणि खूप लोकं आले तर सगळे आजीच्या मदतीला येतात. एरवी आजी आणि तिची धाकटी सून हे हॉलिडे होम चालवतात. आजोबा शेतात आणि मुले आपापल्या उद्योगात असतात.

अंगणाच्या एका टोकाला गेलं की समोर दिसतो तो 'व्हेअर इगल्स डेअर' ह्या चित्रपटामधला तो सुप्रसिध्द होहवेर्फन कासेल!

फारवेर्फन हे इतकं चिमुकलं गाव आहे की संध्याकाळी सहा/साडेसहा वाजताच सगळं बंद होऊन जातं. हे माहित असल्याने डाळ, तांदूळ, फोडणीचे साहित्य, सूपांची पाकिटे, पास्ता, फ्रोझन पिझ्झा असे सगळे बरोबर घेऊनच जातो आम्ही. दुसऱ्या दिवशी सक्काळी तिच्या घरच्या गाईंचे दूध, अंडी, दारची सफरचंदे, तिच्या भावाच्या बेकरीतले गरमगरम पाव असा भरपेट नाश्ता करून बाहेर पडायचे हे आमचं तिथलं रुटिन.. बाहेर पडताना तिची मांजरं पायात लुडबुडतात. त्यांना गोंजारल्याशिवाय, त्यांचे लाड केल्याशिवाय आपल्याला बाहेर पडू देत नाहीत. "अगं, आता तुम्ही ओळखीचे झालात ना, लाडात येतात ती..." आजीचे उत्तर तयारच असते. एका उन्हाळ्यात आम्ही त्यांच्याकडे गेलो असता तिथल्या अंगणात एक शिंगरू दिसले. "हा नवा मेंबर आमचा..आमची घोडी व्याली आत्ता दोन आठवड्यांपूर्वी, बघ कसं गोंडस आहे ते." त्यांचा एक घोडा भारतात विकला आहे, बंगलोरला. तेव्हापासून भारताबद्दल ह्यांना विशेष प्रेम!

एकदा गावात कसलीशी मिरवणूक होती. त्या मिरवणूकीतले हे अहोन्ननेगर मानकरी होते. अंगणात बग्गी सजवली गेली. तबेल्यातले घोडे आणून तिला जोडले, त्यांना झुली घातल्या, गळ्यात रंगीत माळा घातल्या. पीटर आजोबा त्यांच्या पारंपारिक पोषाखात तयार होऊन बग्गीत चढले. मिरवणूक बघायला मुख्य रस्त्यावर उभे रहा असं सांगून निघून गेले. खाली दूरवर दिसत असलेल्या चर्चच्या प्रांगणात रंगीत जत्रा फुललेली मुख्य रस्त्यातल्या चौकातूनही दिसत होती. थोड्या वेळाने शिंग फुंकल्याचा आवाज ऐकू आला. मिरवणूक सुरू झाली. अनेक सजलेल्या बग्ग्या, पारंपारिक वेषातले स्त्रीपुरूष आणि मुलेही त्या मिरवणूकीत सामील झाली होती. रस्त्यावरच्या पदपथावर दोन्ही बाजूंना लोकांनी कौतुकाने ती मिरवणूक पहाण्यासाठी दाटी केली होती. एकेक बग्गी येत होती. पीटर आजोबांची बग्गी आल्यावर त्यांनी आमच्या दिशेने हात उंचावला. नंतर बग्गीतून उतरून काही स्वार पायउतार झाले आणि त्यांचा रुटमार्च सुरू झाला. नंतर लक्षात आले की पायउतार झालेले बरेचसे आजोबाच होते आणि ते सगळे झेंडे, बिगुले, फ्लूट, ट्रंपेट असे काय काय घेऊन संचलन करत होते आणि बग्गीच्या घोड्याचे कायदे बहुतेक तरुणांच्या हातात होते. तरुणाईकडे, पुढच्या पिढीकडे आपला वारसा सोपण्याचा तो संकेत असावा, असं आपलं ते दृष्य पाहून मला वाटलं. पीटर आजोबांना आम्ही तिथे थांबून एवढुशा गावातली ती मिरवणूक पाहिल्याचा फार आनंद झाला आणि आम्हाला तो आनंदाचा ठेवा मिळाल्याचा आनंद झाला होता. आमच्या ओळखीची मैत्री कधी झाली ते आमचं आम्हालाच कळलं नाही.

आपला डेरा ह्या फार्महाउसवर टाकायचा आणि मग साल्झबुर्ग, हलाइनच्या सॉल्टमाइन्स, हिमगुंफा, लाइष्टनष्टाइनचा धबधबा.. इगल्सनेस्टएक ना दोन अशी मनसोक्त भटकंती करायची अशी आम्हाला आता सवयच लागली आहे.

आल्प्सच्या कुशीतलं, निसर्गाचं भरभरून देणं लाभलेलं, अजून कोणाच्या फारसं डोळ्यात न आल्यामुळे अगदी अनाघ्रात असलेलं हे साल्झबुर्ग प्रॉविन्समधल्या पोंगाव जिल्ह्यातलं बिशोफहोफनच्या जवळ असलेलं अगदी लहानसं तुलनेने तसं अप्रसिध्दच गाव! अगदी डोंगराच्या खांद्याकुशीवर वसलेलं असल्याने गावात सरळ रस्ता नाहीच. एका घरातून दुसऱ्या घरात जरी जायचं असेल तरी एका चढावरून चढत जायचं आणि दुसऱ्या बाजूने उतरायचं. घरं सगळी लाकडी, कौलारू आणि घरांचे वऱ्हांडे रंगीत फुलांनी आणि खिडक्या लेसच्या, कलाकुसरीच्या पडद्यांनी सजवलेल्या! लाकडी, बुटकी कुंपणे किवा मग तारांचे बॉक्स करून त्यात लहान लहान दगड भरून अगदी कलात्मकतेने तयार केलेली.. अशा ह्या गावातून चक्कर मारायलाही इतके प्रसन्न वाटते. फारवेर्फन, डॉर्फवेर्फन असे ह्याचे दोन भाग आहेत. हे एवढसं गाव पाचव्या शतकापासून नोरिकमच्या राज्यात आहे. आठव्या शतकापासून रुपर्ड ऑफ साल्झबुर्गच्या अधिपत्याखाली रीतसर ख्रिश्चॅनिटीची सुरुवात झाली आणि साल्झबुर्गच्या आर्चबिशपकडे सन १३९८ पासून ह्याची मालकी आली. येथले चर्च म्हणजे दगडी बांधणीचे, पुरातन तरीही मजबूत असे १४व्या शतकातले फारकिर्श आणि सिबनम्युलं मुझेउम म्हणजे सेवन मिल्स ओपन एअर म्युझिअमही पाहण्यासारखे आहे. तेथल्या ग्रेन नेचर ट्रेल मध्ये आल्प्समध्ये पेरली जाणारी स्थानिक धान्यं, दळणाची वेगवेगळी तंत्रं, पाव बनवण्याच्या विविध पध्दती, त्याबरोबर असणाऱ्या रुढी, परंपरा यांची रोचक पध्दतीने ओळख होते. नितळ निळसर हिरवे पाणी घेऊन वाहणाऱ्या साल्झाख नदीच्या काठावर वसलेलं ह्या अटकर, टुमदार गावात अजून काय बघायचं? असं विचारायचंच नसतं कारण काही प्रसिध्द असं बघायला आपण इथे आलेलेच नसतो. निसर्गाच्या कुशीत, स्वत:शी संवाद करायला, गेर्टा आणि पीटरला त्यांच्या सगळ्या घरालाच भेटायला इथे यायचं असतं.

एका सुटीत असंच परत एकदा आप्ल्सला आणि गेर्टा आणि पीटरला भेटायला जाण्यासाठी फोन फिरवला तर पीटर आजोबा शेतात काम करत असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा मोठा झटका आला आणि त्याच मातीत ते मिसळल्याचं समजलं, सुन्न व्हायला झालं.

आता परत जेव्हा तिकडे जाऊ तेव्हा एका हातात चरवी आणि दुसरा हात उंचावून गुटन मॉर्गन करणारे हसतमुख पीटर आजोबा नसतील ह्या विचारांनी उदासायला होतं..

गेर्टी व पीटर सून व नातीसमवेत

वारी अमेरिकेची - सिक्स फ्लॅग आणि लेक जॉर्ज

(लेखिका - पिलीयन रायडर)

नमस्कार मंडळी!

मागच्या वर्षी नवरोबा कृपेने आमचे पाय अमेरिकेच्या पुण्यभूमीला लागले. इथल्या पावन अनुभवांवर एक विस्तृत लेखमाला येतच आहे (थांबा..थांबा..असे पळू नका!!). हा मात्र न्यूयॉर्क शहराच्या बाहेर पडून केलेल्या एकमेव भटकंतीचा वृत्तांत!

तर त्याचं झालं असं की २ महिने अमेरिकेत राहायचं म्हणून आधी मनमोर पिसारा फुलवून थुईथुई नाचत होता. त्यामुळे फारच उत्साहात आजूबाजूचं सगळंच दणादण पाहून घेतलं. मग लक्षात आलं की अजून जवळपास एक महिना शिल्लक आहे. न्यूयॉर्कच्या बाहेर जाउन काही बघता येईल का ते शोधू लागले. नवऱ्याने वॉशिंग्टन अक्षरशः पिंजून काढलं होतं आणि मलाही आता अमेरीकेतल्या उंच इमारती आणि संग्रहालये पाहून भयानक कंटाळा आला होता. "अमेरिकेतला निसर्ग असतो कसा? ह्यांच्या डोंगर दऱ्या दाखवा तरी." असं म्हणून वॉशिंग्टन वगैरे काही न पाहता सरळ अपस्टेट मध्ये काय पहाता येईल ह्याचा धांडोळा घ्यायला सुरुवात केली.

गुगल आणि अमेरिकावासी मित्र मैत्रिणींना पुष्कळच बोअर करुन झाल्यावर अपस्टेटकडील कोणताही माऊंटन किंवा प्रसिद्ध सरोवरं (लेक) बघुन यावं असं ठरलं. मी माझ्या "शक्य तितकं फिरुन घ्या" बाण्याने जमेल तेवढी ठिकाणं एका दमात बघण्याचा मनसुबा रचत होते. माझे हे मनसुबे सांगितल्यावर एका मैत्रिणीचा छान मेल आला, "बयो, अजून १५ वर्षांनी तुला किती दगदग झाली हे आठवायचय की आपण कित्ती सारी ठिकाणं एकाच ट्रिप मध्ये पाहिली हे? दोनच गोष्टी पाहा. पण मनमुराद पहा! किती स्पॉट "कव्हर" केले ह्या पेक्षाही किती स्मरणीय सहल झाली हे महत्वाचं."

मग मी माझ्या डोक्यातुन खूप काही एकदम पाहायचं खूळ काढून टाकलं. पण तरीही माझ्या भारतीय मेंदुला "गुणिले ६०" सिंड्रोम झालेला असल्याने जे काही असेल ते बजेट मध्ये असलंच पाहिजे हे मात्र नक्की होतं. आमच्याकडे गाडी नाही, भाड्याने घेतली तरी मुळात चालवताच येत नाही अशी परिस्थिती. त्यामुळे टुर्स आणि ट्रॅव्हल्सला शरण जाण्यावाचून काही पर्याय शिल्लक नव्हता. मग गुगलला साकडे घातले.

"गुगल गुगल ऑन द ऑल, व्हॉट इज द चीपेस्ट टुर ऑफ देम ऑल?" (चीपेस्ट महत्वाचं)

मला वाटलं होतं की साध्या साध्या गोष्टींना कै च्या कै किंमती असणाऱ्या ह्या अमेरिकेत, सहल करणे म्हणजे नक्कीच देशोधडीला लागण्या इतकं खर्चिक प्रकरण असणार. पण तेव्हा मी हे विसरले होते की हे वाक्य फक्त अमेरिकन गोष्टींना लागू होतं. "चायनीज" मालाला नाही; आणि अमेरिका हा खरं तर चीनी लोकांचा देश असल्याने "चायनीज" मालाला काही तोटाच नाही. मला खरंतर कोणत्याही प्रकारे चीनी अर्थव्यवस्थेला मदत करायची नव्हती. कसकायअप्पा (वॉट्सअ‍ॅप) वर 'चीन्यांना बुडवा' चे मेसेज वर मेसेज फिरत होते. त्यामुळे मनाला कुठे तरी ह्या टुर्स बुक करवेनात. मग मी अजुन शोध सुरु ठेवला. बाकी टुर्सच्या किंमती पाहून माझे डोळे पांढरे झाले. परत परत पाय चीन्यांकडेच वळू लागले. शेवटी एकदा न रहावून मी त्यांच्या टुर्सच्या किंमती पाहिल्या आणि अचानक चीनी लोक मला तितकेसे दुष्ट वाटेना झाले! ;)

मला अपस्टेट खुणावत होतं. समोर स्वस्त आणि मस्त टुर्सचे पर्याय होते. शेवटी कसंकायाप्पावर सतत कोकलणाऱ्या "चीन्यांना बुडवा" मेसेजला मी डोक्यातून डिलीट केलं आणि नवऱ्याने दोन मिनिटात टूर बुक करुन टाकली.

"टेक टुर्स" ही एक बऱ्यापैकी नाव असलेली ट्रॅव्हल्स कंपनी अनेकांकडून ऐकलेली होती. ह्यांच्या 2-Day Upstate New York, Lake George, Lake Placid Tour from New York ह्या पॅकेजचे बुकिंग झाले. दोन दिवसात सिक्स फ्लॅग्स हे ॲडव्हेनचर पार्क, लेक जॉर्ज, ऑस्बल चाजम, व्हाईट माउंटन आणि हाय फॉल्स गॉर्ज ही ठिकाणे फिरायची होती. म्हणजे बघा, हे असं जायचं होतं.



प्रत्येकी १०० डॉलर्स मध्ये ही सहल होणार होती. २ लोकांच्या बुकिंगवर तिसरा फ्री असल्याने अबीरला (मुलाला) काही चार्जेस पडले नाहीत. ह्या मध्ये दोन दिवसांचे जाणे येणे आणि एका रात्रीचा मुक्काम अंतर्भूत होते. बुकिंग केल्यावर व्यवस्थित डिटेल मेल आला. जाण्याच्या आदल्या दिवशी कुठे यायचे, कितीला यायचे ह्याची माहिती देणारा एस.एम.एस ही टुर गाईड कडून आला. दुसऱ्या दिवशी सकाळी न्यू जर्सीच्या प्रसिद्ध इंडियन स्ट्रिटच्या एका कोपऱ्यावर जमायचे होते. एका दिवसात होईल तेवढी तयारी करुन मी अलार्म लावून झोपले. खरं तर अलार्म लावला की माझी झोप होत नाही, मग पुढचा दिवस वाईट जातो. पण दुसऱ्या दिवशी चक्क मस्त झोप झाली.

"कमाल आहे नै, इतकी झोप झाली तरी अलार्म अजून झालाच नाही!" असं म्हणून घड्याळ पाहिलं, तर मस्त झोप का झाली ते समजले...अलार्म झालाच नव्हता!! निघायला १५ मिनिटं शिल्लक असताना जाग आली होती.

बाकी प्रजा साखरझोपेत होती. मी जवळपास शॉकमध्ये गेले होते. धक्का बसला ना की फार छान रिॲक्शन देते मी. अगदी मालिकांमध्ये दाखवतात तशीच. लोक त्याला "ओव्हर रिॲक्टींग" म्हणतात, पण माझी डिफॉल्ट सेटिंगच तशी आहे. तर त्याच सेटिंग प्रमाणे मी जोरात किंचाळले. दचकून नवरा बेडवरुन खाली पडला. अबीर मात्र कुंभकर्णाची औलाद असल्याने हललाही नाही!

मी किंचाळून झोप उडवल्याने की काय, पण प्रजा घाबरुन १५ मिनिटात बाहेर पडली आणि अगदी वेळेत न्यूजर्सी व्हाईट कॅसेलला पोहचली. पाच एक मिनिटात बसही आली आणि "सुकी" नावाच्या चिनी मुलीने गाईड म्हणून सगळ्यांचे स्वागत केले. सगळे प्रवासी बसल्यावर बस निघाली. प्रसन्न सकाळी अशी ट्रिप निघाली म्हणुन मनरुपी मोगॅम्बो खूश व्हायला सुरुवात झालीच की अचानक "चिंच्यां..कुईईई.." असे लिहिताही येत नाहीत असले आवाज यायला सुरवात झाली. मी आणि माझी प्रजा सुखेनैव खिडकीतून बघत बसलो होतो ते दचकलो. माझ्या सकाळच्या किंचाळण्याने आधीच नवरा दहशतीखाली होता. आता काय नवीन म्हणून बघितलं, तर सुकीने माईकवरुन चिनी भाषेतून बोलायला सुरूवात केली होती आणि त्याचा तो आवाज होता. म्हणजे निव्वळ टुर कंपनी आणि गाईड चिनी नसुन, दोन दिवस ऐकावे लागणारे प्रवचनही चिनीभाषेत असणार होते. पुढचे दोन दिवस सुकी "२ वाक्य इंग्रजीत मग २ वाक्य चिनी" अशी तळ्यात मळयात उड्या मारत होती. पहिलाच स्टॉप म्हणजे "ग्रेट एस्केप" भरपूर दूर असल्याने पुढचे २-३ तास गाडी हायवेवरुन नुसती पळणार होती. सुकीने पुढच्या दोन दिवसात ज्या ॲक्टीव्हिटीज करायच्या आहेत त्याचे पैसे गोळा केले. तुम्हाला हव्या त्याच ॲक्टिव्हिटी तुम्ही घ्यायच्या होत्या. प्रत्येकी साधारण १००-१५० डॉलर्स खर्च होता. अबीरला

राफ्टींग करता येईल की नाही ही शंका होतीच. त्यामुळे आम्ही जे निश्चित होतं त्याचे पैसे देऊन ठेवले. बाकी ऐनवेळेस निर्णय घेण्याचीही मुभा होतीच. असं पाकिट हलकं झाल्यावर मी परत "गुणिले ६०" चा खेळ सुरु करु नये म्हणुन गै गै करुन घेतली. थोड्यावेळाने डोळे उघडले तर अमेरिकेच्या नॅशनल हायवे वरुन गाडी पळत होती. आजुबाजुला एकतर उंचच उंच झाडं दिसत होती, नाही तर भले मोठे मॉल्स. कुठे वस्तीच दिसेना...इतक्यात गाडीने झोकदार वळण घेतलं आणि सुकीने "चला, हला, आलं ग्रेट एस्केप उर्फ सिक्स फ्लॅग्स" अशी दोन दोनदा घोषणा केली. साधारण ४-४.३० तास आमच्या हातात होते.

The Great Escape and Splashwater Kingdom हे एक थीम पार्क आहे. १३५ हून अधिक राईड्स असणाऱ्या ह्या पार्कमध्ये लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांसाठी भरपूर खेळ आहेत. हा भला थोरला नकाशा पाहून तुमच्या लक्षात येईलच.

हाच तो नकाशा मला आधी मिळाला असता, तर किती बरे झाले असते. इथे इतक्या गोष्टी होत्या की नक्की सुरुवात कुठून करावी हेच कळेना. आम्ही दोन चुका केल्या होत्या. एकतर अबीरचा स्ट्रोलर बसमध्ये विसरुन आलो होतो. लक्षात घ्या, अमेरिकेत पोरं सोबत असताना स्ट्रोलर नसणे हा अक्षम्य गुन्हा आहे. तुमचे पाय गळ्यात घालुन फिरावं लागेल अशी वेळ लवकरच येते. ह्यात भरीस भर आम्ही भली मोठी एक बॅग घेऊन आत गेलो. लॉकर्स विश्वास बसणार नाहीत एवढे महाग होते. म्हणजे अबीर आणि ही बॅग मिरवत फिरायचं होतं.

म्हणून मग अबीरचा आत्मा थंड करायला लहान मुलांच्या खेळण्यापासुन सुरुवात केली. सुकीने मोजुन जे ४ तास दिले होते इथे फिरायला, त्यापैकी ३.५ तास बाळराजांच्या राईड्स वर गेले. एक तर राजे एका राईड कडुन दुसऱ्या राईडकडे सैरावैरा पळत होते. नाही तर कपडे काढून कारंज्यात नाचत होते. त्याच्या मागे नाचून वेळ संपत आल्यावर आणि त्याच्या बाललीलांचा अगदी वैताग वैताग आल्यावर, किमान एकातरी राईडवर बसू म्हणून मी आणि नवरा वॉटर पार्क कडे वळलो. मग अबीरला आळीपाळीने सांभाळून एक - एक वॉटर स्लाईड राईड आणि पाण्याला घाबरुन बोंबलणाऱ्या अबीरला डोक्यावर घेऊन "पाच मिनिटं" स्विमींगपूल मध्ये डुंबणे इतका "मनसोक्त" आनंद घेऊन आमचा कबिला निघाला. अबीरला घेऊन पुढची ट्रिप लास वेगासला नेण्याचे स्वप्न पहाणाऱ्या नवऱ्याला समजायचं ते समजलं होतं!

आम्ही खास इतका प्रवास करुन, तिथंवर जाऊन, राईड्स "नुसत्या" पाहुन आलो. हे फोटो पाहुन तुम्ही आणि आम्ही अनुभवांच्या एकाच पातळीवर आहोत. फक्त तुम्हाला मनस्ताप झाला नाही इतकंच!

आल्या आल्या ह्या भव्य राईडने स्वागत केले, पण ह्यात बसण्याची आम्ही तरी हिम्मत करु शकलो नसतो.

आम्ही जिथे वेळ घालवला त्याच लहान मुलांच्या सेक्शनचे फोटो

एका ठिकाणी लहान मुलांसाठी हे नाटक चालू होते.

खाण्यासाठी कॅफे आहेतच. पण अर्थात तिथे बर्गर आणि को़क शिवाय फार काही वेगळं मिळत नाही. एकंदरीत न्यूयॉर्कच्या बाहेर पडलं की शाकाहारी माणसांचे जाम हाल होतात. तेच ते बर्गर, कोक, पिझ्झे आणि सॅण्डविच. एकंदरीत पावाच्या आत / वर भाज्या कोंबा, चीझ पसरा आणि कोक सोबत नरड्याखाली ढकला आणि मग वजन का वाढते ह्यावर चिंता करत बसा.

एवढ्या एका चढ एक राईड्स असताना आम्हाला मात्र काही सुद्धा धमाल करायला मिळाली नाही. फार हळहळ करण्यात काही अर्थ नाही. एक संपूर्ण दिवस घालवायला छान ठिकाण आहे. तेवढा वेळ टुर्सवाल्यांनी प्लॅन केला नाही हे त्यांना फीडबॅकमध्ये मात्र सांगून आले.

आमच्या तिघांमध्ये संपूर्ण दिवस राईड्स, खाणे-पिणे, नाचणे, आई-बापाला पळवणे ह्यात घालवला असल्याने अबीर प्रचंड आनंदात होता. ठरल्या वेळेला आम्ही दमून भागून बस मध्ये जाउन बसलो. बस निघाली म्हणे म्हणेस्तोवर तर लेक जॉर्जला पोहोचली देखील!

अमेरिकेत हे छान आहे. एका क्षणी तुम्ही मोठमोठ्या रस्त्यांवरुन जात असता, झोकदार वळण येतं आणि अचानक समोर काही तरी अप्रतिम उभं ठाकतं.

* आंतरजाला वरुन साभार :- http://lakegeorgesteamboat.com

असून असून एका तळ्यात काय असणार? असा विचार करता करता समोर आला "क्वीन ऑफ अमेरीकन लेक्स"!!! उगाच नाहीये हा 'क्वीन' प्रचंड मोठा जलाशय, मागे दुरवर दिसणारी डोंगररांग, किनाऱ्यावर दिमाखात उभा क्रुझ!

दिवसभर इतकी दगदग झाली होती की ह्या अशाच शांत ठिकाणाची गरज होती. आम्हाला तासभर मोकळं सोडून सुकी आमच्यासाठी बोटीची तिकिटं काढायला निघून गेली. आम्ही निवांत किनाऱ्यावर जाऊन पाण्यात पाय टाकून बसलो. इतकं सुरेख नितळ पाणी, गार गार, झुळझुळीत.

संध्याकाळची वेळ. समोर जॉर्ज असा शांतपणे पहुडला होता. काही न बोलता मुकपणे बसून रहावं अशी वेळ.

मला अमेरिकेत आवडलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे स्वच्छता. सगळं कसं आखीव रेखीव आणि स्वच्छ. मग आपोआपच सुंदर वाटतं. इथे सुद्धा कुणाची गडबड नाही, विक्रेत्यांचे आवाज नाहीत, भिकाऱ्यांचं हटकणं नाही, प्लास्टिकच्या कचऱ्याचं पाण्यात तरंगणं नाही. सगळं अगदी चित्रात असल्या सारखं!

सुकीबाई बोटीची तिकीटं घेऊन आल्या. आम्ही "मिनी हा हा" ह्या बोटीत जाणार होतो. (शप्पथ असंच नाव आहे) ही आमची मिनी हा हा!!* आंतरजालावरून साभार :- http://lakegeorgesteamboat.com

तीन मजली मिनीवर आम्ही एक तास घालवणार होतो. ती आम्हाला लेक जॉर्जची सैर करुन आणणार होती. बोटीत शिरण्या आधी प्रत्येक कुटूंबाचा एक असा फोटोसेशनचा अघोरी प्रकार झाला. आम्हाला सर्वात वरच्या डेकवरती जागा मिळणं अवघडच होतं. मग आम्ही एका खिडकीपाशी खुर्च्या टाकून बसलो. मिनी हा हा म्हणता म्हणता भ्रमंतीला निघाली. मागे स्पीकरवर बोटीविषयी माहिती देणे चालू होते.

अमेरिकेत यत्र तत्र सर्वत्र दिसणारा झेंडा!

लेक जॉर्जचे वैशिष्ट्य म्हणजे किनाऱ्यावरची टुमदार घरं! इथे म्हणे मिलीयन डॉलर्स खर्च करुन रेती टाकून किनारा तयार करण्यात आला होता आणि लोकांनी खास उन्हाळ्यात येऊन रहायला तिथे आपली घरं बांधली होती. मला पैसा काय आनी जानी आहे घर दारं विटांमध्ये काय जीव टाकायचा? वगैरे संन्यासी विचार नेहमी येतात. आणि अशी घरं बघून निघूनही जातात. हे असं तळ्याकाठी घर बांधायला तरी पाच पन्नास मिलीयन डॉलर्स पटकन कमावून टाकावेत असं वाटतं.

तसं तर आपल्या पानशेत वगरे साईडलाही अशी घरं आहेत पाण्याकाठी, पण का कोण जाणे ती एवढी मनाला भावत नाहीत. प्लॉटिंग करुन, कुंपणं घालून बांधल्याने की काय, पण ती निसर्ग उध्वस्त करुनच बांधली आहेत एवढंच जाणवत राहातं. तसा निसर्गाला धक्का इथेही लागला असेल, पण इथली घरं आजूबाजूच्या झाडांमध्ये मिसळून गेली आहेत असं वाटत रहातं. शिवाय ही घरं असतात देखील फार सुरेख. हे मोठ्या घरा सारखं डीट्टो छोटं घर दिसतय ना, ते म्हणजे बोटीसाठी घर...मॅचिंग मॅचिंग! अनेक जण, अगदी लहान मुलं सुद्धा आपल्या पिटुकल्या बोटी घेऊन पाण्यात वलव्हत चालले होते.

आता सूर्यास्त व्हायला लागला होता, बोटीने परतीचा मार्ग

पकडला. बोट जसं जशी जवळून जाते, तसं तसे तिथले लोक बोटीतल्या लोकांसाठी हात हलवतात. आम्ही पण उगाच ओळख पाळख नसलेल्या पन्नास लोकांना हात हलवून हसत होतो.

राईड संपता संपता नवऱ्याला कुठेशीक इंजिन रुम दिसली. म्हणून पटकन तिथेही डोकावून आलो!

'मिनी हा हा' चे अजुन एक वैशिष्ट्य म्हणजे ह्या बोटीवर ५-६ नोझल्स मधुन वाफ बाहेर फेकून मस्त गाणे वाजवले जाते. बोट किनाऱ्यावर परत येत असताना खास करुन हे गाणे वाजवले जाते. ज्यात फक्त ह्या नोझल्सचाच नाही तर डोंगरांमधून येणाऱ्या इकोचाही वापर होतो.

आपला तापोळा किंवा बामणोलीचा तलावही इतकाच सुंदर आहे बरं का. किंवा काकणभर सरसच. पण जरा येणाऱ्या माणसांच्या व्यवस्थेचं आणि स्वच्छतेचं पाहतील तर शप्पथ. आपली पर्यटन स्थळं इथेच मार खातात. उगाच भारताची आठवण येऊन हळहळ वाटली.

आता आम्ही अपार दमलो होतो. डायरेक्ट हॉटेलात नेऊन बेडवर फेकून दिलं असतं तरी चाललं असतं. ॲल्बनी ह्या न्यूयॉर्कच्या राजधानीमध्ये मुक्काम होता. हॉटेल बऱ्यापैकी होते. त्याआधी चिन्यांनी एका चायनीज हॉटेलात नेऊन १८-२० डॉलर्स प्रत्येकी घेऊन अमर्याद बुफे समोर सोडले. मांसाहारी लोकांचा आनंदाने जीव जाईल इतकी व्हरायटी. पण आमच्या तोंडाला पुसायलाही काही शाकाहारी मिळेना. उगाच २-४ पदार्थ (म्हणजे सॅलडच) घेउन मुकाट बसले. लोक लोबस्टरचा डोंगर घेऊन बसले होते. तरी मी चिवटपणे एक दोन पदार्थ तिथल्या वेटर समोर नेऊन "हे व्हेज आहे का?" अशी विचारणा केलीच. त्यांनी मला "हे बीन्स आणि राईस पासून बनवलं आहे. बीन्स आणि राईस तुमच्यासाठी व्हेज असतो का?" असा प्रश्न विचारुन मलाच गार केलं. "व्हेज" ची व्याख्या इतकी धुसर असल्याने मग तर माझा "व्हेज" लिहीलेल्या पदार्थांवरचाही विश्वास उडाला. ज्याची ओळख पटली तेच मी ताटात घेतलं. मांसाहारी असूनही केवळ हॉटेल चीनी आहे म्हणून नवराही भीत भीतच खात होता.

जेवण झाल्यावर मात्र तिथल्याच बाकड्यांवर पथारी लावावी का अशी अवस्था झाली होती. सुकीने आम्हाला हॉटेलात सोडले. उद्या हॉटेलकडून नाश्ता मिळेल अशी घोषणा केली. समस्त इंटरनॅशनल प्रवासी जनता खूश!

मग तिने अजूनच आनंदात "उद्या खूप खूप फिरायचयं हं, तेव्हा सकाळी ६.३० ला भेटूया" ही पुढची घोषणा केली. जनतेचा कानावर विश्वास बसेना! पण सुकीला बहुदा याची सवय असावी. ती लोकांना अजिबात भीक न घालता रुमवर निघून गेली. आम्ही सुद्धा उद्याचं उद्या पाहू म्हणुन पाचचा अलार्म लावून झोपलो! (आमच्या अलार्मची सिस्टीम सुकीला माहिती असावी. तिने ५.३० चा वेकप कॉल रिसेप्शनला सांगून ठेवला होता)

आत्ता पर्यंत तरी चिन्यांनी चांगली सोय केली होती. उद्याही असाच मजेदार दिवस जाईल अशी स्वप्न पहात आम्ही ताणून दिली!

Note: Some photos are from Internet and the purpose is only for Reference. We sincerely thank the sources mentioned above for these photos.

ट्रॅव्हल टिप्स - प्रवासात आवर्जून लागणाऱ्या वस्तू

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

- मोबाईल आणि कॅमेरा चार्जर, कॅमेरा साठी जास्तीचे मेमरी कार्ड, चश्मा, गॉगल केस, लॅपटॉप चार्जर, असल्यास मोबाईलची जास्तीची बॅटरी.
- छोटी कात्री, सुईदोरा, टॉर्च, डासांसाठी गुडनाईट.
- मेणबत्ती-काड्यापेटी, कापूस, दोरी, प्लास्टिक पिशव्या, कुलुप-साखळ्या, पेन आणि लहान डायरी/वही/नोटपॅड, छत्री, रेनकोट.
- छोटा वॉटर हीटर/इलेक्ट्रिक कप, प्लास्टीकचा एक डबा, चमचा, ग्लास, ताटली.
- खरेदी करणार असाल (हा काय प्रश्न झाला का ;)) तर त्यासाठी एखादी फोल्डेबल पिशवी.
- प्रसाधनवस्तू (टॉयलेटरीज) - टुथ ब्रश, टुथ पेस्ट, बॉडी वॉश, फेस वॉश, शॉवर जेल, वेट वाईप्स, सनस्क्रीन लोशन, विंटर लोशन, शेव्हिंग कीट, डिओ, परफ्युम, कंगवा, केसांचे तेल, शाम्पु, कंडीशनर (शक्यतोवर लहान पाऊच), हँड सॅनिटायजर, इअर बड्स, कापूस, लहान मुलांचे डायपर्स.

वारी अमेरिकेची-ऑस्बल चाझम, व्हाईटफेस माऊंटन, हाय फॉल्स गॉर्ज

(लेखिका - पिलीयन रायडर)

दुसऱ्या दिवशी सक्काळी शिस्तीत उठलो. आदल्या रात्री नीट काही न खाल्ल्याने कडकडून भूक लागली होती. कॉम्प्लिमेंटरी नाश्ता खुणावत होता. मी नाचत बागडत कॅफेटेरियात गेले. आता एवढ्या सकाळी थंड वातावरणात नाश्ता म्हणजे कसं गरम वाफाळतं सांबार आणि त्यात डुंबणाऱ्या इडल्या, किंवा उडीद वडे!! अहाहाहा.... विचारानेच अजून भूक खवळली. उड्या मारत जाऊन पाहिलं तर काय, थंडगार डोनट्स, ब्रेड आणि आंबट ज्युस. हुडुत....!

हा काय नाश्ता असतो का राव?? आपली तर भूकच मेली. एका कोपऱ्यात टोस्टर दिसला. त्यात ब्रेड गरम करुन घेतले आणि लोणी लावून खाल्ले. अमेरिकन प्रथे प्रमाणे हे गिळायला दोन घोट ज्यूस प्यायला आणि डोकंच दुखायला लागलं. वैतागून मी बस मध्ये जाऊन बसले. अशी पोटात भूक घेऊन मी जन्मात आनंदी राहु शकत नाही. बॅगेत चिवडा वगैरे काही तरी होतं. भल्या सकाळी चिवडा शेव तोंडात टाकलं तेव्हा माझा भारतीय मेंदू चालू झाला. बसही चालू झाली. तसं सुकीचं तळ्यात मळ्यातही सुरु झालं. तिने केलेल्या अथांग बडबडीचा सारांश असा होता की आता आम्ही "ऑज्बल / ऑस्बल चाझम" कडे निघालो होतो. तिथे जंगल ट्रेल करुन मग आम्ही रिव्हर राफ्टिंग करणार होतो. रिव्हर राफ्टींगसाठी वजनाची अट असल्याने अबीर येउ शकेल की नाही हे ठाऊक नव्हतं. मग तिथे जाऊन आमच्यापैकी नक्की कोण कोण हे राफ्टींग करु शकेल ते बघायचं होतं.

नितांत सुंदर रस्त्यांवरुन गाडी धावत होती. मला आपण युरोपमध्ये आहोत का असं वाटायला लागलं होतं. "मी कधी युरोपला गेले?" असला कुजकट प्रश्न विचारु नका. पिक्चरं नही देखते क्या? आजवर सिनेमातून, फोटोंमधून जे काही युरोपचे चित्र डोळ्यासमोर होते, तेच सत्य बनून समोर आले की काय? भव्य कॅनव्हासवर चितारलेले मनोहर दृश्य! हिरवेगार डोंगर, निळेशार आकाश, हिरवळीतून डोकावणारी टुमदार घरं. काही म्हणा, ह्या लोकांची सौंदर्यदृष्टी मानली पाहिजे. लहानसेच घर बांधतील, पण काय बांधतील! फिकटसे रंग, समोर छोटीशी बाग, जे असेल ते टापटीप, जागच्या जागी. जागेची इथे काही कमतरताच नसल्याने दोन घरांमध्ये भरपूर जागा. शिवाय कुंपण वगैरे भानगड इथे दिसलीच नाही. त्यामुळे डोळ्यांना कुठलीच सीमारेषा नाही. आपण लहानपणी चित्र काढतो ना, दोन डोंगर, मधून उगवणारा सूर्य, डोंगरातून येणारी नदी, एका कोपऱ्यात एक उतरत्या छपराचे घर, मागे झाड...अगदी तसेच.

गाडी इतक्या जोरात पळत होती की मला फार फोटो काढणे जमले नाही. पण हा एकच कसाबसा जमवला. पण खरं सांगायचं तर ह्या फोटोत १०% सुद्धा मजा नाही.

ऑस्बल चाझम

आधीच सांगते की हा शब्द फ्रेंच आहे. त्यामुळे स्पेलिंग आणि उच्चार ह्यांचा मेळ मला तरी जमेल असं वाटत नाही. म्हणून मी त्याला ऑस्बल चाझम (Ausable Chasm) 'च' म्हणणार. उच्चार काही का असेना. तर काय आहे हे प्रकरण?

ऑस्बल चाझमला "Grand Canyon of East" देखील म्हणतात. आपल्या निघोजला नाही का, नदीच्या प्रवाहामुळे रांजणखळगे तयार झालेत. किंवा मध्यप्रदेशमध्ये, जबलपूरजवळ नर्मदा नदीवर "मार्बल रॉक्स" आहेत ना, तसंच. इथेही पाण्याने खडकात कपारी तयार झालेल्या आहेत. फरक इतकाच की ग्रॅण्ड कॅनियनला आपण वरुन खाली बघतो. तर ऑस्बल चाझमला (किंवा मार्बल रॉक्सलाही) आपण खालून वर. ह्या नदीत रिव्हर राफ्टींग करता येते. मी केवळ गुगलवर याचे फोटो पाहून ही अख्खी टुर निवडली होती. त्यात तिथे पोहोचण्याचा रस्ता असला जीवघेणा. त्या स्वर्गामधून वळणं घेत घेत गाडी पोहोचली.

एका छोट्याशा हॉटेल मध्येच खाणेपिणे, खरेदी, तिकीटं, सगळंच होतं. इथे आमच्या हाताला तिकीट देऊन बॅण्ड्स बांधायला दिले. अबीरलाही चक्क छटाकभर वजन जास्तच भरल्याने राफ्टींगमध्ये घेतले. इथून पुढे जायचा मार्ग हा असा होता.

चार प्रकारचे ट्रेल होते. काही सोप्पे होते, काही कठिण. आमचा अधला मधलाच होता. अर्धा तास चालायचं होतं. पायऱ्या, चढ उतार करायचे होते. मग एका ठिकाणी खाली उतरुन रिव्हर राफ्टींग करत पुढे जायचे होते. तिथून परत मागे मूळ ठिकाणी गाडी नेऊन सोडणार होती. आमचा जथ्था घेऊन सुकी बाय निघाल्या. भराभर चालत रिव्हर राफ्टींगच्या ठिकाणी पटकन पोहोचावे असे बाईंचे म्हणणे. तर आम्ही इथे मजा करायला आलोय, आम्ही मजा करतच निवांत पोहोचणार असे इतरांचे (म्हणजे ८०% चायनीज प्रवासी असणाऱ्या ग्रुपचे) म्हणणे. तू बाई शंभरवेळा आली असशील, आम्ही तर जन्मात पहिल्यांदाच आलोय ना! मग आजुबाजूला बघत, फोटो काढत यायला वेळ तर लागणारच.

लोक निवांत होते तशा सुकी बाय लय लय चिडल्या. गुरं हाकल्या सारखी लोकं हाकत पुढे नेऊ लागल्या. आम्ही आधीच बरेच पुढे असल्याने सुकीबाईंचा रोष पत्करण्याची वेळ काही आली नाही.

लोकांचं काही चूक नव्हतं हो. आजूबाजूला असा परिसर असेल तर कुणाचा पाय निघेल?

छोट्याशा पायवाटेने आम्ही जंगलात घुसलो. नदीच्या कडेकडेने चालत निघालो. पायवाट संपली आणि आता खडकाळ रस्ता सुरु झाला. तर एकंदरीत प्रकरण हे असं होतं

ह्या कपारीला लागून चालण्यासाठी कठडे टाकून नीट रस्ता बनवला होता. पायऱ्या होत्या. पुष्कळ चढ उतार होता. बाजूने ही नदी वाहात होती. मी आजतागायत असं काही कधी पाहिलेलं नसल्याने फारच भारावून वगैरे गेले होते. एकंदरीत सुहाना सफर झालेला. मौसम हसीन होताच...दिल तर जवान आहेच माझं..आणि सनम साथ होता..!



ही खळाळत चाललेली नदी..

हा आम्ही अजिबात न ओलांडलेला पूल

(पुढे जाऊन थोडी शांत झालेली नदी)

असं जात जात शेवटी आम्ही रिव्हर राफ्टींगच्या ठिकाणी आलो. इथे ह्या ज्या बोट्स दिसत आहेत, त्यातून ५-६ च्या एका ग्रुपला घेऊन गाईड राफ्टींग करत जात असे. मग पुढे त्यांना सोडल्यावर ह्या बोटी वर चढवून मग गाडीने परत मागे आणल्या जात आणि परत एकदा राफ्टींगसाठी वरुन खाली सोडल्या जात.

गाईडला येण्याजाण्यासाठी पायऱ्या

आम्ही एका टुरचा भाग असल्याने की काय, रांग मोठी असूनही लवकरच आमचा नंबर लागला. रांगेत सर्वात शेवटी उभे राहून अचानक आपले नाव पुकारले की सगळ्यांना टुक टुक करुन बोटीत जाऊन बसण्याची मजा औरच!!

जॉन नावाचा आमचा हसरा गाईड आम्हाला ह्या राफ्टींगला घेऊन गेला. इतका वेळ वरुन बघितलेली नदी आता खालून वर बघताना वेगळीच भासत होती.

जॉन आम्हाला ह्या परिसराची माहिती सांगत शांतपणे नेत होता. इथे अनेक चित्रपटांचे

शूटिंग झालेले आहे म्हणे. एकात तर एका घोड्याने वरच्या कड्यावरुन पाण्यात उडी मारली होती. घोडा पोहत निघून गेला, घोडेस्वार तंगडे गळ्यात घेऊन परत आला म्हणतात. इथून म्हणे तो स्टंट झाला

हे काय होतं ते मला अजिबात आठवत नाहीये. कारण माझं लक्ष इकडे होतं.

इथून पुढे मात्र आम्ही फोन वगैरे सगळं पॅक करुन ठेवलं आणि मस्तपैकी प्रवाहात बोट घातली. अजिब्बात भीती वाटली नाही. मुळात पाणी फार शांत होते आणि राफ्टींगचा वेळ अगदीच ४-५ मिनिटं.. एका ठिकाणी फक्त छोटासा भोवरा होता. तिथे हलकीशी डुचमळली आमची बोट.

पण तेवढंच...अबीरलासुद्धा करता येईल असे रिव्हर राफ्टींग. काय ते समजून घ्या!!

राफ्टिंग संपवून आम्ही वर चढून गेलो. दर १० मिनिटानी तिथे एक बस येते. तिने आम्हाला परत मूळ ठिकाणी आणून सोडले. आम्ही जिथून आत प्रवेश केला होता, त्याच्या मागे ही गंमत लपली होतं हे ठाऊकच नव्हतं..

मला तर किती फोटो काढू न किती नको असं झालं होतं. पण मोबाईल मध्ये येऊन येऊन काय फोटो येणार..

तिथल्या कॅफेमध्ये एका छोट्याशा खोलीत ह्या जागेची माहिती देणारे फलकही लावले होते. पण मी शैक्षणिक सहलीला आले नसल्याने मी ते अजिबात वाचले नाहीत.

ह्या कॅफेत पोटोबा शांत करुन (म्हणजे परत एकदा पिझ्झा आणि सॅण्डविच गिळून) आम्ही पुढच्या सफरीला निघालो. व्हाईटफेस माऊंटनकडे!!

व्हाईटफेस माऊंटन

इथे काय नवीन? तर इथे म्हणे स्किईंगचे ऑलिम्पिक होते. आपण अगदी वर पर्यंत रोपवेने जाऊ शकतो. तिथून "लेक प्लासिड" बघता येतो. तसं इथे फार काही करण्यासारखं नव्हतं. म्हणून वेळही अगदी जेमतेम अर्धाच तास होता.

रोपवेने वर जाताना जवळपास १०-१५ मिनिटं आजूबाजूचा निसर्ग पहाता येतो. रोपवे मधून दिसणारे हे दृश्य.

ही सुकी बाई तर आम्हाला एकाचढ एक जागी घेऊन जात होती!!

वर पोहोचल्यावर आजूबाजूचा परिसर आणि लेक प्लासिड पहायला दुर्बिणी होत्या. वर जाउन आजुबाजूला पाहून थक्क होणे ह्या

व्यतिरिक्त काही दुसरे काम नव्हतेच!

हाच तो लेक प्लासिड.

जाता जाता एक महत्वाची गोष्ट वाचली.

ह्या जागेवरुन कुणाला उठावे वाटेल?!

इथून आता आम्ही निघालो आमच्या शेवटच्या टप्प्याकडे - हाय फॉल्स गॉर्ज!

हाय फॉल्स गॉर्ज!

आता मला हे लोक नदी, डोंगर, पाणी ह्या शिवाय अजून काय दाखवणारेत असं झालं होतं. पण सुकीच्या आग्रहास्तव आम्ही ह्या ही जंगल ट्रेलवर गेलो. इथेही मघाच्याच नदीच्या बाजूने जंगलातून चालत जायचे होते. पण इथे नदी धबधबा म्हणून कोसळते ते पहायला हा सगळा अट्टाहास! गेल्या

गेल्या शांत पसरलेल्या नदीने आमचे स्वागत केले.

आता ही नदी खाली उतरू लागली आणि बदाबदा कोसळू लागली..

जागोजागी अशा काचा होत्या, ज्यावर उभे राहून तुम्ही खालचा प्रवाह पाहू शकता.

हाच तो हाय फॉल्स गॉर्ज. पण दूधसागरचे फोटो बघितलेल्यांना फार काही विशेष वाटायचं कारण नाही!

आता मात्र सगळेच दमले होते. तृप्त मनाने आम्ही निघालो. ८-९ तास सरळ फक्त प्रवास करायचा होता आणि घरी परतायचे होते.

ही ट्रिप माझी सगळ्यात आवडती ट्रिप आहे. मी, नवरा आणि अबीर, अशी तिघांचीच ही पहिलीच भटकंती. ती सुद्धा अमेरिकेत. खरं तर अमेरिका हा काही पृथ्वीच्या बाहेरचा देश नाही. डोंगर-दऱ्या, नद्या - तलाव ह्या व्यतिरिक्त असं वेगळं काय असणार? ते तर आपल्या भारतातही आहेच. ह्या डोंगररांगा अगदी सह्याद्रीची आठवण करुन देतात. ऑस्बल चाझम सारखे मार्बल रॉक्स तर आपल्या जबलपूरलाही आहेत. आणि धुंवाधार किंवा दूधसागर समोर हाय फॉल्स गॉर्ज किस झाड की पत्ती! पण तरीही अमेरिकेत फिरताना हे सगळं जास्त सुंदर, जास्त मनोहारी वाटत होतं. ह्याच एकमेव कारण म्हणजे स्वच्छता!

स्वच्छता कोणत्याही गोष्टीला वेगळ्याच उंचीवर घेऊन जाते. ह्या दोन दिवसात आमची कुठेही गैरसोय झाली नाही. जागोजागी स्वच्छतागृह होते. व्हाईटफेस माऊंटनचे स्वच्छतागृह तर स्वतःच एक पर्यटन स्थळ म्हणून भारतीयांनी पहावे इतके स्वच्छ! कुठेही दुकानांच्या रांगा नाहीत की बेशिस्त कारभार नाही. सर्वत्र एकच दुकान, जिथे तुम्हाला सगळंच मिळेल. अगदी बाथरुम पासून ते स्मरणवस्तूंपर्यंत. खायला मोजकेच चार पर्याय असतील पण कळकटपणा अजिबात नाही. थेट नळाचे पाणी पितानाही काही वाटत नाही.

आपला देश मात्र एवढा सुंदर असून स्वच्छतेत मार खातो. टपऱ्या असायला माझी ना नाही. पण किमान पर्यटकांच्या सोयीचा तर विचार करा. महिलांना तर स्वच्छतागृहापायी किती त्रास होतो हे भारतीय स्त्री असल्याशिवाय नाही कळणार. आपला देश सोडून अमेरिकेत जायला धडपडणाऱ्या लोकांची मानसिकता अशी का बनत असेल हे मला हळूहळू कळायला लागलं होतं. हे सगळं सुंदर असलं तरी आपलं नाही ह्या विचित्र विचाराने उगाच खिन्न वाटायला लागलं. खरं सांगायचं तर आठवण यायला लागली घराची.. खूप आनंदी झाल्यावर अचानक उगाच उदास वाटायला लागणे तर माझ्या स्वभावाची खासियत आहे..

दोन दिवस दंगा करुन आता शांत बसून होते. दूरवर न्यूयॉर्कची स्कायलाईन दिसायला लागली. अगदी विंचवाचे बिऱ्हाड का असेना, पण न्यूयॉर्क आलं की घरी आल्यासारखं वाटायला लागलं...!

ट्रॅव्हल टिप्स - लहान मुलं सोबत असतांना

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

लहान मुलं सोबत असतांना -

- लहान मुलं असल्यास पाठीवरची सॅक पर्सपेक्षा बरी.
- रोजच्या साईटसीईंगसाठी एक कप्पे असलेली बॅग. पाण्याच्या बाटल्या, टोपी, गॉगल, कॅमेरा, एक्स्ट्रा बॅटरी, स्कार्फ, खाऊ ई. साठी.
- महत्वाची औषधे थोडी वरच्या बॅगमध्येही ठेवावीत नाहीतर दिवसभर बाहेर फिरताना गरज पडल्यास औषधं हॉटेलवर राहिल्याने पंचाईत होते.
- मुलांसाठी पट्टा असलेली वॉटरबॉटल म्हणजे चालत्या गाडीत पण पाणी पिता येईल.
- मुलांच्या अंगावर पटकन पांघरता येईल अशी शाल/स्ट्रोल
- सुटसुटीतपणा सगळ्यात महत्त्वाचा. ट्रान्सपरंट, चेन असलेले पाऊचेस अशा वेळी बरी पडतात.
- लहान मुलांची खेळणी, पझल्स, छोटं चित्र काढायचं पुस्तक + ३-४ क्रेयॉन्स सोबत ठेवू शकता, म्हणजे मुलांनापण त्याच त्याच गोष्टींचा कंटाळा येत नाही.
- कापूस, लहान मुलांचे डायपर्स.

वेगळ्या वाटेवरची सफर – ग्वाटेमाला

(लेखिका- इडली डोसा)

दोन वर्षांपूर्वी डिसेंबर मध्ये मोठ्या सुट्टीत 'ग्वाटेमालाला जाऊया का?' असं नवऱ्याने विचारलं तेव्हा मी या देशाचं नाव पहिल्यांदाच ऐकत होते. त्याने दाखवलेले सेमक चांपे (semuck champey) या जागेचे फोटो बघितले आणि बघता क्षणी ती जागा फार आवडली. ग्वाटेमालाबद्दल अजून थोडी माहिती वाचून मग आम्ही तिथे भटकायला जायचा आमचा बेत पक्का केला. सोबत १० महिन्यांची मुलगी असणार आणि तिच्यासाठी जरा नेहमीपेक्षा वेगळी तयारी या प्रवासासाठी करावी लागणार याचं थोडं टेन्शन आलं. पण मग तिला प्रवासाचा ताण नाही येणार अश्या बेताने आपण प्रवासाची आखणी करू असं ठरवून आम्ही ह्या अनुभवासाठी सिद्ध झालो.

आमची १८ दिवसांची सहल सुरू झाली ग्वाटेमालासिटी मधुन. ही ग्वाटेमालाची राजधानी आहे. या शहरात फक्त आम्ही येता - जाता एक एक दिवस थांबलो. ग्वाटेमाला सिटीला पोहोचल्याच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही एका १६ सीटर बसने सेमक चांपेकडे जायला निघालो. बसमध्ये बसायला तशी अडचणच होती. मागच्या बाजूला दाटीवाटीने सर्वजण बसले होते. जवळजवळ सगळेचं परदेशी नागरीक होते. आमच्याकडे बाळ होते म्हणुन आम्हाला ड्रायव्हर शेजारची स्पेशल जागा मिळाली होती. ड्रायव्हरची सीट आणि त्याशेजारची सीट यामधल्या जागेत एक कामचलाऊ बसायची जागा केली होती, त्यावर माझा नवरा बसला. मी त्याच्याशेजारी जरा बऱ्यापैकी सीटवर मुलीला मांडीवर घेऊन बसले होते. ती खूश होती आणि कारसीट शिवाय प्रवास करत असल्यामुळे ह्या स्वातंत्र्याचा मनमुराद आनंद लुटत होती.

साधारण ८ तास असा प्रवास करुन आम्ही संध्याकाळी लंकीन या सेमक चांपेजवळच्या गावात पोहोचलो. तिथे आम्हाला आमच्या 'युटोपिया' (Utopia) होस्टेलला घेऊन जाणारा पिक अप ट्रक येणार होता. तिथून पुढचा रस्ता म्हणजे गाडी जात होती म्हणुन रस्ता म्हणायचा असा भयानक होता. मांडीवरच्या बाळाला घट्ट धरून मी पुन्हा एकदा ड्रायव्हरच्या बाजूच्या जागेत बसले होते. यावेळी माझ्या शेजारी मात्र एक अनोळखी मुलगी बसली होती. बसली म्हणजे बिचारी कशीतरी एका छोट्या फ़ळकुटावर टेकली होती. नवरा आणी इतर युटोपियाला जाणारे आमच्या सोबतचे प्रवासी मागे पिक-अपच्या हौद्यात तोल सावरून आणि आपापल्या बॅग्ज संभाळत उभे होते. प्रत्येक वळणावर आणि खड्ड्यातून गाडी गेली की कोणीतरी खाली पडेल असे वाटत होते. कसाबसा अर्ध्या पाऊण तासाने तो प्रवास संपला आणि आम्ही आमच्या हॉस्टेलला पोहोचलो. तो पर्यंत सगळीकडे अंधार आणि सामसुम झाली होती. दिवसभर प्रवासाने थकलो होतो त्यामुळे मिळेल ते खाउन आमच्या रूम मध्ये जाऊन पडलो. पिल्लू दुध पिऊन मस्त झोपून गेलं. आपण कुठे आहोत आणि कुठे जाणार याची तिला काहीच काळजी नव्हती. सगळया प्रवासात ती मस्त एंजॉय करत होती आणि तिला मजेत बघून आम्हालाही छान वाटतं होतं. सकाळी उठलो आणि समोरचा नजारा बघून आदल्या दिवशीच्या प्रवासाचा शीण कुठल्याकुठे पळुन गेला.

(महिंद्राचा पिक अप ट्रक)

(यूटोपिया हॉस्टेल)

यूटोपिया हॉस्टेल इथली आमची रहाण्याची जागा

यूटोपियाला आम्ही ४ दिवस थांबणार होतो त्यामुळे आम्हाला कसली घाई नव्हती. इथून सेमक चांपेला जायची - यायची व्यवस्था हॉस्टेल मालकच करत होता. शिवाय तिकडे केव्ह टुर्स, नदीमध्ये ट्युबिंग अश्या गोष्टी होत्या त्यासाठीही होस्टेल मधून मुलं गाईड म्हणुन लोकांच्या सोबत जात होती. आम्ही केव्ह टुर करणार नसल्यामुळे जरा उशीराने निघायचे ठरवले. आम्ही यूटोपियाला पोहोचण्याआधी दोन दिवस भरपूर पाऊस पडल्यामुळे निळीशार असलेली नदी थोडी गढूळ झाली होती, पण पाऊस पडून गेल्यामुळे सगळीकडे एक तजेला आला होता. वातावरण खूपच प्रसन्न झाले होते. आम्ही हॉस्टेल मालकाच्या पिक-अप ट्रक मधून सेमक चांपेला पोहोचलो. ही जागा ग्वाटेमालाच्या राष्ट्रीय राखीव जागांपैकी एक आहे. निळ्याश्यार पाण्याच्या टप्प्यांमध्ये विभागलेल्या 'काहाबान' नदीच्या प्रवाहात पोहण्यासाठी लोक खास करून इथे येतात. शिवाय नदीच्या पोटात गुहेसारखा नैसर्गिक बोगदाही आहे. पाणी कमी असताना तिथे आरामात जाता येते. या नदीच्याच बाजूने एक छोटा ट्रेक करून एका 'मिराडोर' म्हणजे व्हयु पॉईंटला जाता येते. आम्ही तो ट्रेक करून वर गेलो आणि तिथून दिसणारा नजारा असा होता.

सेमक चांपे परिसर

आम्हाला एक दिवसाच्या मोठ्या प्रवासानंतर थोडं निवांत रहायचं होतं त्यामुळे सेमक चांपे बघून आल्यानंतरचे दोन दिवस काहीच प्लॅन केला नव्हता. पुढचे दोन दिवस आम्ही युटोपियाच्या आजूबाजूला फिरलो. जवळचे सेमील गाव म्हणजे १५ -२० घरांची डोंगर उतारावर विखुरलेली वस्ती आणि एक छोटी शाळा एवढंच होतं. हॉस्टेल मालकाने जवळपास एक दोन जुने लाकडी झुलते पूल आहेत ते बघून येऊ शकता अशी माहिती दिली. त्यामुळे त्या पुलांचा शोध घेत एका अतिशय चिखलमय वाटेवर जाऊन अडकलो. हळु हळु त्यातून बाहेर पडुन शेवटी एकदाचे त्या पुलाजवळ पोहोचलो. पूल फारच जुना होता. दुसऱ्या बाजुला थोडीफार घरे होती. चांगले ट्रेकिंग शूज असल्यामुळे त्या चिखलातून कुठेही पडझड न होता सुखरूप बाहेर पडलो होतो. नशीबाने परत जायला दुसऱ्या बाजूने जरा चांगला रस्ता होता. त्यानंतर मग आडवाटेला कुठे गेलो नाही.

हॉस्टेलच्या आजूबाजूलाच एवढं अप्रतीम निसर्ग सौदर्य विखुरलेलं होतं की आपण अजून कुठे जाऊन काही बघावं असं वाटलंही नाही.

युटोपियाहून सेमील गावाकडे जाणारा रस्ता

आमचा पुढचा प्रवासही मोठा होता. युटोपियाहुन निघून आम्हाला फ्लोरेसला (Flores) जायचे होते. जवळच्या लंकिन या गावपर्यंत आम्हाला सोडण्याची व्यवस्था आमच्या हॉस्टेल मालकाने केली होती. तिथून सकाळी ८ ला आम्ही मिनी बस घेतली आणि संध्याकाळी ५ ला फ्लोरेस ला पोहोचलो. अमेरीकेत सहजा सहजी प्रत्येक ठिकाणी उपलब्ध असलेले डायपर चेंजिंग स्टेशन्स या प्रवासात कुठेही उपलब्ध नव्हते. मी सोबत एक चेंजिंग मॅट घेतले होते त्यावरच मग जिथे जिथे बसचे विश्रांती थांबे होते तिथे बाळाचे डायपर चेंज केले. याबाबतीत टाळाटाळ न केल्यामुळे तिलाही पुर्ण प्रवासात कधीही डायपर रॅश किंवा इतर इन्फ़ेक्शनचा काही त्रास झाला नाही.

फ्लोरेसला आम्ही 'लॉस अमिगोज' नावाच्या हॉस्टेलमध्ये रहाणार होतो. हे हॉस्टेल गावाच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे इथे युटोपियाच्या मानाने बराच गजबजाट होता. आमची प्रायव्हेट रूम होती त्यामुळे बाहेरच्या कोलाहलापासून आम्हाला जरा निवांतपणा मिळाला. हॉस्टेलमधूनच तिकाल (Tikal) या उत्खननात सापडलेल्या प्राचीन मायन राजधानीला भेट देण्यासाठी सफरीचे बुकिंग करण्याची सोय होती. आम्ही दुसऱ्या दिवशी संध्याकाळची सूर्यास्त- सफर बुक केली.

तिकाल बघण्याची खूप उत्सुकता होती. तिकाल नॅशनल पार्क हि जागा रेन फॉरेस्ट मध्ये गुडूप झालेल्या अतिप्राचीन मायान बांधकामांनी भरलेली आहे. यातल्या अगदी मोजक्याच जागांचे आत्तापर्यंत उत्खनन झाले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियाने इथे सर्व प्रथम उत्खनन सुरु केले आणि त्या उत्खननातून अमेरिकेतले (उत्तर, दक्षिण आणि मध्य) आतापर्यंतचे सगळ्यात उंच टेंपल पुन्हा दिसू लागले. ते तिकाल नॅशनल पार्कमध्ये टेम्पल ४ म्हणून प्रसिद्ध आहे. टेंपलच्या वरच्या भागापर्यंत

जाण्यासाठी लाकडी पायऱ्यांचा जीना करण्यात आला आहे. इथून नजर जाईल तिकडे फक्त जंगलच दिसते आणि मध्ये मध्ये दिसतात तिकाल टेंपल्स. इथल्या जंगलाची वाढ इतक्या झपाट्याने होते की जर व्यवस्थित निगा राखली गेली नाही तर पुन्हा काही वर्षात हि टेंपल्स झाडावेलींनी पूर्णपणे झाकून जातील.

दुसरा दिवस फ्लोरेस जवळच छोट्या पार्क मध्ये घालवला. तिसऱ्या दिवशी तिकाल सारख्याच असलेल्या पण जरा लांबच्या याक्षा (Yaxha) या ठिकाणी उत्खनानात सापडलेली पुरातन टेंपल बघायला गेलो. इथली टेंपल्स तिकालच्या मानाने कमी उंचीची आहेत. शिवाय इथे जायचा रस्ताही खडतर आहे त्यामुळेच की काय, इथे गर्दी कमी होती आणि आम्हाला निवांत फिरता आलं. इथूनही अप्रतिम सूर्यास्त पहायला मिळला.

याक्षा टेंपल्स

सूर्यास्त

पुढचा दिवस आमचा या ट्रिप मधला दहावा दिवस होता आणि आम्ही अजून एक मोठा प्रवास या दिवशी केला. फ्लोरेस मधून निघून आम्ही ग्वाटेमाला सिटी जवळच्या ॲण्टिग्वा (Antigua) या गावी आलो. हा प्रवास जवळ जवळ १० तासांचा होता. सकाळी १०:३० ला फ्लोरेस मधून निघून रात्री ९ ला आम्ही ॲण्टिग्वाला पोहोचलो. या प्रवासात पहिल्यांदाच आम्ही हॉटेल मध्ये रहाणार होतो. हे हॉटेल म्हणजे एक जुना वाडाच वाटतं होते. आपल्याकडे जुन्या वाड्यांना असतो तसा दिंडी दरवाजाही त्याला होता. हे हॉटेल गावाच्या अगदी मध्यवर्ती भागात होते त्यामुळे इथून आम्हाला जिथे जिथे जायचे त्या सगळ्या ठिकाणी चालत जाणे सोयीस्कर होते. इथे काही मोठं आकर्षण बघण्याचा आमचा बेत नव्हता शहरात चालत जाण्यासारख्या ठिकाणी भटकणे आणि दोन दिवस निवांत एका ठिकाणी राहणे एवढाच आमचा उद्देश होता. वास्तुशिल्पासाठी प्रसिध्द असलेली काही चर्चेस या शहरात आहेत. आजूबाजूला भटकून आम्हीही जवळपासचे एक - दोन प्रसिद्ध चर्च पहिले.

आम्ही नाताळलाही ॲण्टिग्वामध्येच होतो. इथे त्या दिवशी आमच्या हॉटेल जवळच्या चर्चच्या आजूबाजूला जत्रे सारखी गर्दी होती. मदरमेरीच्या पुतळ्याची रस्त्यावरुन मिरवणुक चालली होती. आम्हीही रस्त्याच्या बाजूला उभे राहून या सगळ्याची मजा अनुभवली. एकंदरीत आपल्याकडे उत्सवांत असते तसेच उत्साही वातावरण तिथे त्यावेळी होते. या मिरवणुकीमुळे आमचा वेळ चांगला गेला आणि करमणूकही झाली.

आमचा पुढचा मुक्काम होता 'लेक-अतितलान' (Lake Atitlan) ह्या ग्वाटेमालातील अतिशय सुंदर लेकाच्या काठावर. इथे ह्या सरोवराच्या सभोवती वसलेल्या सातपैकी एका गावात सॅन पेद्रो (San Pedro) मध्ये. ही जागा म्हणजे प्रमुख ग्वाटेमालामधाल्या आकर्षणांपैकी एक आहे. या जलाशयाचे क्षेत्रफळ १३० स्क्वे. किमी असून सभोवतालच्या गावांमध्ये पर्यटकांसाठी अनेक गोष्टी उपलब्ध आहेत. यात स्पॅनिश शिकण्यापासुन ते योगा आणि मेडिटेशन शिकण्यापर्यंत बरेच काही आहे. शिवाय ह्या विस्तीर्ण तलावाकाठी राहुन तुम्ही त्याभोवतीच्या 'सिएरा माद्रे' पर्वतराजी मध्ये ट्रेकिंगही करू शकता किंवा आम्ही राहिलो तसे किनाऱ्यावरच्या एखाद्या गावात राहून निवांतपणाही अनुभवू शकता.

आम्ही राहिलो होतो ते 'हॉटेल सक्कारी' लेक अतितलानच्या अगदी काठावर होते. हॉटेलमधून दिसणारा लेक आणि आजूबाजूचा परिसर फारच सुंदर होता. या ठिकाणी दिवसभर काहीही न करता बसून राहिलो तरी एका गावाहून दुसऱ्या गावाला जाणाऱ्या वेगवेगळ्या बोटी, कयाकिंग करणारे पर्यटक, अधून-मधून पाण्यात सूर मारणारे पक्षी हे सगळे बघत वेळ कसा जातो ते कळतही नाही.

(हॉटेल सक्कारी बाग)

हॉटेलच्या आसपास खाण्याचेही बरेच पर्याय उपलब्ध होते. त्यापैकी एका ब्रिटिश तरुण चालवत असलेल्या रेस्टॉरन्टमध्ये खूपच चविष्ट व्हेज बिर्याणी खायला मिळाली. अश्या अनपेक्षित ठिकाणी आपल्या ओळखीचा पदार्थ खायला मिळालं की त्याची चव अगदी अप्रतिम लागते. खूप दिवस भारतीय पद्धतीच जेवण न खाल्यामुळेही असेल पण ती बिर्याणी आम्हाला फारच छान लागली.

आम्ही सकाळ संध्याकाळ पोटपुजेच्या निमित्ताने बाहेर पडून गावात आजूबाजूला हिंडून येत होतो. एकदा असेच भटकत असताना एक स्थानिक आमच्याजवळ आला आणि त्याने माझ्या नवऱ्याला विचारले "तू ग्वाटेमालन आहेस का?" त्याने नाही म्हंटल्यावर तो म्हणे "मग तुझी बायको ग्वाटेमालन आहे का?" त्याने मीही ग्वाटेमालन नाही हे सांगितल्यावर तो आश्चर्यचकित झाला आणि मग आम्ही भारतीय आहोत हे सांगितल्यावर तो म्हणाला, की तुमच्याकडे बघुन तर तुम्ही ग्वाटेमालानच असाल असे वाटाले. पण आमच्या ह्या ग्वाटेमालन दिसण्याचा कोणत्याही दुकानात आम्हाला वस्तुंची किंमत कमी करून घेण्यात काहीही फायदा झाला नाही. आमच्या अगदीच कामचलाऊ स्पॅनिश बोलण्यामुळे लगेचच

समोरच्याला आमचा खरा रंग कळून यायचा आणि मग वस्तूंच्या किमती पण वर जायच्या. रस्त्यात फिरताना बरेचदा लोक आम्हाला मुलीचं वय विचारायचे आणि मी गडबडीत 'दोसे मेसेस'(दहा महिने) च्या ऐवजी 'दोस मेसेस' (दोन महिने) असं सांगायचे आणि विचारणारा हे उत्तर ऐकून चक्रावून जायचा.

इथून एक दिवस 'लांचा' म्हणजे छोट्या बोट मधून जवळ असलेल्या 'सॅण्टिआगो' गावात जाऊन आलो. आम्ही राहत होतो त्या गावापेक्षा हे गाव खूपच बकाल होते. इथे 'सेंट मक्षिमॉन' चर्च बघण्यासारखे आहे असे वाचलेले होते म्हणुन ते बघायला गेलो तर तिथेही फारच उदासीन वातावरण होते चर्चची बाहेरून काही ठिकाणी पडझड झाली होती आणि एकंदरीतच सगळीकडे मरगळ पसरलेली होती. पण लांचा मधून येता जाता आजूबाजूच्या पर्वत्राजीचे आणि सुप्त ज्वालामुखी असलेल्या 'सॅन पेद्रो', 'व्होल्केन अतितलान' यांचे दर्शन फारच मनमोहक होते हीच काय ती जमेची बाजू.

बघता बघता आमचा निघाण्याचा दिवस आला. परतीसाठी आम्ही पानाहाचेल (Panajachel) या गावातून ग्वाटेमालासिटीमध्ये जाण्यासाठी शटल बस घेतली. बससाठी वाट बघत असताना पानाहाचेलच्या बाजारात भटकलो. इथे स्थानिक लोकांच्या बरोबरीने बाहेरून येऊन इथे बस्तान बसवलेल्या 'हिप्पी' लोकांनी आपली दुकाने थाटली होती. हा भाग पर्यटनासाठी खूपच प्रसिद्ध असल्यामुळे छोट्या गोष्टींच्याही किमती बऱ्याच होत्या. आम्हाला आकर्षक असे फारसे काही न वाटल्याने खरेदीचा मोह सहजपणे टाळता आला.

दुपारी १२ च्या बसने इथे तिथे थांबे घेत - घेत संध्याकाळी ५ ला आम्हाला ग्वाटेमाला सिटीमध्ये पोहचवले. आम्ही पहिल्यादिवशी जिथे राहिलो त्याच 'दोस लुनास' या ब्रेड ॲन्ड ब्रेकफ़ास्ट ठिकाणी निघायच्या आधी एक दिवस येऊन राहिलो. आमच्या पुर्ण प्रवासाची हकीकत ऐकण्याची तिथल्या ओनर जोडप्याला खूपच उत्सुकता होती. इतक्या लहान बाळासोबत प्रवास करताना काही अडचण आली नाहीच, उलट बाळामुळे सगळीकडे लोक येऊन आमच्याशी बोलत होते आणि त्यामुळे आम्हाला लोकांमध्ये सहज मिसळण्याची संधी मिळाली. हे ऐकून त्यांना चांगले वाटले. एकंदरीत आम्हाला सगळीकडेच चांगला अनुभव आला. कुठेही लुबाडणूक किंवा गैरसोय झाली नाही आणि जिथे जिथे गेलो ती सगळी ठिकाणे आम्हाला मनापासून आवडली हे त्यांना सांगितल्यावर आपल्या देशाबद्दल अभिमान आणि एक प्रकाराचे समाधान यांचे मिश्रण त्यांच्या चेहऱ्यावर आणि कोणतीही अप्रिय घटना न घडता सहल पूर्ण झाल्याचे समाधान आमच्या चेहऱ्यावर पसरले.

पुढे मुलगी मोठी झाल्यावर जर म्हणाली की 'चला पुन्हा जाऊ ग्वाटेमालाला' तर आम्ही नक्की जाऊ अजून एकदा या वैविध्यतेने नटलेल्या देशाला भेट द्यायला.

इतर माहिती -
भौगोलिक स्थान: मध्य अमेरीका
चलन: केत्साल

मुख्य विमानतळ: ग्वाटेमालासिटी

व्हिजा: उत्तर अमेरिकेतून जाणाऱ्या भारतीयांकडे जर अमेरिकेचा व्हॅलिड वर्क व्हिजा / डिपेंडंट व्हिजा असेल तर ग्वाटेमालाचा व्हिजा घ्यावा लागत नाही. त्यामुळे आम्हाला वेगळा व्हिजा लागला नाही.

प्रवास नियोजनासाठी माहिती स्त्रोत: लोन्ली प्लॅनेट - थॉर्न ट्री फोरम, ट्रिप ॲडवायजर

हॉटेल बुकिंग: स्वतंत्रपणे हॉटेल/हॉस्टेलच्या वेबसाईट वरून

खाद्यसंस्कृती:

येथील खाद्यसंस्कृतीवर माया संस्कृतीचा प्रभाव आहे. बीन्स, कॉर्न हे प्रमुख खाद्यपदार्थ आणि सोबतीने कुठलेतरी मांस. मी थोडाफार मांसाहार करत असले तरी माझा नवरा शाकाहारी आहे आणि श्यक्यातो परगावी किंवा परदेशात गेल्यावर मीही शाकाहारीच जेवण खाणे पसंत करते. ग्वाटेमालामध्ये फिरताना शाकाहारी खाण्याचे पर्याय जरी कमी असले तरी प्रत्येक ठिकाणी काही ना काही खायला मिळत होतेच. तिथे राईस आणि बिन्स सगळीकडे मिळतात. शिवाय वेगवेगळ्या प्रकारचे फ्रँकी सारखे रॅप होते. मोठ्या गावातल्या रेस्टॉरंटमध्ये क्रेप, पास्ता असल्या गोष्टी होत्या. शिवाय रेस्टॉरंट मध्ये गेल्यावर आम्हाला व्हेजीटेरिअन ऑप्शन सुचवा असे वेटरला विचारले तर तेही तिथले आपल्याला माहित नसलेले पदार्थ सुचवतात. एका ठिकाणी भाताबरोबर आपल्या मेथीच्या भाजीसारखी भाजीसुद्धा होती. सगळीकडे ताजी फळे मिळत असल्यामुळे बऱ्याचदा सकाळी नाष्ट्याला आम्ही फळेच खाल्ली. नविन गोष्टींचा अनुभव घेण्याची मनाची तयारी असेल तर खाण्यापिण्यातल्या थोड्याश्या गैरसोयीचे काहीच वाटतं नाही.

यूटोपिया हॉस्टेल्मधाला नाष्टा

फ्लोरेसमधले लंच

सॅन पेद्रो मधे डिनर

भाषा: स्पॅनिश

आमचा अनुभव - इथे छोट्या गावांमध्ये फिरताना तुम्हाला किमान थोडेफार प्राथमिक स्वरूपाचे स्पॅनिश येणे गरजेचे आहे असे मला तरी वाटले, त्यामुळे तुम्ही लोकांशी थोडंफार बोलू शकता. मला अगदी थोडेच शब्द माहित होते पण माझ्या नवऱ्याने ग्वाटेमालाला जाण्याआधी काही दिवसच बेसिक स्पॅनिशचा कोर्स केला होता त्याचा आम्हाला खूप उपयोग झाला. दुकानांमध्ये घासाघीस करण्यासाठी ,जेवणात काय हवे नको सांगायला आणि मुख्य म्हणजे तिथल्या स्थानिक लोकांमध्ये थोडंफार मिसळुन संवाद सुरु करायला आम्हाला या गोष्टीचा चांगला उपयोग झाला. आम्ही तोडके-मोडके बोललो तरी लोकांनी आम्हाला समजून घेतले आणि त्यामुळे भाषेचा अडसर फारसा जाणवला नाही.

समाप्त...!

चित्रकोडं

(लेखिका-किलमाऊस्की)

मंडळी, कशी काय चालू आहे भटकंती? आवडतेय की नाही? थकला असाल तर थोडी विश्रांती घेऊया. विश्रांती पायांना द्यायचीय आणि डोकं चालवायचंय. खाजवा डोकं आणि सोडवा हे कोडं!

खाली दिलेल्या चित्रात उजव्या बाजूला जगभरातील आठ निवडक प्रेक्षणीय स्थळांची छायाचित्रं दिली आहेत. डाव्या बाजूच्या चित्रात ही ठिकाणं ज्या देशात आहेत त्या देशांची नावं लपली आहेत. या देशांची नावं तुम्हाला शोधून हायलाईट करायची आहेत. आहे की नाही सोप्पं?

मग काय तयार का डोक लढवायला? तर मग उचला पेनं, पेन्सिली, हायलयटर्स आणि रंगवा आपापल्या संगणक / स्मार्ट फोन स्क्रिन्स! :-)

ने	ची	ट्रा	क	लो	सि	य	पि	मि
ह	प	इ	स	प	फ्रा	न्स	त्रा	सॅ
छ	प्त	ण	जि	स्प	ड	ल	न	गा
गा	पि	ता	कॅ	प्त	जॅ	य	री	छ
मी	को	की	ई	प	म	मा	ना	चू
प्त	ट्रा	श्री	अ	र	हि	शि	स्पे	स
क	डा	ई	मे	ग	धु	कॅ	न	डा
प	गा	त	री	ली	की	रॅ	इ	गो
वी	ई	त	का	पा	इ	बी	मा	प्त
गा	रु	स	ल	न	ट	को	व्ही	य
पे	घ	ख	न	क	ली	नी	क्सि	झ
न	इं	ग्लं	ड	र	डा	स	टा	मे

सर्व छायाचित्रं आंतरजालावरून साभार.

Note: All photos are from Internet/Wikipedia and the purpose is only for Reference.

माझ्या मामाचे ऐतिहासिक गाव

(लेखिका-प्रश्नलंका)

आपल्यातल्या बहुतेकांचे आजोळ हे एक बालपणी सुट्टीतलं हक्काचं दंगा घालायचं ठिकाण असेल. भरपूर भावंडं असतील तर मग काय त्यात अजूनच भर. अशा मामाच्या गावी जायची एक ओढ असते आणि तेव्हाच्या कडु-गोड सगळ्याच आठवणी परत अनुभवायची मजा मोठं झाल्यावर पण अधून मधून खुणावत असते.

माझं आजोळ म्हणजे सातारा जिल्ह्यातलं रहिमतपूरजवळ "साप" नावाचं छोटसं गाव (इथे नावातच फक्त साप आहेत हो!). माझ्या एक मावशीचे गावातच सासर असल्याने आम्ही सगळी मावस भावंडे आजी आजोबांना भरपूर सतावत असू. मग दरवर्षी परिक्षा संपली की आम्ही आजोबांच्या मागे लागायचो आम्हाला घेउन जाण्यासाठी. मामाचा वाडादेखील गाण्यातल्या ओळींसारखा चिरेबंदी होता, तेव्हा कधी एकदा सुट्टी लागतेय आणि आम्ही तिथे जमतोय असचं आम्हाला व्हायचं. दिवसभर आजीच्या भोवती आम्ही पिंगा घालायचो. तिच्यासोबत सकाळी सकाळी गोठयात धार काढायला जायचं, दुपारी शेतात जायचं, ऊस, करवंदं, जांभळं मनसोक्त खायची आणि संध्याकाळी परत आल्यावर हातपाय धुवुन सगळ्यांनी एका सुरात शुभंकरोती म्हणायची. आजीचा स्वयंपाक होइपर्यंत पत्त्यांचे डाव रंगायचे. एकदाची जेवणे उरकली की आमचा मोर्चा वळायचा आजोबांकडे गोष्टी ऐकण्यासाठी. आजोबा सैन्यात होते त्यामुळे ते बहुतेक वेळेस त्यांच्या आर्मीतल्या गप्पा सांगायचे. याचबरोबर आमच्या आजोळच्या गावांत एक राजवाडा आहे. त्या राजवाडयाच्या पण अनेक गोष्टी ते सांगायचे. काही खऱ्या, काही दंतकथा पण लहानपणी त्या सगळ्याच छान छान गोष्टीच वाटायच्या.

जसं की गावाचं नाव साप कसं पडलं? तर ' पूर्वी चंद्रागिरी टेकडीजवळ कमंडलू नदीच्या पात्रालगत राजापूर नावाचे गाव होतं. व सध्याच्या साप गावाच्या जागेवर घनदाट जंगल होतं. येथील गुराखी रोज गाई चारण्यासाठी जंगलात जात असे. तिथे एका वारुळातून रोज एक साप बाहेर येऊन गाईचे दूध पित असे. एक दिवस त्या गुराख्याने ते वारुळ खोदून सापाला मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा वारुळातून स्वयंभू महादेवाची पिंड निघाली. याठिकाणी गाव वसवावे, असा दृष्टांत झाला आणि त्याठिकाणी लोकवस्ती झाली. त्या लोकवस्तीला 'साप' हे नाव मिळालं. वारुळात गुराख्याला जी पिंड सापडली त्याठिकाणी तेव्हा मंदिरही बांधलेले आहे. तर पूर्वीच्या राजापूर म्हणजे चंद्रगिरीलगत जुन्या गावचे भग्नावशेष आजही पाहायला मिळतात.

तर तसं गावात हुंदडून पण कधी गावातल्या या वास्तू अथवा इतिहास अशा गोष्टींबद्दल जास्त विचार केला नव्हता. आजोबांकडून ऐकलेल्या गोष्टी या 'गोष्टी' म्हणूनच होत्या. पण 'शर्यत' आणि 'खो-खो' तसेच 'राजा शिवछत्रपती' अशा मालिकांमधून जेव्हा ओळखीचा परिसर आणि मुख्य म्हणजे वाडा पाहिला तेव्हा मात्र आजोळच्या गावाबद्दल, गावाच्या इतिहासाबद्दल कुतुहल वाटू लागलं.

तर यंदाच्या भारतवारीत आणि आजोळ गावी गेल्यावर हा राजवाडा आवर्जून पहायचा असं ठरवलं होतं (तेवढंच नवऱ्यासमोर भाव पण खाता येईल असा सुप्त हेतू!! ;)).

आजोबांशी बोलताना कळालेला थोडक्यात इतिहास असा, पूर्वी शाहू महाराजांच्या काळी इंद्रोजी कदम म्हणून एक पराक्रमी आणि तालेवार असा सरदार होऊन गेला. तो गावातल्या कदम घराण्याचा प्रसिद्ध असा पूर्वज. लिखित नोंद अशी की इ.स. १७३७ (मार्च) मध्ये बाजीरावाने झील तलाव (दिल्ली) येथें दिल्लीकर मोगलांचा जो पराभव केला, त्या

लढाईंत "इंद्रोजी कदम यांसी बोटास गोळी लागोन दोन बोटें उडोन गेलीं.". यावेळी इंद्रोजी कदम हे शिंद्यांच्या दळातील एक मातब्बर सरदार होते. पुढें रामराजे यांनां बार्शी पानगांवहून आणविण्याकरितां जी पेशव्यांची विश्वासाची मंडळी गेली होती. तीत हे इंद्रोजीहि होते (जानेवारी १७५०). तर या कदम सरदारांनी आपल्या गावी बांधलेला हा त्यांचा वाडा. आजोबांच्या मते इंद्रोजी आणि खंडोजी (की कंठोजी) कदम यांनी त्याकाळी बांधलेला हा वाडा आहे. बांधणीनुसार तो पुढे-मागे नंतरच्या काळात अजून वाढवलेला असावा असं वाटतं.

सध्याचे त्यांचे वंशज शिंद्याच्याबरोबर उत्तरेत गेल्यावर तिथेच स्थायिक झाले असले तरी वाड्याच्या निमित्ताने त्याचा गावाशी थोडाफार संपर्क आहे. पूर्वी त्यांनी वाड्यासाठी एक दिवाणजी आणि गावाच्या व्यवस्थेसाठी त्याचे विश्वासू व त्यांच्याच भावकीपैकी एक म्हणून माझ्या आजोबांच्या पूर्वजांकडे पाटीलकीची जबाबदारी दिली गेली.

पूर्वी वाड्यात कोणी रहात नसले तरी गावचा राबता असायचा. सध्या चित्रीकरण वगैरे मुळे वाड्याला चांगले दिवस आल्याने तशी पर्यटकांना प्रवेशबंदी आहे. या वेळेस गावी गेल्यावर आजोबांना विचारल्यावर त्यांनी वाडा पहायची व्यवस्था केली.

सर्वसाधारण ५ एकर पसरलेला हा वाडा तसा बाहेरून एखाद्या गढीसारखा दिसतो. सहा बुरुज तसेच चारही दिशांची तटबंदी अजूनही सलामत आहे. १७व्या शतकापासून कधी युद्धाचा प्रसंग तसाही आला नसावा त्यामुळेही तसेच थोडाफार वापर राहिल्यामुळे तो अजूनही शाबूत असावा.

महा-दरवाजावर हत्तीरोधक खिळे अजूनही व्यवस्थित आहेत. अर्थात दरवाजासोबतच त्यांना दिलेल्या रंगामुळे ते अगदी नव्यासारखे दिसतायत. तिथेच असलेल्या छोट्याशा दिंडी-दरवाजातून आम्ही आत गेलो. आत गेल्यावर मुख्य दरवाजावर असलेला नगारखाना दिसतो (ही ऐकीव माहिती).

इथे मुख्य दरवाजातून आत आल्यावर उजव्या हाताला पाग्याची पडझड झालेली जागा दिसते ('शर्यत' चित्रपटात याच जागी बैल बांधलेले दिसतात.. :)). डाव्या हाताला हत्तीच्या अंघोळीचा हौद आणि मोठी विहिर दिसते. हत्तींचा हौद आता बऱ्यापैकी दुरवस्थेत आहे. विहिर वापरात असून वाड्याच्या

परिसरातली झाडं त्यावरच वाढली आहेत.

मुख्य इमारतीत प्रवेश केल्यावर प्रथमतः समोर वाड्याची चौसोपी रचना दिसते. इथेच आपण खुश होऊन जातो. वाडा बऱ्यापैकी ऐसपैस आणि चारी बाजून दगडी जोत्यासह प्रशस्त ओसरी असलेला आहे. इथे चारी बाजूस दगडी चौरंग, बैठका या अजूनही आहेत. ओसऱ्यांच्या कोपऱ्यावर पुरुषभर उंचीचे रांजण आहेत.

इथून आम्ही ओसरीच्या एका कोपऱ्यावर असलेल्या जिन्यावरुन पहिल्या मजल्यावर च्या दरबार सदरेच्या ठिकाणी गेलो.



ही दरबाराची जागा. इथली दोन्ही बाजूची कवाडे आणि नक्षीदार खांबांची रचना खरंच खूप सुंदर आहे. इथे पूर्वी शाळेची होण्यपूर्वी गावातली प्राथमिक शाळा भरायची (माझी आई कधी काळी इथे बसून शिकलेय. :)). आता चित्रीकरणाच्या निमित्ताने का होईना पण या जागेची डागडुजी आणि निगा राखलेली दिसतेय. हे एक छानच.

पहिल्या मजल्यावर बाकी भाग मात्र तसाच रिकामा थोडासा अडगळीसारखा दिसला. वेगवेगळ्या हेतूने बांधलेल्या जागा अजून साफ होऊन समोर यायच्या आहेत असं दिसतं.

इथे या फोटोमध्ये कोपऱ्यातले रांजण आणि दगडी चौरंग दिसतायत बघा.

परत दुसऱ्या बाजूने आम्ही ओसरीवर आलो. तिथून आतल्या बाजूस जाण्यासाठी नक्षीदार सागवानी दरवाजा होता.

आतल्या खोल्या रिकाम्या असल्याने (तिथेच आसपास माजघर वगैरे असावे बहुतेक) तिथे न थांबता मागच्या दारी तुळशी वृंदावनाच्या चौकात आलो. तिथे बऱ्यापैकी जीर्णोध्दाराचे काम चाललेले होते. तिथल्याच इमारतीचा काही भाग मात्र अगदी रहाण्यालायक असा रिनोवेट केलेला आहे. चित्रीकरणादरम्यान लोकांची राहण्याची/थांबण्याची व्यवस्था इथे होते असं सांगण्यात आलं. खरं तर वाड्याचा हा भाग अगदी पर्यटकांसाठी रहायला उपलब्ध करुन द्यायला हरकत नसावी असं वाटलं. अशा एखाद्या ठिकाणी राहण्याची मजा भारीच असेल.

खरं तर बरेचशा बंद दरवाजांच्या भागात तसेच मागच्या नव्याने नीट केलेल्या बागेत वगैरे जाऊन यायची इच्छा होती पण वेळेअभावी शक्य नाही झाले.

पण जेवढे पहायला मिळाले त्यानेही खूप छान वाटलं. सध्या तरी चित्रीकरणातच वाडा व्यस्त आहे पण मराठी चित्रपटसृष्टीच्या निमित्ताने का होईना पण नजरेच्या समोरचाच तरीही दुर्लक्षित असा ऐतिहासिक वारसा जपला जातोय आणि पहायलाही मिळतोय हे ही नसे थोडके. आता तर कदम-इनामदारांच्या सध्याच्या वंशजांनी वाड्याचे पुरातन सौंदर्य जपून नुतनीकरण करायचे मनावर घेतलेले दिसतेय तेव्हा पुढे मागे ही सुंदर वास्तू पर्यटकांसाठीही खुली झाल्यास आश्चर्य वाटणार नाही.

सरप्राइज सहल

(लेखिका-प्रीत मोहर)

मला आणि नवऱ्याला भटकायची खूप आवड आहे. त्यात नवरा एकदम रेल्वेने भारावलेला आहे. अगदी एन्सायक्लोपीडिया म्हणायला हरकत नाही त्याला. आणि एवढ्या वर्षांच्या सहवासात आता ते वेड मलाही लागलंय. त्यामुळे वर्षातून एक मोठ्ठी आणि किंवा २-४ छोट्या सहली ह्या होतातच आमच्या. एखाद्या ठिकाणी जाताना तिथली "टूरिस्ट अट्रॅक्शन्स" पाहतोच पण वेगळ्या/अनवट जागा पाहणे, त्या लोकांशी संवाद साधणे किंवा असच निसर्गाच्या सानिध्यात "टूरिस्ट अट्रॅक्शन्स" सोडूनच्या जागांमध्ये साधे चालणेही खूप आनंद देऊन जाते. त्यामुळे आम्ही जिथे कुठे फिरायला जातो तिथे थोडं गिरकीच्या मिस्टरी कुकिंग टाइप "सरप्राइज सहल" करतो. त्यामुळे आम्ही शक्यतो गाइडेड टूर्स करत नाही. सारं काही स्वतःच्या मनाप्रमाणे मन मानेल तसं भ ट का य चं.

सरप्राइज सहल आळीपाळीने ठरवली जाते. म्हणजे प्रवास कसा करायचा, काय पाहायचं वगैरे प्रत्येक सहलीला आमच्यापैकी एकजण ठरवतो व दुसऱ्याला ते शेवटच्या क्षणी सांगतो. घडाभर तेल ओतत नाही, डायरेक्ट माझा अनुभवच सांगते. म्हणजे बघा हं, आम्ही २-३ वर्षापूर्वी उटीला गेलो होतो तर तिथली सरप्राइज ट्रेल मी ठरवली होती. हॉटेलातून काहीही न ठरवता पायी पायी भटकलो होतो उटी.. असंच भटकत भटकत तिथल्या छान छान चर्चेस पाहिल्या होत्या, तिथली शेकडो वर्ष जुनी सिमितरी, आजूबाजूची घनदाट झाडी, तिथली शांतता ही मुख्य शहरातील कोलाहलापेक्षा खूप आवडली होती. तिथली घरही किती सुंदर!!!! घराभोवती फुलबागा पाहून डोळे निवलेच होते अगदी.

ऊटीतील काही जुन्या इमारती (आता शासकीय कार्यालये आहेत या इमारतीमध्ये)



उटीतील शेकडो वर्ष जुनी ईगर्ज(चर्च) आणि सिमितरी

हौशीने बांधलेली घरे आणि निगुतीने सजवलेल्या बागा!!

त्यानंतरच्या वर्षी मैसूर-बंगळूर केलं. तेव्हा नवऱ्याने ठरवली होती ट्रेल. मैसूर स्टेशन ला चामराजनगर ची तिकिटं काढताना कळलं की कुठे जातोय. चामराजनगर मैसूरपासुन अंदाजे ६० किमी दूर आहे. मैसूर चे महाराज चामराज वडेयार -९ यांच्या नावावरून या गावाचे नामाभिधान झालेय. मैसूरहून लोकल ने इथे पोचायला सुमारे २ तास लागतात. अनेक पाहण्यासारखी ठिकाणे या गावापासून जवळ आहेत. लोकलमधला प्रवास ही मस्तच होता. आल्हाददायक वातावरणातली गाव, तिथली शेती आणि लोक हे सगळं पाहता आलं. चामराजनगर ला पोचल्यावर चामराजेश्वराच दर्शन घेतलं अन बाकी काही न पाहता नवऱ्याच्या आदेशाप्रमाणे तिथल्या बस स्टॅण्डला गेलो.

चामराजेश्वराच मंदिर आणि आवार.

मंदिराच्या आवारातल्या लाकडी प्रतिमा. जाणकारांनी याबद्दल जास्ती माहिती द्यावी.

स्टँड वर बी. आर. हिल्स ची तिकिटं काटली. मधल्या काळात नेट मरत मरत का होईना थोडाफार जीव धरून होत. त्या जीवावर थोडं गुगलिंग केलं तर कळलं की बी. आर. हिल्स म्हणजे बिलिगिरी रंगनाथ हिल्स हे एक अभयारण्य आहे. तिथे आधी बुकिंग करूनच जावं लागतं आणि आम्ही तर कोणतंही बुकिंग केलं नव्हतं. म्हटलं बघू काय प्लान आहे तो. बस प्रवास सुरू झाल्यावर रेंज मेलीच. बेस्टच झालं एकदम. दोन्ही बाजूला गर्द हिरवी झाडी. मधूनच दर्शन देणारे वन्य प्राणी अस सुंदर दृश्य होत सार. मध्येच केम्मन्गुडी किंवा के.गुडी नावाची जागा लागली तिथे उतरलो. अहो स्वर्गतुल्य जागा होती ही...

फोटो पहा बरं.

हत्ती, हरिण असे प्राणी फिरत होते तिथे. जंगल ट्रेल मात्र बंद ठेवली होती त्यांनी. इतकं माणसांची भिती न वाटणारी तरीही न माणसाळलेली जनावर पहिल्यांदीच पाहिली. जनावरांच्या जवळ जायचं नव्हत. तरीही मी हरिणाच्या पाडसाला हात लावून जीवाची के. गुडी केली.

तिथल्या रिसॉर्ट मध्ये जेवण केलं आणि खूप भटकलो त्या जंगलात. असंख्य आठवणी आणि वेगळाच अनुभव जवळ घेऊन आम्ही जायच्या तयारीत होतो. पण अहो तिथे बस चे येणे जाणे काही खरे नव्हते. बस येते तेव्हा खरं. पण मग तिथे एक स्वामींचं मंदिर होत त्या पारावर बसून बस ची वाट पाहणं ही एन्जॉय केलं. पुढल्या वेळेस ह्या भागात टायगर सफारीला नक्की येऊ अस ठरवून बस पकडून परतलो. श्रींरगपट्टण मधल्या रंगनाथाच मंदिर पाहणं ह्याच्याइतकाच किंबहुना अधिकच आवडला हा ही अनुभव :)

माझ्या सासूबाईंचं आजोळ यल्लापूरला आहे. यल्लापूर हे कर्नाटकच्या उत्तर कन्नड जिल्ह्यातलं तालुक्याच ठिकाण. काही ना काही कारणामुळे आमचं तिकडे जाणं होतच असत. दरवेळेस आम्ही नॅशनल हायवे - १३ - अरबैल घाटमार्गे यल्लापूर ला जातो. एकदा असच पणजीसाबांना भेटायला जात होतो तर हेरंब रूट बदलून घेऊन गेला. तसाही अरबैल घाट महाबोर आहे त्यात त्या रस्त्यात भरपूर ट्राफिक असते हेवी लोडेड वाहनांची. म्हटलं बघू. तर हा इतका नयनरम्य रस्ता होता!!! काळी नदी रस्त्याला समांतर वाहते कदरा पर्यंत. कदरा गावात एक महामाया देवीच मंदिर आहे. मंदिर भव्य वगैरे नाही पण इथली एक पद्धत मात्र रोचक आहेत. इथे काम होण्यासाठी देवीच्या दारात तोरणं/कमान बांधण्याचा नवस बोलतात. आणि यामुळे या देवीच्या दारात खूप सारी तोरणं आहेत.

थोडंसं पुढे गेल्यावर काली नदीवर बांधलेलं कदरा धरण आणि जलविद्युत वीज प्रकल्प आहे.

कदरा प्रकल्प जरासा मागे जात नाही तोवर कैगा आणि NPCI (Nuclear Power Corporation of India) ची हद्द सुरू होते.

तिथल्या गेटवरचे फोटो काढू दिले नाही सुरक्षा रक्षकाने. KGS समोरच्या छोटुश्या पोलीस चौकीत रीतसर तपासणी आणि नोंदी होऊन गाडीला पुढे जाऊ देतात. मग समोरचा घाट चढल्यावर एक पॉइंट येतो जेथून अणू ऊर्जा प्रकल्प अगदी नीट दिसतो आणि ठीक तुमच्या डोक्यावरून हाय टेन्शन पावर ट्रान्स्मिशन केबल जातो त्यावर मॉइश्चर असेल तर एक क्रॅकिंग आवाज येतो तोही मस्त वाटतो ऐकायला.

रस्त्यात अनेक छोटे मोठे धबधबे लागतात.

(अरुंद घाटरस्ता.)

यल्लापुर च्या छोट्या खेड्यात.

(नाव विचारू नका बॉ. नाही समजत अजून)

गावातल्या वीरभद्र मंदिरातील मूर्ती

आवारातला जुनाट खांब.

आता पाण्याच्या नळाचा आधार झालाय.

साबांच्या आजोळच्या घरच्या दरवाज्यावरची कलाकुसर.

यल्लापुरला यक्षगान नावाचा एक लोकनाट्याचा प्रकार प्रसिद्ध आहे. दिवाळी आधी ८ दिवस तिथे यक्षगानाचा उत्सव असतो. आज्जेसासरे अगदी सत्तरीतही यक्षगानात काम करायचे. त्यांची खूप जुनी सामग्री.हे नैसर्गिक रंगांनी रंगवून खांद्याला बांधतात

हे गळ्यातलं.

हे मनगटाला बांधायचं. हे तिरफळाच्या झाडाच्या काट्यांपासून बनवतात.

ही सांस्कृतिक शिदोरी आणि अनुभव यांनी समृद्ध होऊन घरी आले त्या ट्रीप मधून.

हल्लीच म्हणजे गेल्या सप्टेंबरात अमृतसरात जाणं झालं. ह्याला कारणीभूत सर्वसाक्षी काकांचा हा धागा. हा धागा आल्यापासून प्लॅन बनवून फायनली आम्ही अमृतसरात पोचलो. इथली सरप्राइज सहल मी ठरवणार होते. म्हणजे भटकंती + खादाडी + खरेदी असा जंगी प्लान मनात ठरवूनच आले होते मी. मस्त निवांत अमृतसर पाहून, सुवर्णमंदिरात माथा टेकून आणि मुख्य म्हणजे खरेदी आटोपून आम्ही हॉटेलवर परततच होतो की एका सायकलरिक्षावाल्याला सायकलरिक्षा चालवण्यासाठी रस्ता पुरेनासा झाल्याने माझ्या नवऱ्याच्या पायावर सायकलरिक्षा घालावी लागली. याला चालता येईनासे झाले. मग कसेबसे डॉककडे जाऊन आलो. महान डॉक ने फ्रॅक्चर बिक्चर नाही असे सांगितले. मलमपट्टी केली, पेन किलर्स दिल्या अन २४ तास रेस्ट घ्या म्हणाले. तरच वाघा बॉर्डर ला जाऊ शकाल. माझे मनचे मांडे मनातच उरले अन सगळी इतर भटकंती रद्द केली. किमानपक्षी अटारी-वाघा बॉर्डर बघून यावे ही इच्छा होती.

मग नवऱ्याला संचारबंदी लागू करून मी अजून थोडी खरेदी केली ;) . मी येईस्तोवर इकडे "बदला" घ्यायचे ठरले होते म्हणून दुसऱ्या दिवशी मी लागू केलेली संचारबंदी रद्दबातल ठरवून मला लोकल ने फिरायचंय आणि आपण जायचं असा खलिता माझ्यापर्यंत आला. मी विचार केला स्टेशनपर्यंत कारने जाऊ, काय ते लोकलने फिरू अन परत कार ने वापस. पायाला कमीतकमी त्रास. घाटे का सौदा नही हय. म्हणून मग हा प्रस्ताव मान्य करण्यात आला. स्टेशनवर याने डेरा बाबा नानक ची तिकिटे काढली आणि लोकलमध्ये बसून आणि लोकल सुटल्यावर मला दाखवली. पायाला भिंगरी लागलेला हा माणूस माझं न ऐकूनही माझं ऐकणार होता आणि मला फक्त याच्या पायाच्या चिंतेमुळे नको होत. असो. आता उपायच नव्हता. गाडी सुटली होती. तर मग हा माझाच प्लान असल्याचे त्याच्यापासून लपविण्याचे ठरवून मी प्रवास एन्जॉय करायचे ठरवले.

डेरा बाबा नानक ला पोचेस्तोवर ही लांबच्या लांब भातशेती, त्याचा एक वेगळाच ओळखीचा सुगंध आणि गर्द नीलगिरीची झाडी पाहून डोळे गार्गार होतात.

ही रेलवे लाइन (अमृतसर-पठाणकोट लाइन) ब्रिटिशकालीन आहे. फाळणी नंतर डेरा बाबा नानक ला स्टेशन बनवण्यात आलं.

डेरा बाबा नानक मधील संध्याकाळ गावातले काही प्रचि

तिथे पोहोचेपर्यंत हेरंबचा पाय ऑलमोस्ट डब्बल सुजला होता आणि तरीही या बाबाला आराम करायचा नव्हता. गुरुद्वारात माथा टेकवून त्याला हट्टाने तिथेच बसवून आजूबाजूला काही वाहन दिसते का याचा मी शोध घेतला तर त्याचा ही पत्ता नव्हता. शेवटी एका

दुकानात एक पंजाबी मुंडा होता, त्याने त्याच्या लहानग्या बहिणीची सायकल दिली. त्या सायकल लाही ब्रेक नव्हते. पण काही तरी साधन मिळाल होतं. प्रत्येक क्षणाला हा प्रवास अजून उत्कंठावर्धक होत होता.
(त्या सायकल आणि त्या वीरजीचे फोटो वगैरे काढायचं सुचलंच नाही :( ) ह्या सायकल ने आम्ही डेरा श्री चोलपूर पर्यंत गेलो. बॉर्डर जवळ खाजगी वाहन नेऊन देत नाही. चालत जावे लागते. पण BSF चे जवानांनी आमची स्पेशली हेरंबची हालत पाहून आम्हाला थेट बॉर्डरपर्यंत सायकल नेऊ दिली. मी पाहिलेली पहिली भारत-पाक सीमा!!!! BSF च्या एका जवानाने आम्हाला (त्याच्या) बायनोक्युलर ने पलीकडे पाहू देखील दिले. अंगावर नुसते काटे आले. नक्की काय वाटलं हे शब्दातीत आहे.

आपल्याकडलं

पलीकडलं

फाळणीच्या वेळी, भारत-पाक सीमेजवळ ३ गुरुद्वारा होते ज्यांना ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व होत. त्यातील २ आज भारतात आहेत तर एक पाकिस्तानात. ह्या पाकिस्तानातील गुरुद्वारात गुरु नानक देवांनी त्यांच्या आयुष्यातील अखेरची काही वर्षे व्यतीत केली. डेरा बाबा नानक आणि डेरा चोलसाहिब ह्या २ गुरुद्वारा भारतात आहेत. श्री करतारपूरसाहिब ही गुरुद्वारा करतारपूर ह्या पाकिस्तानातल्या गावात असून, Army ने ही गुरुद्वारा किमान पाहता यावी म्हणून डेरा बाबा नानक-करतारपूर बोर्डर वर १९९८ साली एक viewpoint उभारून दिलंय. अनेक भाविक येतात आता दर्शन घेण्यासाठी.

करतारपूरसाहिब ला माथा टेकवला, आणि श्री चोलसाहिब ला आलो. तिथून बाहेर पडताना तिथल्या १-२ काकांशी बोलणं झालं. त्यातून त्या लोकांचे आणि BSF चे एकमेकांशी किती छान संबंध आहेत हे कळलं. त्या काकालोक्स नी आम्हाला

मस्त चिडवून घेतलं आणि आम्ही परतीला निघालो. पुढची स्टोरी नाही सांगत, पण यार आपली BSF आणि जवान खूप काही करतात सीमांचं आणि लोकांच संरक्षण करण्यासाठी हॅट्स ऑफ... (या स्टोरीज एका जवान मित्रामुळे समजल्या. त्या कुठेही पब्लीश / स्प्रेड न करण्याच्या अटीवर सांगितल्या असल्याने मी इथे लिहीत नाहीये)

हा अत्युच्च क्षण होता माझ्यासाठी त्याला तसाच ठेवण्यासाठी माझं सहलपुराण इथेच थांबवते. पुढली सहल कुठे घडते ते बघूच.

(नवऱ्याच्या पायाला फ्रॅक्चर होत हे घरी आल्यावर पुन्हा चेकप केलं तेव्हा कळलं. त्यामुळे ह्या आणि एकूणच ट्रीप चं पूर्ण श्रेय हे हेरंबला आणि म्हणून हा लेख हेरंबला आणि त्याच्या सोशिकपणाला डेडिकेटेड.)

ट्रॅव्हल टिप्स - प्रवासात लागणारे कपडे

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

- जिथे जाणार आहात तिथल्या हवामानाचा अंदाज घेऊन प्रत्येक व्यक्तीचे रोजचे कपडे सोबत न्यावेत.
- हिवाळ्यासाठी लोकरी टोप्या, स्वेटर्स, मोठे जॅकेट्स. शक्यतोवर लेयर्स मध्ये कपडे घ्यावे म्हणजे अचानक थंड-गरम वाटल्यास उपयोग होतो.
- टॉवेल किंवा पंचा, अंतर्वस्त्रे, नॅपकिन.
- सफारी, जंगलातले ट्रेक किंवा दुर्गम जागचे प्रवास असतील तर आवश्यक तेवढेच कपडे जे आपल्याला उचलता येतील असे कपडे.
- फ्लोटर्स, स्पोर्ट्स शुज, हॉटेलवर घालायला स्लीपर्स, एक मल्टिपर्पज स्कार्फ/स्टोल, शाल.
- रात्रीचा प्रवास असेल तर पांघरूण, अंथरूण.
- खास प्रवासासाठी मिळते तशी हवेची उशी.
- वापरलेले कपडे ठेवण्यासाठी एखादे साडी कवर किंवा चांगल्या प्लास्टिक बॅग्स, जेणेकरून इतर कपड्यांना वापरलेल्या कपड्यांची वास लागत नाही.
- शक्य असेल तर रोजच्या कपड्यांची १ अशा प्रत्येक दिवसाच्या प्लास्टिकच्या पिशव्या करायच्या. म्हणजे सगळे सामान उघडावे लागत नाही. आदल्या दिवशीचे कपडे त्या दुसऱ्या पिशवीत ठेवायचे.

When Ratnagiri Calls - अर्थात आमची रत्नागिरी वारी

(लेखिका-पूर्वाविवेक)

रत्नागिरी, चिपळूण, पावस, गणपतीपुळे ही प्रसिद्ध ठिकाणे याआधीही पहिली होती. पण तरीही रत्नागिरीची ओढ कमी होत नव्हती, कदाचित आमची दोघांचीही पाळंमुळं तिथली आहेत म्हणून असेल. कोकणात जाणाऱ्या एसट्यांवरील (S.T. चे अनेकवचन) गावांची नावे पाहून ही सारी गावं आहेत कुठे, याचं माझ्या नवऱ्याला लहानपणापासूनच कुतूहल. माझ्या नवऱ्याचे पणजोबा रत्नागिरीच्या अश्याच एका गावातून पेणला राहायला आले ते आलेच. त्यानंतर कुणीही तिथे फिरून गेलं नाही. ते 'केळशी' गाव पण शोधायचं होत. तो योग यावर्षी आला आणि आम्ही निघालो.

तारीख ठरली, त्या दिवशी आमच्या लग्नाचा वाढदिवस होता. दरवर्षी आम्ही पालीच्या बल्लाळेश्वराच्या दर्शनाला जातो. म्हणून या वेळीही प्रथम पालीला गेलो आणि कोकण प्रवासाचा श्रीगणेशा केला.

दिवस १:
पालीहून चिपळूणकडे निघालो, वाटेतच परशुरामाचे मंदिर आहे. परशुरामाने समुद्र मागे हटवून ही 'कोकण भूमी' निर्माण केली असं म्हटलं जात. परशुरामाची माता रेणुकादेवीचे सुद्धा मंदिर आहे. काळ्या पाषाणातल्या या सर्व मूर्ती अतिशय देखण्या आहेत. तिथून निघाल्यावर चिपळूणच्या आधी 'एकविरा' धाब्यावर जेवलो. जेवण चांगले होते.

चिपळूणहून रत्नागिरीकडे जाताना सावर्डे या गावाकडून एक रस्ता डेरवण कडे जातो. सर्कसवाले वालावकरांनी तिथे शिवरायांचे मंदिर आणि मठ बांधला आहे. तिथे शिवरायांच्या जीवनावर आधारित शिल्पे उभारली आहेत. लहान मुलांना आवडेल असे आहे.

तिथून पुन्हा मागे येवून रत्नागिरीकडे जाताना संगमेश्वर फाटा दिसतो तिथून आत संगमेश्वरमार्गे देवरुख लागते. हाच रस्ता पुढे कोल्हापूरकडे पण जातो. देवरूखला माझी मैत्रीण राहते, तिच्या अनेक वर्षाच्या आग्रहास्तव तिच्या मोठ्या चौसोपी कोकणी घरात रात्री मुक्काम केला. देवरुख मध्येही राहण्यासाठी लॉज उपलब्ध आहेत.

दिवस २:
सकाळी लवकर उठून मार्लेश्वरला जाण्यासाठी निघालो. मंदिराच्या रस्त्यावरच झाडांत लपलेले एक 'बोंडे' नावाचे छोटेसे गाव आहे, हे माझ्या नवऱ्याचे आजोळ, पण आता तिथे त्यांचे कुणीही राहत नाही. श्री क्षेत्र मार्लेश्वर हे सह्याद्रीच्या उंच कपारीत लपलेले शंकराचे स्वयंभू स्थान आहे. मारळ या गावातून मार्लेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता सृष्टी सौंदर्याने नटलेला, हिरव्यागार घनदाट जंगलातून जाणारा रस्ता आहे. मंदिरात पायऱ्या चढून जावे लागते. चढण्यासाठी साधारण अर्धा तास लागतो. जसजसे वर चढू लागतो हवेतला गारवा जाणवू लागतो. चढताना अजिबात थकवा येत नाही. वर एका गुहेत शंकराची पिंडी आहे. तिथे विजेचे दिवे नाहीत. समईच्या प्रकाशात आतले वातावरण अतिशय धीरगंभीर होते. गुहेत खूप थंडावा आहे. मंदिराच्या खालच्या बाजूला २०० फुट उंचीवरून पडणारा धबधबा आहे. बाराही महिने त्याला पाणी असते. आजूबाजूला नजर टाकल्यास वैष्णोदेवीला आल्यासारखा भास मला झाला. श्रावणात इथले निसर्ग सौंदर्य बघण्यासारखे असते. मकर संक्रांतीला मार्लेश्वरला देवाचे लग्न असते, तेव्हा मोठा उत्सव असतो.

परतीच्या वाटेवर देवरुखकडे न जाता आंबव मार्गे रत्नागीरीकडे निघालो. साधारण एक-दीड तासात रत्नागिरी शहरात पोहोचलो. तिथे लोकमान्य टिळक यांच्या जन्मस्थान स्मारकास भेट दिली. बाजूलाच असणाऱ्या एका ब्राम्हण खानावळीत जेवलो.

लगेच पावसकडे निघालो. पावसला स्वामी स्वरूपानंद यांचे समाधी मंदिर आहे. तिथे खूपच शांती मिळते मनाला. याचा अनुभव पूर्वीही घेतला होता. तिथे भक्तनिवास आहे, विनामूल्य व खूप चांगली राहण्याची सोय होते. परंतु एका खोलीत १० माणसे असे रहावे लागते. आम्ही गेलो होतो तेव्हा तिथे १-२ शाळेच्या सहली आल्यामुळे गर्दी होती. त्यामुळे तिथूनच जवळ 'मुळे' यांचे लॉज आहे, तिथे राहायचे ठरवले. तिथे जेवणाची सोय देखील आहे.

पावसहून पुढे साधारण ७ किमी वर पूर्णगड आहे. गावात खाली गाडी ठेवून पायऱ्या चढून गडाकडे जाता येते. पायऱ्या गावातूनच जातात. किल्ला उंचावर आहे त्यामुळे खाली दिसणाऱ्या समुद्राचे अथांगरूप स्तब्ध करते. या गावातूनच एक मोठा ब्रिज जैतापुरकडे जातो, तिथून गोव्याकडे जाता येते.

पूर्णगडहून पावसकडे परत येताना एक रस्ता कशेळी कडे जातो. तिथे ८०० वर्षापूर्वीचे कनकादित्य सूर्यमंदिर आहे. पण उशीर झाल्यामुळे आम्हाला तिथे जाता आले नाही. तिथूनच पुढे आल्यावर डाव्या बाजूस एक रस्ता गणेशगुळे इथे जातो. तिथे ४०० वर्षे जुने असे प्रसिद्ध गणपती मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात शिळारुपी गणेश आहे. "गुळ्याचा गणपती पुळ्याला गेला" अशी वदंता आहे.

जसेजसे देवळाच्या जवळ वरवर चढू लागतो तसे एका बाजूला घनदाट झाडी आणि एका बाजूला खोलवर पसरलेला समुद्र, वातावरणातील शांतता आणि गारवा...एका वेगळ्याच दुनियेत गेल्या सारख वाटत. देवळासमोर मोठा सज्जा आहे. तिथून खाली पहिले तर खोल घनदाट झाडी असलेली दरी दिसते. ती दरी 'जावळीचे खोरे' असल्याचा भास मला झाला. तेव्हा संध्याकाळचे ६ वाजले होते पण त्यामानाने खूपच काळोख होता. परतीच्या प्रवासात खुपच अंधारून आल होत. रस्ता अगदी निर्मनुष्य, दिवे नाहीत, वस्ती नाही फक्त समुद्राची गाज जोडीला. त्यामुळे मला मनातून थोडं घाबरायला झालं. तिथे कुणाला जायचं असेल तर पुरेसा उजेड असतानाच जावे. गणेशगुळेहून पावसला परत आलो.

दिवस ३:

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा रत्नागिरीकडे निघालो. वाटेत सुंदर असा भाट्ये बीच लागतो. तिथे झरी विनायक मंदिर देखील आहे. नंतर आम्ही रत्नागिरी शहरात फेरफटका मारला. पतित पावन मंदिर आणि थिबा पॅलेस (तिथे आता शासकीय तंत्रनिकेतन आहे.) बाहेरूनच पाहिले. तिथून रत्नदुर्ग (भगवती किल्ला) पाहण्यासाठी गेलो. थेट वरपर्यंत रस्ता असल्यामुळे गाडी जाते. तिथे भगवती मंदिर आहे. रत्नागिरी शहराचे विहंगम दृश्य वरून दिसते. गडाच्या खाली रस्त्यावरच सागरी जीव संशोधन केंद्र व मत्सालय आहे. पण फारसे पाहण्यासारखे नाही.

रत्नागिरीहून आरे-वारे मार्गे गणपतीपुळे कडे निघलो. समुद्राच्या सोबत जाणारा हा रस्ता अतिशय सुंदर आहे. हळूहळू निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेत घेत, फोटो काढत काढत आम्ही गणपतीपुळेला पोहचलो. (परदेशातील 'ओशियन साईड

रोड' चे काय कौतुक असतं! पण हा 'आरे-वारे मार्ग, आणि पुढे उल्लेख केलेला 'दाभोळहून कोळथर' मार्ग दापोली' आणि असे बरेच समुद्राच्या बाजूने जाणारे रस्ते कोकणात आहेत. पण आपल्याला त्याच कौतुकचं नाही.)

बीचच्या जवळ हॉटेलमध्ये रूम घेतली. फ्रेश झालो आणि गणपतीच्या दर्शनाला गेलो. दर्शन झाल्यावर डोंगराभोवती प्रदक्षिणा घातली. प्रदक्षिणा मार्ग खूप छान आहे. मग बीच वर धमाल केली आणि रात्री जेवूनच रूमवर परतलो. गणपतीपुळ्यापासून १ किमी अंतरावर 'प्राचीन कोकण' नावाचे संग्रहालय आहे. इथे ५०० वर्षापूर्वीच्या कोकणातील ग्रामीण जीवनाचा देखावा ३ एकर जमिनीवर उभारला आहे. आम्ही कोकणातच वाढल्यामुळे त्याबद्दल फारस कुतूहल नव्हते म्हणून आम्ही ते टाळले. याविषयी अधिक माहिती इथे मिळेल.

दिवस ४:

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच पटापट आवरून जयगडकडे निघालो. रस्त्यात मालगुंड लागले. तिथे कविवर्य केशवसुत यांचे स्मारक आहे. जयगड जवळ येताच लांबूनच JSW Power Plant दिसू लागला. JSW ने अतिशय सुंदर असे गणेश मंदिर बांधले आहे ते बघण्यासाठी तिथे पोहोचलो. तिथे सर्वांनाच प्रवेश आहे. मंदिर तर अप्रतिम आहेच पण प्रवेशद्वार आणि आजूबाजूचे गार्डन पण सुंदर.

तिथे थोडा वेळ रेंगाळल्यावर जवळच असणाऱ्या 'जयगड' किल्ल्यात गेलो. गडाची तटबंदी अजून मजबुत आहे. आधी पाहिलेला 'पूर्णगड' तसेच बाणकोटचा किल्ला आणि हा 'जयगड' हे रूढार्थाने किल्ले/गड वा जलदुर्ग नाहीत. गड हे नेहमी उंच ठिकाणी असतात तर जलदुर्ग भर समुद्रात. पण हे किल्ले समुद्र किनारी बऱ्यापैकी उंच जागा बघून बांधलेले आहेत. आकाराने फारसे मोठे नसलेले हे किल्ले 'कोट' या प्रकारातील आहेत. यांचा पूर्वी सागरी मार्गावर टेहळणी करण्यासाठी वापर व्हायचा. बाकीच्या ऐतिहासिक वास्तु प्रमाणेच हे किल्ले पण दुर्लक्षित आहेत. हे किल्ले इतके मोक्याच्या जागी आहेत विशेषत: 'पूर्णगड' अजूनही आपलं सागरी तटरक्षक दल त्याचा उपयोग करू शकते. त्यामुळे हे किल्ले सुद्धा सुस्थितीत राहतील असं मला वाटत.

जयगडहून फेरी बोटने 'तवसाळ' येथे १५ मिनिटातच पोहचलो. फेरी बोटने प्रवास करण्याचा हा पहिलाच अनुभव सुखावून गेला.

तिथून अर्ध्या तासात 'हेदवी' आले. येथे प्रसिद्ध दशभुजा गणेश मंदिर आहे.

मंदिरापासून साधारण ३ किमीवर हेदवी बीच आहे. तिथे 'बामण घळ' म्हणून निसर्गाचा चमत्कार दाखवणारे स्थळ आहे. समुद्राच्या लाटांनी खडकामध्ये चीर केली आहे. लाट आली की पाणी त्या चिंचोळ्या भागात शिरते आणि जोराने उंच उडते. भरतीच्या वेळेला खरी गंमत आहे.

हेदवीपासुन पुढे ६ किमी अंतरावर 'वेळणेश्वर' हे शंकराचे पुरातन देवस्थान व सुंदर समुद्र किनारा आहे. यापुढे १६ किमी अंतरावर गुहागर आहे. गुहागर येथील समुद्र किनारा सुंदर आहे. गुहागरला जेवलो आणि बीचवर सुरुच्या बनात बसून आराम केला.

तिथे 'व्याडेश्वर' हे शंकराचे पुरातन मंदिर आहे. पण आम्ही गेलो नाही.

गुहागर पासून जवळच असणाऱ्या 'धोपावे' हून दाभोळला जाण्यासाठी पुन्हा फेरी बोटचा आधार घेतला. दाभोळपासून जवळचं चंडिका देवीचे नैसर्गिक गुहेमधील मंदिर प्रसिद्ध आहे. परंतु संध्याकाळ होत आली होती, तिथे उशीरा जाणे सोयीचे नाही. त्यामुळे तिथे जाता आल नाही. पण पुन्हा कधीतरी जाणार हे नक्की. दाभोळहून दापोलीस दोन रस्ते जातात त्यापैकी आम्ही 'कोळथर' मार्गे समुद्रकाठाने जाणारा रस्ता निवडला. रस्त्यात 'बुरांडी' लागले. तिथे पृथ्वीवर उभे असणारे 'परशुराम' यांचे मोठे शिल्प दिसले. ते पाहून थांबलो. ती पृथ्वी आतून पोकळ ठेवली असून आत दरवाजा बंद करून ध्यान करता येते. बाजूला छानसे गार्डन केले आहे.

तिथून पुढे तामसतीर्थ म्हणून प्रसिद्ध असणारे लाडघर लागले. समुद्रकिनारा अतिशय सुंदर आहे. तिथे WATER SPORTS आणि डॉल्फिन दर्शनाची सोय आहे.

दापोलीला ४. ३० वाजता पोहचलो. शनिवार होता त्यामुळे 'कोकण कृषी विद्यापीठ पाहता आले नाही. खरं दापोलीत राहण्याचा विचार होता, पण सुट्टीचा एकच दिवस शिल्लक होता. कुठल्याही परिस्थितीत 'केळशी'ला जायचेच होते. आणि रविवारी संध्याकाळ पर्यंत घरी पोहचायचे असे ठरवले होते. त्यामुळे आसुदचे केशवराज मंदिर, मुरुड-कर्दे इत्यादी काही ठिकाणी जायचे रद्द करावे लागले. (आसुदला तर सकाळी लवकर जावे लागते कारण देवळाकडे जाणारा रस्ता दाट झाडीतून जातो आणि वाहन बाहेर ठेवून पायी जावे लागते.) परतून पुन्हा यायचे असे ठरवून हर्णे कडे निघालो.

हर्णे गावात शिरण्याआधीच उजवीकडे एक रस्ता आंजर्लेकडे जातो, तिथुन गाडी वेगात हाकली आणि 'सनसेट पॉइंट' वर धावत-पळतच पोहचलो. आणि तिथून दिसणारे दृश्य पाहून केलेल्या धावपळीचे सार्थक झाले. संपूर्ण हर्णे बंदर, गाव, सुवर्णदुर्ग, दीपस्तंभ तिथून दिसते. बंदरात उभ्या असणाऱ्या शिडाच्या मच्छीमार नौका खूपच सुंदर दिसतात, लाईट

लागल्यावर तर जास्तच सुंदर दिसतात. आंजर्लेला रात्री राहायचे ठरवले होते. पण अंधारून आल होत आणि पुढील रस्ता खराब आहे अस कळलं, त्यामुळे पुन्हा खाली हर्णेकडे आलो. हर्णे माझ्या आईचे आजोळ, पण आता तिथे कुणी राहत नाही. त्यांच्या आंब्याच्या बागा असल्यामुळे फक्त उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी येतात. बराच वेळ शोधाशोध केल्यावर एक बऱ्यापैकी हॉटेल सापडलं. रात्र झाली म्हणून नाईलाजाने राहिलो. त्यामुळे जर कुणाला हर्णेला जायचं असेल तर एकतर आंजर्लेला रहा किंवा मुरुडला. शाळेत असताना मी हर्णेला आजीसोबत आले होते. तेंव्हाचं हर्णे आणि आताचं हर्णे यात जमीन आसमानाचा फरक जाणवला. सगळीकडे गर्दी, अस्वच्छता, मासळीचा वास, लोकांच्या वागण्यातील तुटकपणा...मन खट्टू झालं हर्णेचं पालटलेल रूप पाहून. 'गारंबीचा बापू' या पुस्तकातल्या वर्णनाप्रमाणे भासणारं, माडांच्या गर्दीत लपलेलं, छोटी छोटी घर असलेल हर्णे गेलं कुठे? पण मासेप्रेमींसाठी हर्णे म्हणजे पर्वणी आहे. याचे कारण हर्णे बंदर, मासे व्यापार जोरदार आहे. दिवसाला ४ कोटीची उलाढाल आहे म्हणे. ताजे आणि स्वस्त मासे इथे मिळतात, इथल्या काही हॉटेलमध्ये किंवा काही घरात ते मासे शिजवून मिळतात. हर्णे हे उत्कृष्ट असे नैसर्गिक बंदर आहे. तसेच तिथे 'सुवर्णदुर्ग' हा सागरी किल्ला आणि 'कनकदुर्ग' हा सागरी तटावरील किल्ला आहे. कनकदुर्ग मध्येच दीपस्तंभ आहे. दोन्ही किल्ले मी आधी पहिले होतेच शिवाय तिथे जाण्यासाठी नियमित बोट-सेवा नाही त्यामुळे वगळूनच पुढे ठरवले. त्या किल्ल्यात जायचं असेल तर स्थानिक कोळ्यांशी बोलून बोट घ्यावी लागते.

दिवस ५:

हर्णे गावातून आंजर्लेकडे जाणारा एक दुसरा रस्ता आहे तो पकडून आंजर्लेकडे निघालो. रस्ता खराब आहे. 'आंजर्ले' गावाची पाटी दिसली. एक रस्ता खाली बीचवर व गावाकडे जातो आणि दुसरा रस्ता वर कड्यावरच्या गणपती मंदिराकडे जातो. मंदिराकडे निघालो, रस्ता कच्चा आणि अरुंद आहे. तरीही छान वाटत होतं. मंदिर पेशवेकालीन आहे. मूर्ती देखणी आहे. परिसर सुद्धा मस्त आहे. आंजर्ले येथील समुद्रकिनारा सुंदर आणि स्वच्छ आहे.

आता फक्त मिशन 'केळशी' बाकी होत. आंजर्लेहून थोडे मागे फिरून केळशीकडे निघालो. रस्ता जंगलातून जाणारा, एकदम निर्मनुष्य, आमच्या खेरीज दुसरे कुठलेही वाहन नाही, कसला आवाज नाही. दूरदूरवर काही आहे की नाही याचा अंदाज पण येत नव्हता. एक क्षण असं वाटून गेलं की आपण रस्ता चुकलो. मग हळूहळू छोटी छोटी गावं दिसू लागली आणि जीव भांड्यात पडला. वाटेत वेगवेगळ्या प्रकारचे खूप पक्षी दिसले. एका झाडावर बसलेली खूप मोठी घार किवा तत्सम पक्षी जवळून पहिला.

अस्पर्शित रस्त्याने केलेला हा प्रवास खरंच खूप विलक्षण होता. आणि अखेर केळशीत महालक्ष्मीच्या देवळापाशी येवून पोहचलो. १८ व्या शतकातील हे मंदिर आणि याचा परिसर शांत आणि सुंदर आहे. महालक्ष्मी स्वयंभु आहे. देवीची खणानारळाने ओटी भरली. देवीचा आणि सोमनाथाचा आशीर्वाद घेवून बाहेर पडलो. देवळाच्या बाजूनेच एक रस्ता वर याकुब बाबा यांच्या दर्ग्याकडे जातो. याकुब बाबा हे शिवाजी महाराजांच्या जवळचे होते. त्यांच्या निधनानंतर महाराजांनी हा दर्गा

बांधला. दर्गा थोडा उंचावर आहे. तिथून केळशीचा नितांत सुंदर, अथांग समुद्र किनारा दिसतो. केळशी छोटेसे सुबक कोकणी गाव आहे.

केळशीहून आम्ही आमचा परतीचा प्रवास सुरु केला. हा देव्हारे कडे जाणारा रस्ता खूप खराब आहे. जवळपास बॉक्साईटच्या खाणी आहेत. धूळ उडवत खडखडाट करत चाललेले अनेक ट्रक रस्त्यात भेटले. काही वेळाने केळशी फाट्याजवळ येवून पोहचलो. डाव्या बाजूचा रस्ता वेळास व बाणकोट कडे जाणारा होता. (वेळास हे आपल्या सुंदर असा समुद्र किनारा आणि तिथे होणारा 'कासव महोत्सव' यासाठी प्रसिद्ध आहे. तसेच बाणकोट येथे किल्ला आहे.) आणि दुसरा रस्ता जातो देव्हारे व मंडणगडकडे, हा रस्ता आम्ही पकडला.

देव्हारे गावाच्या पुढे आल्यावर उजव्या बाजूला झाडात लपलेले रस्त्यापासून खाली असलेले एक शिवमंदिर दिसले. गाडी थांबवली आणि पायऱ्या उतरून खाली गेलो आणि एकदम गारवा जाणवला हवेत. मंदिर कौलारू सुबक होत. गाभारा आणखी खोलवर होता. तिथेच बाकावर बसून थोडावेळ आराम केला. बाजूच्या जंगलात झाडांवर माकडे उड्या मारत खेळत होती. उठावंसं वाटतच नव्हत. पण घड्याळाचे काटे म्हणत होते, 'चला उठा, सुट्टी संपली!'

पुन्हा प्रवास सुरु केला. मंडणगड, म्हाप्रळ, आंबेत, गोरेगाव अस पार करत मुंबई-गोवा हायवे वरून गाडी हाकली. माणगावला जेवलो आणि मग न थांबता पेण गाठलं. प्रवास संपला होता पण इतके दिवस सतत सोबत करणाऱ्या समुद्राची गाज मात्र कानात घुमत होती.

सिटी पॅलेस – जयपूर

(लेखिका- इशा१२३)

राजस्थानच्या सहलीत एक एक ठिकाण पहात आज जयपूर पहायला निघालो होतो. राजस्थानची ही राजधानी प्राचीन इतिहास, कला, संस्कृती, परंपरा सगळ्यात अग्रेसर आहे. अनेकविध पर्यटनस्थळ, ऐतिहासिक वास्तु, लोककला, उत्तम कलाकृती यामुळे पर्यटकांमधे अत्यंत लोकप्रिय असणार हे शहर पहायची उत्सुकता आम्हालाही होतीच. मुख्य आकर्षण होते ते तिथले भव्य किल्ले आणि वैभवसंपन्न राजवाडे पाहणे. सिटी पॅलेस हे तिथले मुख्य आकर्षण आहे.

ठरल्याप्रमाणे शहरदर्शनाला निघाल्यावर प्रथम अमेर फोर्ट करून पुढच्या राजवाड्याकडे गाडी वळली. अंबर किल्ला अपेक्षेपेक्षा जास्तच भव्य आणि देखणा निघाल्याने आता सिटीपॅलेसबद्दल उत्कंठा वाढली. अंबर किल्ला आता केवळ पर्यटकांसाठी प्रेक्षणीय स्थळ आहे. तिथे आता कोणी राहात नाही. मात्र सिटीपॅलेसचा काही भाग अजूनही राजपरिवाराचे निवासस्थान आहे. सवाई जयसिंग व्दितीय या अमेरच्या राजाने १९३२ साली या राजवाड्याचे बांधकाम केले. नंतर आलेल्या राजांनी त्यात अजून भर घातली.

सकाळी अमेर साठी जाताना ज्या जुन्या जयपूरमधील रस्त्याने ड्रायव्हरसाहेबांनी गाडी नेली होती तोच भाग पुन्हा दिसू लागला. परत तेवढीच वाहतूकीची कोंडी, तीच गर्दी, गोंधळ पाहुन धास्तावलोच. सकाळी समग्र शहरदर्शनाचा ड्रायव्हर साहेबांच्या मनात आलेला विचार पुन्हा आला की काय अशी भीतीयुक्त शंका आली. पण ट्रॅफिकमुळे राजवाड्याच्या आत वळता येत नाही असा खुलासा झाल्यावर हायसं वाटलं. सकाळी आवडलेला हवामहल आता परत दर्शन देउ लागला. राजवाड्याचे प्रवेशद्वार समोर दिसत असूनही तिथल्या रांगेमुळे पोलिसदादा काही आत शिरु देईनात, की रांगेत घेईनात. मग पुन्हा एक फेरी सुरू झाली. जवळपास पाऊण तास मनसोक्त जुन्या शहराचे दर्शन झाल्यावर मात्र धीर खचू लागला. बाल मंडळ चुळबुळ करू लागले अन इकडची स्वारी डायवर साहेबांबरोबर पुणेरी हिंदीतून पुण्याची ट्रॅफिक आणि जयपूरी ट्रॅफिक यावर तुलनात्मक चर्चा करू लागली. मला मात्र हाताशी असलेला एक दिवस कसा पुरणार याची चिंता वाटायला लागली. एव्हाना दिसेल त्या गल्लीबोळातुन सोयीचा रस्ता शोधत ड्रायव्हरने गाडी पुढं दामटणं सुरू केलं. आता राजवाड्याची मागची भिंत, दुसऱ्या एका बाजूचे प्रवेशद्वार, भाजी मंडई, होलसेल बाजार सगळ बघून झालं. आता पुरेसं बघून झाल्याने देवाला दया आली आणि राजवाड्यात जायला एकदाचा प्रवेश मिळाला. गाडीतून पटकन उतरून मंडळ आत शिरले. समोरच मुख्य त्रिपोलिया गेट दिसले.

भव्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर राजवाड्याची इमारत दिसली. लाल रंगाच्या या पॅलेसचे बांधकाम वास्तुशास्त्राप्रमाणे केल गेलंय. पुढे त्याच्या चारही बाजूंनी शहर वसत गेलं. चंद्रमहल, मुबारकमहल, सुरजमहल, तारकटोरा, हवामहल, चांदनी चौक, जंतर मंतर, जलेब चौक आणि चौगान स्टेडियम अशा अनेक वास्तु या सिटी पॅलेसमधे अंतर्भूत आहेत. सध्या मात्र यातील चंद्रमहालात राजपरिवाराचे वास्तव्य आहे, तर बाक़ी भागात वस्तुसंग्रहालय आहे. इतर भाग शहरात समाविष्ट केलाय. हे

वस्तुसंग्रहालय व थोडा भाग पर्यटकांसाठी खुला ठेवलाय.

राजवाड्याच्या आत प्रवेश केल्यावर समोर दिसतो तो मुबारक महल. (जालावरून साभार - Reference - http://images.travelpod.com)

राजपरिवाराला भेटायला येणाऱ्या पाहुण्यांसाठी या महालाचा वापर केला जायचा. गुलाबी दगडातील अप्रतिम कारागिरी केलेली ही इमारत आकर्षक दिसते. रजपुत, मुघल आणि युरोपियन पद्धतीने याचे बांधकाम केलेलं आहे. सध्या याच वास्तूत राजकुटूंबियांच्या वस्तूंचं संग्रहालय आहे. महाराणी गायत्रीदेवींनी निवडलेल्या सुंदर वस्त्र, शस्त्र, आभुषणं आणि इतर अनेक आकर्षक गोष्टी या संग्रहालयात मांडलेल्या आहेत. यात पहिल्या दालनात राजा, राणी व इतर राजसदस्यांची वस्त्रे ठेवलेली आहेत. राजाचे बारीक नक्षीकाम केलेले अंगरखे, सवाई मानसिंग यांचा पोलो ड्रेस, सोन्याच्या तारेत गुंफलेले, जरीकाम असलेले त्यावर मोती, कुंदनचे काम केलेले राण्यांचे घागरे, साड्या सगळंच देखणं. नजर ठरणार नाही असं बारीक भरतकामाचे नमुने अत्यंत सुरेख. असली अवजड वस्त्रे कसे वापरत असतील देव जाणे. सवाई माधोसिंगांचा अवाढव्य अंगरखा अन तुमानीने तर एक आख्खी भिंत अडवली आहे. सवाई माधोसिंग उंचपुरे आणि दणकट शरीरयष्टी असणारे होते. २५० किलो वजन असलेला हा उंचपुरा राजा त्याचे कपडेही तसेच प्रचंड असणारच म्हणा. बघुन अचंबित व्हयायला होतं. बाकी इतर कपड्यात किमती पश्मिना शाली, संगमनेरी ब्लॉक प्रिंटींगचे नमुने, अंगरखे अशी सगळीच निवडक सुंदर वस्त्रप्रावरणे आहेत. एक एक दालन निरखून बघण्यात वेळ कसा गेला समजलेही नाही. इतरही अनेक वस्तू, शस्त्रं, दागिने सारंच नेटकं मांडुन ठेवलंय.

त्यांनंतरची इमारत म्हणजे दिवान-ए-खास. राजाच्या खाजगी वापराचे दालन. संगमरवरी फरशी, नक्षीदार कमानी, लाल गुलाबी छत, भिंतीवर केलेली पांढऱ्या रंगातील नक्षी सारंच राजमहालाला साजेसं. छतावरच्या मोठ्या झुंबरांनी महालाला देखणं केलय. एक एक झुंबर मोठं आणि सुंदर.



(जालावरून साभार - Reference - http://siyag.net)

त्याहूनही लक्ष जाते ते या महालाच्या प्रवेशद्वारापाशी ठेवलेल्या प्रचंड मोठ्या चांदीच्या पात्रांकडे. गंगाजली असा उल्लेख आहे तिथे त्याचा. या गंगाजली अस्सल चांदीच्या बनवल्या गेल्या. तब्बल ४००० लिटर पाणी सामावणाऱ्या ५.२ उंचीच्या या गंगाजली

प्रत्येकी ३४० किलो वजनाच्या आहेत. ही छान चकचकीत पात्र काचेच्या आत सुरक्षित ठेवलेत. त्यामुळे नीट पाहताही येतात.

त्यामागची कथाही नवलाची. सवाई माधोसिंगराजे हे फक्त गंगेचे पाणी पित असत. १९०१ मधे राजाला इंग्लंडचा राजपुत्राचे राज्यरोहणानिमित्त इंग्लंडला येण्याचे आमंत्रण मिळाले होते. आता परदेशात जायचं तर हा नियम मोडणार. मग ही गंगाजलीची शक्कल लढवण्यात आली. बरं हे राजाचे जलपात्र! साधंसुधं कसं असणार? म्हणून तात्काळ चांदीची १४००० नाणी वितळवण्यात आली आणि ही दोन जलपात्र बनवुन जहाजाने पाठवली गेली. ही सुंदर घाटदार जलपात्र आहेत मात्र छान. गिनिज बुकमधे सर्वात मोठी चांदीचे पात्र अशी त्यांची नोंद आहे. अशी किती किमती भांडी काळाच्या ओघात हरवली गेली असतील अस मात्र वाटुन गेलं.

यापुढचा दिवान-ए-आमही (सभा निवास) खासच. इथल्या भिंती, छत अजूनच सुंदर. सगळीकडे लाल सोनेरी रंगाने केलेल नक्षीकाम अप्रतिमच. आता या महालाचा कलादालन म्हणून उपयोग केला जातोय. चारही बाजूंना राजाच्या पूर्वजांची भव्य तैलचित्रं लावलेली आहेत. सवाई माधोसिंग, सवाई मानसिंग व्दितीय इ.राजांची चित्रं आहेत. शिवाय जुनी पेंटिंग, वस्त्रं, जुनी हस्तलिखितं इ. ठेवलेली आहेत. राजस्थानी, पर्शियन, मुघल मिनिएचर पेंटिंगसुध्दा कमालीची सुंदर आहेत. अगदी आजच सजवून ठेवल्यासारखा वाटतो हा भाग. नीट काळजीपूर्वक जतन केल्याने समाधान वाटते. किती अमूल्य खजिना होता या राजघराण्याकडे. तो व्यवस्थित जपलाय हे विशेष.

(जालावरून साभार - Reference - http://mw2.google.com)

त्याहून खास म्हणजे राजाचे तख्त ए रावल. राजाची लोकांना भेटायला जाताना हत्तीवर बांधायचे हे आसन. पालखीसारखाही याचा उपयोग केला जायचा.

(जालावरून साभार - Reference - http://www.rajasthanvisit.com)

महाराणी पॅलेस हा अजुन एक सुंदर भाग. राण्यांचे निवासस्थान असलेला हा भाग आता शस्त्रांच्या संग्रहायासाठी वापरले जाते. यात सवाई रामसिंगना राणी विक्टोरिया कडुन मिळालेली रत्नजडित बंदुक ठेवली आहे. नजर ठरणार नाही अशा एकएक वस्तू पाहुन आता राजवाड्यातील अजुन मुख्य वास्तूकडे आम्ही वळलो. राजाच्या खाजगी वापराचा महाल, चंद्रमहल! सातमजली असलेल्या या इमारतीत आता राजाचे सध्याचे वंशज राहतात. खालचा मजला फक्त पर्यटकांना पहायला खुला आहे.

इथे जाण्यासाठी प्रीतम चौकातुन जावे लागते. मनात खूप पूर्वीपासुन फोटोत पाहिलेली एक गोष्ट इथे पहायला मिळाली. ते म्हणजे अप्रतिम सुंदर मयुर द्वार. हे इथेच आहे हे आधी माहित नव्हते. गाईडने हा भाग न दाखवताच आमची वरात तिथल्या दुकानात नेलेली. तिथून बाहेर आल्यावर सरळ बाहेर जायचा रस्ता त्याने गाठुन दिला. बाहेर पडताना काहीतरी राहिल्याचे वाटायला लागले पण नेमके काय ते सांगता येइना. एवढी माहिती गोळा करून अगदी ट्रिप आखलेली अन नेमकं हेच सांगता येईना. शेवटी चौकशी कक्षाकडे विचारलं की अजुन काही महाल आहेत का जयपूरात. पण तोही बाबा विचारत पडला. तेवढ्यात भिंतिवर लावलेल्या फोटोकडे लक्ष गेले आणि हेच ते पहायचे होते. आता तो बाबा हसला म्हणाला वो तो पिकॉक गेट अंदरही है देख लिजीये. आता तिकिट परत काढायच की काय? आत सोडतील कसं असा विचार डोक्यात आला. पण उदारपणे बिचाऱ्याने जाइये जाइये केलं. पुन्हा आत शिरलो तर तो मघाचा गाइड उभाच त्याला म्हणालो, की हे कोण दाखवणार? दुकानाची घाई केलीस. मग परत चंद्रमहालाच्या दिशेने वळलो. आत प्रवेश केला तोच मुळी पिकॉक गेटनी. अप्रतिम सुंदर नक्षीकाम केलेल हे प्रवेशद्वार उत्सुकतेन निरखलं आणि केलेला खटाटोप सार्थकी लागला.

तेवढे एकच नाही तर अशी अजून तीन प्रवेशद्वारं तिथे पहायला मिळाली. चौकातील एकाबाजूला दोन व त्यांच्यासमोर अजून दोन अशी चार प्रवेशद्वार आहेत. ही छोटेखानी दारं सुरेख राजस्थानी कलाकुसरीने नटवली आहेत. एक एक नक्षीकाम जवळून पाहण्यासारखं आहे. जरा घाईतच असल्याने भराभरा फोटो काढले गेले. अजुन नेटके काढायला हवे होते असे नंतर वाटू लागले. पण तरी प्रत्यक्ष पहायला मिळाले ते बरे. हे राहिले असते तर नक्कीच रूखरूख लागली असती. राजाच्या खाजगी महालाकडे जाणारी ही चार प्रवेशद्वारं वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. वर्षातील चारी ऋतु सुसह्य व्हावेत यासाठी चार महाल बांधले गेलेत. चारी प्रवेशद्वारांना वर सज्जे आहेत. त्यातून आजुबाजुचा सुंदर परिसर पहाता येतो. अर्थात वर सज्जात



जायला पर्यटकांना प्रवेश नाहीच. खालचा चौक मात्र पहायला मिळतो.

(लोटस गेट व उजवीकडचे लहेरिया गेट)

यातील सुंदर मोराची नक्षी असलेले पिकॉक गेट शरद ऋतुसाठी, लाटांचे अनुभव देणारे लहेरिया गेट वसंत ऋतुसाठी, गुलाबपुष्प नक्षीचे रोझ गेट आणि कमळ असलेले प्रवेशद्वार उन्हाळ्यासाठी बांधलेल्या महालाच्या प्रवेशासाठी आहे. अप्रतिम कलाकुसर त्याकाळातील कलेची, वैभवाची साक्ष देणारी. त्या कुशल कारागिरांचे आणि त्यांच्या कलेला योग्य वाव देणाऱ्या रसिक राजपुत राजांचे आभारच ज्यामुळे हे आज सर्वसामान्याना अनुभवायला, पहायला मिळतंय.

यानंतर बाहेर पडताना आधीच पाहिला होता तो बग्गीखाना भाग. त्याकाळातील बग्ग्या, पालख्या तसेच १८७६ साली राजपुत्र वेल्स याने भेट दिलेली व्हिक्टोरिया बग्गी तिथे ठेवली आहे.

(रोझ गेट व पिकॉक गेट)

एकाबाजुला त्याकाळातील तोफा रांगेत ठेवल्या आहेत.

त्या भागातच पारंपारीक कठपुतळीचा कार्यक्रम चालू होता. रंगीबेरंगी नाचणाऱ्या बाहुल्या बघण्यात मुलं रंगून गेली.

त्या कलाकारांच्या कलेला योग्य दाद देउन तृप्त मनाने बाहेर पडलो. सुंदर राजवाडा आता बघून झाला होता मात्र एक विचार मनात आलाच. देखभालीच्या खर्च काळाच्या ओघात अवाक्याबाहेर गेल्याने या संस्थानिकांनी आपले महाल सरकारच्या ताब्यात देउन जनतेसाठी खुले केले. त्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील? अवघडच आहे असा निर्णय घेणे. महाराणी गायत्रीदेवींच्या आत्मचरित्रात त्या आठवणींबद्दल वाचल्याने हे जास्तच जाणवले असावे.

पण एक झाले की त्यामुळे या भव्य वास्तू सुरक्षित आणि सुस्थितीत दिमाखात उभ्या आहेत. अपेक्षेप्रमाणेच अजुन एक सुरेख राजवाडा पाहुन परत बाहेरच्या गर्दीत मिसळलो. पण मिळालेल्या आनंदापुढे या गर्दीचे आता काहीच वाटत नव्हते.

Note: Some photos are from Internet and the purpose is only for Reference. We sincerely thank the sources mentioned above for these photos.

ट्रॅव्हल टिप्स - खास स्त्रियांसाठी

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

- ✓ सार्वजनिक स्वच्छतागृह वापरल्याने इन्फेक्शन होऊ नये या दृष्टीने लायनर्स, टिश्यूपेपर्स, पेपरसोप, हँड सॅनिटायजर.
- ✓ सॅनिटरी नॅपकिन्स, डिस्पोजेबल इनरवेअर, क्लिप्स, पिना, सेफ्टी पिन, पेपर स्प्रे.
- ✓ एक हँडबॅगेत राहिल असं पाऊच - ह्यात फेसवॉश, कंगवा, पावडर, वेट वाईप्स, डिओ, सेफ्टी पिन्स, टिकल्या, इतर आवडीप्रमाणे सौंदर्य प्रसाधने, दागिने इत्यादी.

अमेर फोर्ट अंबर किल्ला - राजस्थान

(लेखिका- इशा१२३)

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सगळ्यात रंगीला, लोभसवाणा वाटणारा प्रदेश म्हणजे राजस्थान. रखरखीत उन आणि ओसाड वाळवंटात काहीसे भडक रंगीबेरंगी पोषाख, भव्य राजवाडे, प्रचंड मोठे किल्ले, गोष्टीतल्या राजा राणीचे नकळत मनाला तिथे जाणवणारे अस्तित्व, सजवलेले उंट, उत्सव, लोककला, नृत्य सगळेच मनोहारी!

यात पर्यट्कांचे खास आकर्षण असते ते म्हणजे तिथले भव्य राजवाडे. रजपूत कलाकुसरीने सजलेले हे राजवाडे अजूनही सुस्थितीत आहेत हे विशेष! पर्यटकांसाठी खुल्या असणाऱ्या या राजवाड्यांची नीट जपणूक केली गेली आहे शासनाकडून हे सुदैवच. शूर राजपुती राजांच्या नंतरच्या पिढ्यांनी विरोधकांचे सामर्थ्य बघून अस्तित्वासाठी त्यांच्याशी जुळवुन घेतले. आधी मुघल आणि नंतर इंग्रजी राजवटीशी जुळवून घेतल्याने एकूणच त्यांचे नुकसान कमी झाले. वास्तुंची नासधूस न होता ठिकठाक राहिल्या. पुढेही स्वातंत्र्यानंतर संस्थानांच्या विलिनीकरणामुळे या राजवाड्यांचा देखभालीचा खर्च अशक्य होउन बसला. मग काही भाग स्वत:कडे ठेवून बाकी पर्यटकांसाठी बघायला मोकळा केला. हेच राजवाडे बघायची प्रचंड उत्सुकता होती.

उदयपूरमधील सिटी पॅलेस, चित्तोडगड बघुन आता आमची गाडी जयपूरकडे निघाली. जयपूर, गुलाबी शहर! पाहण्याची उत्सुकता असतानाच लक्षात आले की आता हे शहर गुलाबी न रहाता विविधरंगी झालंय. त्यादिवशी पोहोचेपर्यंत उशीर झाल्याने राजस्थानी संस्कृतीचे दर्शन घेण्यासाठी चोखिधाणीला मंडळ जाउन आले.

दुसऱ्या दिवशी जयपूर शहरदर्शनाचा कार्यक्रम आखण्यात आला होता. हाताशी वेळ कमी असल्याने त्या एका दिवसातच सगळी ठिकाणं, खरेदी आटोपायची होती. भराभर आवरुन कुटुंब गाडीत बसलही वेळेत. पहिले ठिकाण होते ते जयपूर पासून ११ किमी. लांब असलेला प्रसिद्ध अमेर फोर्ट अर्थात अंबर किल्ला. (तोच तो जगप्रसिद्ध सिनेमा बाजीराव मस्तानी मध्ये बुंदेलखंडचा म्हणून दाखवलेला किल्ला)

(जालावरून साभार - http://theholidayshoppe.in)

वाटेत जाताना एक फोटो स्टॉप प्रसिद्ध हवामहलसाठी झालाच. जसा फोटोत आधी पाहिला होता तितकाच देखणा प्रत्यक्षातही दिसत होता. महालाचे सौंदर्य असलेल्या अप्रतिम कलाकुसरीच्या खिडक्या अत्यंत मोहक. रस्त्यावरच्या मिरवणुका राणीवशाला सहज पाहता याव्यात म्हणुन असलेल्या अनेक जाळीदार कोरीव खिडक्या महालाचे सौंदर्य व्दिगुणित करतात. आणि या खिड्क्यांमुळे हवाही खेळती राहते.

हा शहराचा जुना भाग असल्याने इथे मात्र गुलाबी लालसर इमारती

दिसत होत्या. फोटो काढून गाडीत बसल्यावरही बराच वेळ त्याचे दर्शन होत राहिले. कारण आख्खे जयपूर रस्त्यावर उतरल्यासारखे दिसत होते. एकुणच हॉर्न वाजवण्याची स्पर्धा, गोंगाट यामुळे गाडीतील जनता आता चुळबुळ करू लागली. मग ड्रायव्हर महाशयांनी, 'यहां तो ऐसा होता है, दुसरे रास्तेसे जाते तो जरा कम ट्रॅफिक होती' अशी मौलिक माहिती दिली. मग बाबारे इकडून आणलंसंच का? तर म्हणे 'सोचा आपको सहर घुमाए.' नशीबाने थोड्यावेळात रस्ता थोडा मोकळा झाला आणि गाडी थेट किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचली.

किल्ला बराच उंचीवर असल्याने त्याची भव्यता नजरेस भरत होती. गाडीने वरपर्यंत जाता येते पण हत्तीवर बसुन राजेशाही थाटात जायचे असल्यास खालीच पैसे भरून जावे लागते. पण मी म्हणणारे उन, हत्तीच्या संथ गतीमुळे लागणारा वेळ, शिवाय हत्ती किती वजन पेलु शकेल असा नवऱ्याने मला विचारलेला कुत्सित प्रश्न दुर्लक्षून गाडीनेच वर जायचा निर्णय अस्मादिकांनी घेतला. लाल झूल घातलेले रांगेत डुलत जाणारे हत्ती दिसत मात्र छान होते. बहुतांशी परदेशी पर्यटकच रांगेत अन हत्तीवर दिसले. त्यांच्या चेहऱ्यावरही महाराजा असल्याचा भाव दिसत होता.

आता त्या हत्तींना आणि गाड्या जायला वेगवेगळे रस्ते असल्याने आम्ही त्या महाराजांपेक्षा फारच चटकन गड सर केला. किल्ल्याचे भव्य प्रवेशद्वार नजरेस पडले. सूर्याकडे तोंड करून असल्याने याचे नाव सुरजपोल आहे. हे प्रवेशद्वार ओल्यांडल्यावर मोठ्या पटांगणासारखा दिसणारा "जलेब चौक" लागला. गडाचे एकूण चार भाग आणि चार द्वारं आहेत पैकी हा पहिला भाग म्हणजे सैनिकांनी एकत्र येण्याची जागा. आता हत्ती दुसऱ्या दाराने इथे येताना दिसत होते.

जयपूरमधील प्रमुख आकर्षण असलेला हा किल्ला मुघल आणि रजपुत स्थापत्यकलेचा सुंदर मिलाप आहे. अकबर बादशहाच्या नवरत्नांमधे जागा मिळवलेला राजा मानसिंग (पहिला) याने हा किल्ला २१ डिसेंबर १५५० मधे बांधायला सुरूवात केली. अकबराची रजपुत राणी जोधाबाई हिचा हा भाऊ. पांढऱ्या आणि लाल पत्थरांनी बांधलेल्या या किल्ल्याचे बांधकाम १५९२ मधे पूर्ण झाले. जलेब चौकातून पुढचा भाग पहायला वेगळे प्रवेशद्वार आहे. मोघली पद्धतीचे बांधकाम, अप्रतिम कलाकुसर, रंगीत चित्रं असलेल्या या गेटवर गणपतीचे चित्र असल्याने हा गणेश पोल या नावाने ओळखला जातो. राजाच्या स्वागतासाठी हे विशेष द्वार. वरच्या जाळीदार खिडक्यांतून राण्या फुलांचा वर्षाव करीत.

(जालावरून साभार - Reference -

https://upload.wikimedia.org/wikipedia)

यात प्रवेश केल्यावर लागला तो दिवान-ए-आम. कोरीव खांबांवर असलेला हा भाग तीन बाजूंनी मोकळाच ठेवलाय.

(जालावरून साभार - http://amberfort.org/wp-content)

त्याला लागून असलेल्या दैनंदिन कामकाजाच्या कचेऱ्या देखील सुंदर आहेत.

त्यानंतर लागतो तो दिवान-ए-खास. सुरेख मोझाइक टाइलने सजवलेला हा भाग खास पाहुण्यांसाठी असे. राजेसरकार खास पाहुण्यांना इथे भेटत असत..

(जालावरून साभार - http://www.pinkcity.com)

या दिवान-ए-खासच्या समोर असलेला भाग म्हणजे "सुखनिवास". चंदनी दार आणि खेळत्या हवेसाठी विशेष योजना असलेल्या या भागात राजा आपल्या आवडत्या राण्यांबरोबर सुखाचा वेळ व्यतीत करायचा. किल्ल्याचा पुढचा आतील भाग हा किल्ल्याची खरी शान आहे. सगळ्यात सुंदर आणि प्रसिद्ध भाग आरसे महाल अर्थात "शिशामहल". तिथल्या आरशांनी केलेली छतं आणि भिंतीवरील डिझाइन्स डोळ्यांचे पारणे फेडतात. आजही तो भाग तितकाच झगमगता आहे. गाईडने तत्परतेने तिथली जादू दाखवली. एक काडी पेटवताच अवतीभवतीच्या आरशात हजारो प्रतिबिंब पडून चांदण्या चमकण्याचा भास निर्माण झाला. निव्वळ अप्रतिम! परदानशीन राणीला मोकळ्या आकाशातील चांदण्याचा आभास निर्माण करण्याची ही खास सोय भलतीच सुंदर. फुलांना वेगवेगळ्या किटकांचा आकार बेमालुमपणे देऊन कलाकुसरीची वैशिष्ठ्यपूर्ण

आकर्षक रचना केली आहे.

या महालासमोरची हिरवीगार बाग अजुनही टवट्वीत आहे. ही आराम बाग नावाने ओळखली जाते. छान गारवा जाणवत होता तिथे. उन्हाळ्यात खरंच आराम वाटत असेल तिथे.

तशीच एक चांदणीच्या आकार असलेली बाग किल्ल्याच्या मागे असलेल्या माओटा तलावात दिसते. राजाने काबुल युद्धाहुन परतताना केशर लागवडीसाठी बिया आणल्या होत्या. त्या लावायला ही बाग.

किल्ल्यावर राण्यांसाठी बसायला एक खास जागाही आहे. राजाच्या अनेक राण्यांमधे संवाद व्हावा यासाठी नाव मात्र चुगली खाना.

या शिवाय अनेक सुंदर कलाकुसरीची पेंटिंग्ज, चित्रं लक्ष वेधून घेतात. सगळं रंगकाम भाज्यांपासून बनवलेले नैसर्गिक रंग वापरून केलं आहे हे विशेष. आता सगळा किल्ला बघून झाला होता. मुख्य म्हणजे मुलांनाही आवडला. निघावे लागणार होते. २-३ तास फिरून अप्रतिम कलाकारी, कोरीवकाम बघितले तरी समाधान होईना. मनात किल्ल्याचे जे भव्य स्वरूप कल्पित केले होते त्यापेक्षा बराच मोठा, सुंदर आणि सुस्थितीतला किल्ला पहायला मिळाला. युनेस्कोने हा किल्ला जागतिक वारसा म्हणून घोषित केला आहे..

सगळा किल्ला बघून परत बाहेर आलो. आता अजून गर्दी जमली होती. शाळांच्या सहली आलेल्या दिसत होत्या. ती मुलं मोठ्या आनंदात रांगेत उभी होती. आता किल्ला निवांत बघणं अवघड झालं असतं. त्याआधी बाहेर पडलो ते बरं झालं.

मुघलांचा अंकित असलेल्या व त्याच्या नवरत्नात स्थान मिळवलेल्या मानसिंग राजाचा इतिहास कितपत आदर्श असेल माहित नाही. (स्वाभिमानी राणा प्रतापसिंगशी हल्दि घाटीचे युद्धात हाच राजा अकबराचा सेनापती होता) मात्र त्याने बांधलेला हा किल्ला भव्य, उत्कृष्ट कारागिरीचा नमुना म्हणून बघायलाच हवा!

(जालावरून साभार - Reference - http://www.travel2india.com/monthly_newsletters)

Note: Some photos are from Internet and the purpose is only for Reference. We sincerely thank the sources mentioned above for these photos.

ट्रॅव्हल टिप्स - प्रवासातला खाऊ

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

- *कोरडा खाऊ* - खाकरा, कणिक/राजगिरा/बेसन इत्यादी मधील १-२ प्रकारचे लाडू, चुरमुऱ्यांचा चिवडा, ज्वारी लाह्यांचा चिवड़ा, वाटी केक्स, लिमलेटच्या गोळ्या, सुका मेवा, बिस्किट्स, टोस्ट.
- डब्यात नेण्यासाठी खाऊ - तूप पराठा रोल, तूप-साखर / गुळ-तूप पोळी रोल. पिचकू आणि जॅमचे पाउच सोबत ठेवायचे. मुलं बरेचदा खायला नाटकं करतात तेंव्हा निदान पोळी सोबत हे खाऊ शकतात. तिखटमिठाच्या पुऱ्या, पराठे, झुणका, पिठलं, फोडणीचा भात.
- खाऊची लहानलहान पाकिटं करायची, रोज एक घेऊन बाकीचं रूमवर ठेवता येईल, म्हणजे वजन होणार नाही आणि सगळाच खाऊ एकावेळी उघडायची गरज नाही.
- सूंठ, गूळ, तूप एकत्र करून छोट्या गोळ्या सोबत ठेवू शकता. रोज सकाळीही गोळी घ्यायची लहान मोठे सगळ्यांनीच. हवाबदलाचा फार त्रास होणार नाही.

सहल गाणी!

(गाणी संकलन- अनाहिता । मांडणी- स्वाती दिनेश)

साधारण डिसेंबर सुरू झाला की शाळेचा शिपाई एका दिवसाच्या सहलीची नोटीस घेऊन येई. वर्गात नुसता दंगा होत असे. एकदाचा तो दिवस उजाडे. घरून पुरीभाजीचा डबा, रसना सरबत, फाइव्ह स्टार चॉकलेट असा खाऊ घेतला जाई. पाण्याची बाटली, लिमलेटच्या गोळ्या न विसरता घेतल्या जात. पहाटे सहा,साडेसहाच्या सुमाराला शाळेपाशी बस येणार असायची. बहुतेक सगळे जण वेळेआधीच ग्राउंडवर पोहोचलेले असायचे बाई हजेरी घ्यायचा पण कोणीतरी एखादा उशीर करायचाच. त्या काळी काही मोबाइल्स नव्हते आणि फोनही घरोघरी नसत. मग त्या उशिरा येणाऱ्याची वाट पाहताना पिकनिकच्या वाटेवर त्याची /तिची काय आणि कशी वाट लावायची याचे बेत आखले जात असतानाच तो उशिरवाला प्राणी अवतीर्ण व्हायचा. सगळे बसमध्ये चढायचे. गणपती बाप्पा मोरया! च्या गजरात बस सुरू व्हायची. खिडकीतून बाहेर बघण्यापेक्षा बसच्या मधल्या जागेत एकत्र दंगा करण्यातच जास्त मजा वाटायची. दोन तट पाडून गाण्याच्या भेंड्या नाहीतर खास अशी पिकनिक साँग्ज यांनी बस दणाणून जायची.

पूर्वीच्या काळी मोटारगाड्यांमध्ये रेडिओ, टेपरेकॉर्डर एवढे विपुलतेने नसत. सीडी प्लेअरचा तर जन्मच झाला नव्हता. आधी मोटार गाड्याच सामान्य माणसाकडे विपुलतेने नसत. एवढेच काय व्हिडिओ कोचने जाणारी मंडळीही फार कमी असत. शाळा, कॉलेजच्या पिकनिकला, ट्रीपला जाताना बस अर्थात लाल डबाच असे नेहमी. अशा वेळी सहलीला जाताना अर्थातच भेंड्या खेळत आणि खास अशी पिकनिक साँग्ज गात दंगा करत सगळे सहलीचे ठिकाण येईपर्यंत घसे बसवून घेत असत. सहलीची ठिकाणेही तासादोनतासात पोहोचू अशी असत. त्या काळी ठाण्यातून ओवळ्याला, येऊरला, पोखरणच्या जंगलातही सहली निघत. त्यातीलच मुंबई दर्शन, कणकेश्वर, अलिबाग, किहिम बिच, गोराई बिच, नेहरू सायन्स सेंटर,आरे मिल्क कॉलनी, खिडकाळेश्वर ही काही वानगी दाखल ठिकाणे-
"गल्यान साखली सोन्याची ही पोरी कोनाची" ह्या गाण्याने बहुदा सुरूवात होत असे. मग लगेच कुणाला तरी सोनू आठवे आणि सुरू होई,

सोनु तुला सोन्याची माळ घे
सोन्यापरी लेडीज घड्याळ घे
टेरीकॉट्ची साडी घे गोल गोल
आतातरी माझ्याशी गोड बोल

सोनूला गोड बोलायला लावून गाडी लाल पागोट्याकडे वळे..

लाल लाल पागोटं गुलाबी शेला...
चिंट्यादादा गेला... जीव झाला यडा...

चिंट्यादादाला घालवून दिलं एकदाचं की दांड्यावरून नवरा यायचा..
या गो दांड्यावरनं नवरा कुणाचा येतो.. पार अगदी दारुगोळे उडवेपर्यंत वरात चालू रहायची. मुलं बसच्या मधल्या भागात नाचायला सुरूवात करायची. धमाल यायची.

नाचून ,गाऊन दमलं की मग मालाडच्या म्हाताऱ्याची शेकोटी पेटायची. हा म्हातारा मालाड पासून साताऱ्यापर्यंत कोणताही असायचा पण शेकोटी मात्र पेटवायचा आणि शेकोटीला येताना सगळं वऱ्हाड घेऊन यायचा.

दत्त दत्त.. दत्ताची गाय.. यायची. तर कधी बिलनची नागिन यायची
मेरी तुझे केस लांब लांब लांब
जवळ नको येऊ तुझे पापा बघतात.. हे गाणं गोव्याला ट्रीप जात असेल तर हमखास अगदी म्हटलं जायचंच..
आणि कुठे अक्षी बिच,किहिम बिच,अलिबाग, गोराई बिच..(हो, त्या काळी गोराई बिच हे शाळांच्या सहली नेण्याचं ठिकाण होतं.) अशी कुठे बिचबर सहल असली की मग हटकून
इन द मॉर्निंग,इन द मॉर्निंग, इन द मॉर्निंग बाय द सी... हे गाणं झालंच पाहिजे.

हीच माझी ,हीच माझी, हीच माझी सुशीला
मला एकट्याला सोडून ती गेली स्वर्गाला..
अशी त्या सुशीलाची आळवणीही व्हायची.

बसमध्ये कोणी संध्या नावाची मुलगी असेल तर
संध्याकाळी संध्याकाळी,
संध्या काळी का काळी?
हे गाणंही हमखास असायचं.

मालवण पाण्यामध्ये किल्ला,
शिवाजी आत कसा शिरला...

अशी शिवाजी महाराजां बरोबर मालवणच्या कुठल्याशा जलदुर्गावरची सफर घडवली जायची. पण ह्या सफरीचे वेळी महाराज अगदी सौंगडी झालेले असायचे, म्हणून मग त्यांचा असा एकेरी उल्लेख कुणाला खुपायचा नाही.
अशी सगळी गाणी चालू असताना
हिल हिल पोरी हिला व्हायचं आणि हिची चाल तुरुतुरू.. म्हटलं गेलं नाही तर फाऊल धरतील की काय? असं वाटावं इतकं ते गाणं मस्ट होतं.

मग यमुनेच्या तीरावरचे बुलबुल यायचे..
यमुनेच्या तीरी किती बुलबुल असतील बुलबुल असतील बुलबुल असतील वृक्षावरती हो
एक तरी दोन तरी तीन तरी असतील चार तरी बुलबुल हो.
चार तरी पाच तरी सहा तरी असतील सात तरी बुलबुल हो...

असे किती बुलबुल आणायचे तेवढे आणून त्यांना तीरावरून किती वेळ उडू द्यायचे नाही ह्याचे गणित करता करता कधी तरी बाई नाहीतर सरांचा आवाज येई.. चला आता आवरा, आपलं उतरायचं ठिकाण जवळं आलं.. हे उतरण्याचं ठिकाण म्हणजे कोणतं रिसॉर्ट नाहीतर ॲम्युझमेंट पार्क नसायचं. असं काही असतं हेच मुळात माहित नव्हतं. सहलीचं ठिकाण म्हणजे समुद्रकिनारा, येऊर सारख्या डोंगरावरचं जंगल नाहीतर लोहगड सारखा किल्ला असंच काहीतरी असायचं.. त्यामुळे मग नवीन उत्साहात सहलीच्या ठिकाणी उतरताना पुढचे खेळ, फिशपॉंड यांची आखणी व्हायची.

दिवसभर असं मनमुराद हुंदडून नवीन उत्साह आणि उर्जा घेऊन परत बस मध्ये चढताना मग भेंड्या खेळायला कोणीतरी सुचवायचं . पण थोड्या वेळाने मग दिवसभराचे शिणलेले शरीर आणि ताजेतवाने मन घेऊन एकेक जण पेंगायला लागायचा. ह्या सहलगाण्यांतून आपल्यापैकी अनेकांच्या शाळा, कॉलेजच्या दिवसाच्या आठवणी ताज्या होतील.

बचके रेहना अर्थात प्रवासातली सुरक्षितता

हॉटेलमधील वास्तव्य

- ✓ रहाण्यासाठी हॉटेल सिलेक्ट करताना ते भरवस्तीतले बघावे. थोडे अधिक पैसे गेले तरी चांगले रिव्ह्यू बघून घ्यावे. विशेषतः एकटं रहायची वेळ आल्यास.
- ✓ रुम सर्व्हिससाठी वेटरला एकटी असताना आत रूममध्ये बोलवु नये. आत आल्यास दार उघडे राहू द्यावे.
- ✓ रूमला गॅलरी खिडक्या असल्यास बंद करुन घ्याव्या.
- ✓ एकल प्रवासात तुम्ही दर दिवशी कुठे असालयाची हॉटेल व फोन नं सह यादी घरातील कोणाकडे तरी असावीच.
- ✓ एकटी फिरत असताना शक्यतो पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर करावा.
- ✓ देस तसा भेस करावा! उगाच लोकांचे लक्ष वेधून घेणारे तंग कपडे इ. केवळ परदेशी आलोय म्हणून घालू नयेच.
- ✓ भारतात प्रवास करताना गळ्यात एखादे खोटे मंगळसूत्र तसंच देशाबाहेर एखादी खोटी अंगठी पण एक सुरक्षितता हत्यार बनते!!

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

मनमोर हुआ मतवाला

(लेखिका - सुरन्गी)

वर्ल्डकप मधला भारत-पाकिस्तान सामना पाहून झाल्यावर पुढचा साउथ आफ्रिकेबरोबरचा सामना होता मेलबर्नला. मधल्या काळात ॲडलेडच्या भवतालात फिरताना जॉर्ज वाईल्डलाईफ पार्क, ॲडलेड येथे भेट देणार होतो.

तिथले मुख्य आकर्षण होते, 'कोआला हगिंग'. म्हणजे त्याला बाहुपाशात घेऊन तुम्ही फोटो काढू शकता. हा प्राणी ऑस्टेलियाचे प्रतीक समजले जाते. त्याची नखे आणि दातही छान टोकदार असतात. त्यामुळे त्याला त्यावेळी सतत निलगिरीची पाने खायला देतात.

कोआला ही एक अस्वलाची प्रजाती असून ऑस्ट्रेलियातील मूळ रहिवासी मानली जाते. मोठ्या डोक्याचा ठेंगू असा हा प्राणी शाकाहारी असून, कान्गारुप्रमाणेच पिल्लू पोटावरील पिशवीत ठेवतो. कान गोल आकाराचे, नाक गोळ्यासारखे, डोळेही गोलवटच, शेपूट नाही, रंग चंदेरी राखाडीपासून तपकिरीपर्यंत कोणताही असू शकतो. दिवसाचे २० तास झोपेत घालवणारा हा प्राणी आहे. सहा-सात महिन्यापर्यंत बाळ कोआला आईचे दूध पितात, नंतर शाकाहारी असल्याने गवतासह सर्व झाडपाला खात असले, तरी विशेष आवडीचे खाद्य म्हणजे निलगिरीची पाने. बरेचदा या पानांतील अंमली पदाथामुळे ते झिंगलेले आढळून येतात. मध्येच जागे झाले तरी मस्त डुरकाळ्या देतात, हो...हो...डुरकाळ्याच त्या. 'डुररऽऽ डुरररऽऽ डुरररररऽऽ' अशा दीर्घ डुरकाळ्या देत पुन्हा झोपी जातात. जसे एखादा दारुडा मध्येच शुद्धीवर येऊन काहीतरी बोलतो, त्याचा आवाज आधी मोठा असतो आणि नंतर परत बेशुद्धीत जाताना जसा लहान होत जातो त्याप्रमाणेच अगदी यांच्या डुरकाळ्या कमी कमी होत जातात. नंतर कांगारू आयलंडच्या जंगलात हे प्रत्यक्ष पाहायला तर मिळालेच पण अशा स्वतंत्र रहाणाऱ्या आणि झाडावर जवळ जवळ बारा-तेरा फूट उंचीवर झोपलेल्या कोआलाचे फोटोही मला घेता घेता आला.

यांना ऑस्ट्रेलियाचे प्रतीक (symbol of Australia) म्हणून ओळखले जाजते. स्मृतीचिन्हे म्हणून यांचीच उपस्थिती असते, तर प्रयेक झू आणि वाईल्डलाईफ पार्क मध्ये हे असणारच. या पार्क मध्ये कोआला हगिंगची परवानगी आहे. बाकी तोरांगा सारख्या सिडनीच्या मोठ्या झू मध्येपण ही परवानगी नाही. तिथे प्रत्येकी ४३ ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतकी फी असूनही कोआलाला लांबूनच पहावे लागते. शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी येथे गर्दी असते. आम्ही शुक्रवारी दुपारी तिथे गेलो असल्याने एखाद दुसरा पर्यटक सोडता तिथे कोणीच नव्हते. रिसेप्शनकाऊंटर, स्मरणवस्तूंचे दुकान आणि आईस्क्रीम विक्री एकाच जागी चालू होती. कॅमेरामन तयार होते.

आम्ही प्रत्येकी १५ ऑस्ट्रेलियन डॉलर्सची तिकिटे घेऊन आत प्रवेश केला. दोन्ही बाजूला दाट झाडी होती आणि मधून सिमेंटने लिंपलेली साधारण तीन फुटांची उताराची पायवाट. थोडं

पुढे एका वळणावर टणाटण उड्या मारत पंचवीसेक कांगारू आमच्या दिशेने झेपावत आले. एक क्षण थबकलोच! पण तेही आमच्याजवळ येऊन थबकले. आतापर्यंत बरीच वाईल्डलाईफ पार्क पालथी घातलेल्या वर्धनने आपल्या सॅकमधून बिस्किटांच्या मोठा पुडा, नून्गने ब्रेडस्टिकचा पुडा हातात घेतला आणि आम्हाला खुणावले. आई एखादा खाऊ वाटताना मुले कशी एकामागोमाग येतात त्याप्रमाणे ती सारी कुटुंबे खाऊ घ्यायला येत होती. आम्हीपण इतके रमलो की पाउण तास तिथेच गेला कारण मग त्यांच्याशी गप्पा झाल्या, दोस्ती झाली, फोटोसाठी पोझ देणे झाले. शेवटी वर्धनने पुढे ढकलले. "आत्या, आपण दुपारी आलोय, संध्याकाळी बंद होईल, मग काय पाहशील?" तरी बरं, तिथली संध्याकाळ साडेआठ वाजता उतरायची. पाय निघत नव्हता तरी पुढे निघालो. पुढे गेलो तर काहीजण पिंजऱ्यातही होते. त्यांनाही खाऊ देऊन निघालो. तिथे काहीजणी बाळांना दूध पाजत होत्या.

पुढे वेगवेगळे पक्षी मोठमोठ्या पिंजऱ्यात ठेवलेले होते. त्यात पंचरंगी पोपट, पांढरे पोपट, वटवाघळं, पांढरे आणि राखाडी गरुड, चॉकलेटी बदकं, खंड्या होते.

एका तलावात मासे पकडणारे मोठे पांढरे, राखाडी पारवे, राखाडी रंगांच्या पिसांवर काळे ठिपके आणि गुलाबी पाय, पिवळ्या चोची असलेली बदकं, लाल चोचींचे काळे राजहंस, काळे पांढरे काळ्या, बारीक चोचींचे गुलाबी पायांचे नाजूक बगळे, काळे पांढरे काळ्या फताड्या चोचींचेच पण लांबसडक गुलाबी पायांचे मोठे बगळे, काळे पांढरे काळ्या फताड्या चोचींचेच पण

मळकट पांढऱ्या आपले नेहमीचे बगळे, करकोचा, पेंग्विन कितीतरी प्रकारचे पक्षी. काही पिंजऱ्यात तर काही स्वतंत्रपणे फिरत असलेले.

इमूपण होता. इमूची मादी अंडे उबवीत बसलेलीही पाहायला मिळाली. एका इमूने तर बिस्कीट खाता खाता माझ्या हाताचा मुकाही घेतला. इमूच्याच प्रजातीतील पण अतिशय सुरेख दिसणारी रंगीबेरंगी एक प्रजाती cassowarry ही पाहायला मिळाली. Cassowarry ही माझे क्षेमकुशल विचारायला पुढे आला होता. त्याच्याकडे पाठ होती माझी. वेळेवर लक्ष गेले म्हणून बरे. मी पटकन बाजूला झाले तर वर्धनची टिप्पणी, "अग आत्या, आत्ता तुझ्या गालाचा मुका घेतला असता त्याने. तू चुकवलास." मग त्याच्याशीही गप्पा झाल्या.

याची अजूनही एक प्रजाती तिथे होती.

एक पिसारा झडलेला बिच्चारा मोरही पाहायला मिळाला. त्याची समजूत घालत मी मी त्याच्यासोबत बोलत होते. बाकीचे पुढे चालले होते.

इतक्यात अरुलने मला हाक मारली. "आत्या, इकडे या ना. याच्याशी बोला ना. हा बघा कसा झोपून आपल्याकडे बघतोय. त्याला उठायला सांगा ना."

"कोण रे, कोण आहे?" म्हणत मी त्याच्याकडे पहिले. त्याने फक्त पिंजऱ्याकडे बोट दाखवले. पुढ्यातल्या झाडाच्या हिरव्या पानाआडून एक हिरवाच डोळा आमच्याकडे एकटक पाहत होता.
"अरे, तू त्याच्या झोपायच्या वेळेस आलास तर तो कसा उठणार?" असे अरुलला सांगत मी पुढे झाले. काय उमदे जनावर!! झोपलेल्या अवस्थेतला काळाशार मखमली रंगाचा, सडपातळ,पांढऱ्या शुभ्र मिशा असलेला चित्ता मान उचलून आपला एक हिरवागार डोळा रोखून, आमच्याकडे पाहत होता. काय सौंदर्य! काय सौंदर्य! मंत्रमुग्ध करणारे दैवीसौंदर्य. क्षणभराने मला वाचा फुटली. "कितीसुरेख आहेस रे तू!! पण उठलास तर अजून छान दिसशील ना?" आणि काय आश्चर्य? तो उठला आणि अरुल, वर्धनच्या लखलखलेल्या कॅमेऱ्यात कैद झाला.

त्याचे आभार मानून त्याला पुन्हा झोपायला सोडून आम्ही पुढे सरकलो. आम्ही ज्या कोआलाला खास भेटण्यासाठी आलो होतो

तो आणि त्याचे कुटुंबीय मात्र गाढ झोपले होते. त्यातले काही नुकतेच झोपेतून जागे होत होते आणि पुन्हा डुरकाळ्या देत झोपी जात होते. वेगवेगळ्या प्रकारची माकडे आणि मिरकॅट आमच्या मनोरंजनासाठी उतावीळ झालेली होती.

आराम करणाऱ्या सुसरी, मोठ मोठे सरडे, कासवे पाहत पहात पुढे गेलो.

आता सामोरे आले ऑस्ट्रेलियन पेलिकन. अतिशय सुंदर पक्षी. बदकाच्या प्रजातीतला की बगळ्याच्या प्रजातीतला? की दोन्हीचा संगम? कारण याचे पाय बदकासारखे तर, मान आणि चोच बगळ्यांसारखी. पांढरी आणि चॉकलेटी पिसे, लांब, फिक्या गुलाबी रंगाच्या चोची. मोठे गोल डोळे. अजिबात न घाबरता तेही पुढे आले.

दोन उंटही होते तिथे. लहान वयाचे नर मादी. त्या सगळ्यांच्याबरोबर गप्पा मारत मारत पुढे गेलो. म्हणजे गप्पा मी एकटीच मारत होते. पण आमच्या उंटानेही थोड्या गप्पा मारल्या त्याच्याशी. इतक्यात एक लांडोर भेटली. एकटीच चालली होती. म्हटलं, "काय ग तुझा सखा कुठे गेला?" तर बिचारी नाराज होऊन निघूनच गेली.

थोडे पुढे जाताच तीन रस्ते एकत्र मिळत होते. तिथे आपोआपच मोकळी जागा तयार झाली होती तिथेच तिचा सखाही भेटला. डौलदार पिसाऱ्याचा घोळ सावरत उभा होता. मोर! कसला देखणा पक्षी.नुसता उभा होता तर इतका सुरेख दिसत होता. आम्ही जवळ गेलो तर तो हळू हळू पुढे चालू लागला. मी त्याची ती डौलदार चाल पाहत स्तब्ध झाले. एखादी नऊवारी पैठणी, बालगंधर्वांच्या पद्धतीने म्हणजे पायघोळ नेसलेली तरुणी आपल्या साडीचा घोळ सावरत जशी आबदारपणे चालते तसाच तो चालतोय असे वाटून गेले त्याक्षणी. बायकांना साड्याच आठवणार ना!

बाकीचे कॅमेरे त्याचसोबत जात लखलखू लागले. आणि तो वळला. माझ्याकडे येऊ लागला. मी खूश! तो माझ्याजवळ येऊन उभा राहिला आणि मी त्याच्याशी गप्पा मारायला सुरुवात केली, "काय रे, ती तुझी सखी गेली बघ पळून आम्हाला बघून, तू कसा आलास माझ्याजवळ. तुला समजलं का मोरे आलेत ते?" सगळे हसायला लागले होते. माझे माहेरचे आडनाव मोरे आहे अन् आमचे कूळ मोराचे पीस आहे. माझ्या गप्पा चालूच. "इतका सुंदर पिसारा तुझा असा लोळवत काय चालला आहेस. उद्या वॅलेन्टाईनन डे आहे. तिला छान पिसारा फुलवून प्रपोज कर हं". अरुल थट्टेने नमिताला सागत होता, "आत्याका बस चले तो इसे नचाकेही छोडेंगी." नमिता लटक्या रागाने त्याला म्हणत होती. "कुछभी मत बोलो हां. आत्या गुस्सा होगी हां. त्यावर अरुलचे उत्तर होते, "अरे, तुने देखा नाही क्या वो पंथरको कैसे उठाया? ये तो बाजूमें खडा है. आत्या हाथसेभी इसके पंख उठा सकेगी."

नून्ग वर्धनला विचारत होती, "what Atya speaking with that peacock?"

वर्धनने एक छोटासा दगड उचलून तिच्या हातात दिला आणि सांगितलं, "my aatya is great, she will talk to this stone also." आणि पुन्हा सगळे माझी चेष्टा करत मला हसू लागले.

“Atya, what is the topic of the conversation? May I come there?" तिने मला विचारलं. मी हातानेच तिला बोलावलं

आणि तिला म्हणाले, "I am introducing you to him, and telling him to dance for you and us too. will he?" या तिच्या साश्चर्योत्सुक विचारणेला बढाई मारत नाटकीपणे मी उत्तर दिलं "let's see.i will try my best."

पुन्हा मोराकडे वळत त्याला म्हटलं, "ही बघ, ही पण मोरे होणार आहे आता, हिलापण हिचा मोर उद्या प्रपोज करणार आहे. तोपण नाचेल उद्या." मीपण चेष्टा करत हसू लागले आणि..... आणि..... मोर महाराजांनी आपला पिसारा फुलवून धरला. सगळे अवाक्! कोणाला कॅमेरे चालवायचे भान राहिले नाही. मी त्याच्या मागे असल्याने खूण करून फोटो काढा लवकर असे सांगितले. नून्ग पण फोटो काढयला धावली. आहा! काय तो क्षण होता. तो मी पुरेपूर उपभोगला. अगदी मर्मबंधातली ठेव बनून तो राहिला आहे सोन्यासारखा लखलखीत क्षण. मग काय? मस्त संचलन केलं आम्ही दोघांनी.

थोडया वेळाने मी त्याला सांगितलं, "आता मला तुझे असे फोटो काढुदेत, तोपर्यंत पिसारा मिटू नकोस."

या सगळ्या कार्यक्रमानंतर त्याने पिसारा मिटला. मिटताना दोन पिसे टाकली आणि डौलदारपणे निघून गेला बाजूच्या झाडीत. ती पिसे तिथल्या अधिकाऱ्यांच्या परवानगीने मी घेऊन आलेय. आम्हा दोघांचे फोटो पाहिल्यावर, त्या फोटोंच्या प्रतीच्या बदल्यात त्यांनीही लगेच परवानगी दिली.

हे सगळे संपल्यावर आता आम्ही कोआलाची चौकशी केली तर आज तापमान जास्त असल्याने कोआला हगिंगचा कार्यक्रम करता येणार नाही असे सांगितले. थोडा विरसच झाला पण लगेच त्यांनी, "उद्या आलात तर याच तिकिटात भेटू देऊ", म्हणून सांगितलं. आम्हाला दुसऱ्या दिवशी वायनरी पाहायला जायचं होतं जिथे वर्धन नून्गला प्रपोज करणार होता, तिचा रस्ता इथूनच असल्याने आम्ही एक संधी घ्यायची ठरवले आणि दुसऱ्या दिवशी तिथे पोचलो तर ही भली मोठी रांग लागलेली. परंतु तिथल्या अधिकाऱ्याने त्या सर्वांना काल आम्ही परत गेल्याचे सांगितल्याने आम्हाला पहिला नंबर मिळाला. त्यांना सतत निलगिरीची पाने खायला घालत असतात या कार्यक्रमाच्या वेळी म्हणजे त्याचे तोंड बंद राहते. तोही कार्यक्रम पार पाडला. तो कोआलाही फार

प्रेमाने मला भेटला. माझ्यातल्या 'प्राणितत्वाची' जाणीव त्यालाही झाली बहुतेक. त्याची काळजीवाहक मला म्हणाली. "You handle him very carefully. He likes you too."

दुसऱ्या दिवशीही मोरमहारजांनी आम्हाला भेट दिली. पण गर्दीमुळे की, काय तो लगेचच निघून गेला. तरीही काही फोटो काढू दिले. एक दोन पोझेस दिल्या आणि निघून गेला.

जेव्हा बाकीच्यांना अधिकाऱ्यांकडून कालची मोराची कथा कळली तेव्हा काहींनी फोटो दाखवण्याची विनंती केली. ते फोटो पाहताना त्यांच्या नजरेतला हेवा पाहून आणि "you are so lucky", "what a luck" असे शेरे ऐकताना मात्र गम्मत वाटली. स्वत:वरच्या परमेश्वरी कृपेबद्दल त्या जगन्नियन्त्याचे आभार मानतच आम्ही तिथून निघालो खरे, पण ती सहल मात्र मनामेंदूवर कोरून राहिली आहे. ती सहजासहजी विसरली जाणे अशक्य आहे.

आनंददायी रहिवास अर्थात होम स्टे (परदेशी घरातील वास्तव्य)

(लेखिका - सुरन्गी)

गेल्यावर्षी ऑस्टेलिया सहलीत सगळी व्यवस्था वर्धनने म्हणजे माझ्या मुलासारखाच असणाऱ्या भाच्याने केली होती. आम्ही ॲडलेड, मेलबर्न आणि सिडनी येथे प्रत्येकी एक आठवडा राहिलो होतो. तिथे राहण्यासाठी घरे भाड्याने घेतली होती. एखाद्या शहरात जास्त दिवस राहायचे असेल तर हॉटेलपेक्षा हा पर्याय मला फार आवडला.

आम्ही त्या पत्त्यावर पोचलो, इतक्यात मालकीणबाई आल्या. त्यांनी आधी मुख्य दरवाजा कसा उघडायचा ते दाखवून, गाडी आत घेऊन, आम्हाला घरात घेत स्वागत केले. सगळीकडे फिरून घर दाखवून, किल्ल्या देऊन त्या गेल्या.

एक मजली घर, दोन एंट्रन्स, त्यातला एक गॅरेजमधून पॅसेजमध्ये. तिथून वरच्या मजल्यावर जाणारा जिना आणि दिवाणखाना, डायनिंग रूम, लाँड्रीरूम, स्वयंपाकघर, तीन बेडरूम्स, त्यातली एक खाली आणि वर दोन होत्या. त्यांना लागून एका बाजूला अजून एक दिवाणखाना आणि दुसऱ्या बाजूला एल् आकाराची प्रशस्त गच्ची. स्वयंपाकघराच्या मागच्या बाजूला बार्बेक्यू एरिया. खाली आणि वर दोन बाथरूम्स.

दोन्ही दिवाणखान्यात सोफासेट आणि दिवाण, शिवाय खुर्च्या अशी बसण्याची सोय होती. तसेच एक टी टेबलही, शिवाय लहान मुलांसाठी विषेश आकाराच्या आणि डिज़ाईनच्या खुर्च्या होत्या. दोन्हीकडे मोठे एल इ डी टीव्ही होते, मुझिक सिस्टीम, निरनिराळी प्रकाशयोजना करणारे दिवे, तसेच पुस्तकांचे कपाट होते.

डायनिंग रूममध्ये सहा खुर्च्यांसह डायनिंग टेबल तसेच वेगवेगळी क्रोकरी असलेले कपाट, टेबलावर सुरेखसा शो पीस, टेबल क्लॉथसह होते. स्वयंपाकघरात कुकिंग रेंज, मायक्रोवेव्ह, फ्रीज, डिशवॉशर, मिक्सर शिवाय स्वयंपाकाची निरनिराळी भांडी, स्वयंपाक करताना वापरायचे, वाढायचे, जेवायचे काटे, चमचे, सुऱ्या, तसेच भाज्या, चिकन, मासे , मटण, कापण्याच्या वेगवेगळ्या सुऱ्या इत्यादी साधनांनी सुसज्ज तर होतेच, शिवाय फ्रीझही दूध, लोणी,फळे आणि निवडक भाज्यांनी भरलेला होता. शेजारीच ब्रेडही ठेवलेला दिसत होता. बार्बेक्यू एरियातही आठ खुर्च्यांसह डायनिंग टेबल, तसेच बार्बेक्यू करण्यासाठी वापरण्यात येणारी विशेष भली

मोठी शेगडीही होती. लाँड्रीरुमध्ये दोन वॉशिंग मशीन्स, इस्त्री, इस्त्री टेबल, साबणपावडर इत्यादी सामान होते. खालच्या पॅसेजमधून दोन विरुद्ध दिशांना जाणारे जिने होते, एक वरच्या दिवाणखान्यात जाणारा आणि एक वरच्या बेडरुम्सकडे जाणणारा. आणि गच्चीवर जाण्यसाठी दोन मार्ग, एक वरच्या दिवाणखान्यातून आणि एक पॅसेजमधून. दिवाणखान्यात छान सोफे, टेबल खुर्च्या, एल इ डी टीव्ही, तसेच एक टी टेबलही, शिवाय लहान मुलांसाठी विषेश आकाराच्या आणि डिज़ाईनच्या खुर्च्या होत्या. दोन्हीकडे मोठे टीव्ही होते, मुझिक सिस्टीम, निरनिराळी प्रकाशयोजना करणारे दिवे होते. या दिवाणखान्यातूनही अप्रतिम निसर्ग दर्शन होत होते. दिवाणख्यातून गच्चीत जाणाऱ्या रस्त्त्यावर पुन्हा एक खोली. तिच्या एका बाजूला पूर्ण काचेचे पार्टीशन आणि त्यातही सहा खुर्च्यांसह डायनिंग टेबल होते. तिथून आणि एका बेडरुममधूनही समुद्र दिसत होता. काय अप्रतिम दृश्य होते ते!

सर्व बेडरूम्समध्ये प्रशस्त पलंग आणि त्यावर गुबगुबीत गाद्या, उशा, पांघरुणे, शिवाय बिछान्यांना हीटर जोडलेले. मोठी कपाटे, ड्रेसिंग टेबल, साईड टेबल्स, त्यावर सुरेखसे रात्रदिवे, उत्तम प्रकाशयोजना देणारी छतावरची झुंबरे, खिडक्यांना दोन प्रकारचे पडदे, एका पातळ आणि त्यावर दुसरा जाड कापडाचा पडदा, असा जामानिमा होता. वरच्या खिडक्यातून अप्रतिम निसर्ग दिसत होता.

दोन सुसज्ज बाथरूम्स खाली आणि वर होत्या. टब, शॉवर बेसिन, कमोड एकत्रित आणि एक वेगळा कमोड स्वतंत्र अशी सोय होय होती. सगळ्या नळांना गरम आणि थंड दोन्ही पाण्याची सोय, अगदी स्वयंपाकघरात सुद्धा ही सोय होती.

पुढे असलेल्या अंगणात विविध झाडे होती. अतिशय रसिकतेने बांधलेले आणि सजवलेले घर होते ते, मागच्या पुढच्या अंगणांसह जवळजवळ २५०० चौरसफुटांचे. घराच्या पुढच्या अंगणात आवाराच्या भिंतीला लागून कोपऱ्यात चाकांवर चालणाऱ्या दोन कचराकुंड्या होत्या. एक विघटन होणाऱ्या कचऱ्याची आणि दुसरी पुनर्वापर करता येणाऱ्या कचऱ्याची. सर्व कचरा त्यात टाकायचा होता. घर सोडताना आम्ही त्या आवराबाहेरच्या फूटपाथवर न विसरता ठेवण्याची सूचना मालकीणबाईनी जाता जाता दिली होतीच.

अॅडलेड हे इतर दोन शहरांच्या मानाने स्वस्त होते. तिथे हेनली बीच वर आमचे घर होते. या बीचवर अशी घरे फक्त भाड्याने देण्यासाठी बांधलेली आहेत.

इथल्या आनंदायी राहिवासच्या जोडीला तिथल्या सुंदर आणि

स्वच्छ दिसणाऱ्या बाजारातील, दुकानांमधून खरेदी करून तिथे स्वयंपाक करण्याचीही एक मजा होती. त्यात वर्धन मला पाच वर्षांनी भेटलेला. त्याची होणारी पत्नी, शिवाय त्याचा एक मित्रही त्याच्या पत्नीसह आला होता. त्यांना घरच्या जेवणाची ओढ होती, शिवाय त्यांचे पाक कौशल्यही दाखवण्याची संधी होती. ती आम्ही पुरेपूर उपभोगली. तिथल्या स्थानिक मार्केटमधून खरेदी करणे हाही एक आनंदच होता. कारण इतर पदार्थांच्या जोडीला तिथेच हिऱ्यांच्या दागिन्यांचीही दुकाने होती.

आपल्या फिशमार्केटमध्ये आणि तिथल्या फिशमार्केटमध्ये जमीन अस्मानचा फरक असतो. वेगवेगळ्या प्रकारचे मासे अख्खे आणि स्वच्छ करून ठेवलेले असतातच. पण माश्यांचे तुकडे करून ते बर्फीच्या तुकड्यांमाणे रचून ठेवलेले असतात. कुबट वास, चिखल यांचा तर मागमूसही नसतो. हे एक खरेदीला आनंद देणारे कारण.

तसेच मटण, चिकन, बदक, पोर्क हॅम, बीफ इत्यादी स्वच्छ करून वेगवेगळ्या आकारात कापून ठेवलेले असतात. तिथे शहामृग, कांगारू ससे आणि मगरीचे मांसही स्वच्छ करून कापून ठेवलेले आढळले. खिमातर शेवईयंत्रातून काढलेल्या फुलांसारखा दिसत होता. अर्थात आम्ही मासे, चिकन, मटण यापलीकडे फक्त पाहिले.

फुले, फळे, भाज्या, मसाले, सुका मेवा, चीज, निरनिराळी बेकरी उत्पादने आणि इतर ग्रोसरीही स्वच्छ नि शुद्ध असतं.

या सर्वच आस्वाद घेण्यासाठी होम स्टे गरजेचा आहे, असे माझे मत झाले आहे. एखाद दुसऱ्या दिवसांसाठी हॉटेल योग्य असले तर आठवडाभरासाठी मात्र ही सोय छानच आहे.

मेलबर्न इथे मेलबर्नचे एक उपनगर बोरोनिया येथे आमचे नवे घर होते. तेथे पोचायला आम्हाला रात्रीचे दहा वाजून गेले होते. रस्त्याच्या एका बाजूला सम क्रामांकाची घरे नि दुसऱ्या बाजुला विषम क्रमांकाची घरे होती. तिथे मुख्य दरवाजाबाहेरचा लाईट लावलेला होता. बाकी दर बंदच होते. घरमालकाला फोन केल्यावर त्यांनी सांकेतिक

क्रमांक सांगून तिथे असलेले इलेक्ट्रिक मीटर उघडायला सांगितले. तसे केल्यवर मुख्य दरवाजाची किल्ली तिथे ठेवलेली सापडली. ती घेऊन घर उघडले.

हे घर फक्त तळमजल्याचे होते. इथे सहा शयनकक्ष बाथरुम्ससह होते. स्वयंपाकघरातच जेवणघर जोडलेले होते. बारा खुर्च्यांसह डायनिंग टेबल, क्रॉकरी, तसेच वर लिहिलेल्या सर्व उपकरणांसह, भांड्यासह सुसज्ज स्वयंपाकघर. लाँड्री रुमही वर सांगितल्याप्रमाणे सुसज्ज होते. पुढे चार बाय आठची बाग होती. मागे मोठे अंगण होते. त्यात लिंबू, संत्री, आदी झाडे होती. त्यातही खुर्च्या टेबलासह मांडलेल्या होत्या. दिवाणखाण्यात एका टेबलावर, घर वापरत असताना काय करावे आणि काय करू नये याच्या सूचना लिहिलेली फाईल होती. आणि भली मोठी लोखंड आणि पितळेची फायरप्लेस होती.

सकाळी उठल्यावर आजूबाजूचा परिसर पाहून खूपच आनंद झाला. रस्त्याच्या आजूबाजूला हिरवळ तसेच निलगिरीची झाडे होती. झाडांखालच्या मातीवर लाकडाचा बारीक चुरा पसरला होता. त्यामुळे माती धूळ रस्त्यांवर दिसतच नव्हती. आमचे घर एका बाजूने हायवेला लागून आणि दुसऱ्या बाजूने हायवेवरून आत जाणारी गल्ली, यांच्या कोपऱ्यावर होते. गल्लीतच गाड्या पार्क केलेल्या होत्या. गल्लीतही छान फुलझाडांचे ताटवे जागोजागी दिसत होते. घराच्या एका बाजूला रस्त्यावरच दोन कचरा कुंड्या होत्याच.

इथल्या सुप्रसिद्ध क्वीन व्हिक्टोरिया मार्केटमध्ये तर पुस्तकेही भाज्या फळे, चीज, सुका मेवा, तयार खाद्यपदार्थांच्या जोडीला बसली होती. इथेच अतिशय उत्तम पिवळे कलिंगड पाहायला आणि खायला मिळाले.

एका भागात टेबल खुर्च्या ठेवून तयार खाद्यपदार्थांची विक्री चालू असते. तिथेच बसून त्याचं आस्वाद घेता येतो. खरेदी करून झालेल्या श्रमांचा परिहार करणारे ठिकाण म्हणजे इथली मार्केट्स.

शिवाय जवळपासच्या शेतकऱ्याच्या शेतातली उत्पादने, तसेच घरी बनविलेल्या वस्तू जसे की, वेगवेगळ्या प्रकारचे जॅमस्, लोणची,वाईन्स, केकस्, मध, सॉसेजेस, अंडी इ. उत्पादनेही होती. शिवाय भाज्या, मासे, मांस स्वच्छ करून विक्रीला ठेवल्याने तो कचराही कमी होतो. आणि हा कचरा खतकंपन्या घेऊन जात असल्याने त्याचेही उत्पन्न मिळते हा दुहेरी फायदा. काहीजण

स्वतःच्या शेतातच खतासाठी तो कचरा वापरतात. त्यामुळे बाजार आणि शहर स्वच्छ राहण्यास मदतही होते.

सिडनीला मात्र खूप महागाई आहे त्यामुळे इथले आमचे घर डार्लिंग हार्बर येथे होते. एकमजली असले तरी दिवाणखाना, छोटेसे स्वयंपाकघर, त्याला लागूनच दोनच माणसे जेवायला बसू शकतील अशी एक फळी आणि त्याखाली दोन उंच टेबले. तरीही कुकिंग रेंज, फ्रीज, मायक्रोवेव्ह ओव्हन, स्वयंपाकाची भांडी, काटे, चमचे, क्रोकरी इ.साधनांनी परिपूर्ण होते. या घराला तळघर होते, त्यात लाँड्रीरूम होती. पहिल्या मजल्यावर एक बेडरूम आणि गच्ची होती.

तिथे सहा खुर्च्यांचे डायनिंग टेबल आणि बार्बेक्यूचा सरंजाम होता.त्याशिवाय या घरात वायफायही सुविधा होतीच,पण तीन लॅपटॉप; त्यातला एक एल इ डी टीव्ही स्क्रीनला जोडलेला होता. बाथरूम वरच्या मजल्यावर होती आणि खालच्या दिवाणखान्यातला सोफा नुसता सोफा नसून सोफा कम बेड होता.
सिडनीमध्ये कर पार्किंगचा प्रश्न फार बिकट आहे पार्किंगचे दर चढे दर पाहता (एका ठिकाणी तर २४ तासांसाठी ६० ऑस्ट्रेलीयन डॉलर्स होते.) इथे रेल्वे आणि बसने फिरणे संयुक्तिक होते. त्यामुळे रेडफर्न रेल्वेस्टेशनजवळचे हे घर तुलनेने लहान असले तरी फिरण्यासाठी सोयीचे होते.

(एखाद्या टुमदार घराप्रमाणे दिसणारे हे रेडफर्न रेल्वे स्टेशन. चिमुकले दिसत असले तरी त्याला १९ प्लॅटफॉर्मस् आहेत.)

इथे आम्ही चौघेच राहणार होतो. शेवाटचे दोन दिवस मात्र वर्धनचा एक लहानपणापासूनचा मित्र आम्हाला भेटायला येणार होता. त्यामुळे हे घर पुरेसे होते, शिवाय एक्स्ट्रा बेड आणि उशा, अंथरुणे, पांघरुणेही जिन्याखालच्या जागेत केलेल्या कपाटात होती. पुस्तके होती. शिवाय या घरमालकाने, जे सायकॉलॅजीचे प्राध्यापक होते त्यांनी आम्हाला चार पास दिले होते त्यात गरजेपुरते डॉलर्स भरून ते पास रेल्वे, बस आणि ट्राम तिकिटांसाठी, सवलतीच्या दराने वापरता येत असत. त्यामुळे बरीच बचत झाली. एका स्टेशनाच्या अंतरावर चायना टाऊन मार्केट आणि दोन स्तेशनांच्या अंतरांवर सुप्रसिद्ध सिडनी ओपेरा हाउस, हार्बर ब्रिज आणि टोरांगा झू होते. अर्थात तिथे जाण्यासाठी बोटीने पुढे जावे लागते. पोलीस स्टेशनही जवळच होते. या घराबाहेर रस्त्यावरच दोन कचराकुंड्या होत्या. तशा त्या प्रत्येक घरासमोर दिसत होत्या. दोन्हीतला कचरा वेवेगळ्या गाडीने नेला जात असे.

ॲडलेड येथे असताना आम्ही कांगारू आयलंड या निसर्गरम्य जागेला भेट दिली. तिथेही दोन दिवसांसाठी असेच घर भाडयाने घेतले होते. उंचावर असलेले हे घर बैठे, लांबलचक एकमजली कौलारू असे होते. पुढे व्हरांडा आणि मागे एका बाजूने सुसज्ज स्वयंपाक घरापासून सुरु झाले ते जेवणघर, दिवाणखाना आणि दुसऱ्या बाजूने तीन सुसज्ज बेडरुमसने संपत होते. शिवाय व्हरांड्यात बर्बेक्युची शेगागी न वेगळे डायनिंग टेबल बसायच्या बाकांसह होते.

सर्व घरातून अतिशय सुंदर देखावा दिसत असे. एकाच दिवसात निसर्गाने एखाद्या मॉडेलने कपडे बदलून फोटोला उभे राहावे त्याप्रमाणे आसमंत बदलून आम्हाला निरनिराळे नजारे दाखवत फोटो काढायला मजबूर केले.

एखाद्या फार्महाउससारखे भवताली खूप मोकळी जागा आणि सुरेख फुलझाडे होतो. मोठा माणसांसाठी झोपाळा होता, लहान मुलांसाठी वेगळी खेळण्याची जागा होती. आणि निलगिरीची अपार झाडे असलेले होती. हे घर

मर्मबंधातल्या ठेवीप्रमाणे मनात जपले आहे. परत जायचे झाले तर मला याच घरात राहायला आवडेल. तसे म्हटले तर कांगारू आयलंड हा स्वतंन्त्र लेखाचाच विषय आहे पण इथे फक्त राहिवासापुरती माहिती नि फोटो दिले आहेत.

नेटवर शोध घेऊन घरमालकाशी पत्रव्यवहार करून किमतीत घासाघीस करून आपल्याला आवडणारे आणि परवडणारे घर आपण राहण्यासाठी निवडू शकतो. स्वत:च्या मालकीचे अलिशान बंगले असल्यासारखे राहू शकतो. तिथल्या देखण्या आणि कमालीच्या स्वच्छ दुकानातून आवश्यक गोष्टींची खरेदी करून आपल्याला हवे तसे जेवण बनवू शकतो. कारण आपल्या देशातून दुसऱ्या देशात जाताना, तिथल्या अन्नाशी जिभेला जमवून घेता आले नाही तर ते पर्यटन मौजेचे ठरत नाही. त्यामुळे अशा, माझ्या नवऱ्यासारख्या लोकांसाठी आणि माझ्यासारख्या स्वत: खरेदी करून, स्वयंपाक करून, इतरांना जेऊ घालाण्यात रमणाऱ्या व्यक्तीसाठी, हा रहिवास आनंददायक होतो यात शंका नाही.

भटकंती विथ कलरिंग बुक्स

(लेखिका - किलमाऊस्की)

साधरण चार-सहा महिन्यांपूर्वी पुस्तकांच्या दुकानात भटकत असतांना एका कोपऱ्यात 'मंडला मॅजिक', 'मंडला कॅलिडोस्कोप', 'नेचर मंडला', 'डे ऑफ डेड मंडला' अशी अगम्य शीर्षकं असलेली पुस्तकांची चळत दिसली. हा प्रकार आहे तरी काय म्हणून एक-दोन पुस्तकं हातात घेतली. आत फक्त कोरी चित्रंच चित्रं. लहान मुलांसाठी कलरिंग बुक्स असतात तशी! म्हटलं असेल लहान मुलांसाठी काही. पुस्तकांवर वयोगट लिहिला नव्हता. लहान मुलांच्या मानाने जर किचकट वाटली पुस्तकं. हातातलं पुस्तक तसंच ठेऊन काही बाही शॉपिंग करुन घरी आले. या पुस्तकाबद्दल विसरुनही गेले. रात्री सहज हा विषय डोक्यात आला. *'Mandala'* असं गुगल केलं. '*Mandala Art theropy', 'Psychology of the Mandala', 'Transform your anger by drawing Madala'* एक ना दोन. म्हटलं हे एक नवीन फॅड वाटत. नेटवर थोडया फार इमेजेस बघितल्या. खूपच आवडल्या. मग जरा खोलात जाऊन वाचलं. तर काय अलिबाबाची गुहाच सापडली.

मंडला ड्रॉईंग बुक्स ही मोठ्यांसाठी असणारी कलरिंग बुक्स. कोरी चित्रं पुस्तकात असतात. आपण फक्त रंगवायची. चित्र रंगवताना कुठलाही नियम नाही. स्केचपेन्स, जेल पेन्स, खडूचे रंग काहीही वापरा. कलाकार असाल तर ऑईलपेंट्स, वॉटर कलर्सही वापरु शकता. हवं तसं, हवं तिथे, हवं तितकं रंगवा. वेळ नसला तरी रोज अगदी ५ मिनिटं वेळ काढून रंगवू शकता, वेळ असला तर कित्येक तास कसे निघून जातात हेही कळत नाही. मन केंद्रित होणे, थकवा दूर होऊन एक प्रकारचा उत्साह संचारणे हे रंगकामाचे साईड इफेक्ट्स. :-)

बाजारात अनेक प्रकारची मंडला कलरिंग बुक्स उपलब्ध आहेत. सुरूवातीला आपल्याला जमेल का हे या विचाराने साधं सोप्पं असं *'Creative Heaven Mandala'* या नावाचं मी पुस्तक निवडलं. अतिशय साधी सोप्पी नक्षी, आपल्या रांगोळीसारखी. रंग पसरण्याची भीती नाही त्यामुळे जेल पेन्सनी सुरवात केली रंगवायला. हे रंगवताना लक्षात आलं की आपल्याला आवडतंय हे. जमतंय सुद्धा. फारसं डोकं चालवावं लागत नाही. रंग रेषेच्या बाहेर पसरु न देणं महत्त्वाचं. सुरूवातीला एवढंच बंधन पाळलं. जसजसा हात बसला तसतसं रंगसंगतीचा विचार करायला सुरूवात केली. मंडला पुस्तकांसारखीच मंडला ॲप्सही उपलब्ध आहेत. थोडी अजून शोधाशोध केल्यावर मंडला कलरिंग बुक्सच्या धर्तीवर बाजारात अनेक प्रकारची 'अडल्ट कलरिंग बुक्स' मिळतात असं लक्षात आलं.

अनाहितामधे भटकंती अंकाची घोषणा झाली तेव्हा भटकंती आणि 'कलरिंग बुक्स' यांची सांगड घालायची ठरवलं. बाजारात उपलब्ध असलेल्या कलरींग पुस्तकांमधे शोधाशोध केल्यावर *'Inspiring Colors - Travel'* हे पुस्तक हाताला लागलं. यातली चित्रंही रंगवायला छान वाटली. 'इलस्ट्रेशन' प्रकारातली.

याच पुस्तकातली काही निवडक चित्रं रंगवून अंकासाठी द्यायचं ठरवलं. चला तर मग सुरु करुया "भटकंती विथ कलरिंग बुक्स" :-)

**** प्रस्तुत लेखातील चित्रे Inspired Coloring - Travel (ISBN # - 978-1-4723-9262-6) या पुस्तकातून घेतलेली आहेत.*

प्रवासात न्यायच्या पाककृती

(लेखिका - रेवती)

वर्षातून कमीतकमी दोनदा प्रवासाला जाणे ही गोष्ट आजकाल सर्रास होताना दिसते. यात तरुणवर्गच नव्हे तर वयस्क व्यक्तीही आनंदाने सहभागी होतात. नातेवाईकांकडे राहणे असेल तर जेवणाचा प्रश्न सहजगत्या सुटतो पण मुक्काम हॉटेलमध्ये असल्यास उदरभरणाच्या सर्व वेळा बाहेरचे खाणे वयोवृद्धांस व क्वचित तरुणाईलाही नको वाटू शकते. बाहेरचे खाणे न सोसवणारे लोक असतील तर घरून पदार्थ बांधून नेण्यास पर्याय नसतो. आमच्याकडे बाहेरचे खाणे ज्येष्ठ मंडळीच नव्हे तर आमचे अपत्यही फारसे पसंत करत नाही. प्रवास करताना मुक्कामी पोहोचल्यावर आजकाल हॉटेल्समधील खोल्यांना जोडलेले छोटेसे स्वयंपाकघर असते. तश्या खोल्या तुम्ही आरक्षित करू शकता. दिवसा स्नॅक्स प्रकारात तुम्ही चिवडा, लाडू, तिखटमिठाच्या पुऱ्या व आणखीची फराळाचे पदार्थ नेऊ शकता. दिवस सुरु करताना व दिवसभराच्या फिरण्यानंतर आपले खाणे हे पोषक व झटपट तयार होणारे असले पाहिजे. त्यातील काही पाककृती देत आहे.

पिठले

साहित्य- डाळीचे पीठ (बेसन), तेल, फोडणीचे साहित्य, हिरव्या मिरच्या, कांदे, कोथिंबीर, मीठ, आमसूल, जिरेपूड, सुके खोबरे, लागल्यास लाल तिखट.

कृती-

कढईत जरा जास्त तेलाची फोडणी करावी. तेलात मोहरी, हिंग, हळद, हिरव्या मिरच्या घालून परतावे.

मग बारीक चिरलेला कांदा घालावा. कांदा नेहमीपेक्षा थोडा जास्त परतावा. हवे असल्यास लाल तिखट घालावे.

त्यावर धुवून चिरलेली कोथिंबीर घालावी.

कोथिंबिरीची तडतड थांबली की डाळीचे पीठ, सुके खोबरे घलून मध्यम आचेवर परतत रहावे.

खमंग वास आल्यावर ताटात गार होण्यास हे मिश्रण पसरून ठेवावे.

पिठले पातळ होणार असल्याने त्याप्रमाणे वरून मीठ, एखादे आमसूल घालावे. भाजलेल्या जिऱ्याची पूड, आवडत असल्यास चिमूटभर साखरही त्यात घालावी.

पिठले तयार करण्याआधी भात करून घ्यावा. त्याची वाफ जिरेपर्यंत अगदी काही मिनिटात पिठले तयार होते. इनस्टंट पिठल्याचे मिश्रण जितके असेल त्याच्या अडीचपट पाणी पातेली उकळण्यास ठेवावे. उकळी आल्यानंतर आपले हे पिठले मिक्स त्यात घालून नीट ढवळावे. गाठी राहू देऊ नयेत. लागल्यास पाणी थोडेसे घालून झाकून वाफ आणावी. पिठले तयार आहे.

कांदा घातलेले मिश्रण एखादा दिवस चांगले राहते. हवा फार उष्ण असल्यास कांदा, हिरव्या मिरच्या व कोथिंबीर वापरू नये फक्त लाल तिखट घालावे. मिश्रण गार झाल्यावर साजूक तूप मिश्रणास चोळून डब्यात भरावे व प्रवासास न्यावे.

उप्पीट

साहित्य- रवा, कांदा, कोथिंबीर, मिरच्या, आलं, कढीपत्ता, उडीद डाळ, सुके खोबरे, मीठ, साखर, फोडणीचे साहित्य.

कृती-

प्रथम कढईत तेल घालून मोहरी, हिंग, हिरव्या/ सुक्या मिरच्यांची फोडणी करावी.

त्यामध्ये उडीद डाळ घालून हलवावे व लगेच कांदा घालावा.

कांदा झाकण न ठेवता परतावा, आल्याचा कीस परतावा. धुवून चिरलेली कोथिंबीर परतावी.

मग रवा घालून रंग बदलेपर्यंत परतावे व त्यात सुक्या खोबऱ्याच्या कीस घालावा.

मिश्रण परतून ताटात गार होण्यास काढून ठेवावे.

कोमट असताना लिंबाचा रस घालून एकत्र करावे म्हणजे पाण्याचा अंश उडून जाईल.

रवा गार झाल्यावर त्यात मीठ, साखर, चमचाभर साजूक तूप घालून एकत्र करावे व डब्यात भरून प्रवासास न्यावे.

उप्पीट करण्याआधी रव्याच्या मिश्रणाच्या दुप्पट मापाचे पाणी गरम करण्यास पातेल्यात अथवा मायक्रोवेवमध्ये ठेवावे. पाण्यास उकळी आल्यावर मूठभर फ्रोजन मटारचे दाणे घालावेत. रव्याचे मिश्रण पाण्यात घालून नीट ढवळून वाफ आणावी.

खिचडी

साहित्य- तांदूळ, मूगडाळ, फोडणीचे साहित्य, कढिपत्ता, मिरच्या, गोडा मसाला, लाल तिखट, मटार, मका, कोथिंबीर, सुके खोबरे इ.

कृती-

तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी, हिंग, हळदीची फोडणी करावी.
त्यात कढीपत्ता व आवडत असल्यास हिरव्या मिरच्या घालाव्यात, आवडीप्रमाणे मटार, मका घालावा.
जरा परतून डाळ तांदूळ, धुवून चिरलेली कोथिंबीर घालून मिश्रण कोरडे होईपर्यंत परतावे.
त्यात सुके खोबरे, गोडा मसाला व इतर मसाले आपल्या आवडीनुसार घालावेत.
मिश्रण ताटलीत गार होण्यास काढावे. अंदाजाने मीठ घालावे.
गार झाल्यावर साजूक तूप चोळून कोरडी खिचडी डब्यात भरून प्रवासास न्यावी.

करतेवेळी पातेल्यात पाणी उकळण्यास ठेवावे. उकळी अल्यावर त्यात खिचडीचे मिश्रण घालून आधी मध्यम व नंतर मंद आचेवर वाफा आणाव्यात.
मऊ मोकळी खिचडी वाढावी. बरोबर मायक्रोवेवमध्ये भाजलेला पापड, घरून नेलेले लोणचे वाढावे.

किचनेटची सोय असलेल्या हॉटेलच्या खोलीत सहसा छोटा फ्रीजही दिलेला असतो. त्यात मी मटारचे दाणे ठेवते. तशी सोय नसल्यास मटार नेऊ नयेत. मुक्कामी गेल्यावर जवळच्या ग्रोसरी स्टोअरमधून २ टोमॅटोज, एखादा कांदा, दह्याचा डबा घेऊन फ्रिजमध्ये ठेवते. खिचडी शिजेपर्यंत ऐनवेळी कोशिंबीर करून वाढता येते.
हा पदार्थ मायक्रोवेवमध्येही होऊ शकतो.

दशमी

साहित्य- कणिक, थोडे मीठ व थोडे तेल. कणिक भिजवण्यास दूध.

कृती-

कणकेत मीठ, तेल घालून कालवावे. गार दूध लागेल तसे घालून नेहमीप्रमाणे कणिक मळावी.
पंधरा ते वीस मिनिटे तेलाचा हात लावून झाकून ठेवावी. आता कणकेच्या नेहमीप्रमाणे पोळ्या कराव्यात.
गार झाल्यावर डब्यात भरून घ्याव्यात. या पोळ्या प्रवासात नेल्यास गार असतानाही मऊ राहतात व चविष्टही लागतात.
अशाचप्रकारे पाणी व दूध (किंवा फक्त पाणी) यांचे मिश्रण उकळून त्यात किंचित मीठ घालून ज्वारी, तांदूळ किंवा बाजरीचे पीठ घालावे व मोदकासाठी काढतो तशी उकड काढावी.
मिश्रण कोमट झाल्यावर मळून उंडे तयार करावेत. नेहमीप्रमाणे भाकरी करून तव्यावर व थेट गॅसवर भाजाव्यात.
भाकरी भाजल्या जाण्यास थोडा वेळ लागतो पण अगदी मऊ राहतात..

मी, प्रवास आणि बरंच काही

(लेखिका - किलमाऊस्की)

फिरायला सगळ्यांना'च' आवडतं (माझ्या नवऱ्याला सोडून) असं माझं ठाम मत आहे. ते मी घरात वेळोवेळी नवऱ्यासमोर हिरीरीने मांडत असते. असं म्हणतात, पायावर तीळ असेल तर प्रवास अगदी पाचवीला पुजलेला असतो. माझ्या दोन्ही तळपायांवर मोठाले दोन तीळ आहेत. आता त्यांना न्याय नको का द्यायला? या दोन तीळांमुळेच अधूनमधून मला *'Fernweh Attacks'* येत असतात. बिझनेस ट्रीप असो वा व्यवस्थित प्लॅन केलेली सुट्टीतली सहल असो, अचानक ठरलेलेली रोड ट्रिप अथवा अगदी निरुद्देशिय भटकंती असो, सर्व प्रकारचा प्रवास मला आनंद देतो. प्रवास आवडतोच पण त्याचबरोबर प्रवासात वापरायला जी नवनवीन ट्रॅवल गॅजेट्स, ॲक्सेसरीज, टूल्स बाजारात मिळतात ती देखील आवडतात. या विविध प्रकारच्या टूल्समुळे सहल सुखकर होतेच, त्याबरोबर प्रवासाची लज्जतही वाढते. या लेखात वेळोवेळी माझ्या सहलीची मजा द्विगुणीत करणाऱ्या ट्रॅवल गॅजेट्स, ॲक्सेसरीजची ओळख.

(१) होलोस्पेक्स ३-D ग्लासेस - ३-D सिनेमा पाहातांना आपण सर्रास ३-D चष्मे वापरतो. पडद्यावर दिसणाऱ्या चित्राचा त्रिमीतीय अनुभव घेणं या चष्म्यामुळे शक्य होतं. पण एखादं ठिकाण पहातांना या ३-D ग्लासेसच्या वापरामुळे अतिशय वेगळा अनुभव घेता येतो हे काही महिन्यांपूर्वी अनुभवलं. परदेशात ख्रिसमसच्या दिवसात ख्रिसमस लाईट्स हे महत्त्वाचं आकर्षण असतं. यावर्षी ख्रिसमस लाईट्स पहायला फ्लोरीडातल्या ऐतिहासिक शहराला - 'सेंट ऑगस्टीन' ला भेट द्यायचं ठरलं. सुमारे ४५० वर्ष जुनं हे शहर अमेरीकेतली पहिली परकीय वसाहत. या शहराने ऐतिहासिक खुणा जपून ठेवल्या आहेतच, त्याचबरोबर तिथल्या ख्रिसमस लाईटस नॅशनल जिओग्राफिकच्या क्रमवारीत जगातल्या अव्वल १० ठिकाणांमधे गणल्या जातात. १९ नोव्हेंबर ते ३० जानेवारी, दररोज जवळजवळ २० लाखाहून अधिक लाईट्सची रोषणाई सेंट ऑगस्टीन शहराला रात्री ६ वाजल्यापासून झळाळून टाकते. या लाईट्स शहरात पायी फिरुन किंवा ट्राम टूरने पहाता येतात. आम्ही ट्राम टूर घ्यायची ठरवली. या टूरमधे या होलोस्पेक्स ग्लासेसची ओळख झाली. रात्रीच्या गडद अंधारात या लाइट्सने झळाळलेलं शहर पहाणं हा अवर्णनिय अनुभव होताच पण तो द्विगुणीत केला या ३-D चष्म्याने.

(होलोस्पेक्स ३-D ग्लासेस)

हा चष्मा डोळ्यावर चढ्वता क्षणी भोवतालच्या लाईट्स स्नोफ्लेक आकारात बदलल्या. आपण शेकडो रंगीबेरंगी स्नोफ्लेक्सच्या जगात उभं असल्याचा भास होऊ लागला. हे कसं शक्य झालं? तर या होलोस्पेक्स ३-D चष्म्यात कॉम्प्युटर जनरेटेड नागमोडी रेषांचे पॅटर्न असतात. डीफ्रॅक्शन, नोड्स व ॲंटीनोडस (Defraction, nodes, antinodes) - साधं सरळं भौतिकशास्त्र वापरुन तयार केलेली लेन्स. या लेन्सचा वापर करुन लाईट्सकडे पाहीलं असता साध्या, छोट्याश्या बल्बमधून बाहेर पडणारा प्रकाश स्नोफ्लेक आकारात दिसू लागतो.

(होलोस्पेक्स ग्लासेस वापरुन स्नोफ्लेक्स आकारात दिसणाऱ्या ख्रिसमस लाईट्स)

याच तत्वाचा उपयोग करुन विविध आकार तयार करता येतात. असे हे चष्मे पार्टी, पिकनिक्सना वापरतात. हे चष्मे न वापरताही ख्रिसमस लाईट्सचा आनंद घेता आला असता, पण या चष्म्याच्या वापराने वेगळ्याच दुनियेत नेलं. या चष्म्याबद्दल अधिक माहिती इथे पहाता येईल. होलोस्पेक्सच्या वेबसाईटवरही हे चश्मे वापरुन व न वापरता चित्रं कसं दिसत हे पहाता येईल.

२. गो-प्रो कॅमेरा – "आपण झीप लाईनिंग करायला जाऊया!" मला अनेकदा अचानक झटके येत असतात त्यातलाच एक सकाळी उठल्या उठल्या आलेला हा नवीन झटका. "तुला जमणार आहे का? तिकडे गेल्यावर उंची बघून मग नको म्हणशील." इति नवरा. हे नेहमीचंच. प्रत्येक गोष्टीत शंका-कुशंका काढणे हे माझ्या 'कन्या' राशी शंकासुर नवऱ्याला चांगलं जमतं. पण मी काय कमी आहे होय! आपलं घोडं कसं दामटत ठेवायचं मला चांगलं माहीतीय. "आपण येत्या शनिवारी जातोय झीप लायनिंग करायला!" मी (नेहमीप्रमाणे) ठरवून टाकलं. झीप लायनिंगचं बुकिंग करतेवेळी वेबसाईटवर दोन ऑप्शन्स दिले होते - गो-प्रो कॅमेरा सकट अथवा गो-प्रो कॅमेराविना. "काय करायचाय कॅमेरा? आहे की आपल्याकडे" माझा आपला आगाऊ भाबडा प्रश्न. "अगं तो साधा कॅमेरा नाहिये, गो-प्रो कॅमेरा आहे." असं म्हणत नवऱ्याने गो-प्रो कॅमेऱ्याची वेबसाईट दाखवली.

गो-प्रो कॅमेरा अर्थात एच-डी क्वॉलिटी, वॉटरप्रूफ, शॉकप्रूफ व्हिडीओ रेकॉर्ड करण्याचं यंत्र. या कॅमेऱ्याची खुबी म्हणजे याचा आकार, वजन आणि यात रेकॉर्ड होणाऱ्या व्हिडियो रेकॉर्डींगची सुस्पष्ट व उत्तम गुणवत्ता. हाताच्या मुठीत मावणारा हलका असा हा कॅमेरा बरेचदा बंजी जंपिंग, स्काय डायविंग, स्किइंग असे प्रोफेशनल ॲडवेंचर स्पोर्ट्स खेळणारे रेकॉर्डींगसाठी वापरतात. गो - प्रो नक्की काय प्रकार आहे समजल्यावर अर्थातच कॅमेऱ्यासकट बुकिंग केलं. झीप लाईनिंग करतांना डोक्यावरच्या हेल्मेटवर हा कॅमेरा बसवण्यात आला.

(हेल्मेटवर बसवलेला गो-प्रो कॅमेरा)

आपल्याला हवा तेव्हा कॅमेरा ऑन-ऑफ करायचा आणि सहलीतली हवे तितके क्षण या कॅमेरात पकडून ठेवायचे. अतिउंच ते अतिरुंद, अरुंद, भरधाव अशा विविध प्रकारच्या आठ झीप लाईन्स आम्ही पार केल्या. पहिली लाईन क्रॉस करतांना थरथरणारे माझे हात, कापरा आवाज ते शेवट शेवटच्या लाईन्स क्रॉस करतांना (अति?)आत्मविश्वास, अत्यानंद, अगदी एक्सपर्ट असल्याच्या आवेशात नवऱ्याला केलेल्या अनाहूत सूचना, अगदी प्रत्येक क्षण या कॅमेऱ्याने टिपले. भीती, अत्यानंद, आश्चर्याने भारलेल्या झीप लायनिंगचे दोन तास अविस्मरणीय होतेच परंतु हे क्षण पुन्हा पुन्हा जगण्याची सोय करुन दिलेल्या त्या गो-प्रो कॅमेरालाही अनेकानेक धन्यवाद!

३. नॅशनल पार्क पासपोर्ट - *"National Parks Passport cancellation Station. Cancel your National Park Passports here!"* सिॲट्लच्या क्लोंडायक गोल्ड रश नॅशनल पार्क गिफ्ट स्टोअरमधला वॉलिंटीअरींगचा पहिला दिवस. स्टोअर मॅनेजर दुकानाची माहिती देत असतांना आम्ही वरचं वाक्य लिहिलेल्या एका टेबलापाशी आलो. पासपोर्ट कॅन्सलेशन? इथे? कशाला? आधीच स्टोअरमधल्या अनेक वस्तू, पुस्तकं, दुकानातली रोजची कामं बघून गोंधळात पडलेले मी, त्यात हा नवा गोंधळ. पासपोर्ट इथे कशाला कॅंसल करायचा? पासपोर्ट असा कॅंसल करता येतो? अनेक प्रश्नांची एकाच वेळी डोक्यात गर्दी. तेवढयात मॅनेजरने माहिती द्यायला सुरवात केली.

पर्यावरण संरक्षण व संवर्धन याकरीता १९१६ साली अमेरिकन सरकारने स्थापन केलेली *NPS* अर्थात 'नॅशनल पार्क सर्विसेस' ही संस्था यावर्षी १०० वर्ष पूर्ण करीत आहे. *NPS* जवळजवळ ३९६ नॅशनल पार्क, मॉन्युमेंट्स, ऐतिहासिक जागा यांची देखरेख करते. या उपक्रमाला सरकारकडून आर्थिक पाठबळ मिळतंच परंतु पैसा उभा करण्यासाठी दरवर्षी *NPS* तर्फे अनेक उपक्रम राबवले जातात. त्यापैकी एक नॅशनल पार्क पासपोर्ट. *"Passport to your National Park"* ही टॅगलाईन मिरवणारा *NPS* तर्फे राबवला जाणारा माझा हा सर्वात आवडता उपक्रम. नॅशनल पार्क पासपोर्ट हे १०० पानी ६ बाय ३.५ इंची छोटेखानी पुस्तक.

एखाद्या ठिकाणची आठवण म्हणून आपण तिथली खासियत असलेली वस्तू विकत घेतो. त्याच प्रमाणे नॅशनल पार्कमधे गेल्यावर तिथली आठवण म्हणून या पासपोर्टमधे त्या त्या ठिकाणचे मी स्टॅंप्स जमवते. :-)

हे ठसे कुठे मिळतात ? *NPS* च्या अधिकाराखाली येणाऱ्या प्रत्येक नॅशनल पार्कमधल्या विझीटर सेंटरमधे हे कॅन्सलेशन ठसे मिळतात. ते आपल्या पासपोर्टवर छापून घ्यायचे. हे पासपोर्ट पुस्तक विकत घ्यावं लागतं, पण स्टॅंप्स अर्थातच फुकट असतात.

नॅशनल पार्कला गेल्यावर तारीख-वार, जागेचं नाव, चिन्ह असलेले हे स्टॅंप्स पासपोर्ट वर मारून घेणं माझ्या अतिमहत्त्वांच्या कामामध्ये येतं (मी हे स्टॅंप मारायलाच नॅशनल पार्कला भेटी देत असते असं नवऱ्याचं मत आहे.)

असो, तर नॅशनल पार्क गिफ्ट स्टोअरमधे वॉलिंटियरींग करत असतांना या पासपोर्ट संबंधीचे दोन अनुभव.

एकदा दोन मुली दुकानात शिरल्या. दुकान फिरत असतांना स्टॅंपपाशी आल्या. स्टॅंप्स बघताच बॅगेतून चटकन पासपोर्ट काढला. तारीख ॲडजस्ट करुन ठ्सा मारणार इतक्यातच कॅश काउंटरुन माझं लक्ष गेलं. लाल रंगाचा पासपोर्ट? हाय रे कर्मा? काय ते माझ्या लक्षात आलं, माझ्यासारखाच त्यांचा घोटाळा झालेला. त्या खऱ्या पासपोर्टवर स्टॅंप मारत होत्या. वेळीच त्यांना मी अडवलं. हा स्टॅंप कशासाठी आहे ते समजावलं आणि अनर्थ टळला.

असाच एकदा एक गलेलठ्ठ अमेरिकन स्टॅंपची चौकशी करीत दुकानात आला. अगदी जर्जर झालेल्या त्याच्या पासपोर्टवर माझं लक्ष गेलं. (माझं बरोब्बर इतरांच्या पासपोर्टसवर लक्ष असतं. "भला मेरे पासपोर्ट्से ज्यादा स्टॅंप्स उसके पासपोर्टपे कैसे?") पान आणि पान भरलेलं. "पासपोर्ट बघू का?" असं विचारताच उत्साहाने त्याने माझ्या हातात पासपोर्ट दिला. हा पठ्ठा अगदी कैरो पसुन ते संपूर्ण उत्तर

दक्षिण अमेरिकेतल्या अनेक नॅशनल पार्कमधे फिरलेला. प्रत्येक ठिकाणचे स्टॅंप्स नेटाने जमवलेले. सांभाळून ठेवलेले. बोलता बोलता अजून कोणाचं तरी नाव घेउन म्हणाला, त्या माणसाचा रेकॉर्ड आहे कितीतरी स्टॅंप्सचा तो तोडाचाय त्याला. मी त्याला आनंदाने शुभेच्छा देत पासपोर्ट परत केला.

हे स्टॅंप्स माझ्यासाठी फक्त स्टॅंप्स नाहीत तर अनेक आठ्वणींचा कोलाज आहे. मिपावर क्लोंडायक गोल्ड रश मालिका लिहितांना माहीती जमवण्यासाठी गोल्ड रश म्युझियमला दिलेली पहिली भेट असो, वा नोकरी मिळाल्यावर या म्युझियममधल्या वॉलिंटीयरिंग कामाचा शेवटचा दिवस असो, 'लेक २२' ची धापा टाकत ३ तासाची अवघड चढण असो वा अचाकन आलेल्या पावसाने पचका केलेली माउंट रेनियरची सहल असो. या आठ्वणी स्टॅंप्सच्या रुपात साठवल्या आहेत. माझ्या खऱ्या खुऱ्या भारतीय पासपोर्टच्या बरोबरीनेच हाही पासपोर्ट माझ्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे.

४. सेल्फ गाईडेड ऑडीयो टूर डिवाईस - "इथल्या प्रत्येक विभागाला क्रमांक दिलेले आहेत. एक क्रमांकापासून सहल सुरु होते व २२ व्या क्रमांकावर संपते. हे तुमचे सेल्फ गाईडेड ऑडीयो टूर डिवाईस. यावर १-२२ क्रमांक आहेत. ज्या ब्लॉकमधे तुम्ही उभे असाल तिथला क्रमांक दाबला की त्या विभागाविषयी माहीती या यंत्राद्वारे हेडफोनच्या सहाय्याने ऐकता येईल. माहिती पुन्हा पुन्हा ऐकण्यासाठी # दाबू शकता. 'विया झोरायदा' अनोखं जग आहे. तुम्हाला नक्कीच आनंद देईल. 'विया झोरायदा' मधे तुमचं स्वागत आहे!" सेंट ऑगस्टीन शहर फिरतांना तिथला प्रसिद्ध वाडा 'विया झोरायदा' चुकवून चालणार नव्हता. विझीटर सेंटर मधला मनुष्य वाड्याची संक्षिप्त माहीती देत होता. 'सेल्फ गाईडेड ऑडीयो टूर डिवाईस' बद्दल ऐकून होतो परंतु कधी वापरण्याचा योग आला नव्हता. हा योग जुळून आला हे म्युझियम पहातांना आला.

रिमोटच्या आकाराचं छोटंसं, हलकं खिशात मावेल व हाताळायला सोप्पं असं यंत्र. हेड्फोन जोडलेले. आवाज कमी जास्त करायला बटनं. स्पॅनिश, इंग्लिश, फ्रेंच या तीन भाषेत वाड्याचा इत्यंभूत इतिहास अगदी मजेशीर रितीने, निरनिराळे संदर्भ देउन सोप्या भाषेत ऐकता येत होता. वेळोवेळी हवं तसं रेकॉर्डींग मागेपुढे करता येत होतं आवडलेल्या जागी किंचित जास्त वेळ रमता येत होतं. सेल्फ गाईडेड ऑडीयो टूर डिवाईसमधलं सांद्र संगीत भूतकाळात नेत होतं.

हा वाडा म्हण्जे स्पेन मधील प्रसिद्ध 'ला ग्रानादा' येथील 'अलांब्रा पॅलेस'ची छोटी आवृत्ती. १८८३ साली हिवळ्यात रहाण्यासाठी फ्रॅंक्लिन स्मिथने बांधलेला हा वाडा पुढे अब्राहम मुस्स्लेम याने विकत घेतला. वाड्याच्या दोन्ही मालकांनी त्यावर निरातिशय प्रेम केलंच, पण वेळोवेळी या वाड्याच्या संग्रहात अनेकानेक सुंदर वस्तूंची भर घातली. इथेच २५०० जुनी इजिप्शियन मांजराच्या केसापसून बनवलेली पर्शियन रग पहायला मिळाली. विविध वस्तूंनी नटलेल्या अतिशय देखण्या अशा या वाड्यात दोन तास या यंत्राच्या सहाय्याने मंत्रमुग्ध केलं. वाड्याची सफर या यंत्राशिवाय ही करता आली असती, परंतु सोबतीला असा माहितीचा खजिना घेउन केलेली सफर नक्कीच लक्षात रहाण्यासारखी होती.

५. डॅश कॅम - डॅश कॅम अर्थातच डॅश बोर्ड कॅमेरा. चारचाकीच्या डॅशबोर्ड्वर हा कॅमेरा चिकट्वता येतो. हा कॅमेरा चालत्या कारच्या विंड्स्क्रिन मधून दिसणारया गोष्टी टिपत असतो. घाटाचा वळणावळणाचा अवघड रस्ता वा निसर्गरम्य सागरीमार्ग अनेकदा रोड ट्रिप करत असतांना चालत्या गाडीत रेकॉर्डिंग करायला या कॅमेऱ्याचा वापर होतो.

(डॅशकॅमचा वापर प्रामुख्याने रस्त्यावरील अपघात रेकॉर्ड करण्यासाठी करतात.)

६. किंडल पेपरव्हाईट - ऑफिसच्या कामासाठी वरचेवर ट्रिप्स कराव्या लागतात. बरेचदा विमानं उशीरा अवतरणं, दुरुस्तीसाठी उशीर होणं, हवामानामुळे प्रवासात होणारा उशीर यामुळे कधी कधी विमानतळावर मुक्काम ठोकावा लागतो. अशावेळेस माझ्या मदतीला धावून येतो तो प्रवासातला माझा दोस्त, सखा, सोबती - किंडल पेपरव्हाईट.

सहा इंची छोट्या पुस्तकाच्या आकाराचा हलका असा इ - रिडर. ऑफिसमध्ये कामाच्या संदर्भातली जाडजूड पुस्तक असोत वा कथा-कादंबऱ्या असोत, क्रोशाचे निरनिराळे पॅटर्न्स असोत, अनेक पिडिएफ्स, वेळोवेळी मी यात भरत असते. अगदी हलक्या पुस्तकासारखा, पुस्तकासारखेच इ-इंक फाँट्स असणारा किंडल एकदा चार्ज केला की महिनाभराची निश्चिंती. यातली खास डोळ्यांसाठी बनवलेली बॅकग्राउंड लाईट अंधारात विशेषतः विमानात सहप्रवासी झोपला असतांना वाचण्यासाठी उत्तम. खुणेसाठी बुकमार्क जवळ बाळगायची गऱज नाही. महत्त्वाच्या ओळी हायलाईट करुन ठेवायला हायलायटर्स. गरज लागेल तेव्हा सतत सेवेत हजर असणारा इन-बिल्ट शब्दकोष. किंडलवर एकदा का पुस्तक उतरवून घेतलं की पुस्तक वाचण्यासाठी इंटरनेटची गरज नाही. मराठी पुस्तकं फारशी उपलब्ध नाहीत अजून किंडलवर पण इंग्रजी पुस्तकं वाचणाऱ्यांसाठी किंडल लायब्ररी हा खजिनाच. प्रवासासाठी सामन भरतांना लॅपटॉप, चार्जर, ऑफिसची कागदपत्रं याच बरोबर बॅगेत कोंबला जाणारा किंडल पेपरव्हाईट हा माझा प्रवासातला सुखनिधीच!

७. मंडला कलरींग बुक्स - विमानातल्या कंटाळवाण्या प्रवासात किंडलच्या बरोबरीने सोबत करणारी अजून एक गोष्ट म्हणजे मंडला कलरींग बुक्स. बॅगेत या पुस्तकांसाठी रंगीबेरंगी पेन्सिल्स, खडू, स्केचलेन्ससाठी हक्काचा कप्पा असतोच. कित्येकदा महत्त्वाच्या कागदपत्रांना कोपऱ्यात ढकलून मंडला कलरींग बुक्स बॅगेत जागा करुन घेतात. लांब कंटाळवाण्या प्रवासात रंगकाम करत बसणं हे माझं अत्यंत आवडतं काम. मंडलाची रंगकामाची ही छोटीशी झलक.

खरं तर या सर्व निर्जीव वस्तू पण प्रवासाचा प्रत्येक क्षण सजीव करणाऱ्या, आठवणी जपणाऱ्या. मी जेव्हा अगदी जख्ख म्हातारी होईन, अगदी चालता फिरता ही यायचं नाही, तेव्हा या सर्व आठवणीचा जिग्सॉ पझल समोर उघडून, तारीख वार या सहीत साठवून ठेवलेले हे क्षण जुळवत बसेन!

बचके रेहना रे अर्थात प्रवासातली ...सुरक्षितता

नेहमी ठराविक ठिकाणी प्रवास करणाऱ्यांसाठी -

- नेहमीचेच प्रवासी बऱ्याचदा त्या वेळेला असतात एकमेकांना नेहमी त्याच प्रवासात बघुन ओळख झालेली असते त्यामुळे सुरक्षित वाटते.
- ऑफिस नंतर किंवा कॉलेज उरकुन निघणार असाल तर गाडीला किती गर्दी असु शकते आणि घरी पोहोचायला किती वाजतील याचा विचार करुन जर उशीर होईल असे वाटत असेल तर रात्री जाण्यापेक्षा सरळ दुसऱ्या दिवशी लवकर जा.
- नेहमी त्याच बस ने प्रवास सकाळी करणाऱ्या एक दोन मित्र मैत्रीणींचे फोन नं जवळ असु द्या म्हणजे ठरवून सोबत निघता येते. तिकिटे काढताना पण समन्वय साधुन एखाद दुसऱ्याला लवकर जाऊन आधी रांगेत उभे राहता येते. आणि मग रांगेत जास्त ताटकळावे लागत नाही.
- सध्या ऑनलाईन एस्टी तिकिट बुकिंग करता येते त्याचाही फायदा घ्या. वेळ आणि दगदग वाचते.सारखं मोबाइल वर बिझी असू नये. बी अवेअर आजूबाजूला काय चाललय याबाबतीत. बर्याच पिक पॉकेटिंग च्या घटना यामुळे टाळता येतात.

टिप्स - अनाहिता | संकलन - मधुरा देशपांडे

आसावरीची पर्यटन भरारी

(लेखिका - मधुरा देशपांडे)

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात अनेकांना कामानिमित्त, आवड म्हणून जगभरात फिरण्याची संधी मिळतेपण . तरीही खरे भटके हे यापेक्षाही वेगळं असं काहीतरी करतात आणि त्यांचे अनुभव इतरांनाही प्रेरणा देतात ७त्यात जर . ही खंडं पर्यटनाची आवड म्हणून स्वबळावर, एकटीने आणि तिशीच्या आत फिरणारी एक मुलगी असेल तर? आसावरी ही यातलीच एक कुणालाही कौतुक वाटेल अशी ही तिची जगभ्रमंतीची .कहाणी -

तुझ्याबद्दल थोडक्यात सांग.

मी मूळ पुण्याची. अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी आले आणि आता इथेच नोकरी करते.

काय निमित्ताने सगळीकडे फिरणं झालं? कामानिमित्त की केवळ भटकंतीच्या हेतूने? आणि हे एकटीने सगळं पर्यटन करण्यापूर्वी कुठे फिरली होतीस, तेव्हापासून असे कही वाटत होते का?

लहानपणापासूनच बऱ्याच गोष्टींमुळे अशा भ्रमंतीची प्रेरणा मिळाली. आमचे शेजारी फ्रेंच मित्रमंडळासोबत आणि अजून काही आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम करायाचे. त्यामुळे त्यांच्याकडे वेगवेगळ्या देशातले लोक येऊन राहत असत. तेव्हापासून या विविध देशांशी, तेथील लोकांशी जवळून संपर्क यायचा. तेव्हा कुतूहल होतं खूप. मी नुकतीच शाळेत इंग्रजी शिकायला सुरुवात केली होती आणि मी लहान असल्यामुळे माझ्याशी बोलायला त्या परदेशी नागरिकांना मजा येत असे. आई बाबाही मला नाकाशावर त्यांचे देश दाखवत. हळूहळू वेगवेगळ्या देशांची नाणी जमवणे, पोस्टाची तिकिटे जमवणे याचा छंद जडला. तेव्हा कोणी ओळखीचे किंवा नात्यातले परदेशी गेले तर आवर्जून माझ्यासाठी तिथली नाणी आणत. मग त्यांच्याशी त्या देशाबद्दल गप्पा होत असत आणि फ़ोटो पाहिले जात. पुढे शाळेत भुगोल शिकताना ह्या सगळ्या देशांची वैशिष्ट्ये, भाषा, झेंडे, राजधान्या, जागतिक आश्चर्ये या गोष्टी आपोआपच माहिती करून लक्षात ठेवू लागले. त्यावर असलेल्या वेगवेगळ्या प्रश्नमंजुषेमध्ये भाग घेऊ लागले. लायब्ररी मध्ये ॲटलास आणि विश्वकोश यामध्ये जग तसेच जागतिक प्रवास याबद्दल वाचत राहिले. डीडी वरची 'सुरभि' मालिका बघताना नेहमी वाटायचं की आपण पण सिद्धार्थ आणि रेणुकासारखे फिरुयात. भारतात महाराष्ट्र आणि इतर आसपासच्या राज्यांमध्ये सुट्टीत फ़िरणं झालं, पण परदेशात जाणे हे फार खर्चिक असल्यामुळे असं कधी वाटलं नाही की मी प्रत्यक्षात लवकर असे प्रवास करू शकेन. पण नव्वदच्या दशकात इंटरनेट उपलब्ध झाले. त्यावेळी मी पत्र मैत्रीच्या एका संस्थळावर सदस्य झाले. माझ्या वयाच्याच परदेशातल्या मुला-मुलींबरोबर इमेल्स मधून शिक्षण पद्धती, संस्कृती, सणवार, एकंदरीत रहाणीमान, आवडी निवडी, महात्वाकांक्षा या आणि अशा इतर विषयांवर गप्पा मारू लागले. या संभाषणांमधून मला बऱ्याच संस्कृतींची कल्पना येऊ लागली या सगळ्यातून जगाचं एक चित्र मनात निर्माण होतं गेलं.

पुढे आई बाबांना कामासाठी अमेरीकेला जाण्याची संधी मिळाली त्यावेळी त्यांनी तिथल्या युनिव्हर्सिटीना भेट दिली आणि तिथल्या उच्चशिक्षणाच्या संधीबद्दल चौकशी केली. ईंजिनिअरींग नंतर अमेरीकेत उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळाली आणि अमेरिकेत आले. त्याआधी एकदा एका प्रवासी कंपनीतर्फे घराचे सगळे थायलंड आणि सिंगापुर बघायला गेलो होतो गाईडेड टूर असल्यामुळे तो पहिला परदेशात फिरण्याच्या अनुभव मस्त एंजोय केला. पुढे अमेरिकेत युनिव्हर्सिटीमध्ये असताना २ वर्षात जवळ जवळ ४० -५० देशातल्या विद्यार्थ्यांशी बोलणं झालं. तेव्हा त्यांच्यासोबत आपापल्या देशांबद्दल तुलनात्मक चर्चा व्हायच्या. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थिती लावली. एका कार्यक्रमात भारताबद्दल माहिती सादर केली आणि त्यावर लोकांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तरे दिली. अनेक

आंतरराष्ट्रीय तसेच भारतातल्याही वेगवेगळ्या राज्यातल्या लोकांबरोबर काम केले. सगळे जग एका छताखाली एकवटले असल्याचा अनुभव आला.

पुढे नोकरी लागल्यावर नवीन वर्षाच्या मुहुर्तावर युरोपला जायचं ठरवलं. नुकतीच भारतात जाउन आल्यामुळे घरातूनही इतर देश फिरण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. एकटीने पहिलाच प्रवास असल्यामुळे खूप उत्सुकता होती. व्हिसा, चलन, भाषा याबद्दल भरपूर माहिती गोळा केली. फ्रान्स मध्ये एका पत्र मैत्रिणीकडे राहिले. पॅरीसमध्ये दहा दिवस राहून तिथल्या रोजच्या आयुष्याचा थोडाफार अनुभव घेतला. त्याच वेळी पुढे जर्मनीत अजून एका पेन फ्रेंडकडे नाताळ साजरा केला. ह्या अनुभवानंतर परदेशात फिरण्यासाठी नक्की काय काय लागते याची कल्पना आली आणि एकटी फिरू शकते हा आत्मविश्वासही आला. त्यानंतर पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय टुरिजमचे स्वरूप कळू लागले. सुरूवातीला आशिया, अमेरिका आणि युरोप हे खंड केले, ते बरंच सहज झालं. मग अजून अंदाज आला की कशा पद्धतीचा प्रवास मला आवडतो, त्याचा पॅटर्न कसा असावा इत्यादी. मग ३० व्या वर्षाच्या आत ७ ही खंड फिरुयात हे ठरवले आणि त्याच ध्यासाने बाकीच्या खंडातील भटकंतीचे बेत केले.

७ खंडांत फिरण्याची सुरूवात कशी झाली? जेव्हा ६ खंड झाले आणि ७ व्या खंडाची सहल ठरली तेव्हा कसं वाटत होतं? आत्तापर्यंत कोणत्या देशात फिरलीस?

पहिलाच युरोपात फिरण्याचा अनुभव फार छान होता. फ्रान्स आणि जर्मनी मध्ये भाषा येत नसली तरी नकाशे, सार्वजनिक वाहतुक आणि इतर उपलब्ध साधन सामग्रीचा कसा वापर कारायचा याची साधारण कल्पना आली. मग पुढची दोन वर्ष हिवाळ्यात पेन फ्रेंड्सकडे आणि होस्टेल्स मध्ये राहून स्पेन, पोर्तुगाल आणि बेल्जिअम, नेदरलँडस, लक्सेमबर्ग, डेन्मार्क फिरले. जरी प्रत्येक देशाची संस्कृती वेगळी असली तरी युरोप ट्रीप एकसारखी वाटु लागली. जुन्या इमारती, ऐतिहासिक जागा, संग्रहालये, खाण्याचे पदार्थ, थंड हावामान ह्यापेक्षा आता काहीतरी वेगळे पाहिजे असे वाटू लागले. चौथ्यावर्षी हिवाळयात भारतात गेले असताना तिथूनच पुढे ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंडला गेले. परतताना ऑस्ट्रेलियाहून पॅसिफिक महासागरावरून अमेरिकेत परतल्यामुळे त्यानिमित्ताने पृथ्वीप्रदक्षिणा झाली.

फेसबुकवर माझे हे फिरतीचे फोटोज बघून बऱ्याच मित्र मैत्रिणींनी सांगुन ठेवलं होतं की पुढच्यावेळी कुठे जाणार असशील तर आम्हाला कळव. पुढची ट्रीप पेरूची ठरली आणि त्यावेळी अजून एक दोन जणांच वेळापत्रकही जुळून आलं. ही पेरू ट्रीप पार पडली तेव्हा सहज कोणाशी तरी बोलताना लक्षात आलं की आपले पाच खंड तर सहज बघून झाले. मग त्यावेळच्या हिवाळ्यात भारतात जाणे होणार नव्हते त्यामुळे हिवाळ्यात आफ्रिका खंडात थोड्या उबदार ठिकाणी जाऊ असे ठरवले. त्यानिमित्ताने अजून एका खंडाची सफरही होईल हाही एक हेतू होताच. एका आठवड्याच्या सुट्टीत जाण्याच्या दृष्टीने दक्षिण आफ्रिका, केनिया हे देश फार मोठे आहेत आणि शिवाय तिथला खर्चही जास्त वाटला. मोरोक्को बद्दल लहान आणि त्यामानाने स्वस्त देश, शिवाय पर्यटनाच्या दृष्टीनेही सध्या विशेष नाव असलेला म्हणून खूप ऐकलं होतं. शिवाय हिवाळ्यात तिथे हवामानही फार थंड नसते. त्यामुळे तिथे जायचे ठरवले आणि जाऊन आले देखील. अशा प्रकारे आफ्रिका खंडाची सहल झाली.

शेवटी फक्त अंटार्क्टिका हा एकाच खंड राहिला होता. कुतूहल म्हणून थोडी माहिती मिळवली तेव्हा असं लक्षात आलं की त्यातल्यात्यात परवडणारी अशी एक टुर उपलब्ध आहे आणि उन्हाळा हा तिथे जाण्याचा उत्तम ऋतू आहे. एकोणतिसाव्या वाढदिवसाचे निमित्त साधून ही सहल बुक केली आणि तिशी गाठण्यापुर्वी सगळ्या खंडांमधे फिरून झाले. मग तिसावा वाढदिवस संस्मरणीय करण्यासाठी अलास्काला जाऊन आर्क्टिक सर्कलला ऑरोरा बोरॉयलिस

(*Aurora Borealis*) बघितल्या. माझा अजूनही विश्वास बसत नाही की खरोखरच माझे जगभर फिरण्याचे स्वप्न साकार होत आहे.

आतापर्यंत पाहिलेले देश -

* उत्तर अमेरिका - युनायडेड स्टेट्स ऑफ अमेरिका
* दक्षिण अमेरिका - पेरु, चिली
* आशिया - थायलंड, सिंगापुर, दक्षिण कोरिया, जपान, भारत आणि युनायडेड अरब एमिरेट्स
* ऑस्ट्रेलिया - ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड
* अंटार्क्टिका - अंटार्क्टिका
* आफ्रिका - मोरोक्को
* युरोप - फ्रान्स, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल, बेल्जियम, नेदरलँड्स, लक्सेम्बर्ग, इटली, व्हॅटिकन सिटी, डेन्मार्क, स्वित्झर्लंड

हे ७ ही खंड फिरताना यापैकी प्रत्येक खंडाबद्दल काय वैशिष्ट्य जाणवले?

सगळ्या खंडांमधील फिरतीबाबत बोलायचं झालं तर अनेक फरक आहेत, असणारच. पण मला प्रत्येक ठिकाणी समान सूत्रही तेवढीच आढ़ळली. म्हणजे जे फरक आहेत ते बघता असं जाणवलं की भौगोलिक स्थान आणि हवामान याप्रमाणे प्रत्येक देश, खंड यातले जीवनमान वेगळे आहे. तेही प्रत्येकाने त्या परिस्थितीशी जुळवून घ्यायला जे काही सर्वोत्तम असेल, तसे ते रुळत गेले आहे. शिवाय प्रत्येक खंडात जसे देशाप्रमाणे बदल होतात, तसेच प्रत्येक शहरातही होतात. उदा. दक्षिण कोरियाची राजधानी सेउल, तिथे खूप टेकड्या आहेत. त्यामुळे लोक नेहमी हायकिंग करतात किंवा पूर्वी करायचे. तो त्यांचा पारंपारिक व्यायाम प्रकार होता. पण आता नवीन पिढ्या यासोबतच जिमला सुद्धा जाताना दिसतात, कारण रोजच्या धावपळीच्या आयुष्यात ते जास्त सोयीचं आहे. म्हणजेच प्रत्येक देशात, शहरात, तिथल्या लोकांचं जीवनमान हे त्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी जसं असेल तसं घडत गेलं आहे आणि काळानुरूप त्यात बदल झालेले आहेत. असे बदल आपल्याला भारत, चिली, स्वित्झर्लंड, म्हणजेच थोडक्यात सगळीकडे दिसतील. आधुनिक जीवनमानाशी जुळवून घेताना हे बदल होणं हा हे अपरिहार्य आहे. आज तंत्रज्ञानाने इतकी भरारी मारली आहे. इंटरनेट, स्मार्टफोन्स च्या वापरामुळे जगभरातल्या बातम्या, तिथल्या भाषा, संस्कृती हे सगळं एका क्लिकवर उपलब्ध आहे आणि त्यामुळे पर्यटन सोपं झालं आहे. जगभरातील नवीन पिढी जागतिकीकरणाच्या बाबतीत अधिक जागरूक दिसते आहे. आपल्या पिढीला सहजपणे दुसऱ्या देशात जाणे, तिथे राहणे याची उत्तम संधी मिळाली आहे. एकाच ठिकाणी राहतानासुद्धा निरनिराळ्या संस्कृतीतील लोकांशी आपला संपर्क येतो. त्यामुळे असं वाटतं की पूर्वी विविध संस्कृती स्वतंत्रपणे विकसित झाल्या आणि आता सगळं जग एकत्र येतंय आणि त्यातून नवीन संस्कृती उदयास येते आहे. पण या सगळ्यात समान काय आहे तर मानवी स्वभाव. मला सगळीकडे सतत असं वाटलं की माणसं सगळीकडे सारखीच असतात. इतकं फिरताना कधीही मी कुठेतरी परग्रहावर आहे असं वाटलं नाही. भारत किंवा दक्षिण अमेरिका, यात शिक्षणाचे महत्व, यशापयशाच्या व्याख्या आणि आर्थिक किंवा इतर अडचणी या सारख्याच आहेत. आर्थिक विषमता, मध्यमवर्गीयांच्या अडचणी, त्यांच्या आशा आकांक्षा हे सगळीकडे समानच आहे. हे सगळं बघून अशी आशा करू शकतो की जगभरातले लोक एकमेकांच्या या वेगळेपणाला समजून घेऊन एकत्र येऊन मानवतेच्या विकासासाठी प्रयत्न करतील. आणि त्याच्व एळी आपापला सांस्कृतिक ठेवाही जतन करतील, कारण ती प्रत्येकाची ओळख आहे आणि ती जपायलाच हवी.

हे सगळं पर्यटन करताना घर, नोकरी आणि आर्थिक बाबी हे कसं मॅनेज केलंस?

नोकरीत वर्षभरात एकून १०-१५ दिवस सुट्टी मिळू शकते. त्याशिवाय कंपनीचे शटडाऊन, लाँग विकेंड्स, वर्क फ्रॉम होम असे काही करून अजून सुट्टी मिळवता येते किंवा तशी जोडून प्लॅन करता येते. साधारणपणे १५ ते २० दिवस एक

संपूर्ण सहल अशा पद्धतीने मी आजवर फिरले. यात काही वेळा अमेरिकेतून भारतात जाताना किंवा येताना एखादी सहल, नाहीतर मग पुर्ण वेळ फक्त भटकंती असे पर्याय निवडले. माझे कुटुंब भारतात आहे, त्यामुळे २ वर्षातून एकदा तरी मी तिथे जातेच. वर्षात एकदा मोठी आणि एक लहान ट्रिप असे ठरवले. वर्षाच्या सुरूवातीलाच मी माझ्या संबंधित मॅनेजरशी बोलून अंदाज घेते की कसा प्लॅन आहे. आणि त्याप्रमाणे माझ्या वैयक्तीक बाबी बघून सहल ठरवायचे. जेवढी लवकर सुट्टी मंजूर होईल, तेवढं पुढचे सगळे ठरवायला मदत होते. मग यात आधी बुकिंग केल्यामुळे वाचणारा खर्च असेल, व्हिसा आणि माहिती मिळवायला जो काही वेळ लागत असेल, या सगळ्यासाठी हातात वेळ राहतो. ऐन वेळेवर घाई होत नाही. पूर्वनियोजन हवंच हे या सगळ्यातून लक्षात येतं.

आर्थिक बाजू -

सहलीतला सगळ्यात खर्चिक भाग म्हणजे विमानाची तिकिटं आणि हॉटेल्स बुकिंग. अमेरिकेत राहात असल्याने साधारण ४ महिने आधी विमानाची तिकिटं काढली तर बराच फायदा होतो हे लक्षात घेऊन ते मॅनेज करते. राहण्याची व्यवस्था जिथे मित्र मैत्रिणी किंवा ओळखीचे यांच्याकडे होत असेल तर उत्तम, नाहीतर मी लक्झरी हॉटेल्स हवेत अशा प्रकारातली नाही. hostels.com, bookings.com, hostelworld.com, hotels.com इथे बरेचसे स्वस्तातले पर्याय मिळतात. मी अशी हॉटेल्स बुक करते जिथून जवळच रेल्वे स्थानक किंवा इतर सार्वजनिक वाहतूकीच्या जागा जवळ असतील. पण स्वस्त जागा म्हणून अस्वच्छ किंवा आवश्यक त्या सोयी नसलेल्या जागा, केवळ जाहीरातीसाठी स्वस्त आणि मग मागाहून येणारे एक्स्ट्रा चार्जेस असं काही होऊ नये यासाठी अशा जागांबद्दल जे आंतरजालावर रिव्ह्युज असतात ते काळजीपूर्वक बघणे आवश्यक आहे.

खाण्याच्या बाबतीत सुद्धा पैसे वाचवता येऊ शकतात. तिथले स्थानिक अन्नपदार्थ खाणे हा जरी एक अनुभव असला तरीही प्रत्येक वेळी ते शक्य होइलच नाही. दिवसभर फिरत असताना खायला सोबत नेता येतील असे पदार्थ बरे पडतात. अशा वेळी जवळच्या सुपरमार्केट्स मध्ये जाऊन स्वस्तात खाद्यपदार्थ मिळू शकतात.

याशिवाय आधी माहिती काढून ठेवली तर प्रत्येक देशातले स्वस्तातले सिम कार्ड्स मिळवता येतात आणि पैसे वाचवता येतात. कधीकधी थोड्या वेळासाठी सोबतच्या लोकांचे वायफाय शेअर करता येते. बजेट ट्रॅव्हलचे बरेच पर्याय असतात, फक्त त्यासाठी योग्य माहिती काढायला हवी.

या विविध देशात फिरताना व्हिसा, त्याची माहिती मिळवणे हे कसं जमवलंस?

कुठल्याही देशाला पर्यटक हवेच असतात. त्यामुळे पर्यटक म्हणून जेव्हा आपण कुठल्याही देशात जातो, तिथे फिरून तिथे पैसे खर्च करणार असतो, त्यामुळे ते स्वागतच करतात. इतर व्हिसा पेक्षा तुलनेने पर्यटन व्हिसा सोपा असतो. कारण फिरुन झाले की लोक परत जाणार याची खात्री असते आणि सहसा व्हिसा देताना पण त्या प्रमाणेच दिला जातो. कुठल्याही देशात जाताना त्यांच्या दूतावासाच्या (*Embassy*) संस्थळावरून माहिती काढणे हे पहिले काम. तिथे पर्यटन व्हिसा बद्दल सगळी माहिती दिलेली असते. यात कुठले कागदपत्र लागतील, किती पैसे भरायचे, मुलाखत आहे की नाही, किती वेळाचा व्हिसा मिळू शकतो ही सगळी माहिती दिलेली असते. त्याप्रमाणे पासपोर्ट (६ महिन्यांपेक्षा अधिक मुदत असलेला), जाण्यायेण्याची विमानाची तिकिटं (व्हिसासाठी कन्फर्म बुकिंगच लागतं असं काही नाही, फक्त एक प्लॅन तयार असायला हवा आणि त्याप्रमाणे तात्पुरती तिकिटं हवीत) ज्यामुळे तुम्ही परत जाल याची खात्री पटते, हॉटेल बुकिंग (जे तुम्ही नंतर रद्द करू शकता), तुम्ही आत्ता राहात असलेल्या देशातील कायदेशीर कागदपत्र (उदा. रेसिडेन्स परमिट, नोकरीची कागदपत्र), हा सगळा प्रवासाचा खर्च कसा करणार यासाठी बँक स्टेटमेंट्स किंवा तत्सम कागदपत्र, इन्शुरन्स, फोटो, अप्लिकेशन फॉर्म, या काही नेहमी लागणाऱ्या गोष्टी हे आजवरच्या अनेक व्हिसा प्रोसेस मधून लक्षात

आलंय. मग काही वेळा देशाप्रमाणे नियम बदलू शकतात. प्रत्येक देशाच्या व्हिसासाठी लागणारा वेळ वेगळा असतो, कधी ३ वर्किंग डे तर कधी २१ वर्किंग डे, त्यात मध्ये कुठल्या सुट्ट्या असतील तर तेही बदलू शकतं. काही वेळा पासपोर्ट पोस्टाने पाठवला तर चालतो, काही वेळा प्रत्यक्ष मुलाखतीसाठी किंवा निदान व्हिसा स्टॅम्पिंगला जावंच लागतं. मग त्यांचे ऑफिस कुठे आहे त्याप्रमाणे तेही ठरवून, आवश्यक असेल तर रजा घेऊन जावं लागतं. या सगळ्यासाठी नियोजन नीट हवं. वेळेवर करण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे किमान १ महिना आधी ही प्रोसेस चालू करावी लागते. म्हणजे हाताशी पुरेसा वेळ असतो. त्यात जर एकाच वेळी २ किंवा अधिक देश असतील, तर प्रत्येक देशाच्या व्हिसासाठीचा वेळ गृहित धरून बरंच आधी सुरूवात करावी लागते. चुकून कधी एखाद्या डॉक्युमेंट मुळे व्हिसा लांबला तरी हाताशी वेळ राहतो.

याशिवाय ट्रांन्झिट व्हिसा हा एक उत्तम पर्याय आहे एखादा देश बघण्यासाठी. तो अर्थातच कमी वेळाचा असतो आणि त्याप्रमाणे विमानाची तिकिटं करावी लागतात. पण त्यानिमित्ताने मधल्या वेळेचा सदुपयोग होतो आणि फिरणंही होतं. शिवाय ट्रान्झिट व्हिसा मिळवणे जास्त सोपे आहे. ऑस्ट्रेलियाला जाताना मी सिंगापुर मध्ये ट्रान्झिट व्हिसा घेतला. तो ९६ तासांचा होता आणि माझ्याकडे ऑस्ट्रेलियाचा व्हिसा आणि जाण्यायेण्याची तिकिटं होती. असंच दुबईला केलं. काही आठवडे आधी फक्त ऑनलाईन अप्लिकेशन द्यायचं होतं आणि मधल्या वेळाचा सदुपयोग करता आला.

सहल ठरवणे, त्याचे नियोजन करणे, तिथे काय बघायचं याचं वेळापत्रक ठरवणे हे कसं करतेस? एखाद्या एजन्सी मार्फत की स्वतंत्र?

एखाद्या देशात फिरायचे बेत फायनल करण्यापूर्वी मी तिथल्या प्रत्येक बाबीचा शोध घेते, यासाठी आंतरजालावर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. tripadvisor.com, roughguides.com यासारख्या संस्थळावर बरीच माहिती असते. अनेक लोक त्यांचे ब्लॉग्स लिहितात, त्यातून अंदाज येतो. शिवाय एकट्या मुलीने फिरणे याबद्दलही अनुभव वाचायला मिळतात. त्या ठिकाणचं वातावरण किती सुरक्षित आहे, काय काळजी घ्यायला हवी, फिरण्यासाठी सगळ्यात चांगला पर्याय कोणता अशा प्रत्येक मुद्द्याचा विचार करते. शक्यतोवर तिथल्या लोकल मित्र मैत्रिणींशी संपर्क साधून बघते, जे त्या देशात, शहरात रुळलेले असतात. किंवा त्या देशात पूर्वी जाऊन आलेले कुणीतरी ओळखीचे असतात, त्यांच्याशी बोलून माहिती मिळवता येते. यासाठी अगदी फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सचा खूप फायदा होतो. या विविध ठिकाणांहून माहिती काढली की मग कुठली पर्यटनस्थळे बघायला हवीत, साधारण किती खर्च येईल, कुठल्या ऋतूत तिथे फिरणे योग्य आहे अशी माहिती मिळवता येते. शिवाय जवळच्या ग्रंथालयात ट्रॅव्हल डॉक्युमेंटरीज असतात, भाषेची जुजबी ओळख करून घेता येईल अशा माहितीपर सीडीज असतात, नकाशे असतात ज्यातून अजून माहिती मिळवता येते.
हे सगळं झालं की मग मला नेमकं काय बघायचं आहे, कुठल्या जागा मला बघायच्या**च** आहेत आणि कुठे मी तडजोड करू शकते याचा अंदाज येतो. त्यावरून मग जवळचे विमानतळ, राहण्याची व्यवस्था ही माहिती काढायला सुरूवात करते. यात मग विमानतळापासून हॉटेलवर जायला शटल बस आहेत का, तिथून पुढे फिरायला सार्वजनिक वाहतुकीच्या सोयी काय आहेत, माझ्याकडे किती दिवस आहेत हे सगळं सविस्तर बघून मग फायनल प्लॅन करते. रोजच्या दिवसाचं वेळापत्रक जमवून त्यानंतर पुढे व्हिसा, विमानाची तिकिटं, हॉटेल बुकिंग आणि तिथे लोकल ट्रिप्स साठीचे बुकिंग्स करायचा मार्ग मोकळा होतो.

तिथे फिरताना मी शक्यतोवर दिवसभराच्या टुर्स घेते, यात मग कधी तिथल्या लोकल गाईडेड टुर्स असतील किंवा स्वतंत्रपणे फिरणार असेल तरीही. फिरताना मी शक्यतोवर असं बघते की एक मुख्य शहर आणि मग तिथून एका दिवसात फिरून होतील अशा जागा. उदा. म्हणून फ्लोरेन्सला राहून मी एक दिवसात टस्कान भाग आणि पिसाचं टॉवर

केलं. सिडनीत राहिले आणि ब्लु माऊंटेन मधला एक दिवसाचा हाईक केला. वेळ असेल तर मला जवळच्या लहान गावात जाऊन राहायलाही आवडतं, पण अशा ठिकाणी सगळं सामान घेऊन फिरणं कंटाळवाणं आणि त्रासदायक होऊ शकतं. जेव्हा मी अशा दिवसभराच्या टुर्स घेते तेव्हा महत्वाचं हे बघते की या टुर प्रोव्हायडर्स बद्दल viator.com, tripadvisor अशा माहितीतल्या संस्थळावर चांगले रिव्ह्युज चांगले आहेत. शिवाय त्यांच्या वेळा, ठिकाण हे सगळं माझ्या वेळांशी जुळलं पाहिजे.

शहरात फिरण्याची मजा वेगळी आहे. 'हॉप ऑन हॉप ऑफ' बसेस आता बऱ्याचशा पर्यटन शहरात आहेत. या बसेसने फिरताना कधीतरी तोचतोचपणा वाटू शकतो किंवा मुख्य जागांशिवाय काही बघता येत नाही, तरीही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला हा पर्याय चांगला आहे. बऱ्याच शहरात सायकल टुर्स असतात ज्या तुम्हाला तिथल्या मुख्य जागा दाखवायला मदत करू शकतात. जपान रेल पास किंवा *Eurail pass* सारखे पर्याय उत्तम आहेत, ज्यात पैसेही वाचतात आणि फ्लेक्सिबिलिटी असते. आधी बुकिंग केलं तर चांगल्या डील मिळतात.

ज्या देशात जायचं असेल तिथले काही जुजबी भाषेचे ज्ञान मिळवता आले तर तिथे फिरताना अजून फायदा होतो. विशेषतः शाकाहारींसाठी कुठल्याही ठिकाणी जाताना अजून जास्त माहिती काढलेली केव्हाही चांगली, त्यातही खाद्यपदार्थांबद्दलचे काही महत्वाचे लोकल शब्द माहित असतील तर अजून चांगलं जेणेकरून काय चालतं आणि काय नाही हे सांगायला मदत होते. उदा. काही ठिकाणी फिश हे शाकाहारी समजलं जातं, मग 'नो मीट' म्हणजे नेमकं काय हे सांगायला तिथले शब्द माहिती असतील तर फायदा होतो.

माझ्या आजवरच्या फिरतीतून मी शिकलेली महत्वाची बाब ही की शक्य तेवढ्या आधीपासून नियोजन करायचं, भरपूर माहिती काढायची, त्याचा सखोल अभ्यास करून मग प्रत्येक गोष्ट ठरवायची. या सगळ्याचा आर्थिक नियोजनातही फायदा होतो, आणि एकूणच तिथे गेल्यावर अरे, हे माहितच नव्हतं असं होण्यापेक्षा आधीपासून ठरवून गेल्याने रुखरुख नसते.

सगळीकडे तू एकटी फिरलीस का? त्यासाठी काय काळजी घेतली?

बहुतेक वेळा एकटीच फिरले. ग्रुपमध्ये फिरण्यासाठी प्रत्येकाचं वेळापत्रक जमून यायला हवं, शिवाय प्रत्येकाची आवडनिवड वेगळी. त्यामुळे अपवाद वगळता एकटीच फिरले. महत्वाची काळजी घ्यायची ते म्हणजे एखाद्या ठिकाणी जायचं असं ठरल्यावर तिथली माहिती काढताना तिथल्या सुरक्षिततेचा सखोल अभ्यास करायचा. आधी म्हणाले त्याप्रमाणे यासाठी आंतरजालावरील विविध ब्लॉग्स, लोकांचे रिव्ह्युज याचा खूप फायदा होतो. तिथल्या लोकल मित्र मैत्रिणींशी संपर्क झाला तर त्यांच्याकडून माहिती मिळवता येते. हे सगळं बघून मी तिथे एकटीने फिरू शकेल का, जर नसेल तर मग इतर काय पर्याय उपलब्ध आहेत याची माहिती काढून पुढच्या गोष्टी ठरवता येतात. उदा. मोरोक्को हा देश पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. पण तिथे स्त्रियांनी एकटीने फिरणं तेवढं सुरक्षित नाही. म्हणून मी तिथे ग्रुपने फिरले. तेच पेरू या देशात तशी भीती नाही, मात्र सगळ्या मित्र मैत्रिणींच्या वेळा जुळून आल्या आणि आम्ही सगळे जण एकत्र फिरलो. त्यामुळे आमचा खर्च कमी झाला आणि धमाल आली.

एकटीने फिरताना मी शक्यतोवर बघते की तिथे कुणी ओळखीचे, नातेवाईक आहेत का ज्यांच्याकडे मला राहता येईल. यातून काही वेळा खास पर्यटन स्थळांइतकाच तिथे राहण्याचा पण अनुभव घेता आला, कारण त्यांच्याकडून तिथले अजून अनुभव ऐकायला मिळतात. लक्झेमबुर्ग, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया, चिली, इटली असे काही देश की जे सुरक्षित आहेत, योग्य त्या सुविधा आहेत त्या ठिकाणी मी संपूर्णपणे एकटीने फिरले. पण अशा ठिकाणी जातानाही माझा सगळा

प्लॅन, प्रत्येक दिवसाचं वेळापत्रक हे माझ्या जवळच्या ३-४ लोकांना माहित असतं आणि त्यांच्याशी मी जमेल तशी संपर्कात असते. इमर्जन्सी साठी लागतील असे सगळे नंबर्स सोबत असतात.

सामानाची सुरक्षितता हाही एक मुद्दा आहे. सामान सुरक्षित राहावं म्हणून कुलुप असणे गरजेचे आहे. विशेषतः एकटीने फिरताना जेव्हा सार्वजनिक ठिकाणी, जसं की विमानतळ, रेल्वे स्थानक अशा ठिकाणी सामान ठेवावं लागतं तेव्हा. बऱ्याच ठिकाणी विमानतळ, रेल्वे स्थानक अशा ठिकाणी लॉकरची सुविधा असते जिथे सामान टाकून दिवसभर फिरता येऊ शकतं. यामुळे केवळ सामान ठेवण्यासाठी हॉटेल बुक करावं लागत नाही. पण याबद्दलही आधी माहिती काढलेली बरी. रोम सारखी ठिकाणं, जिथे अशा ठिकाणी सुद्धा सहजपणे काहीही होऊ शकतं, तिथे आपल्याला सतत सतर्क राहणं अत्यंत आवश्यक आहे. शिवाय इतर वेळीही फिरताना लक्ष ठेवावं लागतं, आणि आपण नेहमी रोजच्या आयुष्यात घेतो ती काळजी इतरत्रही घ्यावी लागते.

एकाच वेळी बरेच देश आणि एकूणच आंतरराष्ट्रीय प्रवास करताना तुझ्या सामानात महत्वाचं असं काय असतं?
Pack per day and travel light हा सामानाचा मुख्य मंत्र. जिथे जायचं आहे तिथले हवामान आणि तुम्हाला कुठे फिरायचं आहे, कशा पद्धतीने फिरायचं आहे याप्रमाणे सगळं बघून ठरवायचं. म्हणजे मी एकदा स्किईंगला गेले पण माझं जॅकेट वॉटरप्रुफ नव्हतं. त्यामुळे मी तो अनुभव मनासारखा घेऊ शकले नाही. एकदा सेदोना, अरिझोना इथे हायकिंग करत असताना माझ्याकडे तेवढे चांगले ग्रिप असलेले शुज नव्हते. अशा लहान सहान गोष्टींमुळे हिरमोड होतो. त्यामुळे सगळं लक्षात घेऊन त्याप्रमाणे तयारी करणे आवश्यक आहे. शिवाय सोबत नेहमी एक इंटरनॅशनल चार्जर / युनिव्हर्सल अ‍ॅडॅप्टर हे नेहमीसाठी असायला**च** हवं.
आशिया खंडातले कुठले देश पाहिले? तिथे आणि भारतात काय समानता किंवा फरक आढळले?
आशिया खंडातील जपान, सिंगापुर, थायलंड, दक्षिण कोरिया आणि युनायटेड अरब एमिरेट्स या देशात फिरले. भारताप्रमाणेच या देशांना भरभक्कम सांस्कृतिक वारसा आहे, विशेषतः पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत हे अधिक ठळकपणे जाणवतं. सिंगापुर, अबु धाबी, कोरिया हे नव्याने विकसित झालेले आहेत. त्यामुळे तिथे अत्याधुनिक विकास बघायला मिळतो आणि त्यांच्या पर्यटन स्थळांमधूनही तेच दाखवलं जातं. त्यामानाने जपान किंवा थायलंड यांचा इतिहास वेगळा आहे आणि त्यामुळे तिथे पर्यटनासाठीही तो त्यांचा पाया आहे आणि ते ठळकपणे दिसतं.

भारताशी तुलना केली तर जपान, कोरिया, सिंगापुर आणि काही प्रमाणात थायलंड आणि युनायडेड अरब एमिरेट्स हे फिरण्यासाठी सुरक्षित आहेत, खूप स्वच्छ आहेत. मुख्य म्हणजे या देशांनी पर्यटकांना खास आकर्षित करण्यासाठी खूप सोयी सुविधा पुरवल्या आहेत. शिवाय हे देश आकाराने लहान असल्याने फिरायला जाताना देशांतर्गत अंतर कमी होते आणि एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा प्रवास सोपा वाटतो. पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी उत्तम सर्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. त्यामुळे बाहेरच्या देशातील पर्यटकांनाही त्यामानाने अडचणी कमी येतात आणि प्रवासाचा आनंद मिळतो. जपान आणि कोरियात मला काही प्रमाणात भाषेचा प्रश्न आला. त्यामानाने भारतात इंग्रजी येत असेल तर मोठ्या शहरात तर अजिबातच अडत नाही.

भारताचं सगळ्यात महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे भारतात प्रचंड वैविध्य आहे, जे इतर ठिकाणी त्या प्रमाणात कमी दिसले. बहुतांशी देशात खूप लहान सहान जागांचे पर्यटन स्थळात रुपांतर केले आहे. त्यामानाने भारतात अशा कित्येक जागा आहेत ज्या मुळातच आवर्जून बघण्यासारख्या आहेत. शिवाय आपण पाश्चिमात्यांपेक्षा वेगळे आहोत आणि आपली एक स्वतंत्र ओळख आहे. इतिहास, भाषा, खाद्यसंस्कृती, कला, सणवार या प्रत्येकात वैविध्य आहे. भारतापेक्षा मला जपान आणि सिंगापुर तुलनेने (भारत आणि अमेरिका) बरेच महाग वाटले. भारतात पर्यटन तुलनेने स्वस्त आहे. शिवाय

आवडीप्रमाणे, बजेटप्रमाणे प्रत्येकाला सोयीचे असे पर्याय आहेत. अगदी स्वस्त ते महाग, साहसी प्रवास, धार्मिक स्थळांना भेटी, समुद्रकिनारे, जंगल भ्रमंती असे कितीतरी प्रकार आहेत.

मला प्रवासात असे अनेक जण आजवर भेटले ज्यांना माझ्या भारतीय असण्याचं कुतूहल वाटलं. भारतात भटकंती हे आमचं स्वप्न आहे असं अनेकांनी सांगितलं. भारतात असे पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने अधिक प्रयत्न व्हायला हवेत, परदेशी पर्यटकांना सुरक्षित वाटायला हवं अशी परिस्थिती हवी. या पर्यटन विकासातून परदेशातून पैसा तर मिळेलच आणि जागतिक स्तरावर विकासाच्या दृष्टीने हे एक मोठे पाऊल असेल.

युरोप आणि अमेरिका या 2 मोठ्या खंडात काय फरक जाणवला?
पर्यटनाच्या दृष्टीकोनातून बघायचं झालं तर युरोपातले देश आकाराने लहान आहेत आणि अमेरिकेत एकाच खंडात ४ वेगवेगळे टाईम झोन्स आहेत इतका प्रचंड फरक आणि इतका मोठा खंड आहे. त्यामुळे युरोपात ज्या वेळात ३-४ देश फिरता येतात, तेवढा वेळ तर पूर्व ते पश्चिम किनारा या प्रवासाला लागतो. म्हणूनच या दोन्हीकडे फिरण्याचे, राहण्याचे अनुभव खूप वेगळे आहेत. न्यूयॉर्क ते कॅलिफॉर्निया या प्रवासाला ५ तास लागतात, त्यापेक्षा कमी वेळात लंडन ते पॅरिस हे अंतर ट्रेनने सहज कापता येतं. युरोपातील सर्व देश उत्तम वाहतूक व्यवस्थेने जोडलेले आहेत. *EuRail* सारख्या अत्याधुनिक फास्ट ट्रेन्स पासून ते शहरात फिरताना ट्राम, बस पर्यंत आणि शिवाय तिथे अनेक स्वस्तातले विमान प्रवासाचे पर्याय उपलब्ध आहेत जसे *RyanAir, EasyJet*इत्यादी. मी म्युनिक ते व्हेनिस हा विमानप्रवास फक्त २० डॉलरमध्ये केला. त्यामानाने अमेरिकेत ट्रेन्स, बसेस तेवढं सोयीस्कर नाही, त्यापेक्षा विमान प्रवास बरा पडतो किंवा मग स्वतःच्या गाडीने फिरण्यासाठी वेळ असेल तर उत्तम रस्ते आहेत.

युरोपात फिरताना जागोजागी जाणवतं की पादचाऱ्यांसाठी किती जास्त सुविधा आहेत, जागेची कमी आहे त्यामुळे भरगच्च वस्ती आहे, तिथे चौकाचौकात विविध शिल्पं आहेत, स्ट्रीट म्युझिशियन्स गात असतात, वाद्य वाजवत असतात, रेस्टॉरंटच्या बाहेर निवांतपणे लोक बसलेले असतात. युरोपात जरी तिथल्या प्रमुख देशांनी अनुभवलेला इतिहास हा वरवर बघता काही ठळक घटनांशी संबंधित असला, तरीही प्रत्येक देशाचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. अगदी जवळजवळ असूनही प्रत्येकाची अशी स्वतंत्र संस्कृती आहे. तिथलं पर्यटन हे मुख्यत्वे विविध संग्रहालये, ऐतिहासिक जागा, स्थापत्यशास्त्र, कलासंग्रहालये यातून संस्कृती समजून घेण्याबद्दल आहे. शिवाय मग आल्प्स आणि इतरही नैसर्गिक सौन्दर्यस्थळे आहेत. काळाबरोबर पुढे जाताना जरी त्यांनी अनेक आधुनिक विकासासाठी नवीन गोष्टी स्विकारल्या असल्या, तरीही त्याच वेळी त्यांनी जुनेपण, त्यांचं वेगळेपण जपलं आहे जे अमेरिकेत फार कमी बघायला मिळतं.

अमेरिकेलाही इतिहास आहे, परंतु युरोपच्या तुलनेने नवीन आहे आणि इथे अनेक संस्कृती एकत्र आल्यात आणि नांदत आहेत. अमेरिकन पर्यटन व्यवस्थेचा प्रमुख भाग म्हणजे वॉशिंग्टन डीसी मधली सरकारी कार्यालये, स्टॅच्यु ऑफ लिबर्टी, सारख्या ऐतिहासिक जागा, नायगारा फॉल्स, यलोस्टोन सारखे अनेक अनेक नॅशनल पार्क्स. याशिवाय लोक अमेरिका बघायला येतात ते मुख्यत्वे इथे असलेला सांस्कृतिक मिलाप बघण्यासाठी, अमेरिकन ड्रीम अनुभवण्यासाठी. यासाठी मग मोठमोठी शहरे, गगनचुंबी स्कायलाईन्स, ब्रॉडवेवरचे ऑपरा शोज, फॅशन, जागतिक अर्थव्यवस्थेची पंढरी म्हणजेच वॉल स्ट्रीट, शॉपिंग, लास व्हेगास, डिस्नेलँड मधील मनोरंजन असे अनेक पर्याय आहेत. शिवाय कित्येकांना नासा, अमेरिकन नेव्हीची संग्रहालये अशा ठिकाणी भेट देण्यातही स्वारस्य असते.

त्यामुळे पाश्चिमात्य असं एक सर्वसाधारण लेबल असलं तरीही दोन्ही तेवढेच वेगळे आहेत. असं म्हणू शकतो की समानता म्हणायची झाली तर दोन्हीकडे उत्तमोत्तम शैक्षणिक संस्था आहेत, आधुनिक तंत्रज्ञान आहे आणि त्यातून आलेला कम्फर्ट, उपलब्ध आधुनिक सोयीसुविधा हा दोन्हीकडील लोकजीवनाचा रोजचा भाग आहे. अर्थातच आधी म्हणाले त्याप्रमाणे मानवी स्वभावाची समान सूत्र इथेही दिसून येतातच.

भारतीय म्हणून काय अनुभव आलेत?

एक भारतीय म्हणून मला नेहमीच इतर भारतीयांकडून चांगले अनुभव आलेत आणि भारतीय संस्कृतीचे ठसे जगात विविध ठिकाणी दिसले, तेही अगदी अनपेक्षितपणे. थायलंडमध्ये आमच्या सहलीचा शेवटचा दिवस होता, आणि दुसऱ्या दिवशी गणेश चतुर्थी होती, त्यामुळे आम्ही आपसात आता घरी जाऊन मोदक घ्यायचे असं बोलत होतो. अगदी त्याच वेळी गाडीने वळण घेतले आणि समोर आलं ते गणेश मंदिर. पोर्तुगाल मध्ये ग्रोसरी शॉपमध्ये होते आणि तिथे खरेदी करताना भाषेची अडचण येत होती, आणि अचानकपणे साडीतली एक बाई आली आणि तिने मला भाषेसाठी मदत केली. आयफेल टॉवरच्या रांगेत असताना मराठी संभाषण ऐकलं, रोममधल्या एका पाकिस्तानी रेस्टॉरंटमध्ये तिथल्या मालकाने माझ्याकडून जेवणाचा एकही पैसा घेतला नाही किंवा अबु धाबीत एका बस चालकाने मला त्याच्या कामातून वेळ काढून मला योग्य त्या जागी पोहोचायला मदत केली, असे कित्येक चांगले अनुभव भारतीय म्हणून गाठीशी आहेत. आपली भारतीय म्हणून सगळीकडे एक विशेष ओळख आहे. विविध देशात भटकंती दरम्यान भारतीयांना येणारे अनुभव, भारताबाहेर वर्षानुवर्षे स्थायिक असणाऱ्या लोकांकडून तिथे राहण्याचे अनुभव ऐकणे, वाचणे हे सगळं मला नेहमीच खूप रोचक वाटतं.

तुझ्या आजवरच्या भटकंतीतले विशेष लक्षात राहिलेले अनुभव?

अलास्कातला नॉर्दर्न ऑरोरा लाईट्स बघण्याचा अनुभव हा अत्यंत सुखद आणि अविस्मरणीय आहे. मी अलास्काला माझ्या ३० व्या वाढदिवसाला गेले होते. माझ्या हातात ३ दिवस होते. सर्वसाधारणपणे हे नॉर्दर्न लाईट्स बघण्यासाठी ३ महत्वाच्या बाबी जुळून येणे आवश्यक आहे - सोलर ॲक्टिव्हिटी प्रेडिक्शन *(requires 3, 4 or 5 on the scale of 5)*, तुम्हाला शहराच्या शक्य तेवढं दूर जावं लागतं म्हणजे शहरातील मानवनिर्मित दिव्यांचा प्रश्न येत नाही आणि आकाश मोकळं हवं. जर ढग आले तर यातलं काहीही जमू शकत नाही. तो हिवाळा होता अलास्कातला, तापमान साधारण -२५ ते -५५ पर्यंत जाऊ शकतं. आम्ही ६ तास निर्मनुष्य रस्त्याने, जिथे दूरवर सगळीकडे फक्त बर्फच बर्फ आहे अशा हायवेवरून ड्राइव्ह करत होतो. काही जंगली श्वापदं आणि सूचिपर्णी वृक्ष वगळता ना इतर गाड्या, ना कुठे कसली चाहूल. ते वेगळंच जग वाटत होतं. ऑरोरा अजून दिसत नव्हता, पण अगदी १२ च्या ठोक्याला माझा वाढदिवस जसा चालू झाला, त्याच वेळी हलता ऑरोरा दिसू लागला. पुढची १५-२० मिनिट आम्ही निशःब्द होऊन तो नेत्रसुखद सोहळा अनुभवत होतो. मी जगातली सर्वात सुखी व्यक्ती आहे असं मला तेव्हा वाटत होतं. त्या ३ दिवसांच्या सहलीत हा सोहळा मला एकदा नव्हे, तर दोनदा अनुभवता आला. तो शब्दात व्यक्त करणे कठिण आहे. दुसरा एक अनुभव म्हणजे न्युझीलंड मधील क्वीन्सटाऊन मधला. हे शहर न्युझीलंड मधील *adventure capital* म्हणून ओळखलं जातं. स्कायडायव्हिंग, बंजी जंपिंग, पॅराग्लायडिंग, हॅन्डग्लायडिंग, झिपलायनिंग अशा अनेक थरारक साहसी प्रकारांसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. मी हॉटेलवर पोहोचून बाल्कनीचं दार उघडलं आणि सगळ्यात पहिले समोर दिसले ते मुक्तपणे आकाशात फिरत असलेले साधारण ५०-६० पॅराशुट्स जे 'बॉब्स पीक' नावाच्या पर्वतावरून हवेत झेपावत होते. या शहराचे नाव किती सार्थ आहे याचा अनुभव घेता आला. त्यानंतर तिथे मी पॅराग्लायडिंग केलं आणि आकाशातून न्युझीलंडचा दिसलेला अप्रतिम नजारा बघून स्तब्ध झाले. तिथली उंच पर्वतशिखरे, हिरवाई हे सगळं इतक्या उंचीवरून बघणं हा सुंदर अनुभव होता. (यावरून आठवलं, न्युझीलंड हा देश तिथल्या कडक कस्टमच्या नियमांसाठी ओळखला जातो. त्यांनी मला माझे

शुज स्वच्छ करायला लावले, कारण इतर कुठल्याही मातीतून आलेली मातीसुद्धा तिथे मिसळू नये आणि त्यांची *unique indigenous ecosystem* सुरक्षित राहावी म्हणून. मी सोबत नेलेले खाद्यपदार्थसुद्धा फेकून द्यावे लागले.) अजून एक रोचक वाटलेली बाब म्हणजे हे सगळं नाताळच्या दिवसात अनुभवलं. न्युझीलंड दक्षिण गोलार्धात असल्याने तिथला नाताळ हा उन्हाळ्यात येतो. यापूर्वी बर्फातला नाताळ पाहिलेल्या माझ्यासाठी हा वेगळा अनुभव होता. मी तिथे ज्या ठिकाणी बंजी जंपिंग केलं, ती जगातली पहिली बंजी जंपिंगची जागा आहे. ४३ मीटर उंचीचा पूल होता तो, जिथून खाली पाण्यात फ्री फॉल.... मी बघत होते की अनेक लोक येतात आणि शेवटच्या क्षणी कच खाऊन मागे फिरतात. त्या पुलावरून खालचा सरळसोट फ्री फॉल बघून असं होऊ शकतं. पण मी मनात पक्कं ठरवलं होतं की मी जास्त विचार करणार नाही, फक्त समोरचं नितळ सुंदर निळं पाणी बघायचं आणि उडी मारायची. मी यापूर्वी घेतलेल्या अनेक साहसी अनुभवांपेक्षा किंवा कित्येक रोमांचक रोलर कोस्टर राईड पेक्षा हा अनुभव फार वेगळा होता. *Although I was fully aware that I was wearing the harness on my feet, my subconscious was convinced that I was in danger and was desperately commanding me to find something to hold on to. Strange.....And stranger even, I remember thinking of this paradox while I was jumping! But nonetheless, the jump felt extremely liberating.*

(क्विन्सटाऊन न्युझीलंडमधे बंजी जंपिंग)

अजून एक म्हणजे अंटार्क्टिकाला पेंग्विनसोबत घेतलेला वॉक.

आता आठवताना असे अनेक अनुभव डोळ्यांसमोर येत आहेत जे सगळेच विशेष होते. माचु पिचु ला फिरताना अतिशय निगुतीने जतन केलेले इंका संस्कृतीचे अवशेष बघण्याचा विस्मयकारक अनुभव, अंटार्क्टिकाला विमान उतरेपर्यंत वाटलेली धाकधूक (अंटार्क्टिकाला बरेचदा असं होऊ शकतं की खराब हवामानामुळे विमान उतरवणे शक्य होत नाही आणि ऐन वेळेवर विमान न उतरवण्याचा निर्णय घ्यावा लागतो), एक अभियंता म्हणून जपानच्या शिनकान्सेन या बुलेट ट्रेन ने प्रवास करताना वाटलेला अभिमान, उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियाच्या सीमेजवळ गेले असताना नॉर्थ कोरियातल्या लोकांच्या जीवनाबद्दल विचार करून हळवं झालेलं मन, अनेक वर्ष पत्रमैत्री असणाऱ्या मित्र मैत्रिणींना प्रत्यक्षात भेटण्याचा आनंद आणि त्यांच्यासोबत नाताळ किंवा नववर्ष साजरं करणं यातून मिळालेला आनंद, जर्मनीत जर्मन कुटुंबासोबत तिथल्या प्रसिद्ध ख्रिसमस मार्केट्स्च्या आठवणी, असे कित्येक संस्मरणीय अनुभव आहेत.

आर्क्टिक सर्कल
अलास्का

ऑरोरा बोरायलीस
अलास्का

एखादा अडचणीत सापडवणारा प्रसंग जो नंतर निभावून नेला?

देवाच्या कृपेने खूप संकटात टाकणारे, काही चोरीला गेलं असे प्रसंग आले नाहीत. पण काही वेळा अर्थातच विचित्र अनुभव आले. रोम मध्ये माझी ट्रेन रात्री १२ ला पोहोचणार होती आणि मला २ मोठ्या बॅग्स घेऊन हॉटेल शोधायचं होतं. ट्रेन स्थानकाच्या बाहेरचा भाग तितकासा चांगला नाही असं प्रत्येक ठिकाणी वाचलं होतं. त्यातून हॉटेल बेड ॲन्ड ब्रेकफास्ट स्वरुपाचं आणि कौटुंबिक स्वरुपाचं होतं, त्यांनी लिहिलं होतं की रात्री १२ ला स्वागतकक्ष बंद होईल. मी फोन केला चौकशी करायला तेव्हा इटालियन भाषेत बोलून त्यांनी फोन कट केला. त्यामुळे मला चिंता होती की आता रात्रभर इथे स्टेशनवर कसं थांबायचं? मी यापूर्वीही अशी काही वेळा थांबले होते, पण रोमबद्दल तेवढी खात्री नव्हती. माझ्या डोक्यात गुगल मॅप्स वरून पक्क्या केलेल्या अंदाजामुळे मी सहजपणे हॉटेलवर तर पोहोचले आणि खोलीचा ताबाही मिळाला. पण खोलीत शिरले त्याक्षणी दिवे गेले. मला सतत काहीतरी चुकतंय असं वाटत होतं. मी सामान घेऊन परत रिसेप्शनवर आले, तिथल्या व्यक्तीसमोरच माझ्या इमर्जन्सीसाठी असलेल्या एकाला फोन केला आणि माझ्या लोकेशनची माहिती दिली. शिवाय खोली बदलून मागितली. नंतर सगळं सुरळीत झालं. असंच एकदा चिलीच्या विमानतळावर परतताना टॅक्सी चालक काही ना काही कारण देऊन तिथे पोहोचायला उशीर करत होता. इंग्रजी येत नाही असं म्हणत दूरच्या रस्त्याने नेत होता आणि सतत माझी काहीतरी चौकशी करत होता. शेवटी मी माझ्या तिथल्या लोकल इमर्जन्सी कॉन्टॅक्टशी फोनवर बोलले आणि त्याला माझ्या लोकेशनचे अपडेट्स देत होते. त्यालाच मग मी स्पॅनिश बोलायला लावले आणि शेवटी सुखरुप पोहोचले. अशा काही प्रसंगात मला क्विक ॲक्शन घेणं गरजेचं होतं, पण त्याशिवाय इतर कुठेही वाईट अनुभव आले नाहीत. माझा ठाम विश्वास आहे की जर आपण योग्य लोकांच्या संपर्कात राहिलो, तर त्यांच्या मदतीने कुठल्याही अडचणीतून मार्ग निघू शकतात.

तुझा या भटकंतीबद्दल मित्र मैत्रिणी, ओळखीचे यांना काय वाटतं?

जरी अनवट, साहसी जागा अजून जास्त लोकांच्या भटकंतीत नसल्या, तरीही निदान मुख्य पर्यटन स्थळं बघण्याचा ट्रेन्ड खूप वाढलेला दिसतो. पुर्वी आंतरराष्ट्रीय प्रवास तेवढा सहज सोपा नव्हता, पण आमच्या पिढीमध्ये हे सहज झालं. शिवाय मी आधीही म्हणाले माहिती मिळवणे, प्रत्यक्ष प्रवास करणे, अनुभव मांडणे या सगळ्यात तंत्रज्ञानाचा फार मोठा हातभार आहे. भारतात राहणारे माझे अनेक मित्र मैत्रिणी थायलंड, सिंगापुर, ऑस्ट्रेलिया अशा देशात जाऊन आलेत. अमेरिकेत स्थायिक असलेले अनेक जण कॅनडा, मेक्सिको, पेरू, कोस्टा रिका अशा जवळच्या देशांमध्ये जातात. युरोप मध्ये इटली, युके, फ्रान्स हे तर खास पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेलेच देश. आमच्या पिढीतले अनेक जण कामानिमित्त विविध देशात जातात आणि मग त्या संधीचा फायदा घेऊन जवळपास फिरतात. काही प्रवासी मित्र जर एखाद्या देशात

जाऊन आले असतील, तर त्यांचे अनुभव ते सांगतात आणि मग त्यावर चर्चा होतात. तरीही माझ्या मित्र मैत्रिणींना माझ्या या सततच्या भटकण्याचं कुतूहल वाटतं. सुरक्षिततता, सुट्ट्या, मोटिव्हेशन असे अनेक प्रश्न ते विचारतात. काही लोक आता त्यांचे भटकंतीचे बेत ठरवताना माझ्याकडून माहिती घेतात.

आता तुझे पुढेचे भटकंतीचे बेत काय आहेत? कुठल्या विशेष जागा आहेत जिथे जायची इच्छा आहे?

७ ही खंड फिरण्याचं माझं स्वप्न जरी पूर्ण झालं असलं, तरीही मला असं वाटतं की मी फक्त धूळ झटकून आले आहे. अजून हजारो जागा मला खुणावत आहेत. शिवाय ज्या देशात मी गेले, तिथल्याही कित्येक जागा बघायच्या राहिल्या आहेत. माझी बकेट लिस्ट सतत भरलेलीच आहे. अजूनही नवीन वर्ष चालू झालं की मी त्याच उत्साहाने पैसे कसे वाचवता येतील आणि त्यातून कुठे आणि कसं भटकायला जाता येईल याचाच विचार करत असते आणि तेवढ्याच उत्साहाने माहिती शोधायला सुरूवात करते. आता मला अशा देशांना भेट द्यायला आवडेल ज्या अजूनही पर्यटनासाठी फारसे प्रसिद्ध नाहीत किंवा अजून पर्यटन विकासाच्या मार्गावर आहेत. उदा. मंगोलिया, सैबेरिया, आइसलँड, बोलिव्हिया, भुतान, इंडोनेशियन बेटे अशी न संपणारी यादी तयारच आहे. शिवाय ग्वाटेमालातील फ्लोरा आणि फॉना, पाटागोनियामधील ग्लेशियर हायकिंग (*Patagonia, Argentina*), हवाईतले ज्वालामुखीचे पर्वत, दक्षिण आफ्रिकेतली जंगल सफारी, कॅनडातला बांफ नॅशनल पार्क (*Banff National park*) हे अजून काही आत्ता आठवताहेत ते, यात सतत भर पडेलच. मला फक्तच प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे याव्यतिरीक्त तिथे कुणी मित्र मैत्रिणी, ओळखीचे असतील, माझे पेन फ्रेंड्स असतीलतर त्यांच्यासोबत राहणे, तिथे त्यांच्यासोबत एखादा त्यांचा सण साजरा करणे हेही आवडतं. भटकंतीचाच हाही एक भाग आहे असं मला वाटतं, कारण यात त्या स्थानिक संस्कृतीशी जवळून ओळख होते, तिथलं जीवनमान कसं आहे हे समजतं.

आणि हो, लास्ट बट नॉट द लीस्ट, भारतातील सगळी राज्य पालथी घालायची हे एक फार पूर्वीपासून जपलेलं स्वप्न आहे आणि तेही पुर्ण करायचंय.

वेळात वेळ काढून तुझे अनुभव आमच्यासोबत शेअर केल्याबद्दल आसावरी तुझे मनःपूर्वक आभार! तुझ्या अजूनही नवीन फिरतीतले अनुभव भविष्यात अशाच काही निमित्ताने वाचायला आम्हाला नक्की आवडेल. आणि तुला पुढील अशाच नवनवीन देशातल्या प्रवासासाठी अनाहिता परिवारातर्फे खूप शुभेच्छा!! आणि या मुलाखतीत तेवढाच महत्वाचा सहभाग असलेली इडली डोसा हिलाही अनेक धन्यवाद.

****

इडली डोसा या अनाहिता मैत्रिणीने भटकंती अंकाच्या अगदी सुरूवातीपासून आसावरीबद्दल सांगितले. मग काय प्रश्न असावेत, कसे असावेत याबद्दल चर्चा केलन, नंतर शब्दांकनातही मदत केली. आसावरीने मराठी-इंग्रजीतून तिचे अनुभव मांडले. मुळात आसावरीने लिहिलेलंच फार छान होतं, तिने लिहिलेल्या बाबी या तिच्या मनापासून आलेल्या होत्या हे मला वाचताना सतत जाणवत होतं, तिने फिरताना किती माहिती काढली आहे हेही त्यातून कळत होतं. त्यात तिने तिच्या रोजच्या बिझी शेड्युलमधून वेळ काढून रात्री उशीरापर्यंत बसून रोज थोडं थोडं हे लिहून पाठवलं हे विशेष वाटलं. आणि तिच्याशी गाठ घालून देणे, शब्दांकनात मदत करणे, फॉलो अप घेणे या इडली डोसाच्या सहभागाशिवाय ही मुलाखत पूर्ण झाली नसती. दोघींचेही अनेकानेक आभार!!

अमेरिकानुभव एका भारतीय आईच्या नजरेतून :

(लेखिका - पलाश)

गेली काही वर्षे अमेरिकेत असलेल्या मुलाचा, तो तिथे असेपर्यंत आम्ही दोघांनी म्हणजे त्याच्या आईवडिलांनी अमेरिका बघावी असा आग्रह चालू होता. मनमोहक निसर्ग, स्वच्छता, वाहतुकीतील शिस्त, मोठमोठे झुळझुळीत रस्ते आणि त्यावर भर वेगात सुळसुळणाऱ्या तरीही पोटातलं पाणीही हलत नाही अशा मोटारगाड्या, वगैरे वगैरे अनेक प्रलोभने दाखवून झाली होती. आम्ही 'काय घाई आहे' असे म्हणत वेळ काढूपणा करत होतो. एवढ्या मोठ्या विमानप्रवासाचा ताण, वेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाचे भय अशी कित्येक कारणे त्यामागे होती. मुलांना उघडपणे सांगायची सोय नसतेच, कारण मुले अशा कारणांना "अगदीच अवास्तव अशी काल्पनिक भीती" या सदरात विनाविलंब टाकतात. ;) अखेर या वर्षी तिकडे जाण्याचा योग आला. मुलगी ऑगस्टमध्ये तिथे शिकायला जाणार असल्याने आग्रह वाढला. परिणामी ऑगस्ट महिन्यात तिच्याबरोबर आम्ही उभयता (एकदाचे) तिथे गेलो.

जाताना नशीबात लुफ्तान्झाचे तिकीट फ्रँकफर्ट पासून बिझिनेस क्लासला अपग्रेड होणं हा सुयोग होता. त्याला समतोल करण्यासाठी येताना युनायटेड एअरलाइन्सचा कुयोग पुरेसा झाला. ;) दोन्ही प्रवास मिळून सरासरी काढायची तर हा आंतरराष्ट्रीय विमानप्रवास मध्यम चांगला झाला. सुनेने आणि मुलाने तिथल्या स्थळदर्शनाचे नियोजन पण उत्तम केलेले होते. ते स्थळवर्णन पण जसे ऐकले होते त्याला साजेसेच म्हणजे स्वच्छ, सुंदर, इ.इ.असे करता येईल. तात्पर्य म्हणजे मजा आली. आता इथे मी "अहाहा! काय ती अमेरिका!" असं गोग्गोड वर्णन करणार नाही. मला बोलायचं आहे ते तिथल्या काही अनुभवांबद्दल. यातून मला सर्व अमेरिकन्सबद्दल वा त्या देशाबद्दल काही सरसकट मत मांडायचे नाही. त्या त्या वेळी मला जे जे वाटले ते ते मी लिहिते आहे इतका सीमित अर्थ घ्यावा ही विनंती.

पहिला अनुभव आहे आम्ही युटा राज्यात एका निसर्गसुंदर रस्त्यावरून गाडीने चाललो होतो तेव्हाचा. ऑगस्ट महिना होता. प्रवासाचा पहिला टप्पा होता. एका बाजूला डोंगर व दुसऱ्या बाजूला सतत सोबत करणारी एक छोटी नदी. कुठे शक्य असेल तिथे गाडी थांबवून नदी जवळून बघुया असे ठरले. तसे एका ठिकाणी थांबलो. खळखळणारी नदी, त्या नदीकाठी फुललेली छोटीछोटी फुले असे छान वातावरण होते. फोटो काढणे जोरात चालू होते तेवढ्यात रस्त्याच्या पलीकडे एक गोऱ्या आज्जीबाई हात उंचावताना दिसल्या. आजींचा पन्नाशीतला लेकसुद्धा त्यांच्याबरोबर होता. आम्ही काय पहातो आहोत ते विचारून त्या पंचाहत्तरी उलटलेल्या आजी इकडे या बाजूला पोचल्या. त्यांच्या हाताशी पट्टा अडकवलेला एक कुत्रा होता.

"हा बॅरन, माझा सर्व्हिस डॉग. तो माझी काळजी घेतो. माझा मुलगा घरी नसताना मी एकटी असते तेव्हा हा असतो ना माझ्याबरोबर. मला फार आधार आहे याचा. तो एक गुड बॉय आहे." असं सगळं अमेरिकन इंग्रजीतून अगदी कौतुकभरल्या स्वरात सून आणि मुलगी या दोघींना सांगून झालं. अजूनपण कायकाय प्रेमळ स्वरात सांगत होती. "मी याच राज्यात जन्मले आणि माझं सगळं आयुष्य इथेच गेलं. माझा मुलगा त्याच्या सुट्टीच्या दिवशी फिरायला आणतो मला. मुलगा खूप करतो माझ्यासाठी." इतकं वय होऊनसुद्धा अजिबात कुरकुर करत नव्हती. फार गोड होती. मी चेहेऱ्यावर आपसूकच आलेले स्मितहास्य लेऊन त्या तिघींकडे

चार पाच फूट अंतर राखून पहात होते. अमेरिकन इंग्रजी उच्चारांची सवय नसल्याने अर्थ लावत लावत गपगुमान

श्रवणभक्ती करत होते. तेवढ्यात मध्येच एकदम माझ्याविषयी प्रश्न आला, "डज शी नो इंग्लीश?" माझ्या पंजाबी ड्रेसमुळे आजींना प्रश्न पडला होता बहुतेक. जीन्समधल्या दोघीजणी पेहरावाने तिला जास्त ओळखीच्या होत्या. त्या तिची भाषा जाणणाऱ्या असणार हे तिने गृहित धरले होते. ;) दोघीही मुली म्हणाल्या, "येस." हे "येस" ऐकून माझा जीव भांड्यात पडला की निदान या आपल्या पोरींना तरी वाटतंय की मला ही परभाषा येतेय. ;) बाईंचा मोर्चा माझ्याकडे वळला. माझ्या ड्रेसवरच्या भरतकामाचे कौतुक केले. एका मैत्रिणीने भारतातून त्यांना एक असेच सुंदर जॅकेट आणले होते ते सांगून झाले. यावर उत्तर म्हणून माझे बिचारीचे गरज वाटेल तेथे सुहास्य, गरजेप्रमाणे थँक्स, इ. पेरणे चालू होते. तितक्यात आज्जी अचानक म्हणाल्या, "कॅन आय हग यू?" मी आश्चर्याने थक्कच झाले. मला आज्जी आवडली होतीच. तिला उद्धटपणे नाही म्हणण्याचा प्रश्न नव्हताच. पण कातडीच्या रंगातला ढळढळीत फरक विसरून इथे प्रवासाच्या पहिल्या टप्प्यात असे काही ऐकू येईल असे वाटलेच नव्हते. मग काय!! इकडे भारतात शेकहँडसुद्धा क्वचित करणारी, नमस्कारी मी त्या आज्जीला "येस, शुअरली!!" असं म्हणाले. तिला भेटल्यावर माझी स्वतःची आई भेटावी तसं काहीसं वाटलं मला. :) हे सगळं फार विशेष वाटलं. माणसं सगळीकडेच सारखीच हेच खरं. सख्खे नातेवाईक कधी मनाने दूरदूर असतात तर ना नात्याचं ना गोत्याचं असं कोणी तुम्हाला कधी मायेने तर कधी मैत्रीने तर कधी अशाच काही धाग्याने जवळचे होऊन जातात. हे वास्तव हजारो मैल अंतर पार केल्यावर परक्या देशात पुन्हा एकदा भेटलं. खरं सांगू, या अशा ओळखीनं त्या दूरदेशात खूप हायसं वाटलं.

आता दुसरा अनुभव म्हणजे प्रवासात आवश्यक अशा स्वच्छतागृहांचा. तिथे रस्त्यांवर अगदी जवळचे स्वच्छतागृह किती अंतरावर आहे आणि त्याच्या लगेच पुढचे किती अंतरावर आहे असे बोर्ड सतत दिसत. पुढच्या थांब्याचे अंतर कळल्याने लगेच थांबावे किंवा नाही हा निर्णय सोपा होई. ही गृहे नावाप्रमाणे स्वच्छ होती. यलोस्टोन नॅशनल पार्क मध्ये असलेली अगदी पोर्टा पॉटीज़ सुद्धा बरी होती. या पोर्टा पॉटीजमध्ये पाणी नव्हते पण तिथे सगळीकडे हँड सॅनिटायझर होतेच. आपल्याकडच्या या बाबतीतल्या सोयींची खरं म्हणजे त्रुटींची आठवण आली. तीस - चाळीस वर्षांपूर्वीच्या प्रवासातल्या अनुभवाच्या मानाने आपल्याकडे सध्या सोयी खूप आहेत. पण कितीतरी करणं बाकी आहे हे खरंच. स्त्रियांसाठी या सोयी आजही फार अपुऱ्या आहेत. भटकंती करायला बाहेर पडलं की निदान बायामाणसांना तरी या त्रुटींचा त्रास फार होतो.

या संदर्भात सरताज ठरेल असा अनुभव आला "द ग्राइंड कॉफीहाऊस, सिडार सिटी" इथे. या कॉफीहाऊसची जास्त माहिती तुम्हाला हवी असेल तर येल्प वर ६१ रिव्ह्यूज आहेतच. पण मी सांगते तो अनुभव तिथे येल्पवर नसेल. या कॉफीहाऊसमध्ये भिंतींवर खुसखुशित अवतरणे आणि चित्रांच्या मस्त फ्रेम्स होत्या. त्या बघतबघत कॉफीची वाट पहात असताना आणि कॉफी पिताना छान वेळ गेला. ह्या अशा फ्रेम्स याआधीपण पाहिल्या होत्या. इथे नवलविशेष म्हणजे स्त्रियांच्या विश्रांतीगृहात भिंतीवर तीन सुरेख डिश आर्ट म्हणता येतील अशी चित्रे व दोन रस्त्यांचे चित्र असलेल्या चिमुकल्या फोटोफ्रेम्स होत्या. इतकेच नव्हे तर तिथे एका फुलदाणीत एक पिवळ्या फुलांचा सुंदरसा गुच्छही सजलेला होता. या जन्मी स्वच्छतागृहात असे पुन्हा कधी पहायला मिळेल की नाही कोण जाणे!! असे वाटल्याने मोबाईलवर लगेच त्या भिंतीचा जो फोटो काढला तो खाली देते आहे.

हे कॉफीहाऊस जिथे आहे तो सिडार सिटीचा मेन स्ट्रीट आणि एकूणच हे गाव ऑगस्ट महिन्याच्या म्हणजेच तिथल्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये जसं दिसलं तसं मला फार आवडून गेलं. इथे घेतलेले सगळे पदार्थ पण चांगले होते. तेव्हा उन्हाळ्यात जवळपास गेलात तर हे ठिकाण चुकवू नकाच. :)

तिसरा अनुभव आहे ज्या गावात मुलाचे घर आहे त्या गावातल्या प्राणीसंग्रहालयातला. जिराफ, रेड पांडा, मादागास्करचा लेमूर, बाल्ड ईगल, महाकाय कासव, व इतरही कित्येक प्राणी आणि पक्षी बऱ्याच मोठ्या मोकळ्या जागेत वावरताना पाहायला मिळाले. त्यांची चांगली काळजीही घेतली जात होती त्यामुळे अशा ठिकाणी माणसाने त्यांचं स्वातंत्र्य हिरावून घेतल्याच्या मानसिक टोचणीने नेहेमीइतके त्रस्त केले नाही.

प्रेअरी डॉग्ज पहात होतो तेव्हा तिथे एक रेंजर भेटली. प्राण्यांच्या शीतनिद्रेविषयी बोलता बोलता त्या भागातील थंडी आणि हिवाळ्यात पडणारं बर्फ आणि नव्या माणसाला या हवामानाची वाटणारी भीती यावर गप्पा गेल्या. "या वातावरणाची अजिबात सवय नसलेली माझी मुलगी याच वर्षी इथे शिक्षण चालू करणार असल्याने एक आई म्हणून मला फार भय वाटतंय." अस मी म्हणाले. यावर तिने मुलीला फार छान समजावून सांगितलं. ती म्हणाली, "इथे आमच्या या भागात सगळे चारही ऋतू (seasons) वेगवेगळे स्पष्ट जाणवतात. प्रत्येक ऋतूतली वेगवेगळी मजा असते. त्या त्या ऋतूंमधली वेगवेगळी मजा असं या हवामानातल्या फरकांकडे बघ तू!! थंडीची सवय नसलेल्या तुला सुद्धा मग हे हवामानातले बदल नक्की आवडतील व मानवतील". "Sunshine is delicious, rain is refreshing, wind braces us up, snow is exhilarating; there is really no such thing as bad weather, only different kinds of good weather." हे जॉन रस्किनचं अवतरण जणू ती मुलगी वेगळ्या शब्दात सांगत होती. "त्या मुलीच्या" सगळ्या फरकांकडे/अनुभवांकडे बघण्याच्या या नवीन कोनामुळे परिस्थितीकडे बघण्याचा आमचा चष्मा थोडा साफ झाला. आता हा नवीन दृष्टिकोन सगळ्या बदलांकडे बघताना वापरावा हे पहाणं ओघानेच आलं !! :)

आता इतर काही ठळक आठवणी.
गेल्या गेल्या जाणवलं की आपल्या नेहेमीच्या चालण्याने देखील या दुसऱ्या मजल्यावरच्या घराची जमीन कंप पावते आहे. वजन एवढं पण वाढलं नव्हतं की पायातळीची जमीन हादरावी. ;) म्हणून चौकशी केली तर कळलं की लाकडी जमीन कार्पेटने झाकली आहे. आता हे काय नवीन आणि कशासाठी ही लाकडी घरं? जबरदस्त वैतागले. मग वैतागून डोकं फिरवून घेण्यापेक्षा आता दबक्या पावलांनी अगदी हळुवारपणे चालायला लवकरात लवकर शिकले पाहिजे ही खूणगाठ मनोमनी बांधली. खाली रहाणाऱ्या बाई चार दिवसांनंतर भेटल्या तरी हसून बोलल्या म्हणजे ही दबक्या पावलांनी चालण्याची कला अवगत झाली होती. मोठंच संकट दूर झालं. नाहीतर शेजाऱ्यांना त्रास होतो म्हणून अपार्ट्मेंटवाले लेकाला आणि सुनेला घर सोडायला लावतील अशी एक शक्यता, जरी बाकी कोणी बोललं नाही तरी माझी मलाच छळायला लागली होती. ;)

बहुतांशी रोज लागणाऱ्या वस्तू विकणारी मोठी मोठी व्यापारी दुकानं अर्थात सुपर मार्केट्स ही आता भारतातही गेली दहाएक वर्षे तरी आहेत. पण त्याशिवाय जगणं अशक्य होईल इतकी महत्वपूर्ण ती नाहीत. अमेरिकेत प्रत्येक वीकांताला (weekend) सहसा काही किलोमीटर अंतरावर असलेल्या सुपर मार्केटमध्ये चारचाकीने जाऊन साधारण पुढच्या आठवड्यात लागणाऱ्या वस्तू नीट यादी करून आणून व्यवस्थित साठवाव्या लागतात. घरात मोठ्ठा फ्रीज हा देखाव्याचा नाही तर अगदी गरजेचा आहे. चुकून काही आणायचे विसरले तर दोनच पर्याय: पहिला म्हणजे पुन्हा सुपरमार्केटपर्यंत जाऊन ती वस्तू आणणे नाहीतर दुसरा म्हणजे पुढच्या सुपर मार्केट फेरीपर्यंत त्या वस्तूशिवाय काम निभावून नेणे. भारतात कोपऱ्याकोपऱ्यावर छोटे व्यावसायिक व दुकानदारमंडळी अगदी कमी अंतरावर रोजच्या रोज ताजी भाजी/फळे/दूध आणि इतर अनेक वस्तू उपलब्ध करून देतात. हे अगणित पर्याय तिथे नाहीत. या इथल्या पर्यायांची किंमत तिथे कळली.

आपण राहतो त्या भागावर सूर्यनारायणाची किती कृपा आहे, हे तिथे लोकांचे सूर्यप्रकाशाचा आनंद घेणे पाहिले तेव्हा उमगले. सूर्यप्रकाश असलेल्या महिन्यांत चार चाकी गाड्यांच्या मागे दुचाक्या लाऊन तसेच गाड्यांवर छोट्या बोटी लादून सहलीला निघालेले कितीतरी लोक आम्हाला वाटेत सतत दिसत होते. अनेक ठिकाणी लोक मासेमारीचा आनंद घेत होते. कुटुंबे सहलीला निघालेली होती. काही दिवसांनी उबदारपणा आणि स्वच्छ प्रकाश कमीकमी होऊन त्याची जागा कमालीची थंडी आणि प्रकाशाची कमतरता घेणार आहेच, पण आता असलेलं हे प्रसन्न वातावरण होतो होईल तो अंगी भिनवून घेण्याची वृत्ती या लोकांच्या अंगी बाणलेली आहे असं ते पाहून प्रत्येक वेळी वाटत होतं. मी माझ्या देशात असलेला सुंदर उबदार सूर्यप्रकाश "अतिपरिचयात् अवज्ञा" या न्यायाने दुर्लक्षित होते हे तिथे लक्षात आलं.

मला आवडलेले एक खास दुकान म्हणजे फार्म मार्केट. इथे फक्त भाज्या, फळे, फुले, मसाले, चीज इत्यादी उत्पादने व फुलझाडे, कुंड्या, बागेत ठेवण्यासाठी बर्ड-फीडर अशा बागेशी संबंधित गोष्टी मिळत होत्या. त्या दुकानात गेलो होतो. फक्त मिरच्यांचे तेही सुक्या व ओल्या दोन्हीतले खूप आकार, प्रकार, व रंग तिथे पाहिले. तिथे भूत जलोकिआ किंवा घोस्ट चिली ही अतितिखट मिरची पहायला मिळाली. असे फक्त मिरच्यांचे नव्हे तर बहुतेक सर्व वस्तूंचे अनेकविध प्रकार होते. त्या राज्यात पिकलेली स्थानिक उत्पादने खास फलक लावून वेगळी दिसतील अशी विक्रीला ठेवली होती. आत चालत जाऊन वस्तू पहाण्यासाठी भलीमोठी फ्रीज रूम होती. त्यात कुडकुडत का होईना पण गेले. अनेक चीजचे प्रकार याची देही याची डोळा पाहिले. आपल्याकडे सहजी बघायला न मिळणारे काही चीजचे प्रकार विकत आणले. एक अविस्मरणीय अनुभव होता तो. तिथून अगदी कोवळी आणि भरपूर पाने असलेली बिटांच्या कंदांची जुडी आणली. तिची डॉलरमधली किंमत गुणिले ६५ मनातल्या मनात केलं. त्या जडभारी किंमतीमुळे का होईना मुळ्याच्या पानांसारखी ही

बिटांची पानेपण खाण्यायोग्य आहेत का व त्याची भाजी होते का हे जालावर पाहिले. खाण्यायोग्य अशा एका अप्रतिम चवीच्या, थोडा रवा व बेसन पेरून केलेल्या नवीन भाजीचा शोध लागला व ती सगळ्यांनाच आवडली. यापुढे इथेसुद्धा निदान मी तरी अशी खाण्याजोगी पाने वाया घालवणार नाही.

तर साधारण अशी होती एका लहान गावात लहानाची मोठी झालेल्या, तालुक्याच्या ठिकाणी काही वर्षे नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेऊन महानगरात रहायला आलेल्या, एकूणात जुन्या पिढीतली असूनही थोडे नवे जगही माहीत असलेल्या, नव्याजुन्याचे मिश्रण अशा एका भारतीय आईला जाणवलेली तिच्या पहिल्यावहिल्या वारीतली अमेरिका.

स्पेन परतीचा प्रवास -

(लेखिका - Mrunalini)

स्लोव्हाकियातून सुट्टीत फिरायला म्हणून स्पेनला गेलो असतानाचा हा एक अनुभव. सहल माद्रिदला सुरू झाली आणि पुढे इतर प्रसिद्ध जागा/शहरं बघून शेवटचा मुक्काम होता बार्सेलोनात.

२४ जून २०१५ -
बार्सेलोनामधला आमचा हा तिसरा दिवस. आजची गौडी (*Gaudi*) ची टुर दुपारी १ ला चालु होणार होती त्यामुळे सकाळी आरामात उठलो. दुपारचे जेवण करून मेट्रो स्टेशन गाठले. मेट्रो समोर तिकीट काढत असताना एक म्हतारी बाई आली आणि म्हणाली *""Be careful of your bags, Barcelona is full of pickpocketers and they are very smart, you will never know, when your belongings would be gone. Keep your bag safe"* असे म्हणुन निघूनसुद्धा गेली. युरोपमधे गेली अनेक वर्ष फिरत असल्यामुळे, ही सुचना काही नवीन नव्हती. कॅमेरा बॅग पाठीवर न घेता नेहमी पुढे ठेवणे, त्यातल्या आतल्या कप्प्यात पासपोर्ट आणि पाकीट ही नेहमीची पद्धत. तरी पुन्हा एकदा खात्री करुन मेट्रो मधे चढलो. ५ मिनिटात आम्ही आमच्या स्टॉपवर पोहोचलो आणि तिथून मिटींग पॉइंटवर गेलो. बरोबर १ वाजता टुरची सुरवात झाली. टुर गाईडने सुचना देण्यास सुरवात केली. त्यातली सगळ्यात महत्त्वाची सुचना - बार्सेलोना मधील *La Rambla* - फेमस रोड आणि सगळे मेट्रो स्टेशन्स ही टुरीस्टसाठी सगळ्यात धोक्याची ठिकाणे आहेत. सर्वात जास्त चोऱ्या ह्या ठिकाणी होतात.
आमचा २० जणांचा ग्रुप निघाला. जूनचा महिना, कडक ऊन, ४० अंश से. तापमान त्यामुळे घामाच्या धारा वहात होत्या. गौडीच्या स्थपत्यकलेल्चे उत्तमोत्तम नमुने बघत आम्ही टुरचा शेवटचा पॉईंट असलेल्या 'ला साग्रादा फामिलिया कॅथेड्रल'ला *(La Sagrada Familia Cathedral)* ५.३० च्या सुमारास पोहोचलो. टुर संपली आणि सगळ्यांचा निरोप घेऊन काहीतरी खाऊन घ्यावे म्हणुन जवळ्याच रेस्टॉरंटमधे गेलो. रेस्टॉरंट फुल्ल होते, बसायला सुद्धा जागा नव्हती त्यामुळे तिथून निघालो. घामाने कासावीस झालो होतो, त्यात भूक लागली होती. त्यामुळे आता हॉटेलवरच जाऊ आणि फ्रेश होऊ असे ठरवले आणि मेट्रो स्टेशन गाठले. 'साग्रादा फामिलिया'ला लागूनच त्याचा मेट्रो स्टॉप आहे.

मेट्रोचे तिकीट काढण्यासाठी तिकीट मशिनजवळ आलो. खिशातले सुट्टे युरो संपले होते. त्यामुळे बॅगेतून पाकिटातून पैसे काढून परत बॅगेत ठेवुन आम्ही तिकिट काढले आणि पुढे निघालो. तिकिट पंचिंग मशिन जवळ लाईन होती, आमच्या पुढे २-३ माणसे होती आणि बाजुच्या रांगेत २-३ माणसे. नवरा निशांत पुढे होता. तो तिकिट पंच करत होता, तेवढ्यात एक जिप्सी बाई आली आणि ती त्याला मदत करायला लागली. आम्ही तिच्याकडे दुर्लक्ष करुन तिकिट पंच करून पुढे आलो.

तिथे दोन जिने होते. आपल्याला कुठल्या जिन्याने जायचे आहे ते बघून नवरा पुढे निघाला. मी त्याच्या मागेच उभी होते. तितक्यात पंचिंग मशिन जवळच्या लोखंडी गेटचा मोठा आवाज झाला. माझे आवाजाच्या दिशेने लक्ष गेले, तर मघाच्याच त्या जिप्सी बाईनेच ते गेट आपटले होते. ह्या १ मिनिटांमधे माझ्या पुढे २ तरुण मुले गेली. त्यामुळे आता जिन्यावर सगळ्यात पुढे निशांत, त्याच्या लगेच मागे ते २ तरुण आणि ४-५ पायऱ्या सोडून मी असे सगळे उभे होतो. दिवसभर फिरुन निशांतने थोड्यावेळासाठी बॅग पाठीवर घेतली होती. मी त्याला मागून सांगत होते की तुझ्यामागे २ मुले आहेत आणि ती काहीतरी विचित्र वाटत आहेत. त्यामुळे बॅगपुढे घे. तो बॅग पुढेच घेत होता. हे सर्व जिने उतरत असताना घडत होते. त्याने बॅग पुढे घेणे, त्या २ मुलांनी लगोलग उड्या टाकुन मागे पळणे आणि त्याच वेळेला

निशांतचे ओरडणे की बॅग उघडी आहे आणि त्यात पाऊच दिसत नाहीये! हे सर्व इतक्या वेगात घडले की १ मिनिट काय झाले ते समजलेच नाही.

आम्ही दोघे जोरात ओरडलो पासपोर्ट गेला. तो पर्यंत आम्ही वर आलो होतो. तिथे बघितले तर कोणीच नव्हते. ती जिप्सी बाई आणि ते २ तरुण पळून गेले होते. आम्ही पुन्हा ला साग्रादा फामिलियाजवळ पोहोचलो. तिथे एक पोलिस उभा होता. त्याने त्याच्या जवळचा पोलिस स्टेशनचा पत्ता आणि नकाशा असलेला कागद दिला. आम्ही पोलिस स्टेशनकडे निघालो.

माझे तर रडणे काही थांबत नव्हते. निशांतलाही काही सुचत नव्हते. पो.स्टे. चा रस्ता पुर्ण चढाईचा होता. सकाळ पासुन चालून चालून पायाचे तुकडे पडले होते. त्यात आता हे नसते प्रकरण! ३० मिनिटे चालत, लोकांना विचारत आम्ही एकदाचे पो.स्टे. गाठले. तिथे बरेच लोक बसले होते. त्यात आमच्या सारखेच २-३ टुरिस्ट होते.

आमचा नंबर आला तेव्हा आम्ही पोलिसांना घडलेली हकीकत सांगितली. त्याने एक फॉर्म भरायला दिला आणि सांगितले की सगळ्यात आधी बँकेचे कार्डस ब्लॉक करा. आमच्याकडे बँकेचा नंबर नव्हता. आम्ही पोलिसांना बँकेचे नाव सांगताच त्याने आम्हाला बँकेचा नंबर लावुन दिला. फोनवरुन आम्ही सगळ्यात आधी कार्ड्स ब्लॉक केले. पोलिसांना सांगितले की आमचा पासपोर्ट चोरीला गेला आहे. त्यांच्या मते, बार्सेलोनामधे चोरीचे प्रकार रोज चालु असतात आणि एकदा चोरीला गेलेली वस्तु परत सापडणे जवळ जवळ अशक्य आहे. तर तुम्ही आता नवीन पासपोर्टकडे लक्ष द्या.

आम्ही लगेच पो.स्टे, मधुन निघालो. खिशात एक दमडी नव्हती. सकाळी काढलेले मेट्रोचे टिकिट काढले होते ते '१०X जर्नी' असे होते, म्हणजे आम्ही १० वेळा मेट्रो किंवा बसने कुठेही प्रवास करु शकतो. तिथून बस आणि मग मेट्रो असे करत कसे बसे हॉटेलवर पोहोचलो. तो पर्यंत ८ वाजुन गेले होते. घडलेला सगळा प्रकार आम्ही रिसेप्शनवर असेलेल्या मुलाला सांगितला. त्याने सांगितले की त्याचे सुद्धा दोन दिवसांपुर्वीच पाकिट चोरीला गेले होते. इथे चोरीचे प्रमाण खूप असल्यामुळे स्थानिक लोक अंगावर ३-४ ठिकाणी पैसे ठेवतात. संध्याकाळपर्यंत सुंदर वाटणारे स्पेन आता नकोसे झाले होते. आमचा हॉटेलचा रिसेपशनीस्ट क्युबाचा होता. त्याचे नाव कार्लोस. त्याने आम्हाला बराच धीर दिला.

दुपारच्या जेवणानंतर आम्ही काहीच खाल्ले नव्हते आणि आता तर भुकच मेली होती. २७ तारखेला आमची रिटर्न फ्लाईट होती आणि आता २४ तारीख संपली होती. फक्त मधले दोन दिवस राहिले होते, त्यात आम्हाला पासपोर्ट मिळवायचा होता आणि त्यासाठी युरोजसुद्धा! कोण देणार होते आम्हाला ह्या परक्या देशात युरो आणि का? आमचे इथे कोणीच ओळखीचे नव्हते. कार्लोसने आम्हाला सांगितले की काही युरोपियन विमान कंपनी पासपोर्ट कॉपीवर बोर्ड करण्याची प्रवानगी देतात. तरी माझ्या मनात शंका होती. सकाळी आता फोनाफोनी करण्याचा निर्णय घेतला होता. रात्री १० च्या सुमारास आम्ही बार्सेलोनामधल्या भारतीय वकिलातीला *(Indian consulate)* ला मेल केला. त्यांच्या कडून सकाळी उत्तराची अपेक्षा होती.

रुममध्ये आलो आणि पाणी पिऊन बेडवर आडवे झालो, तरी डोळ्याला डोळा लागेना. सतत एकच विचार - आम्ही ह्या देशातून आता निघणार कसे?

२५ जून २०१५ -

रात्रभर डो़क्यात सगळ्या प्रश्नांची मांडणी केली. भारतीय वकिलातीकडुन मदतीची बरीच अपेक्षा होती. आम्ही घरी कोणालाचा काही सांगितले नव्हते. घरच्यांना त्रास नको असा विचार केला होता. पहाटे ५ पासुन सगळ्या मित्र-मैत्रिणींना मेसेजेस केले. ऑफिस मधले, मिपा वरचे, स्लोव्हाकियातील जवळचे सगळ्यांना मेसेजेस टाकुन ठेवले. सगळ्यांनीच लगेच मदतीची तयारी दर्शवली.

पहिलं उत्तर आलं ते निशांतच्या स्पॅनिश मैत्रिणीकडून. तिने सांगितले की तिच्या स्पॅनिश अकाऊंट मध्ये ७० युरो आहेत. ती ते लगेच पाठवायला तयार आहे. काहीच नसण्यापेक्षा ७० युरो बरे. आता ते पाठ्वायचे कसे. मग युक्ती सुचली. कार्लोसच्या आकाऊंटमध्ये तिने पैसे पाठवले. २ तासात पैसे ट्रान्सफर झाले. ९ ला बँक उघडताच कार्लोसने पैसे काढून आमच्या हातात ठेवले. तो पर्यंत आमच्या ऑफिसमधल्या पोर्तुगीज मित्राचा मेसेज आला की त्याचा भाऊ बार्सेलोना मधेच शिकत आहे. तो मदत करु शकतो. त्याचा फोन नंबर आम्ही घेतला. अजुन एका आमच्या स्लोव्हाकियातील एका मित्राचा मेसेज आला. त्याची बहीण किरण पुर्वी बार्सेलोनामध्ये होती आणि आत्ता मेक्सिकोमधे राहते ती सुद्धा मदत करु शकते. त्याप्रमाणे आम्हीसुद्धा नक्की किती युरो लागतील त्याचा हिशेब करुन ठेवला. हे सगळे होई पर्यंत भारतीय वकिलातीचं उत्तर आलं होतं:

"Thank you for your kind mail dated the 24th of June.

We sincerely apologize for the situation that you have been found in Barcelona . Unfortunately the Consulate General of India in Barcelona don't intervene in the issue of passports. We beg you, in order to obtain a new passport, to contact the Embassy of India in Madrid. In order to travel to Madrid you can take a plane from the airport or a train AVE (high speed) from Sants Station in Barcelona."

हा रिप्लाय वाचून डोक्यालाच हात मारला. आता माद्रिदला जायचे कसे? युरोज कठुन मिळवायचे?

आम्ही सर्वात आधी एअरलाईन कस्टमर सर्विसला फोन केला. त्यांना घडलेली हकीकत सांगितली. त्यांच्या माहितीप्रमाणे आम्ही फोटो कॉपीवर प्रवास करु शकतो. थोडासा जीव भांड्यात पडला, पण मनात शंकेची पाल चुकचुकत होती. मी ठरवले की विमानतळावर जाऊनच चौकशी करु.

विमानतळावर जाण्याआधी माद्रिदमधल्या भारतीय दूतावासाच्या वेबसाईटवर बघितले. तिथे 'स्टोलन पासपोर्ट कॅटेगरी' मधील फॉर्म भरुन ठेवला. दूतावासाची अपॉइंटमेंट मिळाली २६ जुन - दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता.

अजून एक विचार मनात आला. स्लोव्हाकियन वकिलातीमधे गेलो. तिथे त्यांना घडलेली हकिकत सांगितली. तिथे असलेल्या स्लोव्हाकियन काउंसेलर फार प्रेमळ होत्या. त्यांनी आम्हाला आत बोलावले, विचारपूस केली. स्लोव्हाकियन पोलिसांना फोन करुन काहि मदत होऊ शकेल का तेही विचारले. त्यांनी सांगितले की स्लोव्हाकियन रेसिडेंस परमिट फक्त स्लोवाकियामधेच मिळू शकते. त्यांनी भारतीय वकिलातीला देखील फोन करुन विचारले. इथे सुद्धा असेल सांगितले की नवीन पासपोर्ट हा फक्त माद्रिद मध्येच मिळु शकतो. बार्सेलोनामधील वकिलातीमधे काहीच होऊ शकत नाही.

आता आम्हाला विमानतळावर जाऊन कंफर्म करायचे होते. एअरपोर्ट शटल फ्री असल्यामुळे, ७० युरो आणि पासपोर्ट कॉपीज घेउन एअरपोर्ट वर आलो. प्रचंड तणाव जाणवत होता. जर तिथल्या लोकांनी आम्हाला फोटो कॉपी वापरुन प्रवास करण्याची परवानगी दिली तर सगळा व्याप कमी होणार होता, नाही तर सगळेच अशक्य वाटत होते.

देवाचे नाव घेत चौकशी केंद्रापाशी पोहोचलो. आमच्या पुढे एक जर्मन माणूस उभा होता. तो काय बोलतोय ते आम्ही ऐकत होतो. त्याचा पण पासपोर्ट चोरील गेला होता आणि त्याला जर्मनीला जायचे होते. खिडकीच्या पलीकडच्या माणसाने त्याची पासपोर्ट कॉपी आणि पोलिस कम्प्लेन्ट बघितली आणि त्याला एक फॉर्म भरायला दिला. तो फॉर्म त्याने भरला आणि त्याला सांगितलं की तो जर्मनीला जाऊ शकतो. आम्ही मागे उभे राहुन सगळे ऐकत होतो. आता आम्हाला सुद्धा जाऊ देणार असे वाटु लागले. आत्मविश्वासाने आम्ही पुढे गेलो आणि त्याला आमची पासपोर्ट, व्हिजाची कॉपी, फ्लाईट तिकीट आणि पोलिस कम्प्लेन्ट लेटर सरकवले. त्याने ते नीट वाचले, तपासले आमच्याकडे एक कटाक्ष टाकला आणि पेपर परत आमच्या हातात दिले.

"No, You cannot fly to Slovakia without a valid original passport or id card. I am sorry. For more information please contact our duty manager who is sitting on the check-in counter"

आमचे धाबे दणाणले. त्या मॅनेजरकडे आम्ही गेलो. त्याला झालेली सगळी हकिकत सांगितली. त्याने पहिला प्रश्न विचारला -

"Show me a valid original ID that will prove and convince me that you are a Citizen of India and not a refugee from some country trying to escape"!!
आम्ही उडालोच! तो आम्हाला निर्वासित म्हणत होता. पण त्याने आम्हाला बॉर्डर क्रॉसिंग लॉबद्दल एक महत्त्वाची माहिती दिली ती अशी -

"If you are in a foreign country and you lose your passport, then you are allowed to fly with the photocopy of your passport to and only to your home country. In your case it is India, that is only if you can produce a ticket to India!!" you are not allowed to leave Spain otherwise. If you wish to travel to Slovakia or any other country in the EU, you need to carry at least your original passport and for that you will have to go to Madrid and visit your embassy. There is no other way out. I am sorry".

इतके सांगून तो निघून गेला. दुपारचे १२ वाजले होते. माद्रिदला कसे जायचे हा विचार मनात चालु होता. १२ दिवसांपूर्वी स्पेनचा प्रवास आम्ही माद्रिदहूनच सुरु केला होता. आता पुन्हा माद्रिदला उद्या सकाळी ११ च्या आत पोहोचायचे होते आणि एकच मार्ग होता. बार्सेलोना ते माद्रीद हा ६२३ किमीचा पल्ला आम्हाला इतक्या कमी वेळात फक्त *'AVE* ही हायस्पीड ट्रेनच पोचवु शकली असती. पण त्याचे तिकिट काढणार कसे. त्यात सकाळी भारतीय दूतावासाचा जो फॉर्म भरला होता त्यात लिहिले होते की तात्काळ पासपोर्टची किंमत माणशी २०० युरो असणार. म्हणले आम्हाला फक्त पासपोर्ट साठीच ४०० युरो आणि ट्रेनचे तिकीट त्याचा तर अजून हिशेबच केला नव्हता.

पासपोर्टसाठी आम्हाला दोन फोटोसुद्धा काढायचे होते. ते एका मेट्रो स्टॉपवर फोटो बुथ मधुन काढुन आलो. तिथून आम्ही आता हॉटेलवर पोहोचलो. वाय-फायमुळे आता सगळे मेसेज वाचले. मित्राची मेक्सिकोला असलेली बहिण आणि

पोर्तुगीज मित्राचे मेसेजेस आले होते. मित्राच्या बहिणीने किती युरो लागतील हे विचारले होते आणि मित्राने त्याच्या भावचा फोन नंबर पाठवला होता.

आम्ही इंटरनेटवर बार्सेलोना-माद्रिद-बार्सेलोना तिकिट बघितले. त्याची किंमत होती, ८०० युरो २ माणसांसाठी! आमचा होता नव्हता तो सगळा विश्वास खचला होता. आमच्या बँकेचे इथे एकही ऑफिस नव्हते, त्यामुळे पैसेही काढू शकत नव्हतो. आम्ही लगेचच मित्राच्या बहिणीला मेसेज केला की आम्हाला आज संध्याकाळ पर्यंत १५०० युरोची गरज आहे. आयुष्यात अशी परिस्थिती प्रथमच उद्भवली होती. कधीही न बघितलेल्या व्यक्तीकडे आम्ही १५०० युरो मागत होतो. तिचा मेसेज आला.

"How do I transfer and Will you give me back my money?"
"I am trying to figure out how and yes, I will transfer, please trust me. I am not a con man." - निशांत

लगोलग मित्राचा भाऊ मिगेलचा देखिल फोन आला. त्याला आम्ही हॉटेलवर बोलावले. अर्ध्या तासात मिगेल रुमवर आला. आमचे चेहरे बघून त्याला समजले असावे. त्याने विचारले आम्ही काही खाल्ले आहे का? आम्ही २४ तासांपेक्षा जास्त फक्त पाण्यावर होतो. परंतु दडपण इतके प्रचंड होते की भूक लागेना. त्याला आम्ही सगळे सांगितले. एकुण १५०० युरो लागणार होते. त्याने त्याच्या क्रेडिट कार्डवर आम्हाला ट्रेनचे तिकिट बुक करुन दिले. परंतु आता तो देखिल विद्यार्थी असल्यामुळे त्याच्याकडे जास्त पैसे नव्हते. त्यामुळे आता उरलेली कॅश मित्राच्या बहिणीकडून घ्यायचे ठरले.

आता प्रश्न होता मेक्सिको मधुन स्पेनला इतके पैसे पाठवायचे कसे आणि ते ही २ तासाच्या आत. किरणच्या लक्षात आले की मेक्सिकोमधील तिची बँक आणि मिगेलची बार्सेलोनामधील बँक एकच आहे, मग एटीएम मनी ट्रान्सफर सिस्टीमची तिनेच माहिती सांगितली. यामध्ये, ती तिच्या बँकेच्या वेबसाईट वरुन बार्सेलोनामधील एटीएम मशिन शोधणार होती. त्या मशिनच्या इथे आम्ही जाऊन उभे राहणार. मग ती त्या पैसे ट्रान्सफर करणार. पैसे ट्रान्सफर झाले की एक कोड जनरेट होणार आणि हा कोड ती आम्हाला देणार. आम्ही तो कोड एटीएम मशिनमधे पीन प्रमाणे टाकणार आणि युरो काढणार!! मोठे दिव्य होते.

तिने आम्हाला हॉटेल जवळच्याच एका एटीएम मशिनचा पत्ता दिला. आम्ही लगेचच तिथे पोहोचलो. तिने सांगितले की ती आता पैसे ट्रान्सफर करत आहे आणि मग कोड जनरेट झाल्यावर ती आम्हाला मेसेज करणार होती. ३० मिनिटे झाली, तरी तिचा काही फोन आला नाही. आमचे टेन्शन वाढत होते. मी, निशांत आणि मिगेल त्या मशिन समोरच उभे होतो. तिचा मेसेज आला. पहिले ट्रान्झॅक्शन फेल झाले होते. ज्या मशिन समोर उभे होतो ते हे चलन स्विकारत नव्हते. तिने बँकेत फोन करुन दुसरे एटीएम मशिन शोधले. सुदैवाने ते जवळच होते. आम्ही परत त्या मशिन जवळ गेलो. ५ मिनिटात तिने परत मेसेज करुन नविन कोड सांगितला. मिगेलने पटापट तो कोड एटीएम मशिन मधे टाकला आणि जादूची कांडी फिरवावी तसे ते एटीएम मशिन जिवंत झाले आणि त्यातुन ७०० युरो बाहेर पडले.

किरणला अनेक धन्यवाद देत आम्ही ते पैसे घेउन हॉटेलवर आलो. माद्रिदमधल्या भारतीय दूतावासाला फोन लावला. समोरुन एका उत्तर भारतीय माणसाचा आवाज आला. आमचे संभाषण खालील प्रमाणे:

Embassy - Hello, Indian Embassy Madrid.
*निशांत - Hello, Sir, my appointment number for tomorrow is *******.* मेरा पासपोर्ट चोरी हो गया है|
Embassy - तो आप कल आ जाओ ना सुभे, अभी कॉल क्यु किया? अभी हमारा घर जाने का टाईम हो गया है|
निशांत - सर, लेकिन एक बार डॉक्यूमेंट्स फिरसे बता दो ना, कौनसे लाने है, हम बार्सेलोनासे आने वाले है|

Embassy - तो वेबसाईट पे लिखा है वो ओर साथमे २ फोटो और कॅश. अभी मे फोन रखता हुं|
(फोन कट)

आता आमचे सगळे कागदपत्र, युरो, फोटो तयार होते. सर्व मित्रमैत्रिणींना आम्ही हे कळवले. उद्या पहाटे ५ ची ट्रेन होती जी आम्हाला ९ पर्यंत माद्रिदला पोहोचवणार होती. तिथुन पुढे मेट्रो करुन भारतीय वकिलातीत जायचे होते. रात्रीच आम्ही कार्लोसला सांगुन ट्रेन स्टेशनला जाण्यासाठी टॅक्सी बुक केली होती.

रात्री बेडवर आडवे झाल्यावर मनात विचार आला. २४ तासांपुर्वी आपल्या बॅगेची चोरी झाली तेव्हा हातात १ पैसा देखील नव्हता आणि आम्ही २४ तासात पुर्णपणे अनोळखी देशात, आयुष्यात कधी न भेटलेल्या माणसांची मदत घेऊन - ७०० युरो कॅश आणि ८०० युरोचे ट्रेन तिकिट काढले होते! हे कुठल्याही चमत्कारापेक्षा कमी नव्हते.

२६ जून २०१५ -

सकाळी अगदी वेळेवर टेक्सी आली आणि आम्ही ट्रेन स्टेशनवर जाऊन पोहोचलो. आम्ही बार्सेलोनावरुन निघालो. माद्रिद आधीच फिरुन आल्यामुळे आम्हाला मेट्रोची पुर्ण कल्पना होती. त्या प्रमाणे माद्रिद स्थानकाहून मेट्रोने लगेच भारतीय वकिलातीत पोहोचलो.

एका रागीट दक्षिण भारतीय माणसाने आमचा नंबर आल्यावर आम्हाला बोलावले. आमचा फॉर्म तपासला आणि तो कडाडला -

"Are you people ashamed of writing your parents name in your passport? You young generation have no manners"
फॉर्म भरताना आम्ही *"First name"* ह्या कॉलम मधे फक्त आमचे पहिले नाव टाकले होते. तेथे *fathers name* किंवा *middle name* असे काही विचारले नव्हते. तरी आता दुसरा पर्याय नव्हता. त्याची बोलणी शांतपणे मान खाली घालून ऐकली. शेवटी त्याने आम्हाला ४ तासांनी या, पासपोर्ट तयार असेल असे सांगितले. ४ तास आम्ही मेट्रो स्टेशन वरच काढले. हातात पैसे असल्याने आता थोडे खाऊन घेतले. वायफाय कनेक्ट करुन सगळ्यांना अपडेट दिले. अजुनही आम्ही घरी काहीच सांगितले नव्हते.

दुपारी २ ला आम्ही पुन्हा दूतावासात पोहोचलो. २० मिनिटात आमचा नंबर आला. पासपोर्ट तयार होता. पासपोर्ट घेउन लगेच परत ट्रेन स्टेशनवर आलो. परतीच्या प्रवासाची वेळ झाली. रात्री ११.३० च्या सुमाराच आम्ही हॉटेलवर पोहोचलो. आमच्या हातात आता नवा कोरा पासपोर्ट होता.

दुसऱ्या दिवशी ७ ला हॉटेल खाली आमची एअरपोर्टला घेउन जाणारी टॅक्सी येणार होती. आमच्याकडे आता फक्त एकच कागद नव्हता, स्लोव्हाकियाचे आमचे रेसिडेन्स कार्ड/व्हिसा
एअरपोर्टवरच्या मॅनेजरचे शब्द आठवले - - *"You can travel with only one ID proof - that is ok, but at times even if you are travelling within the European Union, the Emigration authority or even the person who issues your boarding pass may ask for your Residence Permit or Visa of the destination country and in case you fail to produce so, he has full authority to keep you grounded on Spanish Soil until furhter action is taken"*

हा विचार केला आणि मनातल्या मनात देवाची प्रार्थना केली आणि झोपायचा प्रयत्न चालू केला.

२७ जून २०१५ -
सकाळी टॅक्सी हजर होती. सर्व सामान रात्रीच पॅक करुन ठेवले. कधी एकदा स्पेनमधून बाहेर पडतोय असे झाले होते. कार्लोसला मनापासुन धन्यवाद देत आम्ही टॅक्सी मधे बसून विमानतळावर पोहोचलो. चेक-इन करण्यासाठी रांगेत उभे होतो. बॅग चेक-ईन झाल्या, त्याने आमचा पासपोर्ट पाहिला, तिकिट पाहिले, बोर्डिंग पास दिला आणि म्हणाला, *"Your seat is 8A and 8B, please proceed to security and onto Gate B"* पहिला टप्पा बाहेर पडला. सिक्युरिटीचा टप्पा देखिल पार पडला.

आम्ही एकदाचे विमानात बसलो आणि विमानाने उड्डाण केले. खिडकीतून बार्सेलोना शहराचा मोठा पसारा दिसत होता, याच शहरात कुठे तरी ते दोन तरुण होते ज्यांनी आमची बॅग चोरली आणि प्रचंड मानसिक त्रास दिला होता. पण ह्याच शहराने आम्हाला माणुसकीची वेगळी झलक दाखवुन दिली होती.

चोरी झाली त्या रात्री, आम्हाला मानसिक पाठिंबा देणारा आमच्या हॉटेलचा क्युबन रिसेप्शनिस्ट - कार्लोस

दुसऱ्या दिवशी आमच्यासाठी माहिती काढणारी स्लोव्हाकियन एम्बसीची कौन्सेलर

आम्हाला सर्वात प्रथम ७० युरो देणारी स्पॅनिश मैत्रीण - पॉला

कसलीही ओळख नसताना आमच्यासाठी ट्रेनचे तिकिट काढणारा - मिगेल

फक्त तिच्या भावाच्या शब्दावर विश्वास ठेवुन आम्हाला ७०० युरो पाठवणारी मिक्सिकोस्थित - किरण

आणि त्याचबरोबर वॉट्सअॅप, इमेल, फेसबूक आणि व्हायबरवरून सतत आमच्या संपर्कात राहणारे आमचे मित्रमैत्रिणी, ऑफिसमधील सहकारी आणि अर्थात मिपाकर - सानिकास्वप्निल, अजया ताई आणि पैसा ताई.

या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळेच आम्ही स्पेन मधून सुखरुप परतु शकलो. युरोपमधे रेफ्युजी क्रायसिस वाढत असताना घडलेली ही घटना ज्यामुळे आमच्यावर देखील रेफ्युजी होण्याची वेळ आली होती!

स्लोव्हाकियामधे पोहोचल्यावर सर्वप्रथम आम्ही सगळ्यांचे पैसे परत केले. रेसिडेन्स परमिट्साठी पुन्हा एकदा अप्लाय केले आणि एका सुरळीत आयुष्याला सुरवात केली.

ह्या घटनेतून घेतलेले काही धडे -

१. तुम्ही स्वत: कितीही प्रवास करत असलात तरी पासपोर्ट, पैसे, डेबिट्/क्रेडिट कार्ड्स आणि पैसे एकत्र ठेवू नये..
दोघांकडे थोडे थोडे पैसे ठेवावेत.
३. पासपोर्ट कधीही बॅगेत किंवा पिशवीत ठेवुन प्रवास करु नये. जॅकेटच्या किंवा शर्टच्या आतल्या कप्प्यात ठेवावे.
४. हे सगळे करुन सुद्धा जर का दुर्देवाने चोरी झाली आणि पासपोर्ट हरवला तर प्रथम पोलिस तक्रार करावी. त्याशिवाय काहीही होऊ शकत नाही.
५. कितीही वाईट परिस्थिती आली तरी स्वत:वर विश्वास ठेवावा आणि लगेच मदतीची हाक द्यावी. एकटे रडत बसण्यात अश्यावेळी काही अर्थ नसतो.

...and ofcourse Barcelona is a very beautiful city and a must visit if you are in Spain. but make sure you take care of your belongings all the time ;-) Have a safe journey.!! :)

बचके रेहना रेअर्थात प्रवासातली सुरक्षितता ...

- ✓ शक्यतो प्रवास दिवसा सुरु करून संध्याकाळपर्यंत संपवणे.
- ✓ शक्यतो प्रवास तुमच्या गावाला असलेल्या नॉन-स्टॉप एस.टी. ने करा. गाडी बंद पडली तरी पर्यायी व्यवस्था करतात.
- ✓ आपले आपल्याला सहजपणे उचलून नेता येईल असे सामान ठेवणे, ज्यायोगे दुसऱ्या मनुष्यास मदतीसाठी बोलावण्याची वेळ येऊ नये.
- ✓ आपले सामान लक्ष न देता टाकून उगाच फिरु नये. तसंच पायाजवळ बॅग टाकून वाचत बसणं हेही धोकादायक.
- ✓ प्रवासात किमती वस्तू जवळ ठेवू नयेत. जर दागिने घेऊन प्रवासात निघण्याची वेळ आलीच तर बरोबर नातेवाईक असल्यास सोय होते. स्वच्छतागृह वापरण्याच्या वेळेस सामानाकडे लक्ष राहू शकते.
- ✓ कोरडे अन्नपदार्थ जवळ ठेवावेत म्हणजे भुकेच्या वेळेस आपली जागा सोडून उठून जावे लागत नाही. पाण्याची बाटलीही घरूनच घेऊन जावी. कोणाचेही अन्न पाणी ड्रिंक्स शेअर करु नये.
- ✓ सहप्रवाश्यांशी ओळख वाढवताना सावधानता बाळगावी. प्रवासात शेजारील व्यक्तीशी फार अघळपघळ बोलून आपल्या पर्सनल डिटेल्स देऊ नयेत किंवा आपण का जातोय, कोणाकडे जातोय, आपला पत्ता इ. माहिती बोलण्याच्या ओघात सांगू नये.
- ✓ चार्ज केलेली पॉवर बँक जवळ असणे जरुरी आहे.शक्य असेल तर दोन सिमकार्ड दोन वेगळ्या हँडसेटमधे घालून ठेवावीत. त्यातला एक बॅटरी भरपूर चालणारा साधा पाहिजे. म्हणजे एक तरी मोबाईल कायम चालू रहातो.
- ✓ रात्री प्रवास करण्याची वेळ आल्यास बस, ट्रेनमधून उतरून रिक्षा, टॅक्सीने इच्छित स्थळी जाताना घरी फोन करून ज्या वाहनात बसतोय तो क्रमांक कळवावा. शक्य असल्यास फोनवर बोलत अथवा मध्येच फोन करून आपण कुठपर्यंत आलोय हे कळवत रहावे.
- ✓ रात्री प्रवास करताना तुम्ही जिथून निघता तिथे आणि जिथे पोचणार तिथे, दोन्ही ठिकाणच्या किमान एका विश्वासू व्यक्तीला याबद्दल माहिती असावी. जीपीएस वरुन जवळच्याना लोकेशन पाठवू शकता. बाकीच्यांना शक्यतो सांगू नये. मोबाईल डिसचार्ज झाला तर अडचण येऊ नये म्हणून महत्वाचे फोन नंबर कागदावरही लिहिलेले असावेत किंवा पाठ करून ठेवावे. म्हणजे ऐन वेळी मोबाईल चोरीला जाणे, बॅटरी लो असणे वगैरे केस मध्ये फजिती होत नाही.
- ✓ एखाद्या नव्या ठिकाणी अगदीच अपरात्री पोहोचण्याची वेळ आली तर पहाट होईपर्यंत स्टेशन्, एअरपोर्टवरच थांबावे.

प्रवासातले काही अनुभवः फतेहपूर सीकरी, दिल्ली आणि म्हैसूर बंगलोर

(लेखिका - पैसा)

फतेहपूर सीकरी

मुलं लहान असताना त्यांना घेऊन जमेल तसे फिरत होतो. २००५ मधे दिवाळीच्या आधी सुटी घेऊन दिल्ली वारी करू म्हटले. दिल्लीला जायचे म्हटल्यावर ८० वर्षांचे सासरे बरोबर येतो म्हणाले. त्यांची दोघांचीही तिकिटे काढली. हॉटेल्स दिल्लीत जाऊन बघू म्हटले. दोन म्हातारे आणि दोन मुले बरोबर असल्याने फार काही बघून होणार नाही हे माहीत होतेच. त्याप्रमाणे दिल्ली, आग्रा, मथुरा, फतेहपूर सीकरी एवढाच प्लॅन ५ दिवसांसाठी ठरवला.

जुनी दिल्ली, लाल किल्ला, म्युझियम वगैरे पाहिले. मथुरा वृंदावन, आग्रा किल्ला, ताजमहाल हे बघून झाले. हॉटेलवाल्याने गाडी ठरवून दिली होती तो ड्रायव्हर मुस्लिम होता. अतिशय अदबशीर ऊर्दू-हिंदी बोलणारा आणि व्यवस्थित माणूस. पान सिगारेट काही व्यसन दिसले नाही. ग्रँड ट्रंक रोडवर दरोडे वगैरे घातले जातात असे काहीबाही सांगत होता. फतेहपूर सीकरीला जाताना किल्ल्याजवळ पोचताच ५/६ टपोरी पोरांनी गाडीच्या मागून पुढून धावत गाडीला अक्षरशः घेरले. दोघेजण गाडीच्या बॉनेटवर चढले. शेवट ड्रायव्हरने गाडी थांबवली. पोरे एकूण 'अवतार' दिसत होती. ऊर्मट भाषेत आम्ही गाईड आहोत, किल्ला दाखवू म्हणाले. ड्रायव्हर काही बोलेना. दोन म्हातारे आणि दोन मुले बरोबर असताना विरोध तरी कसा करणार?

नशिबावर भार टाकून त्यांच्याबरोबर गेलो. त्यानी सलिम चिश्तीच्या दर्ग्यात नेले. तिथे चादर चढवा म्हणून त्या चादर विकणाऱ्याला दीडशे रुपये देणगी झाली, फुले सब्जा वगैरे झाले. आणि मग त्या पोरांना खंडणी दीडशे रुपये दिल्यावर परत त्यांनी गाडीकडे आणून सोडले. गाडी सुरू झाल्यावर ड्रायव्हर म्हणाला "साब, असली किला आगे दूसरे दरवाजे से जाकर मिलेगा" पुन्हा आता असलाच प्रकार आहे का म्हणून जीव मुठीत धरून बसलो. पण नाही. तिकडे गेल्यावर खरा किल्ला, जोधाबाई महाल, दरबार वगैरे बघायला मिळाला. पण साक्षात दिल्लीच्या जवळ गाईडच्या नावाखाली अशी लुटालूट कशी काय चालू देतात हा प्रश्न पडला. ड्रायव्हरही त्या प्रकारात सामील असावा का शंका आलीच, पण हा प्रकार होऊन गेल्यावर आता काय उपयोग होणार होता? तीनशे रुपये अक्कलखाती खर्च समजून गप्प बसलो. मात्र इतर ट्रिप छान झाली त्यामुळे एक गालबोट एवढेच म्हणून दुसऱ्या दिवशी शॉपिंगला आणि चांदनी चौकात जायचे ठरवले.

दिल्ली

चांदनी चौकात एक दहा मिनिटे भयानक टेन्शनची गेली. झालं काय की तिथल्या प्रसिद्ध गुरुद्वारासमोर आम्ही जरा रेंगाळलो तेवढ्यात सासरे आणि सासूबाई गायब!! जिवाचे पाणी झाले. त्याना हिंदी काही समजत नाही. सगळ्या बाजूंना माणसांचा अफाट सागर. धनत्रयोदशीचा दिवस, संध्याकाळ. सगळी दिल्ली शॉपिंगसाठी बाहेर पडलेली. शोधायचे तरी कुठे? मुलाचे प्रसंगावधान तेवढ्यात कामाला आले. तो म्हणाला आजोबा आपल्या पुढे या फूटपाथवर चालत पुढे होते. त्यांच्यासोबत आजी पण होती. नवरा अक्षरशः धावत त्या दिशेने गेला. एका सिग्नलसमोर फूटपाथच्या टोकाला दोघेही उभे सापडले! (माझ्या सासऱ्यांना असे कोणी सोबत आहे का नाही न बघता चालत सुटायची सवय आहे) तिथल्या ट्रॅफिकमधे रस्ता क्रॉस करायची हिंमत त्यांना झाली नाही हे नशीब.

शॉपिंग वगैरे विचार कॅन्सल करून आम्ही परत पहाडगंज एरियातल्या हॉटेलवर आलो. हॉटेलच्या बाहेर वातावरण जरा विचित्र वाटले. लोक काळजीत दिसत होते आणि घाईघाईत इकडून तिकडे जात होते. बहुतेक हॉटेल्स आणि दुकाने बंद होती. जरा टेकतोय तेवढ्यात भावाचा फोन आला, "तुम्ही कुठे आहात? सगळे सुरक्षित आहात ना?" काय झालं म्हणून विचारले तर टीव्ही लाव म्हणाला. पहाडगंज भागात बॉम्बस्फोट झालाय. अजून कुठे कुठे बाँबस्फोट झालेत आणि चांदनी चौक भागात एक बॉम्ब पकडला गेलाय. अरे देवा!

आम्ही राहिलो होतो तिथून २ रस्ते ओलांडून पलिकडच्या गल्लीत बाँबस्फोट झालेला. चांदनी चौक मधून आम्ही निघालो त्यानंतर अर्ध्या तासात तिथेही एक बाँब डिफ्युज केला होता! सासरे दुसऱ्या खोलीत विश्रांती घेत होते. त्यांना ब्लडप्रेशरचा त्रास आणि अनोळखी गावात उगीच टेन्शन नको म्हणून काही सांगितलेच नाही. रात्री हॉटेलचे रेस्टॉरंट बंद होते. बरेचसे चालून एक बंगाली खानावळ उघडी सापडली. तिथे पटापट मिळाले ते जेवून परत येऊन झोप काढली. सासरे जरा त्या जेवणाबद्दल कुरकूर करत होते, पण ते फक्त ऐकून घेतले. दुसऱ्या दिवशी ऑगस्ट क्रांतीने परत यायची तिकिटे काढली होती.

संध्याकाळपर्यंतचा वेळ कसातरी काढला. बाहेर कुठे जाणे शक्य नव्हतेच. गाडीत पेपर बघताना सासऱ्यांना समजले की दिल्लीत बाँबस्फोट झाले. मुंबईला नणदेच्या घरी पोचल्यावर ते गप्पा सांगत होते, दिल्लीत असे बाँबस्फोट झाले तसे झाले, तेव्हा मुलगा म्हणाला, "काय आजोबा, दिल्लीत असताना तुम्हाला स्फोट झाले हे कुठे माहीत होते?" :D हा आमचा बॉम्बस्फोटांचा सर्वात जवळून घेतलेला अनुभव. प्रत्यक्षात ज्यांना असे कुठे दुर्दैवाने स्फोटाच्या किंवा दहशतवादाच्या तडाख्यात सापडून त्रास होत असेल त्याची किंचित का होईना कल्पना मात्र तेव्हा आली.

बंगलोर - म्हैसूर

२००६ साली म्हैसूर, बंगलोर ऊटीला जायचे ठरले. बंगलोर पर्यंत रेल्वेची तिकिटे आयआरसीटीसीवरून विनासायास काढली. मात्र हॉटेल आणि तिथल्या लोकल साईट सीइंगची व्यवस्था तिथे गेल्यावर करू म्हणून निवांत राहिलो. गेल्यावर बंगलोरमधे हॉटेल चांगले मिळाले. म्हैसूर बघायचे आहे केटीडीसी च्या बसची तिकिटे कुठे मिळतील म्हणून हॉटेलवाल्याला विचारले. तर इथेच शेजारी ऑफिस आहे म्हणाला म्हणून आम्ही बुकिंग केले. ऑफिस लहानसे होते. आणि प्रवासाची तिकिटे हातात पडली त्यावर दादा ट्रॅव्हेल्स असे नाव! बाहेर येऊन पाहिले तर केटीडीसीचा बोर्ड!! हा काय प्रकार म्हणून विचारले तर "इदर ऐसाच रहता" हे उत्तर तिथल्या माणसाने दिले.

हे सगळे काही बरोबर वाटेना. संध्याकाळी पुन्हा तिकिटे कॅन्सल करावी म्हणून गेलो तर तिथे दुसराच कोणीतरी गुंडासारखा दिसणारा माणूस बसलेला. त्याची हिंदी अजून दिव्य. पण अर्थ समजला. तिकिटे कॅन्सल होणार नाहीत. तुम्हाला नको तर येऊ नका. पैसे परत मिळणार नाहीत हे समजले. आता असो. काय फसवणूक करतील? एखादे दुसरे ठिकाण दाखवणार नाहीत. असे ना का! जाऊ म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी सांगितल्या ठिकाणी भरभर आटपून हजर राहिलो. आठाचे नऊ झाले, नऊचे दहा झाले तरी बसचा पत्ता नाही! शेवट साडेदहाला एकदाचा एक बसनामक प्रचंड आवाज करणारा खटारा आला. इतका उशीर म्हटल्यावर माझे डोके आधीच गरम झाले होते.

बस अजून उशीर उशीर करत काही ठिकाणे दाखवून चालत होती. त्या बसवाल्यांची जेवणाची ठिकाणे ठरलेली असतात. तिथे पोचायला दुपारच्या दीडऐवजी पावणेचार झाले. प्रवासात असल्याने काही च्याव म्याव बरोबर होतं. पण माझ्या मुलाला पहिल्यापासून वेळेवर व्यवस्थित जेवायची सवय. त्याला खूप भूक लागलेली. त्याचे कळवळणे बघून मला रडू फुटले. आधीच केटीडीसीच्या नावाचा वापर करून फसवणूक झाली म्हणून डोक्यात संताप खदखदत होता. त्यात सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे मुलाचा त्या दिवशी वाढदिवस म्हणून आम्ही ती ट्रिप आखली होती!

माझा सगळा संताप टूर गाईडवर निघाला. त्याला म्हटले, वेळेवर गाडी जेवायला का थांबवली नाही? तो म्हणे की आमची ठरलेली हॉटेले असतात. त्या दिवशी मी त्यालाच नव्हे, त्याच्या मुलांना शाप दिला. म्हटले, तुला मुले आहेत? माझ्या मुलाला वाढदिवसाच्या दिवशी तुझ्यामुळे उपाशी रहावे लागले, तुझी मुले पण उपाशी राहतील. त्याच्या चेहऱ्यावर एकच अर्धा क्षण चलबिचल दिसली. पुन्हा काहीच झाले नाही असा तो निगरगट्टपणे पुढे चालता झाला.

संध्याकाळी परत यायला उशीर झाला. सगळ्या दिवसाची वाट लागली होती. भुकेमुळे कोणाला काय पाहिले त्यातही इंटरेस्ट राहिला नव्हता. फसवणुकीमुळे अपमान, निराशा आणि असल्या सगळ्या निराश भावना घेऊन ती म्हैसूर ट्रिप पार पडली. दुसऱ्या दिवशी ऊटीला जायचे होते. सुदैवाने दादा ट्रॅव्हेल्सकडे बुकिंग केले नव्हते. आम्हीच दुसऱ्या एका बसने गेलो आणि कोणत्याही अपघाताशिवाय बंगलोरला परत आलो. मैसूरच्या दादा ट्रॅव्हेल्सच्या अनुभवावर जरा उतारा मिळाला. चांगली गोष्ट म्हणजे ऊटीहून परत येताना बसमधे मुंगारु मळे चित्रपटाची अतिशय गोड गाणी पहिल्यांदाच ऐकायला मिळाली!

नंतर इकडे तिकडे बोलताना कळले की बंगलोरमधे कसल्याही चिंधी ट्रॅव्हेल्सनी केटीडीसीचे बोर्ड लावून लुटालूट चालवली आहे. आणि केटीडीसीही त्याच्याकडे काणाडोळा करते. आता या गोष्टीला १० वर्षे झाली. आताची परिस्थिती काय माहीत नाही.

उत्तर असो की दक्षिण आपण भारतीय प्रवाशांची फसवणूक आणि प्रेक्षणीय स्थळांच्या जवळ गुंडगिरी यात सगळीकडे सारखेच आहोत! आता हॉटेल बुकिंग आणि लोकल साईट सीइंग सगळे ऑनलाईन आणि सोपे झाल्यामुळे एवढी फसवणूक होत नसेल. पण जे असे ऑनलाईन बुकिंग करू शकत नाहीत, त्यांची परिस्थिती मात्र कठीण वाटते. प्रवासात अनेक चांगले अनुभवही आले. मुलगा अगदी लहान असताना भाषा सुद्धा न कळणाऱ्या केरळी हॉटेलवाल्यांकडून वेळोवेळी गरम पाणी, दूध, दूधभाताची व्यवस्था होणे असो की कोणी आजारी पडल्यावर अनोळखी गावात जुन्या डॉक्टरने नीट समजून उपचार करणे असो. आंबटगोड अनुभव सगळीकडे येणारच. मात्र हे फसवणुकीचे दोन अनुभव सांगावेत असे वाटले, कारण एरवी आपण खाजगी कंपन्यांचे काम सरकारी कंपन्यांपेक्षा चांगले असे समजतो, पण प्रवासाच्या क्षेत्रात मात्र सरकारी कंपन्याच उत्तम. कारण गाड्या वेळेत सुटतात, वेळेत पोचतात. आपल्याला किती पैशात काय मिळणार आहे याची सुरुवातीलाच कल्पना असते. व्यवहारात पारदर्शकता महत्त्वाची. इथे गोव्यात येणाऱ्यांना मी नेहमी सरकारी गोवा टुरीझमच्या हॉटेल्सची शिफारस करते ती याचसाठी. तिसरा अनुभव म्हणजे दहशतवादाशी लांबून ओळख झाली ती एवढी घाबरवणारी होती, की ज्यांना सहन करावे लागत असेल त्यांच्या हालांची पुसट तरी कल्पना आपल्याला असावी.

झंडा ऊँचा रहे हमारा!

(लेखिका - सुरन्गी)

२ डिसेंबर २०१५ ते २२ डिसेंबर २०१५ आमचा न्यूझीलंड-थायलंड दौरा ठरला होता. एका एजंटने थायलंड बुकिंग जसे हवे तसे करून दिले. तिलाच न्यूझीलंडचेही बुकिंग करायला सांगितले. पण आधी ती आणि नंतर मी आजारी झाल्याने ते लांबणीवर पडत गेले. जेव्हा तिच्याकडून न्यूझीलंडचा प्लान आणि थायलंडचे पक्के रिझर्वेशन आले, तेव्हा लक्षात आले की, मी दिलेल्या प्लॅनपेक्षा त्यात बरेच बदल झाले आहेत. थायलंडचे बुकिंग मेक माय ट्रिप या कंपनीतर्फे झालेले दिसत होते.तेव्हा आपण स्वतः जाऊन त्यांना भेटून आपल्याला हवा असलेला प्लान मिळतो का पाहू असे ठरवून मालाड इथल्या त्यांच्या ऑफिसात गेलो. त्यांनी आधी कबूल केले. त्यांच्याशी जवळजवळ पूर्ण दिवसभर चर्चा करून रूपरेषा ठरवली. आठच दिवसात खर्चाची रक्कम ८३,०००० पर्यंत येईल असे त्यांनी कळवले. ही रक्कम आधी त्याच्या ठाण्यातल्या शाखेने दिलेल्या अंदाजापेक्षा २०,००० रुपयांनी जास्त होती, पण आता निघायला महिनाच उरल्याने आम्ही तेही कबूल केले. निम्मी रक्कम रोखीने लगेच भरली. उरलेल्या रकमेचा धनादेशही त्यांनी सांगितलेल्या दिवशी भरला.

काही दिवसांनी त्यांनी फोनवर कळवले की, "दोन हॉटेलांचे बुकिंग पक्के झाले आहे पण उरलेल्या दिवसांसाठी खर्च वाढेल". "किती वाढेल?", असे विचारल्यावर त्यांनी जो आकडा सांगितला तो ऐकून पायाखालची जमीनच सरकली. मी ओरडलेच, "काय? दोन लाख चाळीस हजार? तुम्ही काय प्रेसिडेंट हाऊसमध्ये बुकिंग करताय की काय आमचं?" "त्याचं काय आहे? तुम्ही इतक्या उशिरा आमच्याकडे आल्याने किंमत वाढतेय." त्यांनी मला समजावण्याचा प्रयत्न केला. मी रागानेच उत्तर दिले, "तुम्ही जेवढे पक्के केले आहे, तेवढेच पुरे, पुढचे बुकिंग तुम्ही करू नका. मी पाहीन काय ते."

नंतर बरेच काही रामायण घडले पण तो या लेखाचा विषय नाही फक्त पूर्वकल्पना येण्यासाठी थोडी माहिती दिली. पाच दिवसांचे पक्के आरक्षणही त्यांनी आम्ही घरातून निघताना आमच्या हातात ठेवले आणि आम्ही धाडस करून पाच दिवसांच्या थायलंडच्या आरक्षणाच्या जोरावर उरलेल्या पाच दिवसांचे आरक्षण नसतानाही न्यूझीलंडच्या दौऱ्यावर निघालो. पाच दिवसांनी हॅमिल्टनमध्ये उतरलो तेव्हा आमच्याकडे कुठल्याही हॉटेलचे आरक्षण नव्हते. तिथल्या बसस्टेशनवर बसून नेट धुंडाळले. माझ्या यादीतील हॉटेलांपैकी 'हॉटेल आयबिस' मध्ये त्या दिवशी जागा उपलब्ध नव्हती. मग दुसरे हॉटेल होते, 'ॲबटस' हॅमिल्टन! तिथे जागा दिसत होत्या. शिवाय दीड कि.मी अंतरावरच ते होते. आता तिथे जाऊन पाहू असे ठरवले, कारण दोन देशांचा दौरा होता. एक लग्न न्यूझीलंडमध्ये आणि त्याच लग्नाचे रिसेप्शन थायलंडमध्ये असल्याने आणि न्यूझीलंडमध्ये उन्हाळा असला तरी आपल्यासाठी ती थंडीच असते. त्यामुळे सामान भरपूर होते. कुठेतरी तात्पुरता आसरा तरी पाहणे गरजेचे होते. तिथेच एका बाजूला टॅक्सीस्टँड होता. तिथे जाऊन टॅक्सी करून ॲबटस, हॅमिल्टनला पोचलो.

तिथली व्यवस्थापक एक मुलगी होती, अगदी विशीबाविशीची. तिच्याशी बोलायला सुरुवात केली. चेक इन टाईम होता दोनचा. आता दहाच वाजले होते. ज्या खोलीचे मला मेक माय ट्रिपने १८० न्यूझीलंड डॉलर्स सांगितले होते त्याप्रकारातली खोली पहिल्या मजल्यावर असून भाडे ८९ असे सवलतीचे होते. शिवाय दुसऱ्या दिवशी राहिले तर १० डॉलर्स अजून कमी होणार होते. आम्ही तळमजल्याची रूम पसंत केली. ज्यात सोयी आम्हाला हव्या तशा होत्या आणि खोली मोठीही होती. तिचे भाडे होते १०९ डॉलर्स. शिवाय या रूमलाही दुसऱ्या दिवसापासून १० डॉलर्स कमी होणार होते. त्या रस्त्यावरच्या ९०% इमारती म्हणजे हॉटेल्स आणि मोटेल्स होती. त्या मुलीने स्वत: जाऊन रूम तयार करून दिली.

अगदी जशी फोटोत दिसत होती तशीच. आम्ही तिथे दोन दिवसांचे आरक्षण करून टाकले. बाकीच्या सोयी कशा आहेत ते पाहून नंतर बदल करू किंवा इथेच रहायचे तर आरक्षण वाढवू, असे ठरवले.

चौकशी करताना समजले की हॉटेल मालक चीनी असून सर्व कर्मचारीवर्गही चीनी होता. तिथेच जेवणाचीही सोय होती, नाश्ता राहण्याच्याच किमतीत समाविष्ट होता. थोड्या वेळाने जरा आराम करून फिरायला निघालो. बाहेर पडताना दिसले की, त्या हॉटेलच्या मुख्य इमारतीवर निरनिराळ्या देशांचे दहा बारा झेंडे फडकत होते. त्यात चीनी झेंडा होता, तसेच आपलाही झेंडा होता. परंतु न्यूझीलंडच्या वादळी वाऱ्याच्या जोराने ते सर्व फाटलेले दिसत होते आणि तसेच चिंध्यासकट फडफडत होते. आपल्या झेंड्याच्या थोडा तिरकस असल्याने एक दोनच चिंध्या निघाल्या होत्या.

फाटलेला झेंडा लावणे हा झेंड्याचा अपमान आहे, त्यातून मालक चीनी म्हटल्यावर मी गप्प बसणे शक्यच नव्हते. स्वातंत्र्यसैनिक कै. सी. व्ही.वारद हे दर १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीच्या नंतर भारतभरात घडलेल्या झेंड्याच्या अपमानाबद्दल जागरूक राहून सरकारकडे तक्रारी नोंदवीत असत. त्यानुसार कारवाई करून वेळ पडलीच तर फौजदारी कारवाई करावी लागत असे. नवरा म्हणाला, "थोडे सबुरीने घे.आपण परदेशात आहोत." "पण आपण भारतीय पासपोर्टवरच आलोय आणि इथे आपल्याला ओळखणारे खूप लोक आहेत. वेळ पडली तर." असे त्याला सांगून मी त्या व्यवस्थापक मुलीला बोलावून तिला ते झेंडे दाखवून सांगितलं, "*This is wrong, You can't put my flag like this torn status. This is an insult of me, my flag, my nation too*" ती गडबडली,म्हणाली, "*I am sorry. I will call my master.*"

"*You call him here. I will talk to him, because this is an International issue.*" मी ठणकावले.

अर्ध्या तासातच मालक आले. मी त्यांना ते फटके झेंडे दाखवून पुन्हा आधीचेच वाक्य थोडीशी भर घालत म्हटले, "*This is wrong, You can't put my flag like this torn status. This is an insult of me, my flag, my nation too. This is a treasonable offence.*" त्यावर त्यांनी उत्तर दिले, "*This is only for decoration and we have windy weather in Newzealand here.*" आता माझी सटकली. "*Look MR. national flags are not things of decoration. They are Pride points. If you want to decorate your hotel by national flags, you should paint them on the wall or you should stick them on the wall properly. But when you unfurl them on flagpole you must conduct the flag code. Each country has flag code and any country does not allow to unfurl torn flag. Not even your country .See, your flag is also torn. If you are not concerned about your flag, I don't mind, but I mind well about my pride point. My flag! So please change it immediately or if you can't change it now please remove it at first*."

मी एका दमात एवढे सांगितल्यावर त्या सद्गृहस्थाने आपल्या कर्मचाऱ्यांना, जे आधीच तिथे उभे होते, त्याच्या भाषेत काहीतरी सांगितले आणि मला सांगायला आनंद वाटतो की त्या चीनी माणसाने तो झेंडा बदललाच पण आपल्या भारतीय झेंड्याला सॅल्यूटही ठोकला. वर मला हात जोडून भारतीय पद्धतीने नमस्कार करून 'नमास्टे' म्हटले. शिवाय भाडे न घेता पाच दिवस आमचा पाहुणचार केला. एवढेच नव्हे तर पुन्हा कधी आलात तर असेच त्यांच्याकडे रहाण्याची ऑफरही दिली आहे, शिवाय चीनला त्यांच्या घरी येण्याचे अगत्यपूर्वक आमन्त्रणही दिलेय.

"साहसे श्री प्रतिवसति", असे म्हणतात, ते अगदी खरे आहे. मेक माय ट्रिप वरच्या रागाने केले धाडस अंगाशी न येता उलट पैसे आणि आत्माभिमान मिळवून देणारे ठरले. जवळजवळ ५०० न्यूझीलंड डॉलर्स रहाण्याचे आणि खाण्यापिण्याचे तीन/ चारशे न्यूझीलंड डॉलर्स वाचले. अजून एका ट्रिपची सोय झाली नाही का?

उटिजैम अ विलागबान -“Útjaim a világban”- माझा जगप्रवास!

(लेखिका - स्वाती दिनेश)

हॅलो, सगळ्यात आधी तुम्हा सर्वांना महिला दिनाच्या खूप शुभेच्छा! मी विकी, व्हिक्टोरिया मट्यास! आमच्या हंगेरियन मध्ये "उटिजैम अ विलागबान" “Útjaim a világban” म्हणजे my journeys in the world ! माझा जगप्रवास!! माझ्या ह्या जगप्रवासातले अनुभव मी आज तुम्हाला सांगणार आहे. मी मूळची हंगेरीची पण आता कामानिमित्त गेली अनेक वर्षे फ्रांकफुर्ट मध्ये राहते. असं म्हटलं खरं की मी फ्रांकफुर्ट मध्ये राहते पण माझं वास्तव्य खरं तर सूटकेस मध्येच असतं असं म्हटलं तर वावगं होणार नाही. कामानिमित्त मला अनेक ठिकाणी, देशोदेशी अगदी वेगवेगळ्या खंडात फिरावे लागते.. आणि खरं सांगू का? मला ते आवडतं सुध्दा.. तशी मी 'भटक्या' स्वभावाचीच आहे. *I am a traveller by nature*

and not a tourist! म्हणजे देशोदेशी भटकून तिथली लोकं, त्यांचं रहेनसहेन, त्यांचं फूडकल्चर, त्यांची संस्कृती पहायला, अनुभवायला नुसतं टूरिस्ट स्पॉट बघण्यापेक्षा मला जास्त भावतं. अगदी लहानपणापासूनच मला फिरायला, वेगवेगळी ठिकाणं पहायला आवडतं. प्रवासाचा मला कंटाळा कधीच येत नाही; उलट एक वेगळीच उर्जा मिळते! अमेरिका, अफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया आणि युरोप तर आहेच.. अशा पाचही खंडात मी वेगवेगळ्या कारणांसाठी फिरले आहे.

मी जेव्हा युनिवर्सिटी मध्ये शिकत होते ना, तेव्हा स्टुडंट एक्चेंज प्रोग्राम मध्ये मी कॅनडाला गेले. अगदी १६,१७ वर्षांची असेन, कोवळं वय, इंग्लिश येतं होतं पण बोलायची सवय नव्हती. हंगेरीत त्यावेळी आमची हंगेरियन भाषा आणि स्लोवाक नाहीतर जर्मन चालायची. इंग्लिश फार कमी! त्यातून मी जरा बुजरीच होते. ग्रामर चुकेल, वर्गातले बाकीचे हसतील ह्या भीतीमुळे बोलायची सवय नव्हती पण इथे आता पाण्यात पडले होतेच, लागले हात पाय मारायला! ग्रामर वगैरेचा विचार न करता बोलायला लागले आणि मग हळूहळू भीड चेपत गेली. जरी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम मध्ये येथे आले असले तरी ३.५ महिने रहायचे होते आणि मी स्टुडंट वर्क परमिट वर आले होते. मी जिथे राहत होते ती एक पर्यटकांची पर्वणी असलेली जागा होती. खूप टूरिस्ट तिथे सतत येतजात असत. अशा ठिकाणी मी एक स्टुडंट म्हणून एका इटालियन रेस्तराँ मध्ये काम केले. हंगेरी सारख्या आधी कम्युनिस्ट आणि मग सोशालिस्ट असलेल्या देशातून आलेल्या माझ्यासारख्या १६ वर्षाच्या मुलीसाठी कॅनडातले हे मुक्त वातावरण फारच वेगळे होते. इथे सगळे लोकं फ्री होते, ओपन होते, हसून खेळून बोलत वागत होते. extremely approachable होते.

मी जिथे राहत होते, ते अगदी लहानसे गाव! त्या गावातल्याच एका व्हिलामध्ये मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होते. आमच्या घराच्या मागेच घनदाट जंगल होते आणि तेथले अनेक प्राणी आमच्या इथे अनेकदा दिसत. पेक्स सारख्या शहरात वाढलेल्या मला त्याची फार गंमत वाटत असे. आमच्या मालकिणबाईंच्या अंगणातल्या चेरीच्या, हेझलनटच्या झाडावर खूप पक्षीही यायचे. त्यांचा किलबिलाट ऐकत एकदा अशीच रविवारच्या सकाळच्या उबदार उन्हात अंगणात

खुर्ची टाकून कॉफी पित बसले होते, तर तेथे अस्वलाचे लहानसे पिल्लू जंगलातून रस्ता चुकून आले. ते भेदरलेले होते आणि त्याला बघून मी अगदी एक्साइट झाले. लगेचच माझ्या लँडलेडीला बोलावून घेतले मी अंगणात. आम्ही मग त्याला दूध पाजले. मी त्याच्याशी खेळत होते पण त्याची आई आता त्याला शोधत इथे येईल. त्याच्या जास्त जवळ जाऊ नकोस असं बजावून मालकीणबाई आत गेल्या आणि पाचच मिनिटात त्यांनी मलाही आत बोलावले. मग आमची चाहूल लागू न देता खिडकीतून आम्ही दोघी ते पिल्लू काय करतं हे पाहू लागलो. आधीचं भेदरलेलं ते पिल्लू आम्ही दूध पाजल्याने आणि थोडा वेळ त्याच्याबरोबर घालवल्यामुळे थोडं आश्वस्त झालं होतं. पण आता आम्ही दोघी दिसेनाशा झाल्यामुळे ते टेडी, ते पिल्लू परत कावरेबावरे झाले होते. मला अंगणात त्याच्याजवळ जावेसे वाटत होते. पण माझ्या मालकीणबाईंनी माझा एक हात घट्ट धरला होता आणि दुसऱ्या हाताचे बोट तोंडावर ठेवून ती मला न बोलण्याचा इशारा करत होती. आम्ही खिडकीला चिकटूनच होतो. दहा एक मिनिटातच आई अस्वल आली आणि पिल्लाला घेऊन मागच्या झाडीत दिसेनाशी झाली. "आता समजलं, मी बाहेर का थांबायचं नाही म्हटलं ते?" मालकीणबाई मला मग त्यांचे असे अनेक अनुभव सांगू लागल्या. कॉफी पित मग आमच्या जंगलगप्पा रंगू लागल्या.

तेथे असतानाच एकदा एक रम्य संध्याकाळी आम्ही अंगणात बार्बेक्यु लावायचे ठरवले. अंगणातून घरात अशी आमची बार्बेक्यूची तयारीची ने आण चालू होती. ट्वायलाइटचे संध्यारंग पसरले होते. घरट्याकडे परतणाऱ्या पक्षांच्या किलबिलाटाचं संगीत होतं. अंगणातच बसून रहावंस वाटणारं असं सुंदर वातावरण होतं आणि 'तो' आला. सोनेरी बुट्ट्यांचा, डौलदार शिंगांचा, उमदा, देखणा काळवीट! तो कळप चुकून आलेला वाटला नाही तर बाकीचे खूप मागे राहिले असावेत आणि बहुदा हा कळपाचा म्होरक्या खूप पुढे आला असावा आपल्याच नादात, आपल्याच मस्तीत.. समोर एकदम रस्ता दिसल्यावर बावरला. आणि मग त्याच डौलात चपळतेने उड्या मारत पुन्हा शेजारच्या जंगलात दिसेनासा झाला. तो काळवीट, त्याची ऐट कॅमेरात बंद करायला कॅमेरा आणायला आत जाण्याइतका वेळ नव्हताच. मी अगदी चुकचुकले कॅमेरा हातात नाही म्हणून पण मग बार्बेक्यू कारायचं म्हणून आत जाऊन कॅमेरा आणला आणि , आणि मग एक मोठ्या नाकाचा 'मूस' आला. त्याला मात्र मी लगेच कॅमेऱ्यात बंदिस्त केलंच पण ते दृश्य माझ्या मनात अगदी कोरलं गेलं आहे. आमच्या मालकीणबाईंना किवा तिथे राहणाऱ्या बाकीच्या लोकांना हे असे प्राणी दिसणे नेहमीचेच होते पण माझ्यासारख्या शहरी वातावरणातल्या मुलीला असे अनुभव फार रोमहर्षक आणि तितकेच आनंददायी होते. एम बी ए ची डिग्री घेतल्यानंतर मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीत कामाला लागले आणि कामाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी भटकंती सुरू झाली. परत कॅनडा, अमेरिकेला जाणे झाले. पण माझ्या मनाच्या अगदी जवळ आहे ते कॅनडा मधलं हे पहिलं वास्तव्य!

मी एका प्रोजेक्ट साठी ऑस्ट्रेलियात चांगले ८-९ महिने गेले होते. त्यामुळे तेथले लोकं, त्यांची जीवन पध्दती, त्यांची कामाबद्दलची ॲटिट्युड ह्याची चांगलीच ओळख झाली. त्यांचा वेगळेपणाही जाणवला. युरोप मध्ये विशेषतः जर्मनीमध्ये काम करताना एखाद्या मुद्द्यावर जर दुमत असेल तर चर्चा, आर्ग्युमेंटस होतात. एका बाजूने दोन पायऱ्या खाली उतरल्या जातात, तर दुसऱ्या बाजूने दोन पायऱ्या वर चढल्या जातात आणि एका कॉमन ग्राउंड वर दोन्ही बाजू येऊन विचार करतात ह्या गोष्टीची मला सवय! पण ऑस्ट्रेलियात एकदमच एखादा इश्यु रेझ केला जायचा. हे मला खूपच नवीन होते. सुरूवातीला मी बावरून गेले. जेव्हा 'एस्क्लेशनची त्यांची व्याख्याच वेगळी आहे' असं लक्षात घेतल्यानंतर मग त्या पध्दतीशी जुळवून घेत स्वतःला थोडे रुळवून घेतले. तेथला प्रोजेक्ट संपत आल्यावर मी चक्क महिनाभ्राची सुटी घेतली आणि ऑस्ट्रेलियातली बाकीची ठिकाणे आणि न्यूझीलंड फिरून आले. नाहीतर २४ तासांचा विमान प्रवास करून युरोपातून ऑस्ट्रेलिया बघायला जाण्याइतका सलग वेळ काढणं कठिणच होतं. तेथेच असताना कामाकरता सिंगापूर, मलेशिया, जपान येथेही जावे लागत असे. मग साधारण गुरुवार, शुक्रवारी काम संपेल असे पाहत असे मी, मग त्याला जोडूनचा विकेंड तिथल्या गोष्टी, ते गाव पाहण्यात घालवता येत असे. एरवीही ऑस्ट्रेलियातले विकांत मी आजूबाजूचा परिसर पाहण्यात रमत असे.

जपानमधली सांगण्यासारखी वेगळी गोष्ट म्हणजे ऑफिसची वेळ संपली तरी जपान्यांच्या कामाच्या वेळा संपतच नसत. काही काम नसले तरी बॉस ऑफिसातून बाहेर निघत नाही म्हणून मग बाकीचेही बसून राहत, काही तरी कामं काढून काढून कर बसत. पर्सनल लाइफ आणि प्रोफेशनल लाइफ यात कायम बॅलन्स राखायची सवय असलेल्या कामाच्या संस्कृतीतून आलेल्या मला हा बसलेला धक्काच होता. पण जपानी लोकं मात्र फार मृदु, अगत्यशील आणि मदत करायला तत्पर असणारे आहेत. श्रीलंकेतला कामाच्या बाबतीतला अनुभव मात्र जपानपेक्षा अगदी वेगळा आणि मला फार आश्चर्यचकित करणारा होता. तेथले लोकं पाश्चिमात्य कामाच्या पध्दतींना फार चांगल्या प्रकारे सामोरे गेले. मदतीचा हात तर पुढे होताच पण वेस्टर्न वर्क कल्चर बरोबर हातात हात घालून चालण्याची त्यांची मनोभावना दिसली. अर्थात मी फार काळासाठी तेथे गेले नसल्यामुळे सरसकटीकरण करू शकणार नाही.

कामानिमित्त जर ४-६ दिवस एखाद्या नव्या ठिकाणी जायचे असेल तर जोडूनचा विकांत तेथे घालवायचा, तेथला परिसर, ते गाव, शहर पहायचे अशी मला सवयच लागून गेली. एक तर कामाचा ताण कमी होऊन एकदम रिफ्रेश, ताजंतवानं व्हायला होतं. मन फ्रेश झालं ना की मग प्रवासाची दगदग, कामाचा ताण ह्याचं काही वाटत नाही. एक तर कंपनी तर्फे कुठे जायचं असेल तर सगळी व्यवस्था केली जातेच, चांगल्या वस्तीत, चांगल्या हॉटेलात सोय असते आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तेथले लोकल कलिग्ज असतात त्यांना बरीचशी माहिती विचारता येते. त्यांच्याकडून जवळपासचा एखादा ऑफबिट पॉईंट समजतो आणि अगदी नुसता टूरिस्टी हेतूही नसतो. असं फिरणं मला जास्त आवडतं. अर्थात माझ्या कामाच्या स्वरुपामुळे मला अशी संधी बरेचदा मिळत असते. :) आणि हो, आपण जेव्हा टूरिस्ट म्हणून एखाद्या ठिकाणी जातो तेव्हा तिथला मौसम, तिथलं हवामान ह्याचा विचार करतोच. मुद्दाम खराब हवेत काही आपण आल्प्समध्ये किवा किवा कडाक्याच्या उन्हाळ्यात इटालीला जाणार नाही. अर्थात कामाकरता जाताना इटालीत ३५ अंशाच्या वर तपमान आहे तर मिटिंग पुढे ढकला..किवा अति हिमवृष्टीमुळे स्वीसचा वर्कशॉप आत्ता न घेता समरमध्ये घेऊ या.. असं तर सांगता येत नाही ना! पण मग अशा वेळीच तिथले नकोसे ऋतुही पाहता, अनुभवता येतात हा मोठाच फायदा! पण तोटा असा की कामासंबधी जेव्हा फिरणे होते तेव्हा ते बहुतांश मोठ्या शहरातून होते आणि एका

पॉईंटनंतर सगळ्या मेट्रो सिटीज मध्ये फार फरक जाणवत नाही. एक 'मेट्रो कल्चर' अशा शहरातून दिसतं. त्या देशाची, तिथल्या माणसांची, मातीची अशी खरी ओळख होत नाही. पण थोडीफर कल्पना मात्र येते. कामानिमित्त देशोदेशी फिरताना प्रवासात आणि कामाच्या ठिकाणीही एक बाई म्हणून मला तरी कोणताही वाईट अनुभव आला नाही किवा बाई म्हणून फार काही मोठी व्हिआयपी, रेड कार्पेट ट्रिटमेंटही कोणी दिली नाही. सगळीकडे 'एक माणूस' म्हणून अगदी सर्वसाधारणपणे कोणाशी वागतात तसेच वागवले गेले. ह्याचा मला अर्थात आनंदच आहे.

साऊथ अफ्रिकेतला अनुभव मात्र थोडा वेगळा आहे. तेथे अगदी विमानतळापासून तेथला कोणीतरी लोकल सहकारी तुमच्या सोबत सतत असतो. अगदी विकांताला सुध्दा.. माझ्या दिमतीलाही तिथली सहकारी, कॅथरिन दिली होती. आम्हाला असं कायम कोणी एस्कॉर्ट असण्याची सवयच नाही. माझ्या हॉटेल रुम वर मला सोडून मग ती घरी जात असे. साऊथ अफ्रिका, नेल्सन मंडेलांची जन्मभूमी! इथे येऊन नेल्सन मंडेलांच्या जन्मगावात जायचं नाही? ते शक्यच नव्हतं. अगदी साधे कपडे घाल, जास्त पैसे बरोबर घेऊ नको. कॅथरिनच्या मला एक ना दोन शंभर सूचना! शेवटी एकदाचे तिथे जायला निघालो. कॅथी मला घ्यायला हॉटेलवर आली होती. अग, इतकी चांगली पर्स नको घेऊ आणि घड्याळ पण काढून ठेव तुझं, महागातलं दिसतय. तिने बरोबर एक झोळी आणली होती. ती मला दिली. आम्ही बसकडे निघालो. जाताना ती मला म्हणाली, अग, माझ्या गावाच्या अगदी जवळच आहे हे ठिकाण तरीही मी एकटीने जायची हिंमत करत नाही. इथे खूप अनसेफ आहे ना, म्हणून तर बाहेरचा कोणी आला की ती व्यकी हरवू नये आणि लुटली जाऊ नये म्हणून आमच्या पैकी कोणी तरी सावलीसारखा त्यांच्या बरोबर थांबतो. हे ऐकून अगदी काटाच आला अंगावर. माबसे नदीच्या काठावर वसलेलं मवेत्सो, अगदी लहानसं ८००-८५० वस्तीचं लहानसं सर्वसाधारणसं खेडं! नेल्सन मंडेलांचं जन्मगाव, यामुळे त्याला वलय प्राप्त झालं आहे. तिथे पोहोचल्यावर ती जे म्हणत होती त्यातली सत्यता दिसली. मला तिथे एक विचित्र तणाव जाणवला. युरोपातल्या खुल्या, मुक्त वातावरणात वावरलेल्या मला हा एक नक्कीच साहसी आणि थोडा भीतीदायक अनुभव होता.

अगदी युरोपातच फिरायचं म्हटलं ना तरी इथल्याही देशादेशातल्या कामाच्या पध्दतीत थोडा थोडा फरक आहेच. उदाहरणच द्यायचं झालं तर जर्मन अर्ली बर्डस आहेत. कामाच्या बाबतीत रोखठोक आणि वेळेच्या बाबतीत अगदी दक्ष! अगदी कितीही महत्त्वाची मिटिंग असो.. पाचसाडेपाचच्या सुमाराला त्यांची चुळबुळ चालू होणारच पण मिटिंगमध्ये व्यत्यय नसतो. चार नंतर मिटिंग असेल तर ही मंडळी आपलं सँडविच नाहीतर सॉसेज असं काहीतरी बरोबर घेऊनच मिटिंग हॉल मध्ये येतात आणि चक्क सँडविच खात खात ते मिटिंग चालू ठेवतात. इटालियन, स्पॅनिश उशीरा दिवस चालू करतात आणि ग्रीक मंडळींचे कॉफी ब्रेक्स मोठाले असतात आणि त्या कॉफीब्रेक्सचं रुपांतर मग मिटिंग मध्ये होतं. फ्रेंच मंडळींना सगळं डेलिकेट, अप टू डेट लागतं पण घोळ घालत बसतात. अशा अनेक गमतीजमती सांगता येतील.

एकाच ठिकाणी, वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी, त्याचत्याच लोकांबरोबर काम करणं मला कंटाळवाणं, स्वतःला मिटून घेतल्यागत झालं असतं. पण असं अनेक ठिकाणी फिरल्यामुळे वेगवेगळ्या लोकांच्या संपर्कात आले, त्यांच्याकडून काय करावं आणि काय करू नये असं दोन्ही शिकता आलं. स्वतःला उलगडताना माझी मीच स्वतःला समजत गेले. माझ्या स्ट्रेन्ग्थ, माझे विकनेसेस मला उमजत गेले. यातून मी समृध्द होत गेले. हा माझ्या कामानिमित्त फिरण्यातून मिळालेला मोठा ठेवा!

असं देशोदेशी कामानिमित्त खूप फिरल्यामुळे अनेक देशातले मित्र झाले आहेत. काहींशी चांगले बंध जुळले तर काहींशी अगदी औपचारिक संवाद झाला. पेरु, स्कॉटलंड आणि नॉर्वेचा मध्यरात्रीचा सूर्य ह्यांना भेटायला जायचं आहे. तसंच भारतातही जायच्या संधीची मी वाट पाहते आहे. पण भारतासारख्या खंडःप्राय देशात जायचं तर हाताशी भरपूर मोकळा वेळ निदान महिनाभर तरी हवाच. जसा मी ऑस्ट्रेलियात महिनाभर वेळ घेऊन फिरले तसंच काहीसं करायचं माझ्या मनात आहे. नुसतंच ताजमहाल, सुवर्णमंदिर, राजस्थान असं न करता एखाद्या खेड्यात जायचं आहे. येथे माझ्या अनेक भारतीय सहकाऱ्यांकडून मी इतकं काही ऐकलं आहे की एवढे देश फिरूनही अजून भारतात जायचा योग का नाही आला? असं मला अनेकदा वाटतं आणि लवकरच ती संधी यावी अशी आशा करते.

विकी, व्हिक्टोरिया मट्यास ही आमची मैत्रिण, कामानिमित्त पाचही खंड पालथे घालून आली आहे हे एकदा असंच गप्पा मारताना समजलं होतं आणि तिचा प्रचंड हेवा वाटला होता. अनाहिताचा भटकंती अंक काढायचा ठरल्यावर विकीच डोळ्यासमोर आली. तिची मुलाखत घ्यायचे ठरवलेच अगदी मनाशी पण तिच्या ह्या नेहमी चालू असलेल्या जगभ्रमंतीतून तिला वेळ सापडतो की नाही? ह्याची शंका होती. एकदाचा वेळ मिळाला आणि मग ती सापडली. खूप भरभरून बोलली. तिच्याकडचा हा प्रवासी अनुभवांचा खजिनाच तिने माझ्यासमोर उघडला. हा खजिना फक्त मराठीत शब्दांकित करण्याचे भारवाही हमालाचे काम मी केले आहे. विकीने उत्साहाने तिला जगभरात आलेल्या अनुभवांची पोतडी आपल्यासमोर उघडून आपल्याला त्यात सामील करून घेतल्याबद्दल तिला आपल्याकडून मनःपूर्वक धन्यवाद आणि तिच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा!

मेरा जूता है जापानी...

(लेखिका - मधुरा देशपांडे)

मी शाळेत असताना रविवारी 'रंगोली' कार्यक्रमात 'मेरा जूता है जापानी' हे गाणं बरेचदा लागायचं आणि खूप आवडायचंही. भविष्यात कधीतरी या देशात जाण्याची आपल्याला संधी मिळेल असा विचार करण्याचंही ते वय नव्हतं. पुढे नोकरीत जपानी लोकांबरोबर काम करण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या वर्कोहोलिक पणाचा पुरेपुर अनुभव घेतल्याने जपानला जाण्याचे योग कधी म्हणजे कधीच येऊ नयेत असं वाटू लागलं. पण जेवढा तुम्ही एखाद्या गोष्टीला विरोध करता, त्याच्या दुपटीने ती गोष्ट तुमची वाट बघत असते असे काहीसे होत अखेर पहिले परदेशगमन जपानला होणार यावर (काहीशा नाईलाजाने) शिक्कामोर्तब झालं. आता जायचंच आहे तर 'बी पॉजिटिव्ह' असं म्हणत जोरदार खरेदीला सुरूवात झाली. पासपोर्ट वर पहिला वहिला व्हिसाचा शिक्का बसला, विमानाच्या खिडकीतून हात बाहेर काढू नकोस अशा हजारो सूचना चालू झाल्या, "पहिल्यांदाच जाते आहेस त्यामुळे आम्ही विमानतळावर सोडायला येणारच" असं म्हणत जमेल तेवढी जनता तिथे पाठवणी करायला लोटली आणि थोडंसं बिचकत, घाबरत, थोडंसं कुतूहल, औत्सुक्य अशा संमिश्र भावनांतच विमान आकाशात झेपावलं.

जपानच्या 'ओकायामा' शहरात विमान उतरले तेव्हा रात्र झाली होती. दिवे झगमगत होते पण तरीही अंधारच सगळीकडे, जपान किंवा कुठलाही परदेश नेमका असतो कसा याची उत्सुकता शमवण्यासाठी फारसा काही चान्स नव्हता. सोबतच्या कलीगने टॅक्सीवाल्याला जपानीतून 'कुराशिकी स्टेशन' एवढे सांगितले. कुराशिकी हे या ओकायामा शहरापासून अर्धा ते पाऊण तासाच्या अंतरावरचे खेडेगाव. सिग्नल लाल झाला की गर्दी नसतानाही गाडी थांबते, पायी चालणाऱ्यांना अत्यंत चांगली वागणूक दिली जाते, या व्यतिरीक्त त्या अर्ध्या तासाच्या प्रवासात फारसे काही कळत नव्हते. मी सुखरूप पोहोचले हे घरी कसे कळवता येईल याचे विचार डोक्यात होते, त्यात डोळ्यात झोप होती आणि टॅक्सी हॉटेलपाशी थांबली. एका अत्यंत लहानशा खोलीत फ्रीजपासून सर्वच कसे बसवले जाते याबद्दल बरंच काही ऐकलं होतं तरीही ते प्रत्यक्षात बघून प्रचंड कौतुक वाटत होतं. एक रात्र फक्त इथे राहून दुसऱ्या दिवशी सकाळी यापुढचे २ महिने जिथे राहायचे होते तिथे नेण्यासाठी बॉस येणार होता. सकाळी उठून ठरल्याप्रमाणे जपानी बॉस हजर झाला, जपानी पद्धतीने वाकून नमस्कार झाले आणि यावर नेमकं कसं रिॲक्ट व्हावं हे न कळल्याने मी गोंधळून फक्तच हस्तांदोलन केले. :) सामान घेऊन आम्ही त्याच्यासोबत निघालो. सोबतचा कलीग पूर्वीही इथे येऊन गेला होता, त्यामुळे त्याच्या दृष्टीने आता मिळणाऱ्या अपार्टमेंट्स या बऱ्याच चांगल्या होत्या. आता सकाळच्या वेळी जपानी लोकांची लगबग चालू होती, गाड्या धावत होत्या, लहान मुलांना शाळेत सोडायला निघालेल्या आया दिसत होत्या, मधूनच रेल्वेचा आवाज येत होता. एवढी स्वच्छता पहिल्यांदाच बघून मी अवाक झाले होते आणि आम्ही त्या घरापाशी पोहोचलो. हे साधारण १.५ किमी अंतर उद्यापासून रोज पायी यायचं आहे आणि तेही बाहेरचं तापमान ०-५ डिग्री असताना याचं टेन्शन आलं होतं. एक बोळ आणि एका बाजूला ५ खोल्या म्हणजे ५ घरं! किल्ल्या घेतल्या आणि दार उघडून मी सामान आत ठेवू लागले तसा 'स्तॉप, स्तॉप' म्हणत बॉस आला. "यु तेक शुज हिअर, यु कान्त गो विथ्थ शुज". मी गुन्हा केलाय असा काहीसा चेहऱ्यावरचा आविर्भाव पण तरीही सांगताना स्वर मात्र कोमल. मग तिथल्या खास बुट-चपलांसाठी आरक्षित जागेत बुट काढून ठेवले. घराच्या आत बुट घालायचे नाहीत हा जपानी संस्कृतीचा पहिला धडा मी गिरवला होता. लाकडी बेस असलेल्या त्या घरात पायांना मस्त गारवा जाणवला आणि सामान आत नेले. "चला मी येतो" असं म्हणून बॉस निघून गेला. आत हे घर माझी वाट बघत होतं. घर म्हणजे खरं तर स्टुडिओ अपार्टमेंटच, पण त्याचे मिनी-मायक्रो स्वरुप! आणि हे म्हणे इतरांपेक्षा मोठे होते. घरात प्रवेश करतानाची पहिली जागा बुटांची, मग लगेच वॉशिंग मशिन, मग पुढे

स्वयंपाकघर - आता स्वयंपाकघर म्हणायचं फक्त, कारण त्याची व्याप्ती म्हणजे फक्त २ हॉट प्लेट्स, सिंक आणि वर एक इल्लुसं कपाट. खालच्या जागेत ४ भांडी. ईथे मी कसं मॅनेज करणार असं म्हणतच पुढे गेले. टॉयलेट बाथरुमचा दरवाजा, मग फ्रीज, त्यावर मायक्रोवेव्ह आणि इथे एक भिंत आणि दार. दोन खोल्या वेगळ्या आहेत असं समजायचं फक्त म्हणून हे दार. आणि मग एक माझ्या उंचीपेक्षाही जास्त असा पलंग, त्यावर चढायला लाकडी पायऱ्या हे दिसले. नाही, लहान मुलांचे असतात तसा नाही, एक मोठं लाकडी कपाट, ज्याच्या आत पण झोपता येईल इतकी त्यात जागा, आणि त्याच्यावरची जागा म्हणजे झोपायची जागा. बरं त्यावर गादी पण नाही, त्यामुळे मला कळेना की झोपायचं कुठे? पण त्या कपाटाच्या आत गादी दिसली, ती मग वर टाकली आणि एक प्रश्न सुटला. पुढे एक डब्बा जुना टीव्ही, एक कपाट, एक टेबल आणि २ खुर्च्या. मला एकटीला तशी ही जागा पुरेशी होती, पण तरीही हे सगळं फार वेगळं वाटत होतं आणि बाकीच्यांची घरं यापेक्षाही लहान आहेत हे ऐकल्यामुळे तर जे आहे ते चांगलं आहे अशीच भावना होती. २ महिने काय असे उडून जातील, पण या २ महिन्यात ६० गुणिले २ वेळचे जेवण या मायक्रो किचन मध्ये करणे हे मात्र काही केल्या पचनी पडत नव्हते. त्यात पोळ्या कुठे कराव्या हा मोठ्ठा प्रश्न होता, मग वॉशिंग मशिन वर पोळ्या लाटायच्या आणि नंतर भाजायच्या की कसं करता येईल अशा विचारातच सामान काढलं.
हे होतं घर -

खरेदीला म्हणून जवळच्या सुपरमार्केट मध्ये गेलो. मीठ आणि साखर यातला फरक कसा ओळखायचा? साखर आपली भारतातलीच डोक्यात होती, पण इथे तीही अगदी मीठासारखीच बारीक. मग चित्रावरून काय म्हणजे काय हे ओळखण्याचे काही जुजबी ज्ञान मित्राकडून समजून घेत दूध, साखर, मीठ, तेल, काही भाज्या अशी खरेदी झाली आणि स्वयंपाकाचे प्रयोग सुरू झाले. प्रयोगच कारण तेव्हा मोजक्या भाज्या, आमट्या एवढीच मजल होती. पोळ्या काय, पुण्यात विकत मिळायच्या. इथे मात्र सगळं करावं लागणार होतं. कपडे धुवायला वॉशिंग मशिन बघितलं तर त्यावर सगळं जपानीत. एसी कम हीटर च्या रिमोट वरही तेच. इंटरनेट होतं पण त्याच्या सेटींग आधी कराव्या लागतात म्हणे जपानीतून. संध्याकाळी जपानी भाषा येणारा एक कलीग आला, त्याने सगळं समजावून सांगितलं. इंटरनेट मिळालं, वॉशिंग मशिनवरच्या २५ सेटिंगशी मला काही देणं घेणं नव्हतं. मुख्य काम होण्यापुरती दोन बटनं लक्षात ठेवली. आणि मग खऱ्या अर्थाने आता इथे राहता येईल इतपत ते सुसह्य वाटले. त्यात इंटरनेटचा स्पीड बघून सुखद धक्का बसला, घरी बोलता आलं आणि सोबत आणलेलं खाऊन गाढ झोपही लागली.

आता ऑफिसला जायचं होतं. सकाळी उठून डबा घेऊन. आमचं ऑफिस हे या कुराशिकीपासून पुन्हा ३ गावं पलीकडे एका दुर्गम जागेत आणि लहान होतं. मोजून ३०-३२ लोक, त्यातलेही आम्ही भारतीयच अर्धे. कॅन्टीन वगैरे काही नाहीच, असतं तरीही जपानी जेवण भारतीय जीभेला मानवलं नसतंच. त्या मायक्रो किचन मध्ये स्वयंपाक आवरून घरापासून १५ मिनिटांचा प्रवास करून आलो कुराशिकी स्टेशन वर. नशीब इथे इंग्रजीत पाटी होती. शिवाय एकंदरीत एखाद्या रेल्वे स्थानकाचे हे रुप बघून मी थोडीफार तरी जपानच्या प्रेमात पडले होते.

तिथे पहिलं काम होतं महिन्याचा पास काढायचा हे. भाषा हा सगळ्यात मोठा प्रश्न. अनेक हातवारे करून, कागदपत्र दाखवून ते दिव्य पार पडलं, त्यात तारीख वगळता काहीही कळत नव्हतं. थोड्याच वेळात २ डब्यांची ही ट्रेन आली. इतक्या कमी गर्दीची ट्रेन पहिल्यांदाच बघितली. आणि मग पांढरे हातमोजे आणि इस्त्रीचे कपडे, टोपी घातलेला चालक आणि त्याचे हातवारे हा एक विशेष अंक सुरू झाला. तो त्यांच्या नोकरीचा एक भाग असला तरीही हे बघून हसू आवरत नव्हते. प्रत्येक स्थानकाहून निघण्यापूर्वी डावीकडे बघा, उजवीकडे बघा, आरशात बघा, वेळ बघा अशा टाईपचे ते चेकिंग असावे पण ते सगळे तो चालक हातवारे करून कन्फर्म करून मग गाडी निघायची. प्रत्येक स्थानक येण्यापूर्वी रेकॉर्डेड टेप मधून जपानीत एक काकू बोलत होत्या आणि त्यासोबत चालकाच्या खाणाखुणाही असायच्या. हसू येत असलं तरीही त्यांच्या कुशलतेचं कौतुक वाटलं, जपानी चालकांना वेळा पाळल्या नाहीत तर नियम कडक आहेत हे ऐकलं होतं, तेही प्रत्यक्षात पाहिलं. आमचे स्थानक आले, उतरताना तिकिटं तपासली गेली आणि आमचे मंडळ ऑफिसात पोहोचले.

"मधुरा सान, वेलकम इन जापान" म्हणून स्वागत झाले आणि दहाव्या मिनिटाला सगळे संगणक आणि त्यावरील भाषा, कळफलक (कीबोर्ड्स) जपानीत बघून मी उडाले. दर काही वेळाने नवीन धक्का बसत होता. मग त्यालाही हळूहळू सरावले. वरून तिसरा ऑप्शन म्हणजे हे, राईट क्लिक करून सगळ्यात खालचा ऑप्शन म्हणजे ते, असे लक्षात येऊ लागले आणि कामंही सुरू झाली.

पुढचे २ महिने बहुतेक वेळा शनि रवि धरून सुद्धा फक्त आणि फक्त काम होतं. आणि रोज १०-१२ तास थांबूनही आमचं काम जपानी लोकांच्या मानाने बरंच कमी होतं. रोज डबा नेणे याला पर्याय नसल्याने रोजचं ऑफिसचं आणि घरचं काम, तेही त्या मायक्रो किचन मध्ये. तेल गरम होऊन मोहरी टाकून बाकीचं सगळं दुसऱ्या कपाटातून आणायचं असं करताना अनेकदा फोडण्या जळायच्या. एक बरं होतं की पोळ्या जमल्या नाहीत तर "नाचता येईना अंगण वाकडे" या उक्तीने तिथल्या स्वयंपाकघराला दोष देता येत होता. खाणारीही मीच होते म्हणा, त्यामुळे प्रश्न नव्हता. कडाक्याच्या थंडीत रोजचं जाणं येणं वेळखाऊ आणि बराचसा पायी प्रवास यामुळे वैताग येऊ लागला. तसं ते गृहित धरलेलं होतं, पण तरीही रोजचे दिवस मोजणं चालू झालं. नशीबाने त्या कुराशिकीत एक इंडियन रेस्टॉरंट होतं, नेपाळी माणसाचं आणि एक इटालियन, या दोन्हीनी आधार दिला. संध्याकाळी ऑफिससमोरच्या एका दुकानात कॉर्न आणि चीज घालून मिळणारा ब्रेड आणि बटाटा चिप्स हे दोन पर्याय आलटून पालटून खायला होते. "अरिगातो" असे म्हणत तिथल्या बाईने कितीही प्रेमाने स्वागत केले, तरी आम्हाला खायला काही पर्याय नसल्याने त्यातला गोडवा जाणवायचा नाही. मॅकडोनल्ड्स मध्येही शाकाहारी म्हणजे उकडलेले कॉर्न किंवा फ्रेंच फ्राईज. व्हेज बर्गर नाहीच. त्यात नेमकं अशाच वेळी भारतातलीही चुकीची लोक भेटतात आणि कामाचा वैताग अजून वाढतो असं काहीसं झालं. पण जपानी लोकांच्या या

अति काम करण्याच्या सवयीने हे दिवस नकोसे झाले होते हे खरं! आणि जास्तीचं काम करण्याच अडचण नव्हती, महिनोनमहिने तेच तेच काम आणि ते सुध्दा एकही ब्रेक न घेता हे मानवणारे नव्हते. त्यापैकी आम्ही काही नवीन होतो नोकरीत, बाकीचे बरेच जण इतर दहा देशातले अनुभव घेतलेले होते आणि त्यांनाही आजवरच्या अनुभवात जपान सगळ्यात जास्त त्रासदायक वाटत होता. रात्रभर ऑफिसच्या खुर्चीत झोपून पुन्हा सकाळी तिथेच काम करताना जपानी माणसांना प्रत्यक्षात पाहिलं. ज्या देशाने पहिली बुलेट ट्रेन अस्तित्वात आणली, त्या देशात ३ तासांवरच्या बायकोला भेटायला जायला लोकांना ६-६ महिने वेळ नाही हे ऐकून तर फार वाईट वाटायचे. एकूणच सेलिब्रेशन हा प्रकार तिथे कमी दिसला. ३१ डिसेंबरच्या रात्री सुद्धा सगळीकडे शुकशुकाट होता आणि रात्री उशीरापर्यंत अनेक लोक काम करत होते.

पण तरीही ऑफिसपलीकडचा जपान आणि तिथले लोक यांच्याशी जेवढा संबंध आला, त्यात बरेच अनुभव मिळाले. कुराशिकी गावात वेळ मिळेल तेव्हा फेरफटका मारणे हा शनि रवि काम संपल्यावरचा एकमेव उद्योग होता. इथला एकमेव मॉल बघून झाला. जपान मध्ये जागेची अडचण असल्याने घरं लहान आहेत हे जाणवायचं. त्यात भूकंपासारख्या आपत्तीशी कधीही सामना करावा लागेल हेही त्यांना माहित आहे. गावातून कुठही जाताना बहुतेक ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग लागायचीच कारण पुन्हा तेच, जागेची अडचण. ट्रेनने जातानाही रुळांच्या अगदी शेजारी वसलेली अनेक घरं दिसायची. या लोकांना मोबाईल किंवा एकूणच गॅजेट्सचं प्रचंड आकर्षण आहे हेही जाणवायचं. तसंच गाडी हा सुद्धा या लोकांचा जिव्हाळ्याचा भाग.

इथेच बिकान म्हणून एक भाग होता. तिथे कितीही वेळा गेलो तरी छान वाटायचं. शिवाय इथे भरपूर दुकानं होती, विंडो शॉपिंग करत तिथे फिरायचं हा मोठा विरंगुळा होता.

जवळच एक तलाव होता तिथे गेल्यावर बाकी कामं, वैताग याचा विसर पडायचा.

एकच शनि-रवि आम्हाला मोकळा वेळ होता. मग ठरवून कुठेतरी जाऊयात म्हणून क्योतो या शहरात जायचे ठरले. बुलेट ट्रेन शिन्कान्सेनचा प्रवास. जपानी भाषा येणारे भारतीय लोकही सोबत होते, पण तरीही काही ठिकाणी अडलेच. तेव्हा जपानी लोकांच्या मदत करण्याचा स्वभाव जवळून पाहिला. जमेल तसे जपानी-इंग्रजी मिश्रित बोलून त्याने आम्हाला सगळी नीट माहिती दिलीच आणि उतरायच्या आधी परत एकदा सांगायला आला. क्योतो मध्ये ट्राम दिसली, मोठमोठ्या इमारती होत्या. कुराशिकीच्या मानाने इथे बरीच गर्दी होती. जपानी ललना किमोनो घालून, मेकअप करून अजूनच सुरेख दिसत होत्या. क्योतोत आम्ही बरंच फिरलो, पण आता सविस्तर काही आठवत नाही. क्योतो टॉवर, सुवर्णमंदिर आणि तिथला परिसर, आणि अजून काही मंदिरं हे एका दिवसात बघितलं.

इथे लक्षात आलं की जपानी लोकांमध्ये अंधश्रद्धा प्रचंड प्रमाणात आहेत. म्हणजे ठिकठिकाणी "लकी पर्स", लकी लॉकेट अशा नानाविध लकी वस्तुंची मांदियाळी होती. आणि तेवढ्याच प्रमाणात खरेदी करणारेही होते. पण मंदिरात शांतता होती, कुठेही आरडाओरड, धक्काबुक्की नव्हती. कुराशिकीबाहेर झालेली ही एकमेव सहल पण

कायमस्वरुपी लक्षात राहील अशी.

जपानी लोकांचे कलाकुसरीचे प्रेम माहित होते, त्याची प्रचिती अनेक वेळा आली. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मॉल्स यात वस्तूंची सुबक मांडणी लक्ष वेधून घ्यायची. प्रत्येक वस्तू अधिकाधिक आकर्षक कशी दिसेल, त्यातही अत्यंत नाजुक कलाकुसर, मनमोहक रंगसंगती यासाठी जपानी लोक, विशेषतः जपानी बायकांना मानायला हवं. अगदी कमी जागेत देखील ज्या पद्धतीने सगळं ठेवलेलं असायचं, ते अचंबित करणारं होतं. लहान मुलांचे कपडे, त्या बायकांच्या छत्र्या, त्यांचे कपडे हे सगळंच फार सुरेख. काय काय घेऊ आणि काय नको असं व्हायचं अगदी. एकदा असंच फिरताना जपानी जुत्याच्या प्रेमात राजकपूर का पडला याचा उलगडा झाला. आता त्या वस्तूंचे फोटो नाहीत, पण तेवढ्या सुंदर चपला आणि बुट मला कधीही कुठेही मिळणार नाहीत हे नक्की. मी चप्पल घेत होते तिथल्या मुलीने तोडक्या मोडक्या इंग्रजीतून संभाषण साधून "प्रेझेंत, प्रेझेंत, तेक फॉर फ्रेंड, यु इंडिया, नमास्ते" म्हणत खरेदीचा भरपूर आग्रहही केला. बांबु वापरून केलेले नळ आणि दगडी हौद आणि ते पाणी घ्यायला वाडग्यासम प्रकार, हा एक प्रकारही इथे पाहिला जो अनेक मंदिरांमध्ये दिसायचा.

कधी हे जपानमधले वास्तव्य नकोसं होत तर कधी क्वचित तिथल्या चांगल्या बाबींचं कौतुक वाटायचं. २ महिने झाले आणि मी अत्यंत आनंदाने 'सायोनारा' म्हणून परतले. त्यावेळच्या अनेक कारणांनी "जपानमध्ये मी कधी ट्रांन्झिटही घेणार नाही" असं मी रागाने म्हणायचे. पण आता इतक्या वर्षांनंतर मत बदललं आहे. म्हणजे त्यांचे वर्कोहोलिक नेचर, कोरडेपणा हे अजूनही आवडत नाहीच, पुन्हा तिथे जाऊन काम करणे काही रुचणार नाही, पण त्या दिवसांनी अनेक अनमोल आठवणी मला दिल्या. जेव्हा कधीकधी निवांत आयुष्याचा सुद्धा कंटाळा येतो, तोचतोच पणा वाटू लागतो, तेव्हा ही अशी आव्हानं असावीत असं वाटतं. या जपानच्या वास्तव्याने कोषाबाहेर पड्ण्याची मला संधी दिली. त्यांच्या या कामसू वृत्तीनेच दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेला हा देश आज परत घडला आहे हेही आहेच. तिथले भूकंप, त्सुनामी यामुळे अनेक अडचणी येऊनही जपानी लोक किती शांततेनी राहतात, लहान मुलांपासून सगळेच कसे शिस्तीत राहतात अशा पोस्ट ज्या फेसबुक किंवा इतरत्र वाचायला मिळतात, त्या खऱ्या असतील याची खात्री वाटते. बराच काळ जावा लागला या देशावरचा राग जायला, यात त्यांचा दोष नव्हता, परिस्थिती आणि माझे अनुभव असे जुळून आले की 'आल इज वेल' म्हणूनही बरं काही वाटेना. पण आता मात्र हे सगळं विसरून त्या अनुभवांनी मला किती समृद्ध केलं, किती कणखर बनवलं हे उमगतंय. आणि म्हणूनच आता मी अभिमानाने गुणगुणते, मेरा जूता है जापानी...फिर भी दिल है हिंदुस्थानी!!

स्मरणवस्तू संकलन

स्मरणवस्तू खरेदी हा कुठल्याही भटकंतीत असायलाच हवा असा कार्यक्रम. कुठे सहलीला निघायचा अवकाश, की तिथे जाऊन आलेल्यांच्या सूचना सुरू होतात, "हे आण नक्की", "तो इकडचा रस्ता आहे ना तिथे हे छान मिळतं" वगैरे. शिवाय "माझ्यासाठी हे आण हो येताना" अशा मागण्या सुद्धा. ;) कधी घाईत असताना सुद्धा किमान एक तरी वस्तू घेऊयात आठवण म्हणून, असं म्हणत पटकन केलेली खरेदी असेल. तर कधी वेळ हाताशी आहे म्हणून भरपूर दुकानं पालथी घालत, किमतीसाठी घासाघीस करत स्वतःसाठी, जवळच्या व्यक्तींसाठी, मित्र मैत्रिणींसाठी सहलीचं एक प्रतीक म्हणून घेतलेल्या वस्तू असतील. या स्मरणवस्तू बघून मनोमन आपण पुन्हा ती सहल, त्या आठवणी अनुभवतो. बघा जरा, काय काय सापडलंय अनाहितांच्या घरात -

(उजवीकडून)

१.

कॅंडल स्टॅंड, हंगेरियन पाप्रिका (हंगेरी),
काडेपेटी (ऑस्ट्रिया)
कप (पॅरीस),
काचेची स्टारफिश (मुरानो ग्लास फॅक्टरी, इटली)

२.

घोडा (मुरानो ग्लास फॅक्टरी, इटली),
इजिप्शियन किंगचा पुतळा (सिंगापुर)
मेर्लिऑन (*Merlion*) (सिंगापुर)
पवनचक्की आणि लाकडी बूट (ॲमस्टरडॅम),
कागदी पंखा (सिंगापूर आणि स्पेन)

३.

कियांते बॉटल (कियांते, इटली)
अगरबत्ती व मेणबत्ती टू इन वन स्टॅंड (दक्षिण भारत),
मॅग्नेट (चनिया, ग्रीस),
एंजल मास्क(व्हेनिस, इटली)

४.

मोर (बहारीन),
बाहुल्या (थायलंड)

५. - भातुकली (तुळशीबाग, पुणे)

६.

मॅग्नेट्स - १. क्रेटर लेक (पोर्टलँड, ओरेगन) २. यलोस्टोन नॅशनल पार्क (वायोमिंग) ३. जॉन्सन स्पेस सेंटर - नासा (टेक्सास) ४. मॅमॉथ हॉट स्प्रिंग, यलोस्टोन नॅशनल पार्क (वायोमिंग) ५. पावसात भिजलेलं सिॲटल (वॉशिंग्टन) ६. आमची मुंबई ७. सेंट ऑगस्टीन (फ्लोरीडा) ८. ब्रूकलीन ब्रीज, (न्यूयॉर्क) ९. टेक्सास १०. सॉल्ट लेक सिटी (युटाह) ११. लिबर्टी बेल (फिलाडेल्फीया, पेन्सिल्वेनिया) १२.पॉवेल्स बुक्स (पोर्टलँड, ओरेगन) १३.ट्युलीप फेस्टीवल (स्कॅगिट वॅली, वॉशिंग्टन) १४. क्लोंडायक गोल्ड रश नॅशनल पार्क (सिॲटल, वॉशिंग्टन)

७.

शोभेच्या वस्तू (ब्लॅक फॉरेस्ट, साल्झबुर्ग) ,
सान जिमिन्यॅनो पॉटरी, (इटली),
कूककूक क्लॉक (ब्लॅक फॉरेस्ट),
काऊ बेल (स्वित्झर्लंड)

भटकंती गिफ्ट शॉप

(लेखिका - किलमाऊस्की)

...तर मंडळी, आत्ताच आपण अनाहितांच्या घरात डोकावून स्मरणवस्तूंचं संकलन बघून आलो. आपल्या या प्रवासाची सांगता करतांना रिकाम्या हाती कसं परतायचं? "थोडा शॉपिंग तो बनता है ना!" म्हणून घेऊन आलो आहोत, भटकंती विशेषांकाच्या संपूर्ण टीमतर्फे एक सप्रेम भेट आमच्या वाचकांसाठी - **भटकंती विशेषांक कॅलेंडर!** - किलमाऊस्की या अनाहितेच्या डोक्यातून आलेली ही विशेष संकल्पना.

खालील लिंकवर क्लिक करुन कॅलेंडर डाऊनलोड करु शकता.

भटकंती विशेषांक कॅलेंडर (मिसळपाव.कॉम)

भटकंती विशेषांक कॅलेंडर (अनाहिता लोगो)

(चित्र आणि कॅलेंडर संकल्पना, डिझाईन-किलमाऊस्की.)

मलपृष्ठ

"अनाहिताचा अंक तयार करायचाय!"
या एका हाकेसरशी जगभरातून एकत्र आलेल्या मैत्रिणींच्या सामूहिक प्रयत्नांतून पूर्णत्वास आलेला अनाहिताचा आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेष *'भटकंती विशेषांक - २०१६'* आपल्यातल्या प्रत्येक हिरकणीस समर्पित!

संपादक - स्वाती दिनेश, मधुरा देशपांडे

अंकासाठी मोलाचं सहकार्य देणारी आमची संपूर्ण टीम
इडलीडोसा, ईशा१२३, गिरकी, Mrunalini, पलाश, पिलियन रायडर, प्रश्नलंका, प्रीतमोहर, पूर्वाविवेक, पद्मावति, रेवती, सानिकास्वप्निल, सुरन्गी, अजया, पैसा, किलमाऊस्की, मधुरा देशपांडे, स्वाती दिनेश,
पाहुण्या मैत्रिणी - आसावरी, मुग्धा, विकी
तंत्रज्ञ - प्रशांत, नीलकांत